
# यशवंतराव चव्हाण

## यांचे समीक्षालेखन व भाषणे



प्रा. डॉ. शिवाजीराव देशमुख




**प्रा. डॉ. शिवाजीराव मारुती देशमुख**

एम. ए. पीएच्. डी., मराठी विभाग,
रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, उस्मानाबाद


पीएच. डी. प्रबंधाचा विषय
'यशवंतराव चव्हाण : व्यक्ती आणि वाङ्मय'

१९९० पासून श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचलित तुळजापूर, उस्मानाबाद, पाचगणी येथे मराठी विषयाचे अधिव्याख्याता म्हणून काम केले.

रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात मराठी विभागात कार्यरत,

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे विविध समितींवर सदस्य म्हणून सक्रिय सहभाग.

मराठी भाषेचे डोळस अभ्यासक.
वाङ्मयीन नियतकालिकांमधून सातत्याने लेखन.
संशोधनपर लेख अनेक मासिकांतून प्रसिद्ध.
अनेक राज्य व राष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग व शोधनिबंध वाचन. एम्. फील. व पीएच्. डी. च्या विद्यार्थ्यांना संशोधन मार्गदर्शन.
विविध दैनिकांमधून दर्जेदार संशोधनात्मक लेखन.
लोकसाहित्याचे व्यासंगी अभ्यासक.
समकालीन व ग्रामीण साहित्याचा प्राधान्याने अभ्यास. समाजाभिमुख चिंतनशील व्यक्तिमत्त्व.
साहित्यासोबतच मराठी संस्कृती, समाज, राजकारण, प्रशासन इ. विषयी विशेष रुची.
विद्यापीठ अनुदान मंडळाची टीचर फेलोशिप प्राप्त.

# यशवंतराव चव्हाण यांचे समीक्षालेखन व भाषणे



प्रा. डॉ. शिवाजीराव देशमुख

कौसल्या पब्लिकेशन, सोलापूर



# यशवंतराव चव्हाण यांचे समीक्षालेखन व भाषणे

प्रा. डॉ. शिवाजीराव देशमुख
भ्रमणध्वनी : ९४२३०६७२८०

■

**प्रथमावृत्ती**
१ मे, २००९

■

**प्रकाशक**
प्रा. सौ. कौसल्या शिवाजीराव देशमुख
कौसल्या पब्लिकेशन
४/१८, विद्यानगर हौसिंग सोसायटी क्र. २
सिव्हिल हॉस्पिटलजवळ, सोलापूर ४१३००३
फोन : ०२१७/२३१९२४९

■

©प्रा. सौ. कौसल्या शिवाजीराव देशमुख

■

**मुखपृष्ठ व मांडणी**
सदाशिव जंगम

■

**मुद्रक**
योगेश जंगम
जंगम ऑफसेट प्रा. लि., पुणे
२५/१० नांदेड फाटा, सिंहगड रोड, पुणे ४११ ०४१
फोन : २४३९२७५९

■

**किंमत : २५० रुपये**

# अर्पण

गेल्या एक तपाहून अधिक काळ
सातत्याने जिव्हाळा
आणि
प्रेम देऊन मला
लेखनाची प्रेरणा देणारे
माझे श्वशुर,
इतिहास संशोधक
श्री. गोपाळराव देशमुख
यांच्या ज्ञाननिष्ठेस
सादर समर्पण !

# शुभेच्छा



**'यशवंतराव चव्हाणांचे समीक्षालेखन व भाषणे'** या पुस्तकाचे लेखक प्रा. डॉ. शिवाजीराव देशमुख यांनी या पुस्तकाला शुभेच्छापर दोन शब्द लिहिण्याचा आग्रह केला. मी आनंदाने स्वीकारला नव्हे, तर मला आनंद वाटला. या शुभेच्छाच्या निमित्ताने सदर जे संशोधनात्मक आणि विश्लेषणात्मक विचार मांडलेले आहेत त्याचेही वाचन करण्याची संधी मला मिळाली. म्हणून हे पुस्तक उत्सुकतेने व काळजीपूर्वक वाचून पाहिले.

यशवंतराव चव्हाण हे मुरब्बी राजकारणी, पुरोगामी विचारवंत, जनताभिमुख लोकनेते याप्रमाणेच साहित्य, ललितकला या विषयी जिव्हाळा बाळगणारे रसिक अग्रणी होते. ते साहित्यप्रेमीच नव्हे तर साहित्यनिर्मिक आणि जीवनभाष्यकार होते. त्यांच्या लेखनामागील प्रेरणा समकालीन वर्तमानाशी निगडीत असून त्यांच्या साहित्यात समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेला गतिमान करण्याची ताकद आहे. त्यांचे साहित्य अव्वल दर्जाचे आहे. साहित्य निर्मितीही विविधांगी स्वरूपाची आहे. डॉ. देशमुख यांनी प्रथमच त्यांच्या साहित्याला योग्य न्याय देऊन यशवंतरावांच्या जीवनातील घडामोडी, जडणघडण, त्यांच्या व्यक्तिमत्त्वावरील संस्कार, साहित्यनिर्मिती, प्रासंगिक भाषणे यांचा सोदाहरण विचार प्रस्तुत पुस्तकात केला आहे. यशवंतरावांच्या जीवनधर्माशी, जीवनदृष्टीशी त्यांच्या वाङ्मयीन आविष्काराचे संदर्भ तपासून त्यातील सुसंवाद प्रा. डॉ. देशमुख यांनी अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे. एक लेखक कसा घडत जातो, एखाद्या संवेदनशील मनाची जडणघडण कशी होते व त्याचे शब्द कसे आकार घेतात, याचा बोध या पुस्तकातून होतो.

प्रा. डॉ. देशमुख यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक व चिकाटीने यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनातील ठळक घटना व त्यांची समीक्षात्मक साहित्यनिर्मिती याचा समग्र विचार या पुस्तकात केला आहे. यशवंतराव चव्हाण हे व्यक्तिमत्त्व म्हणजे त्यांचे श्रद्धास्थान! प्रस्तुत लेखकाचे अमरापूर हे गाव यशवंतरावांच्या देवराष्ट्र, विटा, कराड या गावानजिक असल्याने त्यांच्यावरील अपार श्रद्धेतून व त्यांच्या प्रती असलेल्या निष्ठेतून साहेबांच्या चरित्राबद्दल आणि विविधांगी लेखनाबद्दल अभ्यासपूर्ण विवेचन केले आहे. यशवंतरावांची कारकीर्द दैदीप्यमान होती. त्यांच्या राजकीय प्रतिमेइतकीच त्यांची साहित्यिक आणि समीक्षक म्हणून प्रतिमा लक्षणीय आहे. राजकारणाच्या व्यापात

राहूनही त्यांनी आपल्यातील एक रसिक, समीक्षक, लेखक सजग ठेवला. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे हे विविध पैलू या पुस्तकाच्या रूपाने विस्ताराने समोर आले आहेत. हे पुस्तक म्हणजे केवळ त्यांचे चरित्र कथन नव्हे. यशवंतरावांचे साहित्य केंद्रस्थानी ठेवून डॉ. देशमुख यांनी सौष्ठवपूर्ण वाङ्मय शैलीने यशवंतरावांच्या काळातील सुवर्णपान उलगडले आहे. लेखक अधिव्याख्याता असल्याने लेखनाचा विवेक ढळू दिलेला नाही, असे हे पुस्तक वाचताना लक्षात येते.

यशवंतरावांचे स्वभावविशेष, व्यक्तिविशेष, जीवनविशेष दर्शवताना त्यांचे कुटुंब, परिवार, प्रसंग घटना यांचे विवेचन करताना त्यांनी काल्पनिकतेचा आश्रय घेतला नाही. शिवाय यशवंतरावांच्या सतेज प्रकाशझोतात इतर व्यक्तींनाही उठावदार केले आहे. तत्कालीन परिस्थितीतील वाद, स्पर्धा, हितसंबंध, राग, लोभ यांच्या धुराळ्यात ज्या गोष्टी स्पष्ट समजत नाहीत किंवा दिसत नाहीत त्यांचे बारकावे, फरक आणि वैशिष्ट्ये कालांतराने अतिशय स्पष्टपणे ध्यानात येऊ लागतात. यशवंतरावांच्या पश्चात आज जवळपास पंचवीस वर्षांनी या साहित्यिकाच्या जीवनाकडे पाहताना मानवतावाद हा प्रमुख व मौलिक असा पैलू दिसतो. समाजातील तळाच्या मानवतेवर माणूस म्हणून मायेची पखरण घालणारे जे थोडे राज्यकर्ते झाले त्यात यशवंतरावांचे नाव प्रामुख्याने घेतले जाते. 'माणूस' हा यशवंतरावांच्या चिंतनाचा विषय होता. तोच त्यांचा लेखन विषयही होता. म्हणून त्यांचे व्यक्तिमत्त्व बहुपेडी, बहुकेंद्री, विविधरंगी असले तरी 'मानवतावाद' हाच केंद्रवर्ती होता. त्यांचे ललितप्रवृत्तीचे लेखन असो अथवा त्यांची वैचारिक भाषणे असोत, त्यांच्या विचारांचा मूळ गाभा माणूस होता. त्यांचे या ग्रंथातील विचार आजच्या वादळी जीवनात आपल्याला वाट दाखवायला पूर्णपणे समर्थ आहेत.

या पुस्तकात यशवंतरावांच्या साहित्याच्या आधारे त्यांचे समीक्षणात्मक लेखन आणि भाषणकौशल्य, अथांग महासागरासारखे व्यापक कसे आहे याची सोदाहरण चर्चा अतिशय मार्मिकपणे केली आहे. समीक्षक म्हणून यशवंतराव प्रथमच वाचकांसमोर येत आहेत. भाषा, कल्पनाशक्ती, वाङ्मयनिर्मिती आणि जीवन यांचे परस्पर नाते काय असते, संस्कृतीशी त्याचा अनुबंध कसा असतो हेही प्रस्तुत पुस्तकात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. शिवाय यशवंतरावांची निर्भिड भूमिका त्यांनी तेवढ्याच समर्थ शब्दांत कथन केली आहे. यशवंतरावांचे लेखन प्रामुख्याने आत्मचरित्रपर, प्रवासवर्णनपर, शब्दचित्रणात्मक, पत्रात्मक आणि ललितगद्य स्वरूपाचे आहे. यशवंतरावांच्या प्रासंगिक लेखांचा व भाषणांचाही या पुस्तकात विचार केला आहे. 'सह्याद्रीचे वारे', 'युगांतर', 'कृष्णाकाठ', 'भूमिका' इत्यादी ग्रंथ साहित्याचा एक अनमोल ठेवा ठरावेत असे आहेत. भाषाप्रभू, लोकाभिमुख नेता म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख डॉ. देशमुख यांनी या पुस्तकातून करून दिलेली आहे.

खरे म्हणजे लोकांना योग्य तऱ्हेने, योग्य ठिकाणी नेतो तो नेता. स्वत:चे उदात्त उदाहरण घालून देणे, प्रगल्भ प्रात्यक्षिक निर्माण करणे म्हणजे नेतृत्व करणे होय. नेता हा नीतिमान असावा लागतो. तसा तो असलाच पाहिजे, हे यशवंतरावांच्या लेखनातील व भाषणातील विचार सर्वांनाच प्रेरणादायी ठरणारे आहेत. भाषण करताना त्यांना कधी भाषण वाचून दाखवावे लागले नाही. ते त्यांना आपोआप स्फूरत असे. समोरच्या जनसमुदायाला प्रक्षोभित करण्याचे काम त्यांनी कधी केले नाही. हळुवारपणे त्यांच्या मनाचे एकेक कप्पे ते उघडत असत. म्हणून लोक तल्लीन होऊन ऐकत असत. भाषणात कसलाही दर्प नसे. राजकारणाची भाषा नसे. त्यातून त्यांचे शालीन, नम्र व्यक्तिमत्त्व प्रकट होत असे. त्यांच्या भाषणात व लेखनात समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेला प्रभावित करण्याची ताकद आहे. त्यांचे साहित्य हे वास्तवाला सामोरे जाणारे आहे. तत्कालीन काळाचा सखोल वेध त्यांनी घेतला. त्यांचे साहित्य हे खऱ्या अर्थाने देशी आहे. त्याचे रूप, रंग, गंध, आणि ढंग सर्व काही महाराष्ट्रीय मातीचे सौंदर्य घेऊन आले आहे. त्यांचे साहित्य वर्तमानकाळाशी निगडीत आहे. भूतकाळाला पचवणारी ताकद आणि भविष्यकाळाची दृष्टी त्यात आहे. अशा त्यांच्या समग्र व्यक्तिमत्त्वाचा, साहित्याचा प्रस्तुत पुस्तकात परिचय करून देऊन त्यांच्या साहित्याची वैशिष्ट्ये नोंदवली आहेत. हे मोलाचे कार्य डॉ. देशमुख यांनी अत्यंत कष्टाने, तळमळीने व तन्मयतेने केले आहे. त्याबद्दल त्यांचे कौतुकच केले पाहिजे. या निमित्ताने यशवंतराव चव्हाणांच्या साहित्याचे नवे साधन म्हणून उपयोग केला तर त्यांच्या कार्याचे, साहित्याचे, विशालत्व अधिकाधिक स्पष्ट होईल यात शंका नाही. या पुस्तकाच्या रूपाने यशवंतरावांचे जीवन व साहित्याचे परीक्षण वाचकांच्या हाती पडत आहे, ही अतिशय आनंदाची व अभिनंदनीय घटना आहे. वाचक, अभ्यासक या ग्रंथाचे स्वागत करतील याची मला आशा आहे. या निमित्ताने माझ्या या पुस्तकास व लेखक डॉ. शिवाजीराव देशमुख यांना शुभेच्छा !

**मा. नामदार सुशीलकुमार शिंदे**

केंद्रीय ऊर्जामंत्री, भारत सरकार

# पुरस्कार



डॉ. शिवाजीराव देशमुख यांच्या यशवंतराव चव्हाण व्यक्ती आणि वाङ्मय या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने सादर केलेल्या प्रबंधातील काही प्रकरणे घेऊन हे त्यांचे दुसरे पुस्तक पुढे येत आहे. ही अत्यंत आनंदाची बाब आहे.

डॉ. देशमुख यांनी अत्यंत आत्मीयतेने तरीही तटस्थ संशोधकीय शिस्त पाळून यशवंतरावांच्या वाङ्मयाची चिकित्सा केली आहे. यशवंतराव हे केवळ राजकीय व्यक्तिमत्त्व नव्हते. त्यांच्यात उपजत साहित्यिक जसा विद्यमान होता, तसाच एक समीक्षकही सजग होता.

डॉ. देशमुख यांनी यशवंतरावांचे समीक्षा लेखन व त्यांचे प्रासंगिक लेखन याचा नम्रतापूर्वक शोध घेवून आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

यशवंतराव हे जीवनवादी साहित्यिक होते. समाज हा त्यांनी आपल्या साहित्याचे आशय द्रव्य मानले. त्यांची प्रखर सामाजिक जाणीव हीच त्यांची लेखन प्रेरणा होती. यशवंतरावांचा समीक्षा ग्रंथ जरी आज उपलब्ध नसला, तरी वेळोवेळी, प्रसंगोपात त्यांनी आपली वाङ्मय विषयक भूमिका, जाण, संकल्पना, मते प्रकट केली आहेत. त्यातून एक समीक्षक या नात्याने त्यांचे स्थान डॉ. देशमुख सिद्ध करतात. यशवंतराव जाणिवेला अत्यंत महत्त्व देतात. लेखनाची पृथगात्मता त्यातील जाणिवेवर अवलंबून असते, असे यशवंतराव म्हणतात. त्यादृष्टीने साहित्य ही समाजाची सांस्कृतिक गरज भागवण्यासाठी निर्मिती असल्याने ती समकालीन व काल जाणिवेशी संवादी असते.

माणसाचे कर्तृत्व समाजसापेक्षच असते ही भूमिका असल्याने यशवंतरावांची वाङ्मयीन दृष्टी जीवनातील समाजनिष्ठ असल्याचे दिसते. डॉ. देशमुख यांनी यशवंतरावांच्या या जीवनदृष्टीचा तळ शोधून त्यामागील प्रेरकतत्त्वांचा परामर्श घेतला आहे. बालपणी यशवंतरावांनी कविता केल्या. कथा-कादंबऱ्या लिहिल्या पण कादंबरी मात्र कोणत्या तरी स्टेशनवर राहून गेली.

यशवंतरावांनी कादंबरी, कविता, नाटक या विषयी आपली मते, टिप्पणी नोंदवली आहेत. प्रत्येक पुस्तकाच्या मागील पृष्ठावर पुस्तक वाचून त्या संबंधीची मते ते नोंदवतात. त्यातून त्यांच्याच एका समीक्षक दृष्टीचा शोध लेखकाने घेतला आहे. कवींमध्ये त्यांना केशवसुत का आवडतो हे ते खास नोंदवतात. भाऊसाहेब खांडेकर त्यांना प्रिय वाटतात. माडगूळकरांच्या गीतांची ते प्रशंसा करतात. त्यांची नाट्यविषयक

भूमिका भरतमुनीशी जुळणारी वाटते.

नाटक ही लोकप्रबोधनाच्या दृष्टीने त्यांना मोलाची वाटतात. त्यातील मूल्यांचे चिंतन त्यांना विशेष लक्षणीय वाटते.

४३ वे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन १९६१ च्या अध्यक्षपदावरून त्यांनी नाटकाविषयी मूलभूत विचार प्रकट केले आहेत. डॉ.देशमुखांनी यशवंतरावांची नाट्यआवड व त्यांच्यावर कीर्तन, लोकरंगभूमी यांचे कसे संस्कार झाले याचा शोध घेतला आहे.

यशवंतरावांनी दिलेली भाषणे व त्यांचे प्रासंगिक लेखन याचाही छान परामर्श लेखक डॉ. देशमुख यांनी घेतला आहे. शब्दांवरची त्यांची हुकुमत, त्यांच्या शब्दातील आशय, त्यांची वक्तृत्वशैली, त्यातील पैस व आवाजातील चढउतार, नाट्यगुण, मांडणी, शब्दांची फेक व चातुर्य या सर्वांचा डॉ. देशमुख यांनी उदाहरणासह करून दिलेला परिचय अत्यंत वेधक आहे. त्यातून यशवंतराव आपल्या पुढ्यात प्रकटतात असे वाटते. यशवंतरावांच्या विषयांची विविधता व मांडणीतील कौशल्य, भाषिक क्षमता या सर्वांचा अभ्यास वाचकाला थक्क करतो.

डॉ. शिवाजी देशमुख यांनी त्यांच्या चिंतनातून, निरलस प्रयत्नातून यशवंतरावांच्या ध्यासातून घेतलेल्या या शोधाला ध्यासपर्वच म्हणावे लागेल. यशवंतराव हे डॉ. देशमुख यांचे मनोदैवत. हे लेखन म्हणजे आपल्या पूजका विषयी श्रद्धाभाव तरीही अभ्यास विषय म्हणून असलेला तटस्थ चिंतकाचा संयमशील दृष्टिकोन यांच्या समन्वयातून साकारलेले एक अक्षरशिल्प होय. डॉ. देशमुख यांच्या ग्रंथास शुभेच्छा देतो व पुढेही त्यांच्याकडून अधिकाधिक लेखन व्हावे अशी अपेक्षा व्यक्त करतो.

डॉ. शिवाजी देशमुख यांचा केवळ मी निमित्तमात्र मार्गदर्शक आहे. सर्व श्रेय त्यांना व त्यांच्या सौ. कौसल्याताई देशमुख वहिनी यांना आहे. त्यांचे प्राचार्य डॉ. रमेश दापके सर्व मित्र व सहकारी यांचे पुण्य त्यांच्या पाठीशी आहेच. एका महत्त्वपूर्ण विषयावरचे लेखन प्रसिद्ध केल्याबद्दल प्रकाशकास धन्यवाद.....

**डॉ. विद्यासागर पाटंगणकर**
उपप्राचार्य, प्रपाठक व मराठी विभाग प्रमुख
बलभीम महाविद्यालय, बीड

# मनातले...

महाराष्ट्राचे शिल्पकार मा. यशवंतरावजी चव्हाण यांच्या साहित्याचे आणि त्यांच्या भाषणांच्या अंगाने जाणवलेल्या विविध प्रवृत्तींचे व त्यांच्या कार्याचे एक 'यशवंतप्रेमी' म्हणून विहंगमावलोकन करावे, त्यातील साहित्यिक मूल्ये जाणून घ्यावीत या हेतूने 'यशवंतराव चव्हाण यांचे समीक्षालेखन व भाषणे' त्यांच्या लक्षावधी चाहत्यांच्या हाती सुपुर्द करताना मला अतिशय आनंद होत आहे.

मा. यशवंतराव चव्हाण राजकारणी म्हणून जेवढे प्रसिद्ध होते, त्यापेक्षाही एक लेखक, रसज्ञ साहित्यिक व मर्मज्ञ टीकाकार म्हणून साहित्यक्षेत्रात परिचित होते. या माध्यमातून त्यांनी वाचकांशी दृढ नाते जोडले. त्याबरोबरच, साहित्य, नाट्य, राजकारण, सहकार, सामाजिक संदर्भ घेऊन आलेले विषय यावरील आपल्या भाषणांनी ते श्रोत्यांशी बोलत राहिले.

मा. यशवंतराव नाना क्षेत्रांमध्ये वावरले आणि त्यांच्या फक्त वावरण्याने त्या त्या क्षेत्रामध्ये चैतन्य खेळत राहिले. त्यांच्यामुळे अनेक विधायक उपक्रमांना चालना मिळाली. कल्पकतेला आणि धडपडीला दिशा मिळाली. समाजात व राजकारणात डोळे व कान उघडे ठेवून सावधपणे जे जे पाहिले, अनुभवले व ऐकले ते ते त्यांनी आपल्या भाषणाचा विषय ठरवून विस्ताराने परंतु आकर्षकपणे व भाषाप्रभुत्वाने सादर केले आहे. अलौकिक शैलीदार लिखाणामुळे त्यांनी वाचकावर मोहिनी टाकली होती. अशी माणसे होती म्हणून ज्येष्ठांना आपल्या जगण्याचे सार्थक कळते आणि तरुणांना नवी क्षितिजे धुडाळण्याचे बळ मिळते. ती असतात म्हणून वर्तमानाला भूतकाळाचा सुंदर आशीर्वाद मिळतो आणि भविष्याला स्वप्ने साक्षात करण्याची उमेद मिळते.

मा. यशवंतरावांनी जवळजवळ सर्व वाङ्मय प्रकारांचा रसिक वृत्तीने आस्वाद घेतला. यशवंतरावांनी साहित्याची सेवा केली असे म्हणण्यापेक्षा साहित्य आणि समाज या दोन्हींची सेवा केली असे म्हणणे योग्य ठरेल. त्यांचे चरित्र पाहता ते लौकिक संसारापेक्षा राजकारणात अधिक रमलेले दिसतात. पण राजकारणाच्या रणधुमाळीत राहून उसंत मिळेल तेव्हा साहित्य निर्मितीच्या प्रक्रियेपासून रसिकांवर होणाऱ्या परिणामापर्यंतच्या अनेक प्रश्नांचा त्यांनी वेगवेगळ्या अंगांनी विचार केला आहे. त्यामुळेच त्यांच्या लेखनाला आणि भाषणाला वाङ्मयीन दर्जा प्राप्त होतो. ते संवेदनशील वृत्तीचे असल्यामुळे स्वकालिन समाजस्थितीचा आणि भविष्यकालीन परिणामांविषयी साहित्यनिर्मितीच्या माध्यमातून त्यांनी सतत विचार केला. वाङ्मयाच्या अंगाने सुरू होणारा हा विचार देश, काल, समाजस्थिती आणि व्यक्ती

विकासाच्या दिशेनेही प्रवाहित होता. त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे व साहित्याचे मूल्यमापन त्यांच्या सर्वस्पर्शी जीवनाशी निगडीत आहे. त्यांचे जीवन हे बहुरंगी आहे. राजकारणी, तत्त्वचिंतक, साहित्यिक, समाजसेवक व आस्वादक समीक्षक असे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू आहेत.

मा. यशवंतराव चव्हाणांनी साहित्य क्षेत्रात स्वत:ची मुद्रा उमटवली. आत्मचरित्रात्मक, चरित्रात्मक लेखन केले. व्यक्तिचित्रणे, आठवणी आणि प्रवासवर्णने लिहिली. ग्रंथांना प्रस्तावना लिहिल्या. वाङ्मयीन पत्रव्यवहार केला. एवढेच नव्हे तर वाङ्मय व्यवहारासाठी स्वत:ची मते सडेतोडपणे मांडली. साहित्य आणि समाज, माणूस आणि साहित्य, संस्कृती, भाषिक व्यवहार, साहित्यिकांच्याकडून अपेक्षा, साहित्य समीक्षाविषयक विचार याबद्दल त्यांनी ठीकठिकाणी आपली भूमिका मांडली. महाराष्ट्र राज्याच्या रचनेनंतर मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यामध्ये कमालीचे परिवर्तन झालेले आहे. अनेक वाङ्मयीन प्रवाह निर्माण झाले. हे सर्व प्रवाह आणि प्रवृत्ती सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासाचा अविभाज्य घटक असल्याचे मत मा. यशवंतरावांनी ठामपणे मांडले आहे.

'यशवंतराव चव्हाणांचे समीक्षालेखन व भाषणे' या पुस्तकात त्यांची साहित्यिक कामगिरी, समीक्षालेखन, भाषणे या क्षेत्रात वेगवेगळ्या ठिकाणी आणि वेगवेगळ्या निमित्ताने त्यांनी कार्य केल्याने त्याला एक बहुमुखी असे स्वरूप आलेले आहे. पण त्यांचे समीक्षालेखन केवळ पुस्तकी न राहता एका सांस्कृतिक कार्याचे रूप धारण करते. त्यांची अनेक भाषणे साहित्यविषयक आहेत आणि त्यामध्ये यशवंतरावांमधल्या रसिकाइतकाच, त्यांच्यातील समीक्षकही सजग आहे. पण या सर्व समीक्षाविचारातून व भाषणामधून एक धागा सलगपणे सर्वत्र दिसतो, तो आहे यशवंतरावांच्या साहित्यप्रेमाचा. हे प्रेम संकुचित नाही. त्यात व्यापकता आहे. तशीच सर्वसमावेशकता आहे. त्यांची भाषा हे तर त्यांचे या क्षेत्रातील बलस्थानच होते. ह्या अमोघ शक्तीने त्यांनी सर्व रसिकांची मने जिंकली. यशवंतरावांचे साहित्य जुन्या पिढीतील अग्रगण्य साहित्यिकांना प्रेरणा देणारे व नव्या पिढीला नवे आश्वासन देणारे ठरावे.

औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांतर्गत पीएच. डी.साठी सन २००२ साली सादर केलेल्या संशोधन प्रबंधाला पुस्तकरूपात बांधत आहे. हा मार्ग आक्रमण करत असताना गुरुवर्य डॉ. विद्यासागर पाटंगणकर हे मार्गदर्शक म्हणून लाभले हे मी माझे भाग्यच समजतो. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच प्रस्तुत पुस्तकास निश्चित दिशा प्राप्त झाली व पुस्तक आकार घेऊ शकले. त्यांच्या शुभेच्छा व प्रेमळ सूचनांची मला सतत संगत लाभलेली आहे. त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच! हे गुरुऋण कधी फिटणारे असते काय?

मा. नामदार सुशीलकुमार शिंदेसाहेब (ऊर्जामंत्री, भारत सरकार) हे राजकीय जीवनातले एक चैतन्यशील, समृद्ध व्यक्तिमत्त्व. समाजाचे चालतेबोलते संस्कृतीपीठ. आमच्यासाठी ते दीपस्तंभ आहेत. त्यांनी या पुस्तकास वेळात वेळ काढून शुभेच्छा दिल्याबद्दल त्यांचा मी ऋणी आहे.

लेखनाचा वारसा सांगावा अशी परंपरा किंवा साहित्यिक कार्य वगैरे आमच्या कुटुंबात नसले तरी आमच्या श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा. अभयकुमार साळुंखेसाहेब, सचिव सौ. शुभांगीताई गावडे, माजी शिक्षक आमदार जी. एल. ऐनापुरे, संस्थेचे सर्व आजी-माजी पदाधिकारी, विवेकानंद कॉलेजचे माजी प्राचार्य डॉ. अशोकराव जगताप, माजी प्राचार्य उत्तमराव देशमुख, माजी प्राचार्य अनंतराव पाटील यांच्याच प्रेरणेने व आशीर्वादाने हे पुस्तक सिद्ध होत आहे. या पुस्तकाच्या निमित्ताने अंशत: तरी त्यांच्या ऋणातून मुक्त होण्याचा प्रयत्न आहे.

आजवर यशवंतराव चव्हाणांच्या संबंधी बरेच लेखन प्रसिद्ध झालेले असले तरी त्यावर विसंबून न राहता मूळ साधने स्वत: धुंडाळून त्याची चिकित्सा करा, त्यांच्या विविध लेखनातून व भाषणातून वाचकांशी असलेले दृढ नाते सिद्ध करा. वाचकांना ही एक आनंदाची पर्वणी वाटेल असे सांगून सदैव माझ्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिले व समरसून सहकार्य केले. या लेखन काळात आलेल्या अनेक अडचणींतून मार्ग काढण्यास अग्रेसर असणारे माझ्या कॉलेजचे प्राचार्य, स्वामी विवेकानंद संस्थेचे आजीव सेवक व अर्थसचिव, मा. रमेश दापकेसाहेब व ज्येष्ठ सहकारी प्रा. आनंदा जाधव यांचा मी मन:पूर्वक आभारी आहे.

माझ्या विनंतीला मान देऊन यशवंतराव चव्हाणांच्या प्रेमामुळे व मी धरलेल्या आग्रहामुळे उस्मानाबाद पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष श्री. भारत गजेंद्रगडकर यांनी पुस्तकाचे हस्तलिखित तपशीलवार वाचले व आवश्यक तेथे दुरुस्ती सुचवली. कार्यबाहुल्यामुळे व्यस्त असतानाही अधिकारवाणीने मार्गदर्शनपर अशा मौलिक सूचना दिल्या आणि पुस्तकाला साजरे कोंदण चढविले. त्यांचाही मी अत्यंत ऋणी आहे.

या विषयावर मी पुस्तक लिहित आहे हे कळताच अनेकांनी मला सहकार्य केले. प्राचार्य यशवंत पाटणे, प्रा. डॉ. आर. जी. पाटील, प्रा. एल. जी. जाधव, श्री. डुकरे, प्रा. डॉ. प्रल्हाद लुलेकर, डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. सुदाम जाधव, माझ्या महाविद्यालयातील सर्व सहकारी प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, ग्रंथपाल, श्री. नेताजी पाटील, सहग्रंथपाल श्री. सी. ए. कवडे, विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर येथील ग्रंथपाल श्री. संभाजी मोरे, वेणुताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट कराड, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र कराड येथील कै. विठ्ठल पाटील, श्री. अनिल पाटील यांची फार मोलाची मदत झाली. माझे परमस्नेही सिव्हिल कॉन्स्ट्रॅक्टर श्री. विजय जाधव,

श्री. सूर्यकांत क्षीरसागर, माजी सभापती ॲड. नंदकुमार पवार मंगळवेढा यांनी हे त्यांचे क्षेत्र नसतानाही वेगवेगळ्या स्वरूपात मदत करून धैर्य दिले. कोणतीही मदत मागण्याचा अवकाश, विनाविलंब त्यांनी होईल तेवढे सहकार्य केले. या सर्वांचा मी ऋणी आहे.

प्रबंध लेखनाच्या वेळी व आता पुस्तकाच्या रूपाने हे कार्य सुरळीतपणे पार व्हावे म्हणून माझी पत्नी सौ. प्रा. कौशल्या देशमुख सदैव माझ्या पाठीशी कणखरपणे उभी राहिली. माझे मनोधैर्य वाढवले. पुस्तकाची मुद्रणप्रत करण्याचे काम काळजीपूर्वक, हौसेने केले. माझे सर्व कुटुंबीय, दोन्ही मुली शिवानी व शर्वरी यांच्या मदतीचे मूल्य काय वर्णावे?

माझे सासरे श्री. गोपाळराव देशमुख यांनी या विषयाला चालना दिली. त्यांचे बहुमोल मार्गदर्शनही मला लाभले. कौसल्या पब्लिकेशनच्या प्रकाशिका यांनी माझ्या या ग्रंथाच्या प्रकाशनाची जबाबदारी हौसेने स्वीकारली. हे पुस्तक म्हणजे त्यांच्या प्रेरणेचे फळ आहे.

यशवंतराव चव्हाण यांच्यासंबंधी अनेक मान्यवर लेखकांनी लिहिलेल्या ग्रंथांचा संदर्भासाठी उपयोग केला आहे. तसेच यशवंतराव चव्हाणांच्या लिखित व अलिखित भाषणांचा आम्हास या ग्रंथलेखनासाठी अमूल्य उपयोग झाला. या सर्व महनीय व्यक्तींचे व सहकार्य केलेल्या संस्थांचा मी अतिशय आभारी आहे.

अल्पावधीत हे पुस्तक छापून यशवंतरावांच्याबाबत अत्यंत आदरभाव असणारे पुणे येथील जंगम ऑफसेटचे मालक सदाशिव जंगम, त्यांचे चिरंजीव महेश जंगम, योगेश जंगम यांनी या पुस्तकाची अत्यंत आत्मीयतेने मांडणी केली. विषयानुरूप उत्कृष्ट मुखपृष्ठ तयार केले व आपुलकीने या कामी स्वत: लक्ष घालून हे पुस्तक दर्जेदार व निर्दोष करण्यास मोलाचे सहकार्य केले. त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार.

दि. १ मे २००९ रोजी महाराष्ट्र दिन. यानिमित्त त्यांच्या ललित साहित्य स्मृतीला अर्पण केलेले हे पुस्तक वाचकांच्या पुढे मी नम्रतेने ठेवीत आहे. सूज्ञ वाचक त्याचा स्वीकार करतील ही अपेक्षा !

दि. १ मे २००९

**– प्रा. डॉ. शिवाजीराव देशमुख**

# अंतरंग

—

प्राक्कथन / १५
साहित्यविषयक भूमिका / २५
ललित वाङ्मयप्रकारांची समीक्षा / ४३
ललितगद्याचे आकलन व समीक्षा / ६६
जीवननिष्ठ समीक्षादृष्टी / ७८
भाषणे / १०१
शैक्षणिक व सामाजिक आशयनिष्ठ भाषणे / १२१
प्रासंगिक लेखन / १७०
समारोप / १७५





प्रकरण १

# प्राक्कथन

मराठी साहित्यात प्राचीन, आधुनिक आणि समकालीन अशा परंपरा मानल्या जातात. साधारणत: १९४५ नंतरच्या साहित्याला 'समकालीन साहित्य' असे नाव देण्यात येते. १९४५ ते १९६० आणि १९६० ते १९८५ असे समकालीन साहित्याचे दोन कालखंड मानले जातात. १९४५ च्या आसपास देशपातळीवर व आंतरराष्ट्रीय पातळीवर काही महत्त्वपूर्ण घटना घडल्या. दुसरे जागतिक महायुद्ध, भारताचे स्वातंत्र्य, भारत-पाकिस्तान फाळणी, महात्मा गांधी यांची हत्या यासारख्या काही ऐतिहासिक घटनांचा समावेश त्यामध्ये करता येईल. या घटनांचा समाजमनावर दीर्घकाळ परिणाम झाला. आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक अशा विविध पातळींवरील जीवनसंदर्भ बदले. त्याचा मराठी साहित्यावर परिणाम झाला. त्यातून नवनवीन वाङ्मयप्रवाह उदयाला आले. वास्तववाद व सौंदर्यवाद यावर भर देणारे साहित्य निर्माण झाले व अस्तित्ववादाला जवळ करणाऱ्या साहित्यिक कलाकृती निर्माण होऊ लागल्या. 'समकालीन' साहित्य म्हणजे जे साहित्य आपल्या काळाबरोबर आहे. ज्या काळात ते निर्माण होत असते त्या काळाचे प्रतिबिंब त्यात आहे. त्या काळातील विचार, जाणिवा, मते ज्या साहित्यातून व्यक्त होतात असे साहित्य. ''यशवंतरावांचे साहित्य हे समकालीन साहित्य आहे. त्यांच्या साहित्यातून त्या काळातील घटनांचे पडसाद उमटलेले दिसतात. त्या काळातील मानवाच्या इच्छा - आकांक्षा, प्रयत्न, असहायता, पराभव, वेदना, विद्रोह, स्वप्ने इ. आविष्कार पाहावयास मिळतो. म्हणून अशा काळाशी आणि त्या काळातील परिस्थितीशी जवळचे नाते सांगणाऱ्या यशवंतरावांसारख्या अव्वल दर्जाच्या ललित लेखकाचा व साहित्याचा विचार करता येईल.

महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या राजकारणातही यशवंतरावांनी आपले मराठी वेगळेपण सिद्ध केले. एका सर्वसामान्य खेड्यात जन्मलेली व्यक्ती जगाच्या कानाकोपऱ्यात जाऊन पोहोचली. मला यशवंतरावांची साहित्यातून ओळख झाली ती

अभ्यासक्रमात त्यांच्या वाङ्मयाचा समावेश झाल्यामुळे. त्यातूनच यशवंतरावांच्या जीवनाचे एक एक पैलू उलगडत गेले. त्याअगोदर त्यांच्याबद्दल एक प्रकारचा आदर आणि कुतूहल होतेच. कारण मी व यशवंतराव चव्हाण एकाच परिसरातील आहोत. पुढे यशवंतरावांचे साहित्य अभ्यासत गेल्यावर, एक व्यक्ती म्हणून, एक वक्ता म्हणून, एक राजकारणी म्हणून, एक साहित्यिक म्हणून आणि एक माणूस म्हणून त्यांचा अभ्यास करावा असे वाटू लागले.

माझे गाव विट्यापासून जवळ असल्याने व देवराष्ट्र हे साहेबांचे आजोळचे गावसुद्धा माझ्या गावापासून जवळ असल्याने त्यांच्या लहान वयातील काही आठवणी माझ्या कानावर पडत गेल्या. त्यांच्या या आठवणींचा परिणाम माझ्यावर झाला. पुढे महाविद्यालयीन शिक्षण कराड येथे झाल्याने यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल आकर्षण वाटू लागले. त्यांचा मोठेपणा मला स्पर्शून गेला. त्यातूनच त्यांच्याबद्दल लिहिण्याची खरी प्रेरणा मिळाली.

मी प्राध्यापक असल्यामुळे माझा तरुण विद्यार्थ्यांशी सतत संबंध येतो. या तरुणांमध्ये साहित्याची जाण फारच थोड्या प्रमाणात आढळते. ज्या थोड्याफार तरुणांना ती आहे त्यांच्या विचारांमध्ये प्रगल्भता, ओघवती शैली यांचा अभाव आहे. सामाजिक प्रश्नांची जाणीव कमी प्रमाणात आहे. त्यांच्याकडे बुद्धी आहे पण तिला मार्गदर्शन आणि दिशा मिळत नाही. त्यामुळे आज दर्जेदार नवीन साहित्यकृतींचाही समाजात अभाव जाणवतो. साहित्यातून समाजाचे दर्शन होते आणि समाजाला साहित्यातून दिशा मिळते. मोठ्या लोकांची चरित्रे वाचून समाज प्रेरित होतो व सामाजिक संकटांच्या वेळी समाजाला दिशा मिळते. अशा प्रकारे आजच्या पिढीतील तरुणांची अमर्याद शक्ती भारतीय नवसमाज निर्मितीच्या कार्याला कारणी लागावी. यशवंतरावांचा आदर्श त्यांच्यासमोर राहावा, मानवी मूल्यांचा उच्च आदर्श निर्माण व्हावा यासाठी त्यांच्या साहित्याचा अभ्यास होणे आवश्यक आहे. साहित्यातून व्यक्त झालेल्या त्यांच्या जीवनातील आठवणींचा, आपले मत व्यक्त करण्याचा मोह सर्वांनाच होतो. यशवंतराव चव्हाण हे अपयशाने न खचणारे व यशाने हरखून न जाणारे. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव लेखकावर पडला. म्हणून त्यांचे विचार, त्यांच्यावरील ग्रंथ, त्यांच्यावरील सर्व प्रकारचे साहित्य, म्हणजेच साहित्यातील यशवंतराव व साहित्यिक यशवंतराव यांचा अभ्यास करण्याचा ओढा माझ्या मनात निर्माण झाला.

मला असे म्हणावेसे वाटते की देशाची उंची वाढते ती केवळ त्यातील महान पर्वत व नद्या यांच्यामुळे नाही तर तेथील क्रियाशील विचारवंतांच्या तपश्चर्येमुळे. अशा क्रियाशील विचारवंतांमध्ये यशवंतरावांचा उल्लेख करावा लागेल. अशा या महान



पुरुषाची जीवनज्योत इतरांना आशेचे किरण दाखवते. यशवंतरावांसारखा सामान्य माणूस स्वकर्तृत्वाने परिस्थितीवर मात करू शकतो. ही गोष्ट निराशावादी माणसांना कार्यप्रवृत्त करणारी आहे. त्यासाठीच यशवंतराव चव्हाणांच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेणे, त्यांच्या साहित्यिक मूल्य विचारांचा तटस्थतेने विचार मांडणे हा हेतू आहे.

यशवंतराव चव्हाणांच्या साहित्यामुळे महाराष्ट्र काल, आज आणि उद्याच्या संदर्भात भर पडणार आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या सामाजिक, साहित्यिक व राजकीय, सांस्कृतिक क्षेत्रात प्रगती कशी होत गेली याचे सिंहावलोकनही करण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे. 'आजचे नेते, उद्याचे प्रेरक' या नात्याने तरुण पिढीला, मुलांना आणि भावी पिढीला त्यांचे विचार समजावेत म्हणूनच हा छोटासा प्रयत्न आहे.

यशवंतराव चव्हाण हे एक फार मोठे लोकनेते होते; खरा लोकनेता हा एका अर्थाने लोकशिक्षक असतो. लोकनेत्याला लोकांच्या विविध प्रश्नांची जाणीव असणे आवश्यक असते. त्याचबरोबर लोकनेत्याने समाजाचे सातत्याने प्रबोधन करावे लागते. तेच नेमके यशवंतरावांनी केले. असा हा लोकनेता समाजाला सतत विचार देणारा होता. त्याने समाजाला विचारशील बनवण्याचा प्रयत्न केला. समाजाला त्या काळात विचारप्रवण केले. आणि नवमहाराष्ट्रात विचारांची एक वीण तयार होऊ लागली. महाराष्ट्राचा आकृतिबंध कसा असावा याविषयी त्यांनी सतत चिंतन आणि कार्य केले आणि म्हणूनच महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये त्याचे फार महत्त्वाचे कार्य आहे. सृजनशील विचारांनी भारलेला एक द्रष्टा नेता म्हणून साहेबांचा त्या काळात लौकिक होता. महाराष्ट्राच्या भवितव्याविषयी यशवंतराव आपले चिंतनगर्भ विचार मांडीतच राहिले. कलाकारांना कसे फुलवायचे हे तंत्र जाणणारे ते एक जादुगार होते. त्यांच्या प्रेरणेने कलाकार फुलले. साहित्यिक ही भारावून गेले. गुणांची कदर करणारा व लोकांच्या भावना जपणारा असा हा महामानव होता. त्यांच्या एका सत्कार समारंभात सातारचे एक नवोदित लेखक, साहित्यिक व सामाजिक कार्यकर्ते 'उपरा'कार लक्ष्मण माने श्रोत्यात बसलेले साहेबांना दिसले. साहेबांनी त्यांना तेथून आपल्याजवळ बोलावून घेतले आणि समारोपाच्या भाषणात त्यांनी डॉ. अनिल अवचटांच्या 'माणसं'च्या बरोबरीने लक्ष्मण माने यांच्या 'उपरा'चा जाणीवपूर्वक गौरव केला. यावरून त्यांचे साहित्यिकांवर व साहित्यावर असलेले प्रेम दिसून येते. हे प्रेम त्यांनी स्वत:पुरते ठेवले नाही. इतरांनाही प्रेरणा देऊन सातत्यपूर्वक फुलविले. पश्चिम महाराष्ट्रातून आज निर्माण झालेली अनेक ग्रामीण साहित्यिक मंडळीही त्यांच्या जाणीव जागृतीची साक्ष देतील.

विकसनशील भारताला सर्वांगीण प्रगतीचे शिखर गाठायचे असेल तर सर्वांगीण

प्रगती म्हणजे नेमके काय हे उमजणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी नव्या पिढीने यशवंतरावांच्या साहित्याचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. म्हणून यशवंतरावांसारख्या देशातील एका मुत्सद्दी विचारवंत, साहित्यिक म्हणून लौकिकास पात्र असलेल्या विचारवंत नेत्याचे अभ्यासपूर्ण संशोधन करणे गरजेचे आहे. लेखकासारखे साहेबांच्या विचारावर, कर्तृत्वावर, साहित्यावर अलोट प्रेम करणारे हजारो चाहते या देशात आहेत. महाराष्ट्रामध्ये जी नवीन पिढी सक्रीय राजकारणात, समाज-कारणात, साहित्यात रस घेत आहे किंवा इच्छुक आहेत त्यांच्यापर्यंत हा विचार पोहोचणे महत्त्वाचे आहे.

यशवंतरावांच्या संदर्भात अनेक मान्यवर लेखकांनी लिहिलेले ग्रंथ, त्यांच्या संदर्भातील गौरवांक, विशेषांक, स्मरणिका, अभिनंदनपर ग्रंथ, दैनिकांतील अग्रलेख, संपादित ग्रंथ, तसेच त्यांच्याविषयी उपलब्ध नियकालिके, मासिके इ. चा लेखनासाठी उपयोग आहे. त्यांच्या अशा स्वरूपाच्या लेखसंग्रहामध्ये, संपादनामध्ये केला आहे. महाराष्ट्राच्या जीवनातील बहुतेक सर्व क्षेत्रातील आणि विविध व्यवसायातील व्यक्तींनी आपली मते प्रदर्शित केली आहेत. यामध्ये सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, प्राध्यापक, विचारवंत, विद्वान पंडित, व्यापारी, उद्योगपती, विविध पक्षातील कार्यकर्ते, स्वातंत्र्यसैनिक अशा विविध व्यक्तींच्या आठवणीतून व त्यांच्या भावपूर्ण लेखनातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर व जडणघडणीवर सहज प्रकाश पडतो. या लेखनातून त्यांचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व वाचकांसमोर उभे करण्याचा त्यांचा प्रयत्न निश्चित स्तुत्य आहे. यशवंतरावांच्या आठवणी त्यांनी श्रद्धेने आणि भक्तिभावाने सांगितल्या आहेत. अशा या विविध स्मृतिलेखनातून यशवंतरावांचे मोठेपण जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यात हे लेखक निश्चित यशस्वी झाले आहेत. यशवंतरावांच्या सर्वस्पर्शी जीवनाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकण्यासाठी या बहुमोल लेखांचा उपयोग होणार आहे.

महाराष्ट्राच्या इतिहासातील संयमशील सहिष्णू, राजकीय मुत्सद्दी, साहित्य-कला यांचा उत्तम दर्दी, रसिक आणि गुणग्राहक नेता असे वर्णन कुणी केले तर न चुकता यशवंतराव चव्हाण साहेबांचेच नाव घ्यावे लागते. त्यामुळे तत्कालीन विचारधारेचा अभ्यास करताना जीवनाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी, त्यांच्या व्यक्तिमत्वाची वैचारिक प्रगल्भता, त्यांची जीवननिष्ठा, साहित्य आणि संस्कृती याबद्दलचे त्यांचे विचार हे विविध लेखनसाहित्यात पाहावयास मिळतात. त्या आधारे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची उकल होत जाते. राजकारणात राहूनही त्यांनी आपले वेगळे साहित्यिक अस्तित्व निर्माण केले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा हा फार मोठा पैलू आहे. त्यामुळे हे आधुनिक महाराष्ट्राचे सर्वार्थाने शिल्पकार झाले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा पिंड मानवता धर्मावर पोसलेला होता. स्नेह, जिव्हाळा, आपुलकी या माणुसकीच्या गुणांचे सुंदर मिलन त्यांच्या



व्यक्तीमत्त्वात गुंफले गेले होते. त्यांची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी ही वैचारिक होती. असे हे माणुसकीचे ओथंबलेले, मराठी मातीचा गंध लागलेले, विविध कलांचे भोक्ते असलेले व्यक्तिमत्त्व होते. त्या काळाचा या व्यक्तिवर प्रभाव कसा पडला, त्यातून हे आदर्श अष्टपैलू सुसंस्कारित व्यक्तिमत्त्व कसे उदयास आले, कसे दृग्गोचर होत गेले हे त्यांच्या साहित्याच्या आधारे पाहणे महत्त्वाचे आहे. यशवंतरावांच्या इतका प्रचंड कामाचा आवाका असलेला, ज्याच्या कर्तृत्वाची पाळेमुळे सामान्य माणसाच्या जीवनात खोलवर रुतलेली आहेत असा, पहिला महाराष्ट्रीयन मुख्यमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री, संरक्षणमंत्री व उपपंतप्रधान पदापर्यंत पोहोचलेला नेता स्वतंत्र भारतात झाला नाही.

डॉ. पंजाबराव जाधव त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल म्हणतात, ''श्री. यशवंतराव चव्हाण म्हणजे लोकशाही समाजवादाचा धन्वंतरी, विशाल दृष्टिकोन असलेला व समतोल बुद्धीचा राजकारणी, धुरंधर कर्तबगारीचा कुतुबमिनार - यशवंतराव म्हणजे भारतीय क्षितिजावर झळकणारा देदीप्यमान तारा. अपूर्व आकर्षणाचा लोहचुंबक, निर्भयतेचा महामेरू, पावित्र्याचा महासागर, उत्साहाचा नायगारा व चैतन्याचा महासिंधू होय.'' डॉ. पंजाबरावांना शास्त्र, इतिहास, भूगोल या सर्व विषयातील उपमांचा उपयोग करून यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करावेसे वाटणे साहजिक आहे आणि यातील प्रत्येक उपमा यशवंतरावांच्या बाबतीत खरी ठरली; सार्थ ठरली.

व्यक्तिचित्रण हा वाङ्मयप्रकार साधारणत: १९३०-४० नंतर मराठीमध्ये प्रचलित झालेला दिसतो. शब्दचित्र, व्यक्तिचित्र, स्वभावचित्र इत्यादी पर्यायी शब्द प्रचलित आहेत. व्यक्तित्व चित्रण हे कधी काल्पनिक असू शकत नाही. स्वातंत्र्योत्तर काळात एकूणच मराठी वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व विविध प्रकारच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक इ. संकेतापासून मुक्त झालेले दिसते. तसे दुसऱ्या बाजूनेही लोकशाही मूल्यांमुळे स्वयंविकासी झाले आहे. हेच वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व पुढे व्यक्तिमत्त्व विकासाच्या अनेक वाटा शोधीत राहिले आहे. यशवंतरावांसारख्या व्यक्तीचा व त्यांच्या साहित्यिक संस्काराचा परिणाम समाजावर सतत होऊन त्यात विविधता निर्माण होण्याची शक्यता असते. व्यक्तीच्या स्वभावातील विविध गुणांचा परिणामसुद्धा समाजावर होत असतो. थोडक्यात व्यक्तिमत्त्व जेवढे वेगळे, श्रेष्ठ प्रतीचे तेवढे ते वाङ्मयही नवे व प्रयोगशील होत राहते. यशवंतराव चव्हाणांच्या साहित्याचे स्वरूपही असेच होते. आशय, विषय, माध्यम, आविष्कार या सर्वच बाबतीत त्यांचे साहित्य अधिक रमणीय, अधिक वाचनीय असे बनले आहे. त्यामागे असलेल्या सकस व संपन्न व्यक्तिमत्त्वाचा बाज, त्यामधून सतत जाणवत राहतो. रसिक मनाला नेहमीच लेखकाचे अंतरंग जाणून घेण्याची जिज्ञासा

असते. यशवंतरावांसारख्या सजग लेखकाच्या आंतरीक व्यक्तिमत्त्वाचे पडदे हलक्या, हळुवार नाजूकपणाने उलगडून दाखवणे महत्त्वाचे वाटते. त्यांच्या लेखनातील संवेदना, काव्यात्मकता, तरलता, भोगलेपण, अनुभवातील चैतन्य इत्यादि गोष्टींमुळे त्यांचे साहित्य, ताजे, टवटवीत व काव्यात्मक वाटते.

साहित्य हा यशवंतरावांचा आत्यंतिक जिव्हाळ्याचा विषय होता. माता, मातृभाषा आणि मानवता यांच्याविषयी त्यांना अतिशय आदर होता. त्यांचे ग्रंथावर प्रेम होते. अनेक साहित्यिक आणि विचारवंत व विविध क्षेत्रांतील मान्यवर त्यांचे मित्र होते. यशवंतरावांचे हे साहित्यप्रेम या मान्यवर लेखकांना माहीत असल्यामुळे अनेक साहित्यिकांनी त्यांना आपले ग्रंथ भेट म्हणून दिले. त्या मौलिक ग्रंथांवर काही टीका-टिप्पणी केली आहे. तर काही निरनिराळ्या ग्रंथांना प्रस्तावना लिहिल्या. हे मूल्यमापन म्हणजे साहित्याच्या आकलन आस्वादनाला, मूल्यमापनाला योग्य ती दिशा, दृष्टी देणारे आहे. हे मूल्यमापन म्हणजे एक प्रकारची साहित्य समीक्षाच आहे. समीक्षा म्हणजे साहित्याचे अंतरंग व बाह्यरंग उलगडून पाहण्याच्या दृष्टीने केलेली एक शोधयात्राच असते. यशवंतरावांच्या अशा जवळ जवळ १७६ प्रस्तावना उपलब्ध आहेत. या प्रस्तावना म्हणजे साहित्यातील आस्वादक समीक्षेचा एक आदर्श नमुना आहे. या प्रस्तावना म्हणजे ग्रंथाच्या आरंभी ग्रंथाच्या विषयाचे केलेले दिग्दर्शन होय. या प्रस्तावनेतून यशवंतरावांची अभिजात साहित्यिक रसिकता प्रकटते. मराठी साहित्य समीक्षेच्या क्षेत्रात या नव्या दृष्टिकोनाची कशी गरज आहे हे स्पष्ट होण्याच्या दृष्टीने यशवंतरावांचे या संबंधीचे लेखन किंवा त्यांचे विचार विषयक लेखन लक्षणीय आहे. विविध विषयांवरील पुस्तकांना त्यांनी आटोपशीर, विस्तृत आणि विचारांचा वारसा देण्याच्या अशा मौलिक प्रस्तावना लिहून दिल्या आहेत. भालचंद्र नेमाडे, ना. धों. महानोर, अरुण साधू, लक्ष्मण माने, अनिल अवचट यांच्यासारख्या विविध प्रवृत्तीच्या साहित्यिकांच्या साहित्यप्रवृत्तीवर अभ्यासकास व संशोधकास निश्चितच उपयोग होईल. त्याचबरोबर विविध विषयांवरील लेखकासही एक नवीन दृष्टिकोन मिळण्यासाठी त्यांच्या या वाङ्मयीन लेखनाचा अभ्यास होणे महत्त्वाचे आहे.

गोविंदाग्रज हे यशवंतरावांचे आवडते कवी होते. यशवंतरावांनी या गोविंदाग्रजांच्या कवितेचा अभ्यास तर केलाच पण सामाजिक व राजकीय क्षेत्रात त्यांनी त्यांच्या काव्याचे अनुकरणही केले. कविता ही त्यांना स्फूर्तिसमान होती. त्यांची प्रतिभाशक्ती जागृत होती. पण काव्यप्रांतात यशवंतरावांचे फारसे भरीव कार्य दिसत नाही. त्यांच्याकडे सर्जनशीलता होती, काव्यकलाकृती निर्माण करण्याचे सामर्थ्य होते. स्फूर्ती, प्रतिभा व कल्पना याच्या साहाय्यानेच कविमनात काव्यनिर्मितीची प्रकिया सुरू होते.



यशवंतरावांजवळ अशा प्रकारचे सर्जनशील मन असतानासुद्धा काव्यप्रांतामध्ये ते फारसे का रमले नाहीत? हा ही एक चिंतनाचा किंवा अभ्यासाचा विषय आहे.

यशवंतरावांचे साहित्य हे विशिष्ट भूप्रदेशातील मानवाच्या संस्कृतीशी निगडित साहित्य आहे. त्यांनी आपल्या देशातले साहित्य, संस्कृती, रीतीरिवाज यात आपल्या साहित्याच्या प्रेरणा शोधल्या. याच विचारसरणीवर अधिक भर देऊन त्यांनी आपली भूमी, वातावरण, जीवनपद्धती साहित्यात मांडल्या. लोकजीवनात निर्माण झालेल्या लोकसाहित्याच्या परंपरेचा त्यांनी विचार मांडला. एकंदरीत यशवंतरावांच्या साहित्यात भूमीवरचे भान, त्यातील सर्व जाती जमाती, वंशाचे समूह, संप्रदाय, धर्म, परंपरा, स्थलकाळाचे उभे आडवे छेद, या सर्वांसकट येणारे एकजिनसीपणाचे भान दिसते. म्हणून देशवादाचा पुरस्कार करणारे देशी साहित्यिक म्हणून त्यांच्या साहित्याचा विचार होणे महत्त्वाचे आहे.

यशवंतराव स्वत: साहित्यिक होते. त्यांनी साहित्यावर, विचारवंतांवर मनापासून प्रेम केले. ते प्रभावशाली व प्रतिभावंत वक्ते होते. ते आपल्या वक्तृत्वाने लाखोंच्या जनसमुदायाला मंत्रमुग्ध करीत. त्यांचे भाषण म्हणजे माणसे जोडणारा पूल असे, विचारांची मेजवानी असे. प्रसंगानुसार त्यांनी भाषणे केली. औचित्यपूर्णता हे त्यांच्या भाषणाचे वैशिष्ट्य होते. त्यांच्या भाषणांचे संग्रह 'सह्याद्रीचे वारे', 'युगांतर' 'शिवनेरीचे सोबती', 'यशवंतराव चव्हाण - शब्दाचे सामर्थ्य', 'भूमिका' वाचत असतानाच त्यांच्या या भाषणांचा साहित्यिक दृष्टिकोनातून विचार करावा असे वाटू लागले. त्यांची भाषणे फक्त उत्कृष्ट शब्दांची जुळवाजुळव नसून त्यामागे एक साहित्यिक विचार आहे, तत्त्वज्ञान आहे. ते सदैव पुढच्या पिढीला मार्गदर्शक ठरणारे आहेत. याची खात्री झाली. 'विचार प्रकटीकरण' हाच त्यांच्या भाषणाचा मुख्य हेतू वाटतो. यावरून मराठी साहित्यातील एक उच्च प्रतिभाशक्ती असलेले निबंधकार म्हणून त्यांच्या या संकलित भाषण संग्रहांचा अभ्यास करणे महत्त्वाचे वाटते. ही भाषणे वाचताना मुळात ही भाषणे होती याची आठवण ही वाचकाला येत नाही. यामुळेच या भाषणांना लेखकाच्या मते एक उत्कृष्ट निबंधाचा दर्जा प्राप्त झाला आहे. मानवतावादी जीवननिष्ठा आणि विविध क्षेत्रांना व्यापून टाकणारी कल्पनाशक्ती त्यांच्या या वैचारिक लेखनात आहे. जनसामान्यांच्या मनातील आशा-आकांक्षा समजून घेण्याबाबत त्यांचा हातखंडा होता. यात शंका नाही. महाराष्ट्रातील सर्व सामाजिक स्तरातील जनतेबरोबर आपल्या प्रभावी संभाषण कौशल्यामुळे सुसंवाद स्थापन करण्यात ते यशस्वी झाले होते. त्यांच्या विविधांगी वाचन-छंदामुळे विचारांच्या विविध छटा त्यांच्या भाषणामध्ये दिसतात. संसदेतील भाषणामध्ये

उत्तम संसद पटुत्वाचे अनेक दर्जेदार नमुने पाहावयाच मिळतात. विषयाचे सखोल ज्ञान, परिपूर्ण माहिती गोळा करून त्यावर टिप्पणी तयार करणे व नंतर आपले म्हणणे समाजाला पटवून सांगणे यामुळे त्यांचे मोठेपण बहुतेक भारतीयांना मान्य आहे. अशा या मराठी मातीशी एकरूप झालेल्या नेत्याचा आदर्श आजच्या तरुण पिढीला, राजकारणी लोकांना मार्गदर्शक ठरेल. म्हणूनच त्यांना भेटलेल्या साहित्यिक व्यक्ती, अनेक साहित्यिक घटना, त्यांचे अनेक अनुभव आणि त्यांची मतं ही आजच्या काळात मौल्यवान ठरतील. कारण आज प्रसार माध्यमांनी एवढ्या प्रचंड प्रमाणात आक्रमण केले आहे की आजचा माणूस, वाचन, मनन, लेखन, चिंतन व त्यावर भाष्य या गोष्टी विसरून गेला आहे. म्हणून यशवंतरावांच्या अभ्यासपूर्ण वृत्तीच्या स्मृती आजच्या पिढीसमोर ठेवण्यासाठी हा लेखनप्रपंच. यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची श्रीमंती आजच्या पिढीच्या नजरेत भरेल.

यशवंतरावांच्या भाषणांचा, विचारांचा, मध्यबिंदू हा भारतातील सामान्य माणूस होता. हा सामान्य माणूस वैचारिकदृष्ट्या प्रगत झाल्याशिवाय, त्याला आर्थिक सामर्थ्य प्राप्त झाल्याशिवाय तो खऱ्या अर्थाने स्वतंत्र होणार नाही. असा त्यांचा दृष्टिकोन होता. भारतातील ऐक्य टिकले पाहिजे हा त्यांच्या चिंतनाचा आणि चिंतेचा सर्वात मोठा विषय असे. त्यासंबंधीच्या विचारांचे पडसाद त्यांच्या अनेक भाषणांतून उमटलेले दिसून येतात. गरीबीशी कधीही तडजोड करता कामा नये. लोकभाषा हीच ज्ञानभाषा असली पाहिजे, असे ते ठामपणे सांगत. अशा क्रियाशील विचारमंथनातून साहेबांचे कर्तृत्व आणि नेतृत्व निर्माण झाले. या नेतृत्वाने भारताला वेगळी विचारशलाका दिली ती भाषणातून.

महाराष्ट्राच्या उत्कर्षाचे विचार त्यांनी काही भाषणांमधून मांडले आहेत. मा. यशवंतरावजींचे विचार आणि मुद्दे महाराष्ट्राच्या आजच्या आणि उद्याच्या संदर्भातसुद्धा तंतोतंत लागू पडतात. म्हणूनच त्यांचे विचार काळ उलटला तरी अढळ आहेत व ते भावी पिढ्यांना स्फूर्ती देणारे आहेत, हे त्यांच्या भाषणांतून जाणवते. त्याचबरोबर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू त्यातून उलगडत जातात. एखादी व्यक्ती समाजवादी विचारांची आहे की लोकशाहीवादी, तिला सर्वधर्मसमभाव मान्य आहे की ती संकुचित धार्मिक प्रवृत्तीची आहे, स्वार्थी आहे की परोपकारी हे त्या व्यक्तीच्या बोलण्यातून समजते. म्हणनूच त्यांच्या विचारांचे, भावनांचे व प्रेरणांचे स्वच्छ प्रतिबिंब आपणास या भाषणांमधून पाहावयास मिळते.

आपल्या भाषणांत सुभाषितवजा सुंदर वाक्यांची ते पेरणी करीत. ते संयमी राजकारणी होते. त्यांचा आपल्या वाणीवर विलक्षण ताबा होता. ते मोजके आणि



मुद्देसूद बोलत. सर्व विषयांवर बोलत, सर्व प्रसंगी बोलत. सर्वसाधारण सभांपासून ते पंडितजींच्या परिषदांपर्यंत त्यांनी भाषणे केली. समोरील श्रोत्यांच्या पातळीवर जाऊन सर्वांना समजेल असे मिठ्ठास भाषण ते करीत. शब्दांनी केलेल्या जखमा जन्मभर झोंबत राहतात. त्यांच्या वाणीला चीड, द्वेष, राग यांचा संसर्ग झालेला कधी दिसत नाही की विजयी वातावरणात त्यांच्या वाणीमध्ये अहंकाराचा दर्पही कोठे दिसत नाही. सुरुवातीच्या काळापासून यशवंतराव चिंतनशील स्वभावाचे असल्यानेच यांच्या व्यक्तिमत्त्वाला एक शालीनता प्राप्त झालेली दिसते. शब्दांचे भांडार त्यांच्याकडे होते. त्यामुळेच चर्चासत्रात, परिसंवादात, वादविवादात प्रभावीपणे ते आपली मते मांडत असत. प्रभावी विचार मांडणीबरोबरच दुसऱ्यांची भाषणेसुद्धा ते लक्ष देऊन ऐकत असत. त्यांच्या काही मुद्द्यांची लगेच स्तुती करत किंवा सूचना देत. कित्येकदा श्रोत्यांच्या प्रश्नांना संयमाने उत्तरे देत.

यशवंतरावांच्या भाषणांनी वैचारिक व ललित निबंधाचा दर्जा प्राप्त केलेला आहे. साहित्याच्या दृष्टीने त्यांच्या भाषणांचे संकलित ग्रंथ 'सह्याद्रीचे वारे', 'युगांतर' व 'भूमिका' हा एक साहित्याचा अनमोल ठेवा आहे. ललित निबंध वाङ्मयाचा एक प्रकार म्हणून त्याचे मूल्यमापन करावेसे वाटते. मुद्देसूद मांडणी, अंत:करणाला भिडणारी भाषा, राजकीय दूरदृष्टी यांचा संगम त्यांच्या भाषणात दिसतो. ग्रामीण जीवनपद्धती, विविध स्तरावरील सुसंस्कृत व्यक्तींचा सहवास या सर्वांचा संस्कार त्यांच्या या ललितरूपी भाषण साहित्यावर झालेला आहे. यशवंतरावांनी साहित्याच्या माध्यमातून मराठी माणसाला स्वत:च्या उज्ज्वल भवितव्याच्या स्वप्नपूर्तीसाठी प्रेरणा देणारा विचार मांडलेला आहे. एकूणच राष्ट्राची उभारणी करण्याचा मनोदय त्यांनी त्या ठिकाणी मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

साहेब जाऊन अनेक वर्षे झाली. पण त्यांच्या भाषणांच्या संकलनातून ते स्मरणात राहिले. मला साहेबांना जवळून पाहण्याचा किंवा त्यांच्याजवळ जाण्याचा योग आला नाही. महाविद्यालयीन व शालेय शिक्षण घेत असताना एक दोनदा त्यांची भाषणे ऐकली व त्यांना पाहिलेही आहे. त्यावेळी त्यांची मूर्ती मनात ठसली गेली. ती स्पष्ट होत गेली ती त्यांच्या साहित्यातून आणि तशीच मनात बिंबली गेली. त्यांच्या साहित्यातून एक गोष्ट स्पष्ट होते की त्यांना लेखनाबद्दल व लेखकांबद्दल ओढ होती, जिव्हाळा होता, त्यांच्याजवळ प्रतिभाही होती. भाषण करताना त्यांना कधी वाचून दाखवावे लागले नाही. ते त्यांना आपोआप स्फुरत असे. समोरच्या जनसमुदायाला प्रक्षोभित करण्याचे काम त्यांनी कधी केले नाही. हळुवारपणे त्यांच्या मनाचे एक एक कप्पे ते उघडत असत. म्हणून लोक तल्लीन होऊन ऐकत असत. लोकांना तो आपला माणूस वाटत

असे. जणू आपल्याच भावना, आपलेच प्रश्न, आपलीच सुखदु:खे त्यांच्या तोंडातून बाहेर पडत आहेत असे श्रोत्यांना वाटत असे. भाषणात कसला दर्प नसे, राजकारणाची भाषा नसे. त्यातून त्यांचे शालीन, नम्र व्यक्तिमत्त्व प्रकट होत असे. या माणसाचे साहित्य कसे असेल? असा प्रश्न मनात आला. एक उत्सुकता निर्माण झाली व त्यांच्या साहित्याचा शोध घेण्याचे मनात आले.

यशवतंरावांचे साहित्य हे मूलत: समकालीन संकल्पनेशी निगडित आहे. त्यांच्या साहित्यात समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेला प्रभावित करण्याची ताकद आहे. समाजाचे प्रतिबिंब त्यांच्या साहित्यात दिसते. त्यांचे साहित्य हे वास्तवाच्या काळाला सामोरे जाणारे आहे. तत्कालीन काळाचा सखोलपणे त्यांनी वेध घेतला. त्यांचे साहित्य हे वर्तमानकाळाशी निगडित आहे, भूतकाळाला पचवणारी ताकद आहे आणि भविष्यकाळाची दृष्टी असणारी प्रवृत्ती त्यात आहे. हे आपल्याला जाणवते. असे असतानाही मराठी साहित्याच्या केंद्रवर्ती संस्थांनी या लेखकाची म्हणावी तशी दखल घेतली नाही, असे खेदाने नमूद करावेसे वाटते. कारण मराठी वाङ्मय प्रकारात त्यांनी हाताळलेल्या वाङ्मयाने लक्षणीय भर घातली आहे. असे असतानासुद्धा वाङ्मयेतिहासाच्या ग्रंथात अथवा समीक्षात्मक ग्रंथातही त्यांच्या साहित्यकृतींना फारसे स्थान नाही. कचित ओझरता उल्लेख केलेला मात्र आढळतो. तेव्हा त्यांच्या समग्र व्यक्तिमत्वाचा आणि वाङ्मयाचा अभ्यास करून, त्यांचे वाङ्मयीन मोल दाखवून त्यांच्या साहित्याच्या क्षेत्रात झालेली उपेक्षा नाहीशी करणे महत्त्वाचे वाटते. पश्चिम महाराष्ट्रातील या प्रतिभावंत लेखकाचे वाङ्मयीन गुणांवर मूल्यांकन करणे हे महाराष्ट्रातील अभ्यासकांचे नैतिक कर्तव्य आहे असे मला मनापासून वाटते.

यशवंतरावांसारख्या लेखकाचा अभ्यास करताना या लेखकाच्या व्यक्तित्वाचे सुप्त प्रकट पैलू, त्यांच्या वृत्तीचे गुणविशेष, त्याचा व त्यांच्या वाङ्मय निर्मितीचा, सकारात्मक वा नकारात्मक संबंध तपासणे महत्त्वाचे आहे. यशवंतरावांच्या साहित्यातून मला जे आकलन झाले त्यावर भर देऊन त्यांच्या या साहित्यकृतींचे मला घडलेले दर्शन प्रतिबिंबित करण्याचा माझा मन:पूर्वक प्रयत्न आहे.

○ ○ ○



मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण



पंडित नेहरू व यशवंतराव चव्हाण



शरद पवार यांचेसमवेत (वर्ष १९७८)



रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील व माजी अध्यक्ष यशवंतराव चव्हाण



श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षण महर्षि प. पु. डॉ. बापूजी साळुंखे व यशवंतराव चव्हाण



परराष्ट्रमंत्री नात्याने
इंदिरा गांधी व महंमद युनुस यांचेसमवेत.
(१९७४)

पदवीदान समारंभ
संचलनप्रसंगी यशवंतराव चव्हाण





प्राचार्य प्र. के. अत्रे व यशवंतराव चव्हाण



पु. ल. देशपांडे समवेत यशवंतराव चव्हाण

'ज्ञानपीठ' पारितोषिक सत्कार समारंभप्रसंगी
वि. स. खांडेकर यांना कोल्हापूर येथे पुष्पहार
समर्पण करताना यशवंतराव चव्हाण



लेखिका दुर्गा भागवत, यशवंतराव चव्हाण व
तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी





सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष
तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी व
यशवंतराव चव्हाण



गीत रामायणकार व
संगीतकार ग. दि. माडगूळकर व
यशवंतराव चव्हाण



लोकसाहित्याच्या अभ्यासिका व
संशोधिका डॉ. सरोजिनी बाबर
आणि यशवंतराव चव्हाण



'श्रीमान योगी' कादंबरीचे
प्रकाशन करताना यशवंतराव चव्हाण आणि
कादंबरीकार रणजित देसाई

संत साहित्याच्या अभ्यासिका व
कवयत्री सुहासिनी इर्लेकर यांच्याशी
साहित्यिक चर्चा करताना
यशवंतराव चव्हाण



चित्ररसिक गं. ना. जाधव यांच्यासमवेत
यशवंतराव चव्हाण





पं. भीमसेन जोशी व
यशवंतराव चव्हाण



कवी ना. धों महानोर
यांच्यासमवेत



ग्रंथप्रेमी,
व्यासंगी, विचारवंत
यशवंतराव





यशवंतरावांचे निवासस्थान विरंगुळा, कराड



वेणूताई चव्हाण पब्लिक
चारिटेबल ट्रस्ट, कराड



संगीत दिग्दर्शक वसंत देसाई समवेत
यशवंतराव चव्हाण



भालचंद्र पेंढारकर, यशवंतराव, सुलोचना,
सुधीर फडके, वसंत देसाई इ.



रसिकराज यशवंतराव
नाट्यकलाकारांसमवेत

रायगडाला जेव्हा जाग येते या नाटकाच्या शतक महोत्सवी डॉ. काशिनाथ घाणेकरांसमवेत
यशवंतराव चव्हाण व वेणूताई चव्हाण आणि इतर कलाकार.





कलावती सुलोचना यांचे
संरक्षण निधीस सुवर्णदान

'रायगडाला जेव्हा जाग येते'
संभाजीची प्रशंसा करताना

व्होल्गाग्राडला भेट,
यशवंतराव व वेणूताई चव्हाण
आणि राम प्रधान



प्रकरण २

# साहित्यविषयक भूमिका

मराठी साहित्यक्षेत्रात यशवंतरावांनी विविधांगी लेखन केले आहे. चरित्रात्मक, आत्मकथनपर, वैचारिक, ललित अशा स्वरूपाचे लेखन केले आहे. या लेखनाबरोबरच त्यांनी समीक्षेच्या क्षेत्रातही मोलाची कामगिरी केली आहे. या साहित्यविषयक विवेचनात त्यांनी वेगवेगळ्या वाङ्मयप्रकाराबद्दल समर्थपणे आपले विचार प्रकट केले आहेत. त्यातून त्यांची साहित्याकडे पाहण्याची भूमिका स्पष्ट होते. रसिक मराठी भाषिक, साहित्यप्रेमी, मर्मज्ञ व समतोल भाष्यकार हा वाङ्मयीन प्रगतीचा घटक आहे असे मानणाऱ्या यशवंतरावांनी सतत वाङ्मयाच्या विकासाचा विचार केला आहे. साहित्य आणि समाज याचा त्यांनी विचार मांडला. 'साहित्य हेच मुळी जीवन आहे. साहित्याची अंतिम प्रेरणा मानवी मूल्यांची जाणीव करून देणारी असावी. मानवी मूल्यांचा प्रत्यय हीच वाङ्मयाची कसोटी' असे ते मानतात. हे यशवंतरावांचे विधान त्यांच्या साहित्य विचाराच्या अभ्यासाच्या दृष्टीने महत्वाचे आहे. अशी प्रसंगोपात त्यांनी व्यक्त केलेली मते समीक्षेचे स्वरूप दिग्दर्शित करणारी आहेत.

यशवंतरावांनी साहित्य आणि समाज, साहित्य आणि भाषा, साहित्य आणि अनुभव, इतर मानवी व्यवहार यांचे तारतम्याने आकलन करून विचार मांडले आहेत. यामधून त्यांचे भावस्पर्शी संवेदनशील मन आणि मार्मिक समीक्षा व आस्वादक डोळसपणा पाहावयास मिळतो.

## यशवंतरावांचा जीवनवाद

यशवंतरावांचा साहित्याविषयीचा दृष्टिकोन हा पूर्णपणे जीवनवादी होता. १९२० नंतर देशात राजकीय व सामाजिक चळवळीचे नवे वारे वाहू लागले. त्याचाही परिणाम साहित्यावर आणि साहित्य विचारावर झाला. राजकारण, समाजकारण, अर्थकारण या सर्वांचे परिणाम भारतीय लोकजीवनावर होत असताना साहित्यक्षेत्रही त्याला अपवाद नव्हते. कला जीवनवादाचे वाद याच कालखंडात निर्माण झाले. साहित्याच्या

रंजनमूल्याची आणि बोधमूल्याची चर्चा यापूर्वीच सुरू झाली होती. पाश्चात्य आणि भारतीय साहित्यशास्त्रातून आलेल्या साहित्यविषयक विचारांची बरीच उलटसुलट चर्चा या काळात झाली. कलावादी साहित्य, पुरोगामी साहित्य, साहित्यातील नवमतवाद, जीवनवाद, नीतीवाद, वास्तववाद अशा अनेक मतमतांतराची चर्चा-चर्वणे झाली. अशा या कालखंडात यशवंतरावांच्या जीवनवादाचे स्वरूप पाहणे मोठे उद्‍बोधक आहे. यशवंतरावांनी लहानपणीच वाचनसंस्कारांनी मन समृद्ध करण्याचा प्रयत्न केला. हरिभाऊ आपटे, रा. ग. गडकरी, श्री. कृ. कोल्हटकर यांच्या साहित्याचा सत्यशोधकीय चळवळीचा, मार्क्स, फ्रॉईड आणि गांधी यांच्या विचार प्रणालीचा सूक्ष्मपणे केलेला अभ्यास त्यांच्या जीवनवादी भूमिकेसाठी महत्त्वाचा ठरतो. तत्कालीन पुरोगामी साहित्यचळवळीचा विचारही यशवंतरावांच्या जीवनवादी प्रेरणेसाठी उपयुक्त ठरला असावा. यशवंतरावांचा वाङ्मयीन कालखंड हा विविध मतप्रणालींनी आणि विचारप्रवाहांनी गजबजलेला असल्यामुळे त्यांनी स्वकालीन विचारांचा मागोवा घेत आपला जीवनवादी विचार प्रकट केला आहे. ते म्हणतात, ''कलेसाठी कला की जीवनासाठी कला'' हाही वाद पूर्वी फार गाजलेला आहे. मराठी साहित्यात अजूनही त्याचे पडसाद अधूनमधून उमटत असतात. माझ्यापुरते बोलायचे झाले तर माझा कल जीवनासाठी कला, या तत्त्वाकडे झुकलेला आहे. केवळ शब्दसाहित्य आणि प्रतिमांचे सौंदर्य हीच चांगल्या साहित्याची कसोटी घेणे होय. असा कलेसाठी कला याचा अर्थ असला तर ही स्वत:ची फसवणूक करून घेणे होय. जीवनवादी भूमिका मांडताना कलावादाला छेद देणारी भूमिका त्यांनी मांडली. समर्पित जीवन हा यशवंतरावांचा आदर्श होता. कला व सौंदर्य ही जीवनाच्या इतर अनुभवावर अवलंबून असणारी मूल्ये आहेत. यशवंतरावांच्या जीवनवादी साहित्यामध्ये मांडलेल्या समाजविषयक वैचारिक भूमिकेचा सहभाग लक्षणीय आहे. त्यांनी जीवनवादी भूमिका समजून उमजून विस्तारपूर्वक मांडली आहे. सामाजिक आशयाच्या बाजूने जीवनवादाचा पुरस्कार करण्यामध्ये यशवंतरावांचा उत्साह उदंड आहे. याचे कारण हे की यशवंतराव हे सामाजिक जीवनात अंग घुसळून घेतलेला नेता, लेखक, समाजाच्या आशा-अपेक्षा, विचार कल्पना, चढ-उतार, भावभावना यांची जाण असलेला समाजधुरीण, असल्याने त्यातून त्यांची जीवनवादी भूमिका विचाराचे रूप मिळवून राहते.

कलाकृती कशी दिसते यापेक्षा तिच्यात काय आहे या गोष्टीला जीवनवादी आशयात अधिक महत्त्व दिसते. यशवंतरावांच्या जीवनवादी साहित्याचा विचार करताना त्यांनी केवळ रंजन हे साहित्याचे प्रयोजन मानले नाही. किंवा तशी कलाकृती त्यांनी निर्माण केली नाही. कथा, कादंबरी, नाटक इ. वाङ्मय प्रकार त्यांनी निर्माण केले नाहीत.



तसेच त्यांनी कलावादी किंवा रंजनवादी साहित्य निर्मिती केली नाही. कारण केवळ आनंदासाठी लेखन करणे हा प्रांत त्यांना मान्य नव्हता. साहित्यातून पोरकट रहस्ये, आकर्षक उत्तान वर्णने किंवा खोटा आभास निर्माण करणारे भोंगळ तत्त्वज्ञान कलेच्या नावाखाली येऊ नये. कलावंत साहित्यिकाने विचारवंत झाले पाहिजे. आजच्या खऱ्याखुऱ्या जीवनाची, जीवनविषयक तत्त्वज्ञानाची जोड साहित्याला असली पाहिजे असे त्यांना वाटते. साहित्यातून सर्वसाधारणपणे समाजाची दु:खे चित्रित झाली पाहिजेत.परंतु ती होत नाहीत. याविषयी यशवंतरावांना खंत वाटते. म्हणून ते म्हणतात, साहित्याची अंतिम प्रेरणा मानवी मूल्यांची जाणीव करून देणारी असली पाहिजे असे मी मानतो. अशा प्रकारे जीवनमूल्यांवर यशवंतरावांची दृढ श्रद्धा होती. जीवनवादात समाजदर्शन किंवा सामाजिक भाष्य त्यांना अभिप्रेत आहे. जीवनातल्या अंतिम सत्याची जाणीव करून देत त्यांनी जीवनवादाचा पुरस्कार केला. उद्‌बोधन हे एक साहित्याचे प्रयोजन असावे असे त्यांना वाटते. म्हणूनच त्यांनी त्यांना अपेक्षित असणारे जीवन त्यांच्या साहित्यात मांडले आहे.

साहित्याचा आणि समाजजीवनाचा असणारा संबंध यशवंतरावांना अपरिहार्य वाटतो. किंबहुना समाजजीवनाचे वास्तव चित्रण परिणामकारकतेच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. ते म्हणतात, ''ज्या साहित्यामुळे अमंगलाचा नाश होतो आणि मंगलाची स्थापना होते असे साहित्य उदात्त गुणांची प्रेरणा देऊ शकते. अशा प्रकारचे साहित्य जनतेला प्रगतीच्या दिशेने समाजाला गतिमान करते. आपल्या मनाला अस्वस्थ करून सोडणारे, भोवतालचे खरे वास्तववादी जीवन, जीवनवादी साहित्यात प्रतिबिंबित व्हायला हवे असे विचार त्यांनी व्यक्त केले. यशवंतरावांच्या एकूणच लेखनामागची प्रेरणा सामाजिक स्वरूपाची आहे. या सर्व लेखनातून यशवंतरावांचे जे चिंतनपर विचार विखुरले आहेत ते सर्व अभ्यासनीय आहे.

यशवंतरावांनी जीवनवादाचा पुरस्कार केला. जीवनवाद या शब्दातून यशवंतरावांना केवळ साहित्यातून होणारे जीवनदर्शन अपेक्षित नाही. या जीवनदर्शनात जीवनाच्या अंतिम सत्याचा, मूल्याचा पुरस्कार त्यांना अभिप्रेत आहे. चिरंतन मूल्यांची सामाजिक जाणिवेची कदर साहित्यातून व्हावी ही यशवंतरावांच्या जीवनवादाची अपेक्षा आहे. यातून त्यांची जीवनवादी भूमिका स्पष्ट होते.

## साहित्याचे सामर्थ्य

यशवंतराव चव्हाणांनी जीवनवादी पक्षाचीच बाजू मांडली आहे. ही बाजू मांडताना साहित्याच्या सामर्थ्याचा मोठ्या आत्मविश्वासाने त्यांनी पुरस्कार केला आहे. कारण

साहित्य हे एक सामर्थ्य आहे. व्यक्तीच्या जीवनाप्रमाणेच राष्ट्राच्या जीवनात जी आव्हाने येतात ती आव्हाने झेलण्याचे सामर्थ्य जेव्हा प्रत्यक्ष अनुभवाला येते तेव्हा राष्ट्र मोठे होते असा आतापर्यंतचा अनुभव आहे. पण हे सामर्थ्य कशाने प्राप्त होते? हे सामर्थ्य शस्त्राने प्राप्त होत नाही. बंदुकीच्या गोळीने प्राप्त होत नाही. हे सामर्थ्य विचारांतून येते. संस्कारातून येते. हे विचार आणि हे संस्कार देण्याचे काम भाषेमार्फत, साहित्यामार्फत घडते. म्हणून साहित्याचे मोल जास्त आहे असे मी मानतो, अशी साहित्याच्या सामर्थ्याबाबत यशवंतरावांची ठाम भूमिका होती. जीवनाच्या प्रतिकूल परिस्थितीशी झगडणाऱ्या बहुजन समाजाच्या व्यथा व्यक्त करणारे साहित्य निर्माण झाले पाहिज, अशी अपेक्षाही ते व्यक्त करतात. साहित्य, वाङ्मयाचा सामान्य माणसाला उपयोग झाला पाहिजे. जीवनात रोज झगडणाऱ्या माणसाच्या अंत:करणात चैतन्य निर्माण करून त्याला समाधान देणे हे वाङ्मयाचे कार्य आहे. असा त्यांचा आशावाद होता. साहित्याच्या सामर्थ्याचा देशाच्या आणि समाजाच्या प्रगतीसाठी उपयोग करून घ्यावा असे चव्हाणांना वाटते. 'मराठीचे सर्व संग्राहक स्वरूप' या लेखात ते लिहितात, ''साहित्याचा समाजजीवनासाठी आरशासारखा उपयोग होतो. कारण या साहित्यात सर्वसाधारण लोकांच्या सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक प्रकृतीचे प्रतिबिंब सापडते. यातच साहित्याच्या उत्पत्तीचे व जनतेच्या अभिव्यक्तीचे रहस्य दडलेले आहे हे असे सत्य आहे की ज्याला समस्त मानवी इतिहासाचा पुरावा देता येईल. यावरून यशवंतरावांच्या साहित्याची संस्कारक्षमता व शब्दकारण लक्षात येते. त्यांचे भाषेवर अतोनात प्रेम होते. शब्दांच्या सामर्थ्यावर व सौंदर्यावर त्यांनी अनेक ठिकाणी विश्वास व्यक्त केला आहे. ''शब्दांचे सामर्थ्य फार आहे. मी शब्दांना फार मानतो. त्यांच्यात अस्त्रांचे सामर्थ्य आहे. तसेच प्रकाशाचे तेज आहे. एखादा शब्द कोणी अशा वेळी उच्चारतो की त्यामध्ये एक विलक्षण सामर्थ्य येते. साहित्य हे समाजाला शिक्षित करण्याचे समर्थ साधन आहे. साहित्य हे मानवी जीवनाशी निगडित आहे. साहित्य हा मानवी संस्कृतीचा एक अविभाज्य घटक आहे. साहित्याचा समाजाच्या स्थितिगतीशी साक्षात संबंध असतो. साहित्य हे संस्कृतीचे संरक्षण करते तसेच संस्कृतीचे संवर्धन करते. ''नवनिर्मितीचे सर्जनशील कार्य जसे शब्द करतात तसेच साम्राज्यशक्ती धुळीला मिळविण्याचे संहारक सामर्थ्यही शब्दांत आहे. कल्पना, विचार आणि शब्द यांचा त्रिवेणी संगम ही मानवी इतिहासातील एक जबरदस्त शक्ती आहे. एके ठिकाणी साहित्याबाबत अत्रे असे विचार व्यक्त करतात, ''देशाच्या घटनेचे आणि प्रगतीचे वाङ्मय एक प्रभावशाली शस्त्र आहे. जीवनाची जी चिरंतन मूल्ये आज मानवजातीच्या प्रगतिपथावर



ध्रुवताऱ्याप्रमाणे अटळ तेजाने तळपत आहेत ती मूल्ये आणि सत्ये ही मानवजातीला साहित्याने दिलेली लेणी आहेत. सैन्य आणि आरमार फार झाले तर जिवंत राष्ट्राचे रक्षण करू शकेल. पण राष्ट्राला जिवंत ठेवण्याचे काम केवळ साहित्यच करू शकते. राष्ट्राच्या पौरुषाच्या आणि पराक्रमाच्या परंपरा जिवंत राखून त्याग, ध्येय आणि शौर्य हे गुण जनतेच्या अंगी येण्यास बंदुका आणि तोफांपेक्षा साहित्याचाच उपयोग होतो. असे साहित्याचे महत्त्व त्यांनी व्यक्त केले आहे. साहित्याचा सर्व स्तरांतील लोकांशी संबंध येतो. एकूण साहित्याने सारे लोकजीवन व्यापले आहे. शब्दांच्या मदतीशिवाय कोणतेही काम पूर्ण करता येत नाही. शब्दांचा वापर करून त्यांच्यामार्फत विचार मांडले जातात. यासाठी कोणी लेखणीचा उपयोग करते तर कोणी भाषेचा उपयोग करतात. पण या प्रगटीकरणातूनच शेवटी साहित्य-निर्मिती होत असते. संत तुकारामांनी आपल्या एका अभंगात म्हटले आहे.

**आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्न करू ॥**
**शब्दांचे अमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोका ॥**
**तुका म्हणे पहा शब्दांचे हा देव । शब्दांचे गौरव पूजा करू ॥**

आपल्या घरी शब्दांचेच धन, त्यांचीच रत्ने, शस्त्रे आहेत. तेच आमच्या जीवाचे जीवन आहे व शब्दांचे धन आम्ही लोकांना वाटू असे तुकारामांनी फक्त म्हटले असे नव्हे तर ते त्यांनी प्रत्यक्षात आणले. यशवंतरावांनी सुद्धा शब्दांचे मोल असेच जाणले होते. त्यांच्या साहित्यातून सतत जीवनाबद्दलची खोल चिंतनशीलता मांडलेली आहे. ''मी भाषेवर प्रेम करणारा मनुष्य आहे पण संकुचित अर्थाने अभिमानी राहिलो नाही'' अशी विनम्रता देखील भाषेच्या बाबत दाखवतात. म्हणून साहित्य हे शब्दांच्या साह्याने साधलेले विविध अनुभवांचे सर्जन असते. शब्दांचे कार्य एका अनुभवाचे विश्व साक्षात प्रकट करणे, समूर्त करणे हे असते. अर्थात साहित्यात एखादी व्यक्ती शब्दांच्या साह्याने आपल्या अनुभवाचा शोध घेते. हे काम एखादी निर्मितिक्षम व्यक्तीच करू शकेल. म्हणूनच साहित्यात शब्दसामर्थ्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. यशवंतरावांचे शब्दसामर्थ्य त्यांच्या चिंतनविहारात विशेष स्वरूपात जाणवते. या चिंतनात सुरुवातीस एखादा स्वानुभव बहुधा येतो. त्या अनुभवातून मग चिंतन प्रेरणा घेते. चिंतनाच्या वेळी त्यांची वृत्ती गंभीर होते. चिंतनाच्या ओघात इतर अनुभव, उदाहरणे, दृष्टांत येतात. त्यांच्या चिंतनाचा पसारा मोठा आहे. त्याची व्यापकता सखोल आहे. त्याच्या पाठीमागे एक सामाजिक तळमळ आहे. मानवी जीवनाविषयी अथांग आस्था त्या चिंतनातून उत्कटतेने प्रत्ययास येते. यासाठी शब्दशक्तीचा उपयोग मोठ्या कौशल्याने

त्यांनी केला आहे. समाजाच्या प्रबोधनासाठी व समाजाचा पिंड घडवण्यासाठी साहित्यातील शब्दांचे सामर्थ्य फार प्रभावी आहे असा त्यांचा विश्वास होता. ते म्हणतात, ''सामर्थ्य म्हणजे त्यांच्या मनाचे सामर्थ्य, विचारांचे सामर्थ्य, त्यांच्या अनुभवांचे सामर्थ्य, आणि त्यांच्या शीलाचे सामर्थ्य. हे सामर्थ्य जेणेकरून वाढीस लागेल असा प्रयत्न केला पाहिजे. अशा प्रकारची परिस्थिती निर्माण करण्यासाठी समर्थ साहित्य निर्माण झाले पाहिजे. माणूस मनाने व विचाराने युक्त व समर्थ बनण्यासाठी साहित्याची व शिक्षणाची आवश्यकता आहे.

## साहित्यविषयक दृष्टिकोन

यशवंतरावांनी विविध वाङ्मय प्रकारांचा मनापासून अभ्यास केला आहे. तद्वतच जीवनविषयक प्रणालींचाही त्यांनी अभ्यास केला आहे. कार्ल मार्क्स, फ्रॉईड, गांधी, रॉय इ. प्रवृत्तीच्या विचारप्रणालींचा डोळसपणे अभ्यास केल्यामुळे यशवंतरावांना विविध कलांचे यथार्थ आकलन होऊ शकले. येणाऱ्या नव्या काळाला अनुसरून मानवतेचा पुरस्कार करताना मानवतेला कलंक ठरू पाहणाऱ्या घटनांचा आणि वृत्ती-प्रवृत्तींचा साहित्यातून धिक्कार झाला पाहिजे अशा स्वरूपाची त्यांची भूमिका होती. यशवंतरावांनी त्यांच्या साहित्य लेखनातून मानवी जीवनाच्या विकासाचा विचार नेहमीच केला आहे. देश, काल, स्थितीचा विचार करता मानवता हाच नव्या युगाचा मंत्र असेल असे त्यांना वाटते. ते म्हणतात, ''आपली प्रगती करून घ्यायची तळमळ खुद्द जनतेलाच असायला हवी. आपली गरीबी आपण नाहीशी करावी. आपले जीवन समृद्ध व्हावे. आपल्या मुलाबाळांना जीवनात स्थैर्य मिळावे ही तळमळ प्रत्येक व्यक्तीत निर्माण झाल्याशिवाय तिची प्रगती होणार नाही.'' यशवंतरावांनी आपल्या साहित्यातून मानवी विकासावर जास्त भर दिला आहे. जीवनातल्या अंतिम सत्याला म्हणजेच मानवतेच्या मूल्याला त्यांनी महत्त्व दिले आहे.

साहित्याचा आणि समाजजीवनाचा असणारा संबंध यशवंतरावांना अपरिहार्य वाटतो. किंबहुना समाजजीवनाचे वास्तव चित्रण परिणामकारकतेच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. केवळ साहित्यिकाची प्रतिभा प्रक्षुब्ध झाल्याशिवाय नवनिर्मिती करू शकत नाही. आणि जेव्हा प्रतिभेला प्रत्यक्ष समाजातील अन्यायकारक घटना दिसते तेव्हा ती प्रक्षुब्धतेने प्रकट होते. ''जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांशी अधिक निकटचे संबंध प्रस्थापित केल्याशिवाय आणि जीवनामध्ये असलेले श्लेष आणि काव्य यांच्याशी अधिक जवळीक केल्याशिवाय साहित्यात फारशी मोलाची भर कोणी घालू शकेल असे मला वाटत नाही.'' असे यशवंतराव म्हणतात. समाजजीवनातील



घटनांनी बेचेन झालेला साहित्यिकच अशी सहजपणे सुंदर निर्मिती करू शकतो. घटना तात्कालिक असल्या तर तात्कालिकाला चिरंतनाचे रूप देण्याचे सामर्थ्य श्रेष्ठ साहित्यिकाच्या प्रतिभेत असते असा त्यांचा ठाम विश्वास होता. ते म्हणतात, ''देशातील लेखक, विचारवंत, कलावंत, शास्त्रज्ञ आणि संशोधक यांच्या प्रयत्नाने निर्माण होणारे जे विचारधन आहे, ते खरे म्हणजे समाजाचे फार मोठे धन आहे असे मी मानतो. ते असले म्हणजे देश ओळखला जातो, समाज ओळखला जातो. समाजाचे जीवन प्रवाही राहते, चिरंतन राहते. समाज जिवंत राहतो तो त्याच्याजवळ असणाऱ्या भौतिक सामर्थ्याने नाही तर त्याच्याजवळ असणाऱ्या सांस्कृतिक मूल्यांवर व विचारधनावर ! त्यावरच समाज आणि देश जिवंत राहिलेले आहेत. वाढलेले आहेत. असा इतिहासाचा दाखला आहे.'' यशवंतरावांचा साहित्य आणि साहित्यिकांवर फार मोठा विश्वास होता. बहुजन समाजाच्या सर्व स्तरांमधून नव्या वृत्तीचे, खऱ्या अर्थाने नवे अनुभव, नवे भावविश्व, नवे सत्य, नवी मूल्ये, नवे संघर्ष, दलित, ग्रामीण, आदिवासी, भटक्या अशा सर्व स्तरांतून नवे साहित्य निर्माण होत आहे. या साहित्यातून आपल्या सुखदु:खाला वाचा फोडण्याचे काम लेखणीवाणीच्या माध्यमातून या नवलेखकांनी करावे असे त्यांना वाटत होते. महाराष्ट्रामध्ये आज वैचारिक लिखाणाची वाण पडलेली दिसून येते. त्याबद्दल ते खंत व्यक्त करतात. ''मराठी सारस्वत विविध अंगोपांगानी समृद्ध व्हावे आणि मराठी भाषा संपन्न व्हावी म्हणून एका व्यापक अशा वैचारिक बैठकीची आता फार आवश्यकता आहे.'' यशवंतराव चव्हाण नेहमी साहित्यिकांशी व त्यांच्या कलाकृतीशी संधान साधून असत. साहित्य हे एक सामर्थ्य आहे, कारण ते विचार देणारे आहे असा उल्लेख त्यांनी अनेक ठिकाणी केला आहे.

यशवंतराव साहित्याचा अर्थ संकुचित वृत्तीने घेत नाहीत. साहित्यासंबंधी त्यांची दृष्टी विशाल आहे.''जे साहित्य सर्वसामान्य जनतेचे हित साधते ते साहित्य.'' अशा प्रकारे साहित्याची अतिशय साधी पण अर्थवाही व्याख्या ते करतात. ''निव्वळ शब्दलालित्य म्हणजे साहित्य ही साहित्याची व्याख्या घेऊन त्याप्रमाणे चालण्याचा काळ संपलेला आहे.'' असा सल्ला त्यांनी साहित्यिकांना दिला आहे. साहित्याने काळाच्या, देशाच्या, परिस्थितीच्या मर्यादेत न राहता सारे जीवन व्यापून राहिले पाहिजे. साहित्याने जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांशी अधिक निकटचे संबंध प्रस्थापित केल्याशिवाय लोकजीवन समजणार नाही. लोकजीवनातूनच साहित्य निर्माण होते. तेव्हाच त्या साहित्यातून समाजमनाचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रतिबिंब साहित्यात पडते. अशा साहित्याचा परिणाम पुन्हा

समाजमनावर घडत असतो. ''म्हणून लोकजीवनातूनच साहित्य निर्माण होते असे मानण्यात येते. आवाजाच्या प्रतिध्वनी प्रमाणे ही क्रिया चालत असते. लोकजीवनाचा स्वर साहित्यात उमटतो. आणि साहित्यात त्या स्वराचा असा प्रतिध्वनी निर्माण होतो की, जो पुन्हा लोकजीवनात जाऊन मिसळतो.'' अशा प्रकारे साहित्याचा जीवनावर परिणाम घडत असतो. हे चक्र चालूच असते. असे विचार यशवंतराव व्यक्त करतात. समाजजीवनात घडणाऱ्या अनेकविध घडामोडींसंबंधी उत्सुकता आणि ओढ साहित्यिकांना असली पाहिजे. अशा घडामोडी लेखक आपल्या साहित्यातून मांडत असतो. अशाच ठिकाणी सामाजिक जाणीव ही संज्ञा वापरता येईल म्हणजेच साहित्यात भोवतीच्या समाजाचे सुद्धा तपशील व समाजवास्तवाचे काही प्रमाणात सूक्ष्म निरीक्षण असणे गरजेचे आहे. यासाठी जीवनाशी संबंधित अशा विविध विषयांचा अभ्यास, ज्ञान असावे लागते. अशा प्रकारच्या अध्ययनातूनच असे कसदार, दमदार साहित्य निर्माण होते. त्याचबरोबर आपल्या साऱ्या निर्मिती व्यवहाराकडे साहित्यिकाने गांभीर्याने पाहिले पाहिजे असा त्यांचा दृष्टिकोन होता. साहित्याच्या निर्मितीमध्ये अभ्यासाला, गांभीर्याला जसे अतिशय महत्त्व असते तसेच साहित्यकृतीतील वास्तवतेलाही महत्त्व असते. साहित्यकृतीचा सारा डोलारा उभा असतो तो समाजवास्तवावरच. शब्द, भाषा, निवेदनशैली, विविध प्रसंग, मानवी मनाची भावांदोलने, नाद, लय इ. अनेक घटक साहित्यकलाकृतीमध्ये एकजीव होत असले तरी हे सारेच घटक एकाच केंद्रस्थानाभोवती फिरत असतात आणि हे केंद्रस्थान म्हणजे त्या लेखकाला भावलेले समाजवास्तव. समाजवास्तव ही साहित्यकृतीमधील अतिशय महत्त्वाची बाब असते. यशवंतराव चव्हाण म्हणतात, ''मानवी जीवन वैयक्तिक असो वा सामाजिक असो त्याच्या कोणत्याही पैलूची भाषेच्या मदतीने केलेली अभिव्यक्ती साहित्याचे स्वरूप घेते. खरे म्हणजे असल्या साहित्याने मानव आणि मानवोपयोगी प्रकृती ह्यांची अभिव्यक्ती झाली पाहिजे.'' मानवाचे जगणे, त्याचे अस्तित्व टिकणे, त्याची सुरक्षितता आणि सुखसमृद्धी या सर्व गोष्टी साहित्यात अभिव्यक्त व्हाव्यात अशी त्यांची अपेक्षा होती.

साहित्यिक हा समाजातच असतो. त्याच्या भोवती सारा समाज वेढून राहिलेला असतो. किंबहुना लेखकाच्या बऱ्यावाईट घडणीसाठी भोवतीचा समाज, समाजव्यवस्था, राज्यव्यवस्था, अर्थव्यवस्था, राजकारण इ. अनेक बाबी जबाबदार असतात. लेखन हे आत्मनिष्ठ असते असे कितीही म्हटले किंवा लेखकाचा तो वैयक्तिक आविष्कार असतो असे म्हटले तरी त्याच्या जडणघडणीत वरील साऱ्याच बाबींना महत्त्व असते. म्हणजेच



भोवतीच्या समाजातून तो घडत असतो आणि तो व्यक्त करतो ते अनुभवही त्याच समाजातले असतात. ते लिहितात, ''साहित्य हे सुद्धा एका अर्थाने जीवनाची समीक्षा आहे. साहित्य निर्मिती करावी, पण खरे म्हणजे जीवनावरचा लोभ सोडू नये. जीवनावरचे प्रेम कायम ठेवावे. जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत काम करणाऱ्या सगळ्याच माणसांचा नाही म्हटले तरी साहित्याशी संबंध येतो. मग हे काम जीवनाच्या कोठल्याही क्षेत्रातले असो शब्दांच्या मदतीशिवाय ते आपणास पार पाडता येत नाही. शब्दांचा वापर करून त्यांच्यामार्फत विचार मांडावयाचा असतो. मग हे प्रकटीकरण कोणी लेखनाद्वारे करील किंवा कोणी वाचेद्वारा करील. पण या प्रकटीकरणातूनच शेवटी साहित्यनिर्मिती होत असते.''

यशवंतरावांची साहित्याकडे पाहण्याची दृष्टी व्यापक आहे. ''साहित्यिक विचारवंतांनी प्रकट केलेले साहित्य कोणत्याही रंगाचे असले तरी चालेल पण आजूबाजूच्या परिस्थितीचा डोळसपणे अभ्यास करून समाजात सर्व थरांत निर्माण झालेल्या अस्वस्थतेची जाणीव असणारे समाजचिंतन त्यात असले पाहिजे.'' असे चिंतनशील व समाजोपयोगी साहित्य निर्माण व्हावे असे त्यांना वाटते. अशा स्वरूपाचे साहित्य समाजामध्ये परिवर्तन घडवून आणेल असा विश्वास त्यांना होता. तसेच असे साहित्य समाजाला मार्गदर्शन करील, समाजाची कुवत वाढवेल, मने व्यापक करील आणि नव्या जाणिवा निर्माण करील. ज्या साहित्यात अन्यायाविरूद्धची चीड आहे, देशातील आर्थिक, सामाजिक विषमतेच्या, दारिद्र्याच्या प्रश्नाचे विवरण आहे, सामान्य माणसाचे प्रेम आहे आणि ज्या साहित्यात सामाजिक समता आणणारे, समाजातील सर्व घटकांना वाव देणारे लेखन आहे तेच साहित्य खरे साहित्य होऊ शकेल असे यशवंतरावांना वाटे.

मराठी साहित्य हे राष्ट्रीय जीवनापासून अलिप्त राहू शकत नाही हे यशवंतरावांना मान्य होते. राष्ट्रीय आंदोलने आणि सामाजिक चळवळी यांची प्रतिबिंबे मराठी वाङ्मयात अवश्य पडावीत याविषयी त्यांचे दुमत नव्हते. साहित्यिकांचे तत्त्वज्ञान व विचार त्याच्या सामाजिक परिस्थितीवरून ठरत असते. 'माणूस' खऱ्या अर्थाने भौतिक, सामाजिक परिस्थितीतच घडतो. 'माणूस' हाच साहित्याचा केंद्रबिंदू आहे. आणि या विषयाच्या अनुभूतीतून साहित्य निर्माण झाले पाहिजे आणि साहित्यिकाच्या साहित्य रचनेत समाज मनाचे प्रतिबिंब पडले पाहिजे असे त्यांना वाटते. यशवंतराव साहित्याचे स्वरूप सांगत असतानाच त्या साहित्याचा समाजजीवनासाठी आरशासारखा उपयोग झाला पाहिजे असे मत व्यक्त करतात. लोकजीवन समृद्ध करण्यासाठी साहित्याचा उपयोग व्हावा, ज्ञानाच्या आणि विज्ञानाच्या क्षेत्रात मूलभूत संशोधन करण्यासाठी

साहित्यिकांनी पुढाकार घेऊन तशा स्वरूपाची साहित्यनिर्मिती करावी. साहित्य हे संवेदनशील व पारदर्शक असावे या संदर्भात ते म्हणतात, ''साहित्य हे थर्मामीटरमधील पाऱ्यासारखे संवेदनशील असते. निदान असावे. समाज मानसामध्ये जे असते तेच साहित्यात अवतरते. मराठी साहित्याचा इतिहास हेच सांगतो.'' यावरून त्यांच्या विचारांची दिशा लक्षात येते. त्यांच्या साहित्य विचाराचे समाज हेच सूत्र आहे. त्यांच्या सर्वच विचारांमध्ये 'समाज' हा केंद्रीभूत आहे. समाजाभोवतीच त्यांचे सर्व विचार पिंगा घालताना दिसतात. समाजाचे प्रश्न, समस्या, सुखदु:खे सोडविण्यासाठी यशवंतराव राजकारणाबरोबरच साहित्याचा उपयोग आणि वापर करून घेतात.यशवंतरावांनी समाजकारणाचे, साहित्याचे आणि राजकारणाचे एकत्रीकरण केले. त्यांच्यातील राजकारणी समाजाचे, राष्ट्राचे प्रश्न सोडविण्याला प्राधान्य देतो. समाजाचे अंतिम कल्याण करण्यासाठी झटतो. साहित्यिकानेही समाजाचे प्रश्न मांडावेत. त्यांच्या समोरच्या समस्या चित्रित कराव्यात. साहित्य आणि समाज यांची फारकत न होऊ देता साहित्याने समाजाच्या कल्याणासाठी प्रयत्न करावेत. बंधूभाव वाढविण्यासाठी मदत करावी. ऐक्यभावना वाढीस लावावी. प्रादेशिक भेद संपुष्टात आणण्यासाठी साहित्यिकांनी प्रयत्नशील राहण्याचा संदेश ते देतात. कारण साहित्याचा आणि समाजाचा अतूट संबंध असल्याचे ते सांगतात. तसेच साहित्यिकांची सामाजिक बांधिलकी स्पष्ट करतात. साहित्यिकांनी श्रेष्ठ दर्जाचे साहित्य निर्माण करावे आणि राष्ट्रालाही मोठे करावे असेही त्यांना वाटते.

यशवंतरावांना विद्वानांबद्दल व विचारवंताविषयी आदर होता. त्यांच्या कार्यावर आणि त्यांच्या ज्ञानावर त्यांचा पूर्ण विश्वास असे. अशाच विचारवंतांच्या कार्यावर देश, राष्ट्र जगत असते. सर्व धनापेक्षा विचारधन श्रेष्ठ असते. म्हणून विचारवंत साहित्यिकांनी सर्वांची बौद्धिक भूक भागविण्यासाठी सर्व तऱ्हेचे साहित्य निर्माण करणे त्यांना आवश्यक वाटते. कारण पंडितांची, विचारवंतांची, साहित्यिकांची 'अक्षरवाणी' ही देशाला चैतन्यरूप बनवत असते. त्यांच्यात राष्ट्राभिमान जागृत करते. आणि राष्ट्रभावनेचा विकास घडवते. त्यामुळे कुठल्याही देशातील साहित्य आणि साहित्यिक जिवंत राहतात. मोठे मोठे सम्राट येतात आणि जातात. त्यांची नामोनिशाणी राहत नाही. परंतु शब्दधन, विचारधन हे चिरंजीव व चिरतरुण असते. म्हणूनच सम्राट संपतात, शेक्सपिअर शिल्लक राहतो. तुकारामांचे अभंग बुडविणारे मातीमोल होतात. तुकारामांचे स्थान अभंग राहते. ''मानवी मनात अनेक मूळ आशाआकांक्षा असतात. कल्पना असतात आणि त्या प्रकटीकरणासाठी, व्यक्त होण्यासाठी, एक प्रकारे हाका मारीत असतात. शब्दांसाठी त्या भुकेलेल्या असतात,

तहानलेल्या असतात. त्यांच्या हाकेला ओ देऊन लेखक, विचारवंत, संशोधक व शास्त्रज्ञ त्यांना लेखनाद्वारा शब्दरूप देत असतात. मराठी भाषिक जनतेच्याही अशा काही आशा, आकांक्षा, इच्छा असून त्या विविध प्रवाही आहेत. त्यांना आपण लेखनाद्वारे शब्दरूप दिले पाहिजे. त्याचप्रमाणे ज्ञानाच्या सरोवराचे पाट आपण लोकांच्या जीवनापर्यंत पोहोचवले पाहिजे.'' अशा प्रकारचे अतिशय मोलाचे व महत्त्वपूर्ण विचार यशवंतराव येथे मांडतात. जनता म्हणजे मूक कलावंत असतो. त्यांना वाचा देण्याचे कार्य फक्त साहित्यिक करतात. हा विचार अजोड असाच आहे.



लेखकांनी सामाजिक बांधिलकी ठेवूनच लेखन करावे. स्वप्नात भराऱ्या मारणारे वास्तविक प्रश्नाकडे डोळेझाक करतात आणि स्वप्नाळू समाज निर्माण करतात. एक प्रकारची समाजाची दिशाभूल करतात. हे यशवंतरावांना नको आहे. सामान्यातील सामान्य माणसाचे प्रश्न, त्याचे दु:ख, वेदना साहित्यिकांनी आपल्या शब्दात मांडावी. आणि शक्य झाल्यास ते दु:ख दूर होईल असे पाहावे. त्याचप्रमाणे साहित्यिकांनी भारताच्या कानाकोपऱ्यातील जीवन, विशेषत: ज्यांच्याकडे साहित्यिक अद्यापपर्यंत पोचलाच नाही अशा आदिवासी, दलित, स्त्री जीवनाचे वास्तव चित्रण करून आपल्या अमर साहित्याद्वारे भारतीय समाजजीवन आणि संस्कृतीचे दर्शन घडवले पाहिजे. साहित्य हे धारदार शस्त्र आहे. ते शस्त्रापेक्षाही अधिक परिणाम साधू शकते. साहित्यातून योग्य संस्कार घडतात. म्हणून अशाच साहित्याच्या निर्मितीची अपेक्षा त्यांच्या विचारातून दिसून येते.

यशवंतरावांना लोकजीवन समृद्ध करण्यासाठी तसेच महाराष्ट्राची प्रादेशिक एकात्मता भक्कम करण्यासाठी आणि माणसांची भावनात्मक एकात्मता टिकविण्यासाठी लेखकांनी आपली लेखणी झिजवावी असे वाटते. याशिवाय शास्त्रीय माहिती व वैज्ञानिक संशोधन मराठी भाषेत झाले पाहिजे असा वारंवार आग्रह ते धरतात. ''ज्ञानाच्या आणि विज्ञानाच्या क्षेत्रातील मूलभूत संशोधन हाती घेण्याचा प्रयत्न ज्या भाषेत होतो तीच ज्ञानाची भाषा होऊ शकते.'' आज आपल्याला हे मान्य करावेच लागेल. त्याशिवाय त्या भाषेला 'ज्ञानभाषा' होता येत नसते. आणि अमृताते पैजा जिंकायचे असेल, ज्ञानेश्वरांचे भाकीत खरे करायचे असेल तर शास्त्रीय माहिती मराठीत उपलब्ध झाली पाहिजे. इतर भाषेमधील ज्ञानभांडार खेचून आणण्याची भाषा यशवंतराव करतात, इतकी त्यांना गरज वाटते आणि यासाठी साहित्य संस्कृती मंडळाने 'पॉवर हाऊस बनावे' असे ते म्हणतात. पॉवर हाऊस हे सृजनशील असते. इतरांची उचलेगिरी करणारे नसते. हे मंडळ महाराष्ट्राचे जीवन व्यापक, विस्तृत व क्रियाशील करणारे माध्यम बनावे अशी इच्छा ते बोलून दाखवतात.

यावरून यशवंतराव साहित्याच्या भाषा आणि माध्यमाकडे आणि साहित्यिकांकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहात होते ते स्पष्ट होते.

## साहित्यातील सामाजिक जाणीव

यशवंतराव चव्हाण यांनी 'सामाजिक जाणीव' प्रकट केली हे त्यांच्या साहित्याचा अभ्यास करताना सहज लक्षात येते. सामाजिक जाणिवेच्या स्वीकारामध्ये समाजाच्या स्थितिगतीचा अतिशय गांभीर्याने त्यांनी शोध घेतला. समाजाची प्रगती, जडणघडण, सामाजिक, आर्थिक संबंध, समाजातील अंत:प्रवाह इ. विविध घटकांचे परस्परसंबंध तसेच शोषण, पिळवणूक, गुलामगिरी या सगळ्यांची सामाजिक जाणीव त्यांच्या साहित्यातून प्रकट होते. तेथेच सामाजिक या संज्ञेला अर्थ प्राप्त होतो.

कोणत्याही साहित्याचे वेगळेपण हे जसे त्यातून व्यक्त होणाऱ्या जाणिवांवर अवलंबून आहे, तसेच त्या साहित्याचे श्रेष्ठत्व किंवा सामान्यत्वही लेखकाने व्यक्त केलेल्या जीवन जाणिवांच्या उत्कटतेवरच अवलंबून असते. प्रतिभावंताची संवेदना मान्य केली की जीवनानुभवाचे सामर्थ्यही मान्य करावे लागते. केशवसुत, हरिभाऊ, वामन मल्हार जोशी, मुक्तिबोध तसेच काही प्रमाणात खांडेकर, मर्ढेकर, अनिल, कुसुमाग्रज यांनी सामाजिक जाणीव ठेवून लेखन केले. अलीकडच्या काळात दलित साहित्याच्या संदर्भात, ग्रामीण साहित्याच्या संदर्भात, 'सामाजिक जाणीव' ही संज्ञा वापरली जाते. समाजासह जाणारे, समाजाच्या संगतीने जाणारे असे साहित्याचे स्वरूप असते. एक प्रकारच्या आंतरिक प्रेरणेने, अंत:स्फूर्तीने लेखक साहित्य निर्माण करीत असतो. त्यामध्ये समाजाच्या स्थितिगतीचा व जडणघडणीचा विचार अपेक्षित असतो. ''समाजजीवनात घडणाऱ्या अनेकविध घडामोडीसंबंधीची उत्सुकता आणि ओढ जेथे कलावंत मनाला वाटत असते आणि त्या घडामोडी तो आपल्या साहित्यातून मांडत असतो अशाच ठिकाणी 'सामाजिक जाणीव' ही संज्ञा वापरली जाऊ शकते.'' साहित्यिक हा समाजातच जन्मतो. त्याची सृजनशक्ती ही सामाजिक घटना कल्पनांच्या रूपाने व्यक्त होते. म्हणून सामाजिकता व सृजनशक्ती यांच्या विधायक मिश्रणातूनच साहित्यिकांची साहित्यिकता सिद्ध होते. सामाजिकतेशिवाय साहित्य व साहित्यिक निर्माण होऊच शकत नाहीत. म्हणून साहित्यिकांची सामाजिकता ही त्यांच्या निर्मितीचे समर्थनही असते व साधनही असते.

साहित्य हे समाजाची सांस्कृतिक गरज भागविणारी निर्मिती असते. तत्कालीन समाजाच्या स्थितिगतीचा परिणाम साहित्यनिर्मितीवर होत असतो. थोडक्यात समाजाची ज्या प्रकारची स्थितिगती असेल, ज्या प्रकारचे काळाचे आव्हान असेल,



ज्या प्रकारच्या जीवनविषयक मूल्यकल्पना असतील, त्या प्रकारची 'जाणीव' लेखकाच्या भावविश्वाबरोबरच त्यांचे विचारविश्वही शिल्पित करीत असते. ''म्हणूनच 'सामाजिक जाणिवा' असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा समाजाच्या स्थितिगतीबद्दलचा विचार गृहित असतो किंबहुना कलावंतांच्या विचार विश्वाचा परिपाक म्हणजेच 'सामाजिक जाणीव' असते.'' साहित्यातील सामाजिकता व सामाजिक जाणीव ही सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा देत असते असे मत ते व्यक्त करतात.

''कुठल्याही समाजातील कर्तृत्ववान मनुष्य हा समाजाला सोडून कर्तृत्व करूच शकत नाही.'' असे यशवंतरावांनी म्हटले आहे. तसेच काहीसे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात घडले आहे. त्यांनी वास्तव जीवनात जे पाहिले, वाचले, अनुभवले तेच त्यांच्या जीवनात मार्गदर्शक ठरले. यशवंतरावांसारखा लेखक समाजातच जन्मतो, जगतो त्यामुळे जन्मापासूनच त्यांचे मत एका अखंड सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेने संस्कारित झालेले होते. त्यांच्या लौकिक जीवनाचे क्षेत्र समाजातच असल्याने लेखक म्हणून निर्माण केलेली वाङ्मयनिर्मिती ही देखील सामाजिक जाणीव प्रकट करणारी आहे. त्यामुळे ही सामाजिक जाणीव त्याने घेतलेल्या जीवनविषयक अनुभवांचे अन्वयार्थ लावणारी असते. ते लिहितात, ''ज्या समाजात, ज्या देशात आपण जन्मलो, त्या देशाला, समाजाला, आपला काहीतरी उपयोग व्हायला नको का? माणूस हा 'सामाजिक प्राणी' असं म्हणतात तेव्हा त्याचं सामाजिकत्व हे त्याच्या सामाजिक बांधीलकीवरच अवलंबून असतं.'' यशवंतरावांसारखा लेखक आपल्या कलाकृतीतून अशी जी सामाजिक जाणीव प्रकट करतो ती त्यांच्या वास्तवाच्या आकलनातून आलेली असते आणि हे त्यांचे आकलन अगदी मूलगामी आहे. त्यामुळे साहित्यातील जाणीव ते प्रभावीरीत्या प्रकट करू शकतात.

यशवंतरावांनी आपली सामाजिक जाणीव अर्थपूर्णरीत्या प्रकट केली आहे. त्यांनी त्यांच्या साहित्यात वास्तवाचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे त्यांची सामाजिक जाणीव कोठेही धूसर जाणवत नाही. याचे कारण त्यांचे समाजवास्तवाचे असलेले भरपूर आकलन हे आहे. तसेच पूर्वग्रह दूषित लेखन त्यांनी अजिबात केले नाही. ते म्हणतात, ''आपणही समाजाचे घटक आहोत. समाजाचे आपल्यावर ऋण आहे. ही भावना मनात आणली तर तुम्हाला या समाजासाठी कितीतरी गोष्टी करता येतील. समाजऋण हे केवळ पैसा देऊनच फेडायला लागते असे नाही तर काही प्रेमाचे शब्द, आपुलकीची भावना, थोडे फार कष्ट याबरोबरच समाजाविषयीची तळमळ असली तरी कितीतरी कामे करता येणं सहज शक्य आहे.'' म्हणून समाजासाठीही नेमकं काय करता येईल याचा वेध घेतला पाहिजे, त्यासाठी विचारांचं आंदोलन उभं केलं पाहिजे.

यासाठी संबंधित व्यक्तीकडे भक्कम वैचारिक बैठक असणे गरजेचे आहे. यशवंतरावांच्या साहित्यातील सामाजिक जाणिवांचा विचार करताना त्यांच्या वाङ्‍मयीन, सामाजिक व राजकीय प्रेरणांचा शोध घेणे महत्त्वाचे ठरते. हा शोध घेताना एक गोष्ट चटकन जाणवते की या प्रेरणा संमिश्र स्वरूपाच्या होत्या. त्यांच्यावर वाङ्‍मयीन संस्कार हरिभाऊंच्या साहित्यातून, खांडेकर, साने गुरुजी, गोविंदाग्रज, कोल्हटकर आदी मान्यवर साहित्यिकांच्या साहित्यातून झालेला होता. या साहित्यिकांचा आदर्शही त्यांच्यासमोर होता. 'कृष्णाकाठ' या आत्मचरित्राची सुरुवातच त्यांनी प्रसिद्ध कवी श्री गोविंदाग्रज यांच्या ''कृष्णाकाठी कुंडल आता पहिले उरले नाही'' या कवितेच्या ओळीने केली आहे. लहानपणापासूनच ते कविता वाचायला लागल्यापासून त्यांच्या आवडत्या कवितांपैकी ती एक कविता होती. सुरुवातीच्या काळात गडकरी, कोल्हटकर, खांडेकर यांच्या भाषेच्या विलासाने त्यांना विशेष मोहिनी घातली असावी. पण नंतर या साहित्यिकांच्या साहित्यात कधी कधी जो एक सामाजिकतेचा पदर दिसतो तेवढाच यशवंतरावांनी प्रामुख्याने उचलला होता असे दिसते.

कृष्णा कोयनेचा प्रीतिसंगमकाठचा नैसर्गिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या संपन्न असलेला परिसर यशवंतरावांच्यामधील संवेदनशील प्रकृतीला पोषक ठरला. यशवंतरावांना खेड्याचे, ग्रामीण जीवनाचे उत्स्फूर्त असे आकर्षण होतेच. सुरुवातीचा बराच काळ यशवंतरावांचे वास्तव्य देवराष्ट्रासारख्या आडवळणाच्या गावात होते. तिथेच त्यांचे अनुभवविश्व समृद्ध झाले. पुढे शिक्षणासाठी कोल्हापूरला येईपर्यंतच्या काळात यशवंतरावांनी सातारा, सांगलीचा संबंध कमी होऊ दिला नव्हता. पण कोल्हापूरच्या वास्तव्यात त्यांच्या वाचनात व ज्ञानात खूप भर पडली. वाचनाने त्यांचे सामाजिक भान सतर्क बनले. यशवंतरावांना तेथील लोकांचे, शेतकऱ्यांचे दारिद्र्य दिसत होते. शेतकरी-मजूर, कामकऱ्यांच्या याच दारिद्र्याला, असहाय्यतेला, समाजातील शोषणाला त्यांनी आपल्या लेखणीवाणीच्या माध्यमातून शब्दांकितही केले होते. या दारिद्र्याचा अर्थ, या शोषणामागील कारणे शोधण्याचा प्रयत्न ते करत होते. साहजिकच यशवंतरावांच्या साहित्यातून मानवी दुःख, शोषित माणसाचे दारिद्रयाने खचलेले आयुष्य हे सगळे चित्र उमटले.

वाङ्‍मयातील खांडेकर-फडके युगाबरोबरच देशाच्या राजकीय वर्तुळात गांधी युग सुरू झाले होते. गांधी भारतीय पातळीवरचे राष्ट्रीय पातळीवरचे नेते झाले होते. यशवंतराव यावेळी स्वातंत्र्यचळवळीत एका ध्येयवादाने प्रेरित झाले होते. मनाने अतिशय संवेदनशील म्हणून आसपासच्या दारिद्र्यात खुंटणारे मानवी जीवन पाहून तळमळणारे, व्याकूळ होणारे, त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील या संवेदनशील



वृत्तींना गांधीवादाचे आकर्षण वाटले व म. गांधींच्या तत्त्वज्ञानाचा मोठा पगडा न कळत त्यांच्यावर बसला होता. ग्रामीण जीवनाकडे त्यांनी गांधीजींच्या दृष्टितूनच पाहिले. ''खेड्यातल्या दारिद्र्याचा आणि अज्ञानाचा शोध घेण्याचा, त्यावर उपाय शोधून काढण्याचा माझा छंद हा त्यावेळेपासूनचा आहे. भारताचा विकास म्हणजे भारताच्या ग्रामीण भागाचा विकास आणि तिथल्या शेतीचा आणि शेतकऱ्यांचा विकास उद्योगाचा विकास आणि साऱ्या माणसांचाच विकास. याला माझ्या मनात बळकटी प्राप्त झाली. ती या पहिल्या पावलामुळे! परिस्थितीच्या चटक्यामुळे. तापवल्याशिवाय वाकवता येत नाही हे लहानपणी लोहाराच्या भात्याशेजारी बसून मी पाहिले होते. परिस्थिती बदलण्यासाठी शहरातली आणि खेड्यातली मने तापवली तर!'' हा गवसलेला नवा आदर्श त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील भावविश्वाची उभारणी करत होता. रंजनातून सामाजिक प्रबोधन हे त्यांच्या साहित्याचे उद्दिष्ट नाही. गांधीयुगाने दिलेली समाजाकडे पाहण्याची दृष्टी व सामाजिक प्रबोधनाच्या उद्दिष्टांमुळेच त्यांच्या साहित्यात सर्वसामान्य मनुष्याचे दु:खी जीवन, त्याचे निरंतर होणारे शोषण, अस्पृश्य समाजातील दु:ख, त्यांचे प्रश्न, भारतीय समाजरचनेतील विषमता, हिंदू स्त्रीची वर्षानुवर्षे झालेली कोंडी, त्यांचा संघर्ष अशा अनेक गोष्टी येत होत्या. त्यांच्या एकेक लेखनाचा किंवा भाषणाचा आशय जरी आपण न्याहाळला तरी ही गोष्ट लक्षात येते. सामाजिक जाणिवांच्या या पार्श्वभूमीवर त्यांचे हे लेखन महत्त्वपूर्ण आहे. 'जीवनाचे पंचामृत,' 'सामाजिक जबाबदारी' संयुक्त महाराष्ट्राचे साध्य', 'नव्या प्रेरणांना साथ देऊ या', 'समाजक्रांतीचे रसायन', 'सामाजिक प्रगतीची प्रेरणा', 'भविष्यकाळाचे अभूतपूर्व आव्हान', यासारख्या कितीतरी लेखांमध्ये त्यांनी सामाजिक प्रश्नासंबंधी, समाजातील विषमतेच्या दु:खासंबंधी, अथवा शोषणाच्या प्रश्नाविषयी मांडलेले विचार महत्त्वाचे आहेत. आपल्या सगळ्या वाङ्मयीन निर्मितीतूनच ते एक प्रकारे सामाजिक प्रवृत्तीचे विश्लेषण व विवेचन करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. अशा प्रकारच्या विश्लेषणात व विवेचनात यशवंतरावांची स्वत:ची अशी खास वैशिष्ट्ये आहेत. वेगळेपण आहे.

यशवंतरावांच्या साहित्यातील सामाजिक जाणिवांच्या संदर्भात त्यांचे वैशिष्ट्य हे की भविष्यकालीन नव्या समाजरचनेचे त्यांना आकर्षण होते. सामाजिक व्यवस्थेकडे वैज्ञानिक व शास्त्रीय दृष्टिकोनातून पाहावे असा सल्ला ते देतात. ते आपल्या लेखनातून व भाषणातून दलितांच्या प्रश्नांकडे, दु:खांकडे , समाजातील समानतेकडे तीव्रतेने लक्ष देतात. त्यांच्या लेखनात आत्मशोधाचे एक बीज आढळते. यशवंतराव हे प्रतिभाशाली

राजकीय नेते तर होते त्यात पुन्हा त्यांच्या मानवतेवरील प्रेमाची त्यांच्या साहित्याला जोड मिळाली होती. या प्रेमाची जातकुळी संतकवींना मानवतेबद्दल वाटणाऱ्या कळवळ्याची, प्रेमाची होती. म्हणूनच माणसाच्या माणसुकीवर व त्याच्या अंत:सामर्थ्यावर त्यांची जबरदस्त श्रद्धा होती. मानवी सामर्थ्यावरचा प्रचंड विश्वास, व्यापक मानवसमूहाच्या दृष्टीने केलेला परिवर्तनवादी विचार, त्यासाठी संघर्षशीलता आणि मूल्यात्मक दृष्टीने समाजवास्तवाचा अन्वयार्थ लावण्याची कुवत या सगळ्या गोष्टी ज्या साहित्यिकाजवळ एकवटलेल्या आहेत. त्यालाच खऱ्या अर्थाने 'सामाजिक जाणीव' प्रकट करता येईल. त्याच्याच कलाकृतीचे शक्तीकेंद्र ही सामाजिक जाणीव होईल. ही सर्व गुणवैशिष्ट्ये आपणास यशवंतरावांच्या साहित्यामध्ये पाहावयास मिळतात. म्हणून वरील विवेचन आणि यशवंतरावांचे साहित्य यात समान धागा सापडतो.

## साहित्य लेखनामागील प्रेरणा व दिशा

यशवंतराव चव्हाण हे प्रतिभावंत साहित्यिक, प्रथितयश ललित लेखक, पुरोगामी सामाजिक कार्यकर्ते, काँग्रेस पक्षाचे राजकीय नेते, प्रभावशाली वक्ते अशा विविध गुणांनी सुपरिचित होते. त्यांना वाङ्मयीन संस्काराची प्रतिभेची देणगी मिळाली व त्यांची साहित्यिक जडणघडण झाली ती त्यांच्या आईमुळेच. बालपणी आईच्या मांडीवर झोपून त्यांनी अनेक ओव्या ऐकल्या. तसेच महाभारताचे कथासार आईने आपल्या ओव्यांतून त्यांना ऐकवले. तर गावात होणारे भजन, कीर्तन, प्रवचने, पौराणिक आख्याने यातून यशवंतरावांची भाषेविषयीची जाण सतत जागृत राहिली. पुढे ती गणपती उत्सवातून कविता, मेळ्याची पदे लिहिण्यापासून ते इतर लेख, बातम्या, कविता यांच्यातून प्रकट झाली. हा त्यांचा जणू छंदच बनला. ''साहित्याकडे त्यांनी केवळ विरंगुळा म्हणून पाहिले नाही तर त्या साहित्यातून जीवनाचा आणि अवतीभोवतीचा अर्थ ते शोधत राहिले.'' साहित्य, लेखन-वाचनातून ते राष्ट्र कार्याची ऊर्मी शोधत असत. भाषेवर ते मनापासून प्रेम करत. साहित्याविषयी चोखंदळ जाण बाळगत. शालेय जीवनापासून त्यांना साहित्य जीवनाचा छंद लागला. पुढे ते राजकारणात सहभागी झाले. अनेक राजकीय पदे सांभाळत असताना त्यांचा सर्व थरांतील लोकांशी संपर्क आला. त्यांच्याकडे असणाऱ्या कर्तव्यदक्षता व कार्यतत्परता या गुणांमुळे त्यांचा राजकीय लौकिक देशात, परदेशात वाढत गेला. परिणामत: त्यांना अनेक समारंभात, संमेलनात, मेळाव्यात निमंत्रित केले जाऊ लागले. त्या त्या प्रसंगी



यशवंतरावांनी जी भाषणे केली, ज्या चर्चेत सहभागी झाले ती भाषणे समयोचित तर होतीच त्याचबरोबर रोचक होती. अभ्यासपूर्ण होती. साहित्यविषयक केलेल्या भाषणातून त्याची प्रचिती येते. त्याबरोबर त्यांची साहित्यविषयक आवड दिसून येते.

'वाचक' ही आपली साहित्यक्षेत्रातील प्राथमिक भूमिका तर यशवंतरावांनी अत्यंत निष्ठेने व चोखपणे अगदी बालपणापासून पार पाडलेली दिसते. कृष्णा-कोयना, सोनहिरा हा परिसर तसा निसर्गत: निसर्ग सौंदर्याचे वरदान ठरलेला. या रम्य परिसरात बालपणी त्यांनी घेतलेला साहित्य आस्वाद म्हणजे अक्षय आनंदाचा प्रवाहच होय. अशा कितीतरी आठवणी यशवंतरावांच्या संग्रही आहेत. त्यांच्या बालपणातील वाचनाचा हा स्वच्छंदी दिनक्रम त्यांच्या निर्व्याज साहित्यिक संस्कारास कारणीभूत ठरला. पुढे ''राजकारणातील रुक्षपणा घालविण्यासाठी सतत वाचन करून नवीन ज्ञान आत्मसात करण्यावर त्यांचा भर होता. साहित्यावर त्यांचे खूप प्रेम होते. 'साहित्यप्रेमी यशवंतराव' हा यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक महत्वाचा आणि आकर्षक पैलूच समजला जातो. परंतु राजकीय कार्यक्षेत्रात सक्रिय प्रवेश केल्यानंतर त्यांना अनेक छंदांना मुकावे लागले. राजकारणात हयात घालवली तरी त्यांचे व्यक्तिमत्त्व कधीच एकांगी बनले नव्हते. किंवा राजकारण हे आपले संपूर्ण जीवन आहे असे त्यांनी मानले नव्हते. कला, साहित्य, संगीत, खेळ, नाट्य या सर्व क्षेत्रांची त्यांना आवड होती. परंतु त्यांच्या आवडीच्या एखाद्या छंदास जीवनाच्या धावपळीमध्ये मुकावे जरी लागले तरी त्यांना त्याची फारशी खंत वाटली नाही. लहानपणी त्यांनी रविकिरण मंडळातील कवीने प्रामुख्याने य.दि. पेंढारकर, गिरीश यांच्या काव्याने लळा लावला. त्या वयामध्ये त्यांच्यावर काव्याचे संस्कार झाले. काही कविता त्यांनी लिहिल्या. पण हा काव्यलेखनाचा छंद मात्र पुढे कमी झाला. या संदर्भात ते लिहितात,''कवी बनण्याचा छंद जसा मनाला लागला, तसा कथा-कादंबरी लिहिण्याचाही छंद लागला. काही कथा मी लिहिल्या आणि त्यावेळी 'लोकक्रांती'त एक दोन प्रसिद्धही झाल्या. एक कादंबरीही मनामध्ये योजिली. पण छंदाचा सांधा बदलून गाडी दुसऱ्या मार्गावरून धावू लागली. तेव्हा ती कादंबरी कुठेतरी मागल्या स्टेशनवरच राहिली असावी.'' याचा अर्थ यशवंतरावांची गाडी साहित्याच्या रुळावरून राजकीय कार्याच्या रुळावर सांधा बदलून आली. याचा आपणास एवढाच अर्थ घेता येईल की वेळेअभावी कथा, कादंबरी, काव्य, नाटक या वाङ्मय प्रकारात त्यांनी फारशी साहित्य निर्मिती केली नाही, पण हा वाङ्मय प्रांत त्यांनी वर्ज्य मानला नाही. रसिक वाचक म्हणून कितीतरी कलाकृतींना त्यांनी आपला

अभिप्राय चोखंदळपणे कळवला आहे. काही कथा, कादंबरी, नाटक, कविता इ. सारख्या वाङ्मयीन कलाकृतींना त्यांनी प्रस्तावना लिहिल्या आहेत. पण त्या काळाचा महिमा लक्षात घेता मराठीतील साहित्य अभिरूची स्वप्नरंजनात गुंग होती. फडक्यांच्या प्रेमकथांबरोबरच खांडेकरांचा जीवनवाद रसिकांना स्वप्नांच्या दुनियेत घेऊन जाणारा होता. माडखोलकर आणि इतर असंख्य लेखक असले लेखन करत होतेच. यशवंतरावांच्या साहित्यिक प्रकृतीला ही भूमिका पटणारी नव्हती. दुसऱ्या बाजूला मार्क्सवादी विचारांचा प्रभाव अनेक कवींच्या कवितेवर व लेखनावर दिसतो. कुसुमाग्रज, मुक्तिबोध, करंदीकर, नारायण सुर्वे, लालजी पेंडसे, काणेकर, अनिल यांसारख्या लेखकांनी, कवींनी, मार्क्सवादी विचारांच्या अनुषंगाने जीवनाची एक नवी मांडणी करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी स्वातंत्र्याची चळवळ चालूच होती. कष्टकऱ्यांचे प्रश्न होते. शोषितांच्या व्यथा होत्या. या संबंधाच्या अनुरोधानेच जीवनातल्या सर्व प्रश्नांकडे यशवंतरावांसारखा ललित लेखक पाहात होता. ग्रामीणांच्या शोषणाचा मूलगामी विचार करणाऱ्या विचारवंतांच्या परंपरेमध्ये यशवंतरावांचे नाव घ्यावे लागेल. त्यामुळे साहिजकच त्यांचे लेखन कथा, कादंबरी, काव्य, नाटक यासारख्या वाङ्मयप्रकारांमध्ये कमी आहे किंवा या वाङ्मयात ते फारसे भरीव कामगिरी करू शकले नाहीत; परंतु त्यामुळे त्यांना या वाङ्मयप्रकारात लेखनापेक्षा वाचनावरच अधिक भर द्यावा लागला.

यशवंतरावांची साहित्य विचाराबाबतची भूमिका पाहताना असे आढळते की ते त्या वाङ्मयप्रकाराच्या आणि त्या त्या साहित्यकृतींच्या अंगभूत सौंदर्याचा विचार महत्त्वाचा मानतात. कविता हा साहित्याचा आत्मनिष्ठ प्रकार असून 'नवनिर्मिती' असल्याने तिच्या सौंदर्याला आणि बंदिस्तपणाला यशवंतराव महत्त्व देताना दिसतात. जीवनातल्या अनंत वेदनांना शब्दरूप देणाऱ्या आणि अनेकांच्या भावनांना शब्दरूप देऊन आनंद निर्मिती करणाऱ्या या काव्यप्रकाराबद्दल स्वत:ची भूमिका ते नम्रपणे व्यक्त करतात. याचबरोबर कवींच्या संपन्न व्यक्तिमत्त्वाचाही विचार मांडतात.

○ ○ ○



प्रकरण ३

# ललित वाङ्मयप्रकारांची समीक्षा

यशवंतरावांनी सर्वच साहित्य प्रकार आवडीने वाचले आहेत. त्यांची कादंबरी वाचनाची आवड तशी जुनीच आहे. किंबहुना साहित्य वाचनाची आवड कादंबरी वाचनापासून सुरू झाली. हरिभाऊंच्या ऐतिहासिक, सामाजिक कादंबऱ्या, तसेच नाथमाधव व डॉ. केतकर, फडके, खांडेकर, माडखोलकर, साने गुरुजी यांसारख्या श्रेष्ठ लेखकांच्या, कादंबरीकारांच्या कादंबऱ्या त्यांनी वाचल्या. फडक्यांचा प्रत्यक्ष विद्यार्थिदशेत त्यांना सहवास लाभला त्यामुळे आपण त्यांच्या कादंबरीचे भोक्ते होतो हेही ते प्रांजळपणे नमूद करतात. साने गुरुजींची 'श्यामची आई' असो की मॅक्झिम गॉर्कीची 'आई' कादंबरी. या कादंबरी वाचनाने त्यांच्या मनाची कालवाकालव होत होती. अशा स्वरूपाचे अक्षर वाङ्मय वाचले की ते स्वत:लाही हरवून जाताना दिसतात.

महाराष्ट्रीय माणसाला राजकारणाबद्दलही जबरदस्त आकर्षण वाटते. माडखोलकरांनी 'राजकारण' हा विषय घेऊन कादंबरी लेखन केले. समकालीन राजकीय विचारांचा व व्यक्तिचित्रांचा निर्देश त्यांच्या कादंबरीमध्ये असे. त्यांच्या पत्रकारितेचा, राजकारणाचा जो प्रदीर्घ अनुभव होता त्याच्या आधारे त्यांनी राजकीय कादंबऱ्या लिहिल्या. यशवंतरावांचा राजकारण हा जिव्हाळ्याचा विषय असल्याने भाऊसाहेबांच्या राजकारण व सामाजिक जीवनावर भाष्य करणाऱ्या कादंबऱ्या त्यांनी वाचल्या. ते म्हणतात, ''माडखोलकरांच्या साहित्याचा मी तसा पहिल्यापासूनच वाचक आहे. कादंबरीकार माडखोलकर मी वाचले होते. परंतु त्याहीपूर्वी त्यांचे टीकात्मक लेख मी अगदी पहिल्यापासून वाचीत आलो होतो.'' भाऊसाहेबांना माडखोलकरांच्या राजकीय कादंबऱ्यांनी एक नवीन दालन उपलब्ध करून दिल्याचेही ते नमूद करतात. तसेच त्यांच्यासारख्या समर्थ राजकीय कादंबऱ्यांची उंची इतर साहित्यिकांनी गाठली नाही असेही ते सांगतात. त्यांच्या 'मुक्तात्मा' या कादंबरीत साहित्याची बांधीलकी आहे असाही ते उल्लेख करतात. अरुण साधूंच्या राजकीय कादंबऱ्याबाबत ते लिहितात, ''राजकारणाचे मराठी कादंबऱ्यांतील चित्रण अतिशय अपुरे व फसवे आहे. काही

उदाहरणे सांगायची तर अरुण साधूंच्या 'सिंहासन' या कादंबरीत मला प्रचाराचा वास येतो. राजकीय कादंबऱ्या लिहिण्याचा साधूंचा प्रयत्न आहे. पण त्यांचा थाट प्रचारकी आहे. 'सिंहासन' कादंबरीपेक्षा 'रिपोर्टिंग' वाटते.'' यावरून यशवंतरावांच्या विचारांची स्पष्टता तर जाणवते शिवाय त्यांच्या राजकीय कादंबऱ्या त्यांच्या मनाची मुळीच पकड घेऊ शकणार नाहीत हे तितक्याच परखडपणे ते नोंदवतात. 'कोसला', 'जरिला', 'झूल', यासारख्या भालचंद्र नेमाडेंच्या कादंबऱ्या, अनिल अवचटांची 'माणसं' यासारख्या कलाकृतीने आपण अस्वस्थ झाल्याची नोंद ते करतात. मीना जोशी यांची इंदिरा गांधी यांच्या जीवनावरील चरित्रपट कादंबरी, भा. द. खेरांची लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनावरील 'अमृतपुत्र' ही चरित्रपर कादंबरी, तसेच 'हिरोशिमा' ही भा. द. खेरांची हिंदुस्थानच्या परराष्ट्र धोरणाचे चित्रण करणारी कादंबरी आहे. 'सारंग' ही कुमार धनवडे यांची ग्रामीण पार्श्वभूमीवरील ग्रामीण जीवनातील दारिद्र्याचा शोध घेणारी कादंबरी. सारंग नावाच्या बैलाचे चित्र साकारणारी कादंबरी. या आणि यांसारख्या कितीतरी कादंबऱ्यांना प्रस्तावना देऊन, कधी अभिप्राय लिहून कादंबरी या वाङ्मयप्रकाराबाबतची आपली रसिकता त्यांनी नोंदविली आहे. ही त्यांची साहित्य आस्वादकाची भूमिकाच त्यांच्या साहित्य लेखनास प्रेरणादायी ठरली असावी.

कादंबरी कथात्मक वाङ्मयप्रकाराचे विस्तृत रूप आहे असे लक्षात घेता यशवंतराव कादंबरीत जीवनदर्शनाची किंवा सामाजिक समस्येच्या तपशीलाची अपेक्षा करतात. कादंबरीतील सौंदर्याचा विचार फारसा न करता आशयाच्या संपन्नतेचा, त्यातील जीवनविषयक मूल्यांचा विचार ते महत्त्वाचा मानतात. वाचकांची वैचारिक आणि भावनात्मक भूक शमविण्याचा प्रयत्न कादंबरीतून व्हावा ही यशवंतरावांची अपेक्षा कादंबरीच्या रचना सौंदर्यापेक्षा विचार सौंदर्यालाच महत्त्व देणारी आहे.

## काव्यविषयक विचार

जीवनक्षेत्रातील कोणत्याही नवप्रवृत्तींचा ताण जो प्रथमत: जाणवतो तो कवितेसारख्या लेखनप्रकारातूनच. या प्रकारामध्ये जुन्या अभंगओवीपासून नव्या मुक्तछंदांपर्यंत अनेक कवींनी काव्ये लिहिली. या काव्यविश्वातील अनेक कवींच्या कविता यशवंतरावांनी वाचल्या. काही कवींचा त्यांच्यावर प्रभाव पडला. विशेषत: रविकिरण मंडळातील अनेक कवींचे ते चाहते बनले. यामध्ये कवी यशवंत, य. दि. पेंढारकर, माधव ज्युलियन(माधव त्र्यंबक पटवर्धन) कवी गिरीश, घाटे, रानडे, सौ. रानडे, यांच्या कवितांनी त्यांना वेड लावले होते. या मंडळाच्या अगोदरच्या अनेक कवींच्याही कविता त्यांनी वाचल्या. तरीही यशवंतरावांनी आपल्या लेखनाच्या उमेदवारीच्या काळात अगदी



अल्पसे काव्यलेखन केल्याचा उल्लेख कचितच सापडतो. यशवंतराव स्वत: कवी जरी नसले तरी काव्याचे रसिक, मर्मज्ञ, आस्वादक आहेत. त्यामुळे त्यांचे कवितेबद्दलचे विचारही त्यांच्या रसिकत्वाचे दर्शन घडविणारे आहेत.

यशवंतरावांनी काव्यप्रांतामध्ये आपली प्रतिभा लेखनाद्वारे फारशी दाखवली नाही. पण गणेश उत्सवाच्या वेळी येणाऱ्या मेळाव्याच्या वेळी त्यांनी काही पदे, कविता लिहिल्याचा उल्लेख सापडतो. पण स्वतंत्रपणे काव्यवाङ्मय प्रकार म्हणून चर्चा केली नसली तरी चांगली कविता कशी असावी या विषयीचे विचार त्यांनी वेळोवेळी व्यक्त केले आहेत. त्यातून 'काव्य' या वाङ्मयाबद्दलची त्यांची मते लक्षात येतात. ''केशवसुतांच्या काळात बांधीलकी असावी की नाही असा काही वाद नव्हता. पण उत्स्फूर्त बांधीलकी असलेला मराठीतील तो पहिला आधुनिक कवी म्हणायला हवा. त्यांच्या कित्येक कवितांचे संदर्भ हे आजही नवे वाटतात. भावी काळातही वाटत राहतील.'' केशवसुतांच्या काव्याविषयी आपले मत नोंदवून केशवसुतांच्या कविता का महत्वाच्या वाटतात याचा ते उल्लेख करतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातच सामाजिक विचारांच्या बैठकीचे स्थान आहे. त्यांच्या अशा नवनिर्मितीमुळे मानवी जीवनाचा कायापालट होऊ शकतो. मानवी जीवन नवीन सुंदर रूप धारण करू शकते. साऱ्या जगाला नवीन व सुंदर रूप देणे हे प्रतिभेचे कार्य आहे ही व्यापक जाणीव केशवसुतांच्या कवितेतून व्यक्त झाली. म्हणून यशवंतरावांना केशवसुतांच्या कवितेविषयी विलक्षण प्रेम वाटू लागले आणि केशवसुतांच्या कवितेत ते अधिक रमलेले दिसतात.

यशवंतरावांना कवी व कवितेबद्दल मोठा आदर वाटत असे. नवोदित कवींच्या बाबतही त्यांना अपार कुतूहल असायचे. त्यांच्या काव्यवाचनाच्या मैफलीत ते रसिकतेने समरस होत. प्रसंगी आपली चिंतनगर्भ मते नेमकेपणाने मांडून उपस्थितांना चकित करत. ''मनामध्ये कविता यावयाची पण पुष्कळदा ती कागदावर उतरत नसे. पण ज्यांच्या मनामध्ये कविता डोकावून जात असे, असे पुष्कळ विद्यार्थी त्यावेळी असायचे. ज्या तरुणांच्या मनामध्ये काव्य येत नसेल तो तरुण, तरुण नसला पाहिजे असे म्हटले तरी चालेल.'' या त्यांच्यावरील विवेचनावरून त्यांची काव्यविषयीची अभिरुची लक्षात येते.

यशवंतरावांनी अनेक कवींच्या मैफिली करवल्या. अनेक कवी त्यांचे मित्र झाले. ग. दि. मां. चे 'गीतरामायण', ''पापण्यात गोठविली मी नदी आसवांची'' हे शब्द त्यांच्या मन:पटलावर दीर्घ काळ उमटत राहिले. निखळ आनंद देणारा मित्र म्हणून ते त्यांना मानत. नारायण सुर्वे, ना. धों. महानोर यांच्या कविता तेवढ्याच तन्मयतेने ते वाचत. करंदीकरांच्या काव्यात ते रमून जात. कुसुमाग्रजांच्या कवितेची उंची त्यांना सदैव जाणवत राहिली. कविवर्य यशवंत यांच्या 'छत्रपती शिवराय' महाकाव्याचे प्रकाशन

यशवंतरावांच्या हस्ते संपन्न झाले. त्यावेळी या समारंभास अनेक साहित्यिक जमले होते. खांडेकर, प्रा. फडके, कवी गिरीश, कवी यशवंत, घाटे, रानडे इ. तर नव्या पिढीतील शिरवाडकर, पु.ल. देशपांडे, रणजीत देसाई इ. काही श्रेष्ठ साहित्यिक पहिल्या रांगेत बसले होते. त्यांना पाहून यशवंतराव म्हणाले,''इथं थोर थोर साहित्यिक प्रेक्षागारात माझ्या समोर बसलेले आहेत. मी सरस्वतीचा किंचित मानकरी आहे. अशा परिस्थितीत या सरस्वतीच्या दरबारात व्यासपीठावर मिरवताना मला अतीव संकोच वाटत आहे.'' यावरून यशवंतरावांच्या ठिकाणी असलेल्या साहित्यिकांच्या बाबतची आदरार्थी भावनाच व्यक्त होते. शिवाय विनम्रताही. त्यांनी या कवींच्या संदर्भात स्वतंत्र ग्रंथलेखन जरी केले नसले तरी प्रसंगानुसार त्यांनी मराठी कवी व कविता यांची भलावण केली आहे. समाजजीवनातील अनुभवांचा साहित्यातील पहिला हुंकार म्हणजे काव्य या कल्पनेने यशवंतरावांनी काव्याकडे पाहिले.'' ''कविता निव्वळ योजून घडत नाही म्हणतात तर ती स्फुरावी लागते. अनुभूतीची उत्कटता भावनांच्या पंखावर बसून शब्दरूप घेते तेव्हा कवितेचा जन्म होतो.'' अशा स्वरूपाचे चिंतन काव्यनिर्मितीबाबत मांडले आहे. कवी सुधांशु यांच्या 'स्वर' या काव्यसंग्रहास त्यांनी अतिशय अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहिली आहे. 'दत्त दिगंबर दैवत माझे' या भक्तिमधुर गीताने सर्वांना परिचित असणारा कवी रसिकांच्या भावमनात अनेक स्वरमधुर गीतांनी रिझवील असा आशावाद ते व्यक्त करतात. आणि कवींच्या कल्पनाशक्तीबद्दल आणि सरस साहित्यनिर्मितीबद्दल म्हणतात,''सूर्य जे पाहू शकत नाही, ते कवी पाहू शकतो. जीवनातल्या अशा काही खाचाखोचा असतात की ज्या सुसह्य व्हायला जगातलं पांडित्य, सारं तत्वज्ञान अपुरं ठरतं. कवीच्या मुखातल्या एका आर्त शब्दात ह्या साऱ्या अनुभवांतून एक निराळं भव्य दिव्य स्वप्न दाखवायची शक्ती असते. समवेदनेचा दिलासा असतो. सुख वाढविणारी, दु:ख हलकी करणारी, आशेचे नवजीवन जगण्याची उमेद देणारी ही संजीवनी मुक्त हस्ताने सर्वांना देण्याचे औदार्य कवीमनालाच असते. कवी यशवंत आणि यशवंतराव दोघेही सातारा जिल्ह्यातले. त्यामुळे दोघात एक वेगळे नाते होते. यशवंतरावांच्या व कवी यशवंतांच्या नावातही साम्य होते. त्यामुळे यशवंतरावांच्या या कवीबद्दल तीव्र भावना आहेत. या कवीबद्दल ते लिहितात,''आईवर प्रेम न करणारा माणूस या दुनियेमध्ये कुठे सापडेल? पण कवी यशवंतांना आईची आठवण झाली आणि घराघरातली आई जागी झाली.'' असे उद्‌गार त्यांच्या कवितेबद्दल ते प्रेमामुळेच काढतात. त्यांनी देशभक्तीपर कविता लिहिल्या. या कवितांमधून त्यांनी संसारातील अनेक सुखदु:खाच्या छटा नाजूकपणे मांडल्या. शेवटी ते म्हणतात, '' हे काव्य आता महाराष्ट्रातील जनतेच्या हातात जाईल. साहित्यिक त्याचे समीक्षण करतील. विद्वान



त्याचे कदाचित खंडनही करण्याचा प्रयत्न करतील. परंतु आम्ही सामान्य रसिक माणसं ते गात राहू, आवडीने गात राहू.'' यावरून यशवंतरावांनी काव्यप्रतिभा, कवीचे व्यक्तिजीवन आणि कवीच्या भोवतालच्या सामाजिक व वाङ्मयीन परिस्थितीचा परस्परांवर कसा परिणाम होतो हेही सांगितले. त्यांनी काही कवींच्या व्यक्तिमत्त्वाचा मागोवा घेतला आहे. या कवींच्या काव्यावर तत्कालीन परिस्थितीचा झालेला परिणाम पाहाता त्यांच्या काव्य प्रकृतीचा ऊहापोह त्यांनी केला आहे. प्रसंगी जुन्या कवींचे आणि नवकवींचे संदर्भ घेत यशवंतरावांनी आपले काव्यविषयक विचार मांडले आहेत. यशवंतरावांना कवितांबद्दल वाटणारा जिव्हाळा त्यांनी वेळोवेळी साहित्यिक मैफलीमध्ये व्यक्त केला आहे. जीवनातल्या अनंत वेदनांना शब्दरूप देणाऱ्या आणि अनेकांच्या भावनांना शब्दरूप देऊन आनंदनिर्मिती करणाऱ्या या काव्यप्रकाराबद्दल स्वत:ची भूमिका ते नम्रपणे व्यक्त करतात. ''नाहीतर काव्याच्या क्षेत्रात जाणता वाचक या नात्याखेरीज अकारण प्रवेश करण्याचा मला फारसा अधिकार नाही हे मी जाणतो.'' त्यांच्या या विधानातून एक रसिक मनाचा कवी म्हणूनच त्यांनी स्वत:चा उल्लेख केला आहे. साहित्य दरबारात राजकारणाचे जोडे बाहेर ठेवून रसिक मनाने प्रवेश करणारा सरस्वतीचा नम्र सेवक यातून प्रतीत होतो.

## नाट्यविषयक विचार

यशवंतराव चव्हाण ललित लेखक म्हणून जेवढे प्रसिद्ध आहेत तेवढेच नाटककार म्हणून ख्यातनाम नाहीत. किंबहुना नाट्यक्षेत्रात नाट्यकलाकृतीची निर्मिती ते करू शकले नाहीत. एवढे मात्र खरे आहे की साहित्याचे बहुतेक सगळे प्रकार त्यांनी आस्वादक पातळीवर हाताळले होते. यशवंतरावांची लोकप्रियता, विलोभनीय सामर्थ्याचा प्रत्यय त्यांच्या वैचारिक साहित्यातून, आत्मकथनपर लेखनातून, निबंधांतून प्रामुख्याने होतो. नाटककार म्हणून ते यशस्वी झाले नसले तरी नाटकाचे रसिक, वाचक, प्रेक्षक, आणि टीकाकार या नात्याने त्यांनी केलेली कामगिरी मौलिक स्वरूपाची आहे.

यशवंतरावांच्या बालपणी अनेक श्रेष्ठ नाटककारांच्या नाटकांचा बहराचा काळ होता. रा. ग. गडकरी, श्री. कृ. कोल्हटकर हे दोघेही त्यांच्या अगोदरच्या पिढीतले श्रेष्ठ नाटककार होते. तर समकालीन नाटककारांमध्ये भा. वि. वरेरकर, मो. ग. रांगणेकर, प्र. के. अत्रे, पु.ल. देशपांडे, वि. वा. शिरवाडकर, वसंत कानेटकर, विजय तेंडुलकर असे कितीतरी दिग्गज नाटककार नाट्यलेखन करीत होते. याचा परिणाम असा झाला की यशवंतरावांच्या नाट्य अभिरुचीत वाढ झाली.

यशवंतरावांना नाट्यवाङ्मयाचे आकर्षण शालेय जीवनापासून होते ते त्यांनी

'कृष्णाकाठ' मध्ये नमूद केले आहे. नाट्यकलेला त्यावेळी त्या शहरात अगदी पोषक वातावरण होते. एक वेगळी परंपरा त्या शहराला होती. गणेश उत्सवाच्या निमित्ताने ऐतिहासिक, सांस्कृतिक नाटके सतत होत असत. या संदर्भात ते आठवण सांगतात, ''नाटक कंपनीची नाटके मी मोठ्या हौसेने पाहत असे. आनंदविलास नाटक मंडळी ही आमच्या कराडला वर्ष दीड वर्षाने भेट देत असे. मास्टर दीनानाथ मंगेशकर व रघुवीर सावरकर या प्रसिद्ध नटांच्या नाटक कंपन्यांची नाटकेही कराडला होत. पिटातल्या स्वस्त तिकीटांच्या जागेत बसून मी ती सगळी नाटके मनमुराद पाहिली आहेत.'' यशवंतरावांना नाट्यवाङ्मयाबद्दल ममत्व कसे होते हे त्यांच्या वरील उद्‌गारावरून स्पष्ट होते. यशवंतरावांनी मराठी रंगभूमीवर सुरुवातीपासून होत आलेली स्थित्यंतरे मोठ्या जिज्ञासू वृत्तीने आणि डोळसपणे पाहिली आहेत. यशवंतरावांना मराठी नाटकाविषयी, मराठी रंगभूमीविषयी कमालीची आस्था होती. आत्मीयता होती. मोठ्या अभ्यासू वृत्तीने आणि जिव्हाळ्याने मराठी नाटकांचे त्यांनी केलेले चिंतन महत्वपूर्ण आहे. यशवंतरावांना गडकऱ्यांची नाटके अधिक आवडत होती. त्यांच्या काही नाटकांचे उतारे, संवाद, यशवंतरावांना तोंडपाठ होते. तसा नाटकाचा जन्म मुळी नाट्य पंढरी सांगलीमध्ये झाला. यशवंतरावांचे आजोळ देवराष्ट्र हे सांगली जिल्ह्यातले. त्यांच्या वडिलांची नोकरी विटा व नंतरचे वास्तव्य कराडमध्ये झाल्याने तेव्हाच्या विशाल सातारा जिल्ह्यात सांगली शहर होते. कृष्णाकाठी नाटकाचा जन्म झाल्याने यशवंतरावांना नाटकाचा आणि आपला सुप्त संबंध असावा असे वाटते. म्हणूनच की काय त्यांना नाटकाची गोडी लागली असावी. नाटक पाहता पाहता नाटकात काम करावे अशी इच्छा मात्र झाली. ''आमच्या शाळेच्या संमेलनातील 'माईसाहेब' या नाटकात किर्लोस्करवाडीला एका प्रयोगात मी काम केल्याचे आठवते.'' ही आवड यशवंतरावांनी शेवटपर्यंत टिकवून ठेवली होती. पुढे नाटक पाहण्यासाठी यशवंतराव कराडहून कोल्हापूरला जात असत. गंधर्व मंडळी, पेंढारकरांची ललित अकादमी मंडळी यासारख्या नामवंत नाटक मंडळीची नाटके त्यांनी पाहिली. पण राजकारणात सक्रिय प्रवेश केल्यानंतर वेळेअभावी त्यांचा हा छंद कमी झाला. या संदर्भात ते म्हणतात,''परंतु तोंडाला रंग लावून रंगभूमीवर येण्याची माझी इच्छा मात्र तशीच राहून गेली आहे. माझ्यासाठी परमेश्वराने कदाचित राजकारणाच्या रंगभूमीवरील भूमिका नेमून दिली असावी.'' पण जेव्हा जेव्हा संधी , वेळ मिळेल तेव्हा ते आवर्जून नाटक पाहात. कलेचा आस्वाद हा मानवी जीवनातील श्रेष्ठ प्रतीचा विरंगुळा असल्याचे ते सांगतात. कार्य बाहुल्यामुळे मनातील अनेक गोष्टी त्यांना पूर्ण करता आल्या नाहीत. तरीही गायन ऐकणे, नाटक पाहाणे, मित्रांच्या बरोबर गप्पागोष्टीत रात्र घालविणे यातील आनंद हा



वेगळा असतो. या संदर्भात ते म्हणतात, ''एखाद्या जुन्या नाटकातील पडदा वर जाऊन पेटीचे सुमधुर स्वर वातावरणात घुमू लागले किंवा सारंगीचे मृदू सूर कानी पडले की एका निराळ्या जगात आपण प्रवेश करतो. त्योवळी आपल्या भावना कशा दोलायमान होतात त्यांचे वर्णन शब्दांनी करता येणार नाही. बालगंधर्वांची ती जुनी गाणी आठवली किंवा त्या काळातील नटश्रेष्ठांच्या अभिनय कौशल्याची नुसती आठवण आली की गोड स्मृती चाळविल्या जातात. केशवराव दाते यांच्यासारख्या कसलेल्या नटांच्या भूमिका आणि जुन्या काळातील ती भारदार नाटके, यांच्या आठवणी देखील किती सुखद वाटतात.'' या त्यांच्या वरील विचारांवरून त्यांना नाट्यवाङ्मयाचे व रंगभूमीचे किती आकर्षण होते हे स्पष्ट होते. याशिवाय जनसमुदायात बसून नाटक अथवा तमाशाची गोडी मनमुराद लुटल्याचे ते सांगतात. प्रत्यक्ष लोकांच्यामध्ये जाऊन लोकनाट्याची मौज लुटणे, नाटक पाहणे, क्रिकेटची मॅच पाहणे, कुस्त्यांची दंगल अवलोकणे यातील मौज वेगळीच असल्याचे ते सांगतात.

यशवंतरावांनी नाट्यवाङ्मयाचा आस्वाद विविध प्रकारे घेतला. संहितेपासून ते रंगमंचावरील प्रत्यक्ष प्रयोगापर्यंत नाटकाचा त्यांनी एक रसिक या नात्याने आस्वाद घेतला. नाटक रंगमंचावर डोळ्यांसमोर पात्र-प्रसंगाच्या साहाय्याने साकारते. मनोमंचावर वा रंगमंचावर त्याचे एक दृक् श्राव्य स्वरूप उलगडले जाते. 'नाटक' या वाङ्मयप्रकाराचे हे स्वरूप व त्याची वैशिष्ट्ये, त्यातील विविध घटक, नाटकाचा इतिहास परंपरा यांचा यशवंतरावांनी अखिल भारतीय ४३ व्या मराठी नाट्य संमेलन (२५ मार्च १९६१) मध्ये व मराठी रंगभूमीची अखंड परंपरा (मराठी नाट्यपरिषद ४७ वे अधिवेशन, नांदेड, दि. ३१.१.६५) या दोन लेखांमध्ये विस्ताराने चर्चा केली आहे. नाट्यवाङ्मयाच्या इतिहासात महत्वाचे टप्पे आहेत व त्यात बरीच स्थित्यंतरेही होत गेली आहेत याचाही उल्लेख त्यांनी आवर्जून केला आहे. नाटक ही जशी एक कला आहे तसा तो एक वाङ्मयप्रकार आहे. या दृष्टीनेही यशवंतरावांनी नाटकाच्या स्वरूपाचा विचार केला आहे. यशवंतरावांचे हे विचार नाट्यशास्त्रकार भरतमुनी यांच्या विचारांशी जुळणारे आहेत. भरतमुनींनी 'क्षमार्तानां, शोकार्तानां, दु:खार्तानां, तपस्वितानां विश्रामजननं लोके नाट्यमे तन्मयाकृतम्' असे म्हणून 'लोकविश्राम' म्हणजेच जनरंजन हे नाट्याचे प्रयोजन मानले आहे. आजही यशवंतराव प्रबोधनाची भूमिका मांडतात. 'नाट्य' ही कला अधिकाधिक समाजजीवनाशी संवादी असते. '' लोकरंजन आणि लोकाराधन या नात्याने नाट्याचे स्थान फार महत्वाचे आहे.'' असा नाट्यवाङ्मयाचा उल्लेख ते करतात.

यशवंतरावांनी नाट्यवाङ्मयविषयक चिंतनात जीवनमूल्यांना महत्वाचे स्थान दिले

आहे. नाट्यवाङ्मयासारख्या साहित्यकलेतून चिरंतन जीवनमूल्यांची जोपासना केली पाहिजे. मानवी जीवनात जी शाश्वत सत्ये असतात त्याची जाणीव नाटकाच्या कथानकातून व्हावी अशीही त्यांची अपेक्षा होती. आदर्श मूल्यांची जपणूक झाली पाहिजे. त्यासाठी रंगभूमी अधिकाधिक लोकाभिमुख झाली पाहिजे असा त्यांचा अट्टाहास होता. ते म्हणतात, ''नाटक जीवनाचा जितका खोल वेध घेईल, तुम्हा आम्हाला त्रस्त करणाऱ्या प्रश्नांना जितक्या यशस्वीपणे हात घालील तितके ते तुम्हा आम्हाला जवळचे वाटणार आहे.'' मराठी नाटकातून सामाजिक प्रश्नांची मांडणी व्हावी हा त्यांचा दृष्टिकोन होता. यशवंतरावांनी नाटक आणि समाजजीवन यांचे संबंध सूक्ष्मपणे शोधले आहेत. नाटकातील विषय समाजाच्या तत्कालीन जीवनाला स्पर्श करणारे असावेत. सामाजिक प्रश्नांचा ऊहापोह करण्याची रीत नाटककारांनी स्वीकारावी असा नाटककारांबद्दल त्यांचा विचार होता. त्या त्या काळात जी श्रेष्ठ कलाकृतींची निर्मिती झाली त्यामध्ये तत्कालीन सामाजिक समस्यांचे प्रतिबिंब पाहावयास मिळते. स्त्री शिक्षण, स्त्री स्वातंत्र्य, बालविवाह, पुर्नविवाह, दुराचार यासारखे असंख्य प्रश्न नाटकाचे विषय झाले. सामाजिक जीवनाच्या व्यथा वेदनेला स्पर्श करण्याचे सामर्थ्य नाट्यवाङ्मयात निर्माण व्हावे. तसेच जीवनविषयक चिंतनाला चालना देण्याचे सामर्थ्य नाट्यकलाकृतीत असणे गरजेचे आहे म्हणून काळाबरोबर उत्पन्न होणारे नवे नवे प्रश्न नाट्यरूपाने मराठी वाङ्मयात मांडले गेले आहेत व येथून पुढेही मांडावेत. आपले जीवन, आपला समाज जसजसा बदलत जाईल त्याप्रमाणे रंगभूमीही बदलत जाणे अपरिहार्य आहे, असे यशवंतरावांना वाटते.

२५ मार्च १९६१ मध्ये दिल्ली येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय ४३ व्या मराठी नाट्य संमेलनामध्ये स्वागताध्यक्ष म्हणून यशवंतराव चव्हाण होते. या संमेलनाचे उद्घाटन राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी केले. अध्यक्षा सुप्रसिद्ध अभिनेत्री दुर्गाबाई खोटे या होत्या. या संमेलनामध्ये यशवंतरावांनी मराठी नाट्यवाङ्मयाचा ऐतिहासिक परामर्श घेतला. शिवाय नव्या नाटकाविषयी बोलताना त्यांनी मराठी रंगभूमीवरील नव्या बदलाचे स्वागत केले आहे. नाट्य रचनेचे नवे तंत्र, नव्या विचारांच्या दर्शनासाठी नव्या नाटककारांची मराठी रंगभूमीला असणारी आवश्यकता यशवंतरावांनी वेळोवेळी प्रतिपादन केली आहे. पौराणिक संगीत नाटकाचा इतिहास सांगताना ते लिहितात, ''तंजावरास भोसले राजांनी मराठी नाटके लिहिली आणि करविली. १८४३ साली विष्णू अमृत भावे यांनी सांगलीकरांच्या प्रेरणेने पौराणिक नाटकांचा नवीनच प्रयोग करून दाखविला. यानंतर अनेक पौराणिक नाटक कंपन्या जन्माला आल्या.''त्यापूर्वीही नाटक रंगभूमीचे काही प्रयत्न झाले. पण ते ललित, तमाशा, गोंधळ, कळसूत्री बाहुल्या, कीर्तने, भारूडे अशा लोकरंगभूमीच्या प्रकारातून व्यक्त झाले. ज्ञानेश्वर, एकनाथ,



तुकाराम, यांच्या वाङ्मयातून त्यांचे उल्लेख आहेत. पेशव्यांच्या काळात होनाजी बाळा, राम जोशी, अनंत फंदी, सगनभाऊ, प्रभाकर, परशुराम यांच्यासारख्या शाहिरांनी लोकनाट्याच्या द्वारा समाजाचे रंजन केले. लोकरंगभूमीची अशा प्रकारे लोकशाहिरांकडून जोपासना होत असतानाच मराठी नाट्यक्षेत्रामध्ये पौराणिक, भाषांतरित, रूपांतरित नाटके निर्माण झाली. संस्कृत व इंग्रजी वाङ्मयाच्या अध्ययनाने मराठी नाट्यास स्फूर्ती व प्रोत्साहन मिळाले असले तरी त्याला आज जे बाळसेदार स्वरूप प्राप्त झालेले दिसते ते मराठी वळण लागल्यानंतरचे आहे. संख्येच्या दृष्टीने मराठी नाटके विपुल नसली तरी त्यात वैचित्र्य, विविधता आणि नाट्यगुण भरपूर प्रमाणात आहेत. मराठी नाट्यसृष्टीत मानवी मनाच्या सूक्ष्म भावभावनांचे आणि मानवी जीवनातील विविध घटनाप्रसंगाचे रम्य चित्रण पाहावयास मिळते. काही काळ मराठी नाटकांची दृष्टी देवदानवांच्या अतिमानुष व अमानुष लीला पाहण्यातच दंग झाली होती हे खरे. तथापि केवळ शंभर सव्वाशे वर्षांच्या अवधीत मराठी नाटकांचे स्वरूप इतके पालटले आहे की भविष्यकाळात सामाजिक जीवनातील समस्या सोडविण्याला आणि मानवी मनातील गुंतागुंतीचे सूक्ष्म धागे उकलण्यात आज मराठी नाटककार गुंतलेले दिसतात. बाह्यसौंदर्यापेक्षा मानवी मनात दडलेली सौंदर्यस्थळे हुडकण्याची मराठी नाटककारांची आजची धडपड जितकी कौतुकास्पद आहे तितकी मराठी नाट्यसृष्टीच्या प्रगतीच्या दृष्टीने ती अत्यंत समाधानाची आहे, असे मत यशवंतराव व्यक्त करतात.

कै. बळवंत पांडुरंग उर्फ अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी मराठी संगीत नाटकांची एक समृद्ध परंपरा निर्माण केली. विष्णुदास भावे यांनी घालून दिलेल्या पायावर नवी वैभवसंपन्न इमारत उभारण्याचे काम अण्णासाहेब किर्लोस्करांनी १८८० मध्ये केले. जुन्या नाटकांचे स्वरूप त्यांनी सर्वस्वी बदलून टाकले. कथानकांचा विकास, स्वभाव परिपोष, नव्या धर्तीचे संगीत, उत्कृष्ट संवाद इत्यादी गुणांनी युक्त अशी नाटके लिहून त्यांनी मराठी रंगभूमीवर नवी प्रथा सुरू केली. आपल्या प्रतिभेच्या सामर्थ्याने नाट्यसृष्टीत सर्वत्र क्रांती घडवून आणली. त्यांच्या नाटकांबद्दल यशवंतराव चव्हाण लिहितात, ''संस्कृत नाटकांतील कला व पौराणिक नाटकातील संगीत यांचा अपूर्व संगम अण्णासाहेब किर्लोस्करांनी 'सौभद्रात' साधला. हे नाटक रंगभूमीवर येऊन पाऊणशे वर्षांच्यावर काळ उलटून गेला आहे. पण आजही ते पहिल्या दिवसाइतकेच लोकप्रिय आहे. काळ बदलला. तंत्रविषयक कल्पनांत जमीनअस्मानाचा फरक पडला. गेल्या पाऊणशे वर्षांत अनेक प्रभावी नाटके रंगभूमीवर आली. पण सौभद्राचे स्थान अढळच राहिले.'' सौभद्र नाटकाने अण्णासाहेब किर्लोस्करांची ख्याती झाली. त्यांनी

नाट्यकलेला समाजात प्रतिष्ठा मिळवून दिली. हे करताना त्यांनी जुन्या परंपरेचा त्याग केला नाही. उलट कथानक पौराणिक स्वरूपाचेच ठेवले. चटकदार संभाषणे, नादमधुर प्रसादपूर्ण शब्दरचना, उठावदार रसपरिपोषक प्रसंगांची निवड, रंगभूमीचे मार्मिक ज्ञान, अत्यंत आकर्षक संगीत व पदरचना यांचा सुंदर मिलाफ सौभद्रात दिसून येतो. यशवंतराव लिहितात, ''महाराष्ट्रात १८८२ ते १८९८ या सोळा वर्षांच्या अवधीत नाटकांची वाढ झपाट्याने झाली. याची गंगोत्री 'सौभद्र', 'शाकुंतल'सारखी नाटके आणि वाङ्मयाची निर्मिती व प्रसार यांच्या विषयी महाराष्ट्राला वाटणारी आस्था ही होय.'' तत्कालीन महाराष्ट्राचे सामाजिक, साहित्यिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक चित्र मोठे खुमासदार आणि उद्‌बोधक अशा स्वरूपाचे होते. यशवंतराव वेळात वेळ काढून नाटके पाहात असत. ते कलाप्रेमी रसिक वृत्तीचे असल्यामुळे नाटके पाहात असत. कराडहून कोल्हापूरला नाटक पाहण्यासाठी ते जात असत. 'प्रेमसंन्यास' हे नाटक पाहण्यासाठी व केशवराव दाते यांची या नाटकातील जयंताची भूमिका पाहण्यासाठी ते कोल्हापूरला गेले. ''नाटक सुरू झाले आणि जयंतच्या भूमिकेत मी केशवराव दात्यांना पाहिले. त्यांचा अभिनय, शब्द उच्चारण्याची पद्धत मला फार आकर्षक वाटली. ज्यासाठी मी आलो होतो त्याचे चीज झाल्यामुळे मला समाधान वाटले.'' यशवंतरावांना मराठी नाटकांविषयी व नामवंत नटांविषयी कमालीची आत्मीयता होती. मोठ्या जिज्ञासू वृत्तीने व जिव्हाळ्याने नामवंत मराठी नटाकडे ते पाहात असत. भाऊराव कोल्हटकर, गणपतराव जोशी, मोरोबा वाघोलीकर, दत्तोपंत हल्याळकर, केशवराव भोसले, बालगंधर्व, केशवराव दाते, चिंतामणराव कोल्हटकर, या व यासारख्या कित्येक नामवंत नाट्यकलाकारांबाबत त्यांच्या मनात आत्मीयता होती. कलेची आणि कलावंताची कदर करणारा हा रसिक नेता होता.

यशवंतराव चव्हाण विदेश दौऱ्यावर असताना वेळातवेळ काढून ते रंगमंदिराला भेट देत असत. तसेच तेथील नृत्य आणि नाटक या कलांमध्ये ते रंगून जात असत. रशियात मॉस्कोला गेले असताना रशियन रंगभूमीवर चाललेले खेळ पाहण्यात ते दंग होत. ''न्यूयॉर्क आणि लंडन येथील नाट्यमंदिरे आणि तेथे सुरू असलेली काही नाटके मी पाहिली. या दोन्ही शहरातील नाट्यकला क्षेत्र मोठे भव्य आहे. मन प्रसन्न होते.'' असे येथील नाट्यकलेबद्दल मनोगत व्यक्त करतात. आशिया, आफ्रिका, युरोप, अमेरिका, लंडन, न्यूयॉर्क, ताश्कंद अशा कितीतरी ठिकाणी विदेशी दौऱ्यासाठी गेले असताना त्यांनी तेथेही आपली नाट्यरसिकता कमी होऊ दिली नाही. लंडनच्या रंगभूमीबद्दल ते सांगतात, ''लंडनची रंगभूमी हे माझे सर्वात मोठे आकर्षण आहे. दोन नाटके पाहिली. अगदी वेगळ्या स्वरूपाची पण रंगतदार होती. अभिनयातील सहजता,



आधुनिक तंत्रामुळे आलेली वास्तव कथेतील स्वाभाविकता, नाटकाचे अंक दोन. दोन अंकात सर्व मिळून चार प्रवेश. दोन अडीच तासांत सर्व काही संपते. एक नवा आनंद घेऊन प्रेक्षक बाहेर पडतो. कित्येक नाटके दोन दोन वर्षे सतत चालली आहेत. या रंगभूमीला पल्लेदार इतिहास आहे. काळाने आलेली परिपक्वता आहे. कलाकारांची जाणीव आणि व्यासंग या सर्व गोष्टींनी नाट्यकला येथे सदा बहरलेली असते.'' २५ सप्टेंबर १९७२ मध्ये लंडनहून वॉशिंग्टनला आल्यावर त्यांनी जे पत्र लिहिले त्यामध्ये लंडनच्या रंगभूमीची वरीलप्रमाणे प्रशंसा केली आहे.

नाटक हा एक ललित वाङ्मयाचा प्रकार आहे. आणि साऱ्या ललित वाङ्मयाचा प्रमुख उद्देश म्हणजे काही सत्य हे अनेक कल्पित प्रसंगांनी कलात्मक रीतीने समाजापुढे मांडणे व मनोरंजन करणे. नाटकही त्याला अपवाद नाही. प्रयोगरूपाने रंगभूमीवर उभे राहिलेले नाटकी दृश्यात्मक रूपाने साकार केलेले ते नाटक अशीही एक कल्पना आहे. परंतु एवढीच कल्पना गृहित धरली तर रंगभूमी आणि नाटक यामध्ये दुजाभाव कल्पिल्यासारखे होते. नाटककार नाटकाची रचना करतो. आपल्या नाटकाविषयी काही कल्पना निश्चित करतो. यातूनच शोक नाट्य, सुखान्त नाट्य, प्रहसन लिहिण्याचे स्थूलमानाने मनाशी ठरवतो आणि नंतर कथानक, स्वभावचित्रण, संघर्ष, संवाद आणि वातावरण निर्मितीच्या साहाय्याने एक कलाकृती नाटक रूपाने निर्माण करतो. नाटक आणि नाट्यप्रयोग या दोन्ही गोष्टी भिन्न नसून एकाच वस्तूची दोन कलात्मक रूपे आहेत.

नाटकातून मानवी जीवनाचे दर्शन चित्रित करणे हाच प्रमुख उद्देश असतो. या बरोबर 'नाना रसांचा' अनुभवही नाटकामुळे घेता येतो. विविध स्वभावाच्या व्यक्ती, त्यांचे परस्परसंबंध, त्यातून विकसित झालेले कथानक आणि त्याच्या साहाय्याने साकार होणारे विविध रस, यांच्या परस्पर संबंधातून नाट्य तयार होते. पण हे नाट्य कोणासाठी? ते पाहण्यासाठी, ऐकण्यासाठी प्रेक्षक नसतील तर त्याचा उपयोग नाही. नाटक हे प्रेक्षकांशिवाय असूच शकत नाही. यशवंतराव चव्हाण लिहितात, ''आपण नाटकाचा हा जो एवढा संसार मांडतो, त्यात रंग भरतो तो प्रेक्षकांमुळे. नाटककार, नट आणि प्रेक्षक हेच रंगभूमीचे तीन मूलभूत घटक आहेत.'' नट आपल्या अभिनयाद्वारे त्यातील पात्रांची व्यक्तिमत्वे, नाट्य व संघर्ष यांचे दर्शन घडवतात. नाटककाराला नाटक सुचते आणि तो त्याचे लेखन करतो. विविध अभिरुचीचे प्रेक्षक असणेही नाटकाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची बाब आहे. रंगमंचावर चाललेल्या नाटकाला प्रेक्षकसुद्धा अनुकूल, प्रतिकूल दाद देतात. हशा, टाळ्या, शिट्ट्या, शांतता, सावधता, एकाग्रता या सगळ्या आदानप्रदानातून नाट्य खुलते, फुलते, रंगते. म्हणून नाटकातील हे सर्व घटक महत्वाचे आहेत. शिवाय पडद्यामागे कितीतरी घटक असतात. उदा. नेपथ्य, वेशभूषा, रंगभूषा,

प्रकाशयोजना, ध्वनी, संगीत इ. म्हणून नाटक हा वाङ्मयप्रकार व्यामिश्र आहे तो या अर्थाने.

यशवंतराव चव्हाणांची नाट्यविषयक आणि नाटक या कलाप्रकाराची समज व अभिरुची किती सजग होती ते त्यांच्या न्यूयॉर्क, १२ ऑक्टोबर १९७५ च्या पत्रावरून लक्षात येते. तेथे विदेश मंत्र्यांची परिषद होती. युनोमधील आंतरराष्ट्रीय प्रश्नांवरील चर्चा संपल्यानंतर रात्री ते नाटक पाहण्यासाठी गेले. या नाटकाचा अभिप्राय ते असा नोंदवितात, ''रात्री Same time New Year हे नाटक पाहिले. केवलसिंग व जयपाल पती-पत्नी आणि शरद काळे असे आम्ही गेलो होतो. एक नमुनेदार अमेरिकन नाटक आहे. पात्रे फक्त दोन. उत्कृष्ट कामे केली. २-२ तास फक्त दोन पात्रांनी नाटक असे रंगविले की सांगता सोय नाही. नाटकाचा विषय, मांडणी कलाकारांनी जीव ओतून केलेला अभिनय यामुळे नाटक फारच परिणामकारक होते. कॉमेडी आहे. विनोद भरपूर आहे. पण सर्व विनोद मूलत: जीवनातील गंभीर अनुभूतीतून निर्माण होतो. एका जोडप्याची विवाहबाह्य मैत्री, अकस्मात आपल्या गावापासून दूरच्या शहरी होते. दरवर्षी याच महिन्यात एका Week-end ला ते सतत २५ वर्षे भेटत राहिले. सहा सीन्स् आहेत. दर पाच वर्षांनी होणारी भेट प्रत्येक प्रवेशामध्ये दाखविली आहे. २५ वर्षातल्या परिस्थितीत, वयात, स्वभावात, मनात, झालेले फरक दाखविले आहेत. पण मैत्री अतूट आहे. शेवटी त्यातले गृहस्थ वृद्धपणी लग्नाची इच्छा व्यक्त करतात. आणि स्त्री म्हणते 'I cannot' कुटुंबाविषयीचा जिव्हाळा, नवऱ्याबद्दल आदर ही कारणे सांगते आणि ती खरी असतात. तो रागावतो आणि निघून जातो. पण लगेच परततो आणि मैत्री संथपणे पुन्हा सुरू राहते. म्हटले तर मजा म्हटले तर एका गंभीर प्रसंगाचे चित्रण होते.'' या यशवंतरावांच्या वरील नाट्यकलाकृतीवरील भाष्यामुळे अमेरिकन रंगभूमीचा इतिहास डोळ्यांसमोर उभा राहतोच. शिवाय त्यांची अभिरुचीपूर्ण नाट्य समीक्षाही किती कल्पक आहे याचीही जाणीव झाल्याशिवाय राहात नाही. मराठी नाटकांवर जेवढे त्यांचे प्रेम आहे. तेवढेच ते परकीय भाषेतील नाटकांवर प्रेम करतात. ताश्कंदला गेले असताना तेथे रात्री एक ऑपेरा पाहून आले. हे ऐतिहासिक प्रेमकथेवर आधारलेले नाटक. या नाटकातील संगीत आणि नाटकात काम करणारी पात्रे यातील विशेष त्यांना तीव्रतेने जाणवले. त्याबद्दल ते लिहितात,''काल रात्री एक ऑपेरा पाहण्यासाठी गेलो होतो. उझबेकी भाषेतील ऐतिहासिक प्रेमकथेवर आधारलेले हे नाट्य भव्य होते. संगीत उत्तम होते. परंतु Dilorom चे काम करणारी गायिका इतकी जाडजूड होती की तिला सुंदर कसे म्हणावे हेच समजत नव्हते. तास दोन तास होतो. नंतर निघून आलो.'' यशवंतराव पाश्चात्य कलाकृतीचा अशा रीतीने मनसोक्त आनंद घेत



असत. अरसिक माणसापासून चार हात दूर राहण्याचा सल्ला ते आपणास देतात. विविध कलांनी मानवी जीवन समृद्ध होते. मानवी मन सुसंस्कृत बनते. मात्र एखादा माणूस साक्षर असूनही सुसंस्कृत नसतो किंवा रसिक नसतो. जीवनातील आनंद कशात आहे व तो कसा लुटावा हे अशा रुक्ष माणसास समजत नाही. कलेचे रहस्य त्याला उमगलेले नसते. म्हणून जीवनात तो कुठेच रममाण होत नाही. पाश्चात्य देशामध्ये मात्र चित्र वेगळे आहे. नृत्याचे व इतर कलांचे शिक्षण घेण्यासाठी शेकडो लोक, स्त्रिया, पुरुष आठवड्यात एक दोन वेळा त्यांच्या सोईप्रमाणे एकत्र जमतात, कलेचा आस्वाद घेतात. सॅनफ्रान्सिस्कोमध्ये १ ऑक्टोबर १९७२ मध्ये विदेश दौऱ्यावर गेले असता तेथील कला केंद्र पाहिले. तेथे नृत्याचे व इतर कलाशिक्षण घेण्यासाठी अनेक लोक एकत्र येतात व आपले छंद जोपासतात. अशाच तेथील कलावंताबद्दल ते लिहितात,''या सर्व संसारी स्त्रिया (होम वाईव्हज) आहेत. शरीराची बांधणी आकर्षक राहावी, वेळ जावा, नवीन शिकावे, आपल्या पतीचे मन सतत आकर्षित ठेवावे या हेतूने अनेक संसारी स्त्रिया हे नृत्य शिकतात. नृत्य पाहण्यासारखे होते. तालबद्ध पद्धतीने शरीराची ठसकेबाज हालचाल करणारे हे लोकनृत्य असावे.'' यावरून कलावंतांबद्दलची आत्मीयता तर स्पष्ट होतेच शिवाय पाश्चात्य देशातील संस्कृतीकडेही ते अंगुलीनिर्देश करतात. अव्वल दर्जाचे आंग्ल नाटककारांपासून ते आधुनिक नाटककारांपर्यंत तसेच कलावंत, लोकजीवनाशी समरस झालेले वासुदेव, गोंधळी इ. लोककलावंताचे नाना प्रकारचे संदर्भ त्यांच्या लेखनात व भाषणात आढळतात. त्यांनी नाटक व नाट्यकलावंतांवर उदंड प्रेम केले. कलावंतांची तरल संवेदनक्षमता ते ओळखत असत. त्यामुळेच त्यांनी अनेक जुन्या नटांचा उल्लेख केला आहे. बालगंधर्व, केशवराव दाते यांसारखे कसलेले नट व बहारदार जुनी नाटके यांच्या आठवणी सुद्धा सुखद वाटतात.

यशवंतराव चव्हाणांनी मराठी रंगभूमीच्या थोर परंपरेचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. दिल्लीसारख्या राजधानीच्या ठिकाणी मराठी नाट्यकलेचा गौरव झाला. दिल्लीतील बहुभाषिक रसिकांचे या कलेने मनोरंजन केले. यातच हा नाट्यकलेचा सर्वोच्च सन्मान आहे असा ते गौरवोद्‌गार काढतात. तसेच कित्येक नामवंत नाट्यकलाकृतीची ते चिकित्सा करतात. सौभद्र, शाकुंतल, भाऊबंदकी, शारदा यासारख्या नाटकांचा ते उल्लेख करतात. एखादे नाटक रंगभूमीवर सदैव तितकेच प्रसन्न राहते. त्याचे यश कमी होत नाही. याची कारणमीमांसा करताना यशवंतरावांना नाटककारांचे रचनाचातुर्य महत्वाचे वाटते. त्यातील कथाबीज, पात्रनिर्मिती, रसपरिपोष व उत्तम पद्यरचना इ. गुणांमुळेच किर्लोस्करांचे सौभद्र आणि देवलांचे

'शारदा' रंगभूमीवर नेहमीच आकर्षित करीत राहिले.

अण्णासाहेब किर्लोस्करांनी स्वत:च्या प्रतिभाबलावर आणि उदंड नाट्यकर्तृत्वावर एक नवीन रंगावट निर्माण केली. उर्दू, संस्कृत आणि इंग्रजी नाटकांच्या प्रेरणेने मराठी संगीत नाटक नावाचे एक नवे नाट्य रसायन त्यांनी निर्माण केले. ते नाट्यरसायन मराठी नाटकाचे गौरवचिन्ह ठरले. मराठी नाटककार, प्रयोगकर्ते आणि प्रेक्षक यांच्या प्रकृतीची ती एक जन्मखूण म्हणायला हवी. या नाट्यप्रेरणांच्या प्रवृत्तींचा विस्तार आणि विकास नाटककार गो. ब. देवल, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, राम गणेश गडकरी ह्या प्रमुख नाट्यप्रतिभावंतांनी केला. १८८५ ते १९२० हा कालखंड म्हणजे मराठी नाट्यवाङ्मयाच्या दृष्टीने मोठा भाग्याचा आणि वैभवाचा. नाट्यकलेची प्रतिष्ठा या काळात स्थिरपद झाली. या काळात संस्कृत नाट्यवाङ्मयापेक्षा इंग्रजी नाट्यतंत्र अधिक परिणामकारक ठरले. शोकांतिका हा वाङ्मयप्रकार सर्वस्वी इंग्रजीतून मराठीत आला. त्याच्यावर शेक्सपिअरच्या नाटकाचा परिणाम झाला. त्यामुळे मराठी शोकांतिकेला सखोल व व्यापक स्वरूप प्राप्त झाले. मराठीतील शोकांतिकेचे निर्माते - खाडिलकर ! या काळात पूर्वार्धात सात्विक लोकरंजनाचे प्रयोजन होते तर उत्तरार्धात नाट्यकलेने लोकशिक्षण व लोकजागृतीकडे लक्ष वळवले. राजकीय विचार, सामाजिक समस्या पण नाटकात येऊ लागल्या.

रंगभूमीवर विलक्षण चैतन्य होते. अशा या कालखंडातील नाटककारांबद्दल व नाटकांबद्दल यशवंतरावांनी ठळक अशा नोंदी केल्या आहेत. देवलांच्या बाबतीत ते म्हणतात,''गोविंद बल्लाळ देवल हे या काळातील नाटकांचे मुकुटमणी ! त्यांच्या सात नाटकांपैकी 'झुंजारराव', 'मृच्छकटिक', 'शारदा', 'संशयकल्लोळ' ही चार नाटके म्हणजे मराठी रंगभूमीवरील देदीप्यमान रत्नेच ! त्यांची बहुतेक नाटकेही भाषांतरित व रूपांतरित होती. असे असले तरी देवलांच्या प्रतिभेची ठेवण ही वास्तववादी स्वरूपाची होती. पुरोगामी विचारसरणीची, प्रभावी सामाजिक नाटकांची मुहूर्तमेढ रोवण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले. शारदा हे नाटक स्वतंत्र सामाजिक बालजरठ विवाहावरील, मराठी रंगभूमीच्या इतिहासातील पहिले नाटक आहे. या नाटकातील शारदेच्या पात्राबद्दल व नाटकाबद्दल यशवंतराव लिहितात, ''या नाटकाचा महाराष्ट्रावर इतका परिणाम झाला की पुढे कित्येक वर्षे आपल्या मुलीचे नाव शारदा ठेवायला एकही माता धजली नाही. बालवृद्ध विवाहातील घोर अन्याय समाजाला देवलांनी 'शारदेच्या' रूपाने दाखविला. अस्सल भारतीय नाटकांचे दर्शन या कलाकृतीने लोकांना घडविले यात संशय नाही. समाजातील अबलेची करुण कहाणी शारदेच्या रूपाने दाखविली. त्यामुळे या नाटकाची लोकप्रियता अलौकिक होती. देवलांच्या नाट्यकर्तृत्वाचा शेवट होत असतानाच श्रीपाद



कृष्ण कोल्हटकर उदयास आले. त्यांच्या नाटकात कल्पनारम्यता, विनोदप्रवणता आणि सहेतुकता हे गुण प्रामुख्याने दिसतात. त्यामुळे त्यांच्या नाटकांनी तत्कालीन शिक्षितांची भूक भागविली. त्यांच्या कल्पनेला हसवले, खेळवले. त्यामुळे यशवंतरावांसारख्या अभिजात रसिकाला त्यांच्या नाटकाविषयी ममत्व निर्माण झाले. कोल्हटकरांनी मराठी नाटकामध्ये अनेकविध प्रकारची नवीनता आणली. सूत्रधाराचा वायफळ प्रवेश त्यांनी कमी केला. नाट्यपदे नव्या पारशी, गुजराथी चालीवर बसवली. स्वतंत्र आणि कल्पनारम्य असे नाट्यकथानक ही गोष्ट त्यांनी महत्त्वाची मानली. कल्पकता, विनोदबुद्धी, सौदर्यशक्ती, संगीतप्रेम आणि समाजचिंतन या कोल्हटकरांच्या व्यक्तिवैशिष्ट्यातूनच त्यांच्या नाटकांची स्वतंत्र संविधानके तयार झाली आहेत. यशवंतरावांना कोल्हटकरांच्या नाट्यप्रतिभेतील स्वतंत्र कथानकाचे वैशिष्ट्य लक्षणीय वाटते. त्यांच्या नाट्यकर्तृत्वाबद्दल ते म्हणतात, ''कोल्हटकर म्हणजे मराठीतील विनोदाचा ओनामा! मराठी रंगभूमीला संगीत व विनोद यांची नव्या पद्धतीने जोड करून देणे हेच त्यांच्या प्रतिभेचे कार्य. १९०० ते १९१० या दशकात मराठी रसिकांनी कोल्हटकरांची 'वीरतनय', 'मूकनायक', 'गुप्तमंजूषा', 'मतिविकार'ही नर्म विनोदाने नटलेली नाटके मोठ्या आवडीने पाहिली. एका हातात शेक्सपिअर आणि दुसऱ्या हातात मोलिअर होऊन त्यांनी अद्‌भुतरम्य कथानकात हास्यरसाचा मनमुराद शिडकाव केला. कोल्हटकरांनी आपल्या नाटकांमधून सामाजिक समस्यांचे दर्शन घडवले.'' म्हणूनच यशवंतरावांना त्यांच्या नाटकातील सामाजिक मूल्य महत्त्वाचे वाटते. यशवंतराव रंगभूमीच्या शिल्पकारात कोल्हटकरांना स्थान देतात. त्यांच्या साहित्याला प्रधानपद देणारी यशवंतरावांची नाट्यविषयक भूमिका वरील त्यांच्या उद्‌गारावरून स्पष्ट होते. यशवंतरावांनी ४३ व्या अखिल भारतीय नाट्यसंमेलनांमध्ये २५ मार्च १९६१ साली दिल्ली येथे भरलेल्या नाट्यसंमेलनात अनेक अंगोपांगाचा सविस्तर विचार केला आहे. नट, नाटककार, दिग्दर्शक, टीकाकार, प्रेक्षक नाट्यवाङ्‌मयातील नवे जुने प्रवाह यांचा त्यांनी समाचार घेतला आहे. १९६५ साली नांदेड येथे भरलेल्या ४७ व्या नाट्यपरिषदेमध्ये यशवंतरावांनी नाट्यवाङ्‌मयाचा ओझरता उल्लेख केला होता. याचबरोबर मराठी नाट्यवाङ्‌मयाचा थोडक्यात इतिहासही त्यांनी कथन केला. पौराणिक नाटककंपन्यांच्या निर्मितीपासून ते संस्कृत, इंग्रजीमधील भाषांतरित, रूपांतरित नाट्यवाङ्‌मयाची कामगिरीही त्यांनी मांडली. ऐतिहासिक नाटकांची परंपरा वि. ज. कीर्तने (थोरले माधवराव पेशवे) पासून झाली. याचाही ते उल्लेख करतात. यावरून त्यांचा नाट्यवाङ्‌मयाचा अभ्यास किती चिकित्सक आहे हे स्पष्ट होते.

काळाबरोबर उत्पन्न होणारे नवे नवे प्रश्न नाट्यरूपाने मराठी नाट्यवाङ्‌मयात

मांडले गेले आहेत. कोल्हटकरांचे समकालीन नाटककार म्हणून नाट्याचार्य खाडिलकरांचा उल्लेख करावा लागतो. या नाटककाराने मराठी रंगभूमीचे सौंदर्य आणि सामर्थ्य वाढविले. कोल्हटकरांची नाटके सौंदर्यासक्तीतून निर्माण झाली होती. तर नाट्याचार्य खाडिलकरांची नाटके ध्येयासक्तीतून उद्भवली होती. राजकीय, सामाजिक व वैयक्तिक ध्येयांची उदात्त चित्रे त्यांनी आपल्या नाटकातून रंगवली. या नाटककारांच्या संदर्भात खांडेकर म्हणतात, ''कोल्हटकर स्वभावत: सौंदर्याचे उपासक तर खाडिलकर सामर्थ्याचे पूजक ! कोल्हटकरांना रम्यतेचे आकर्षण, खाडिलकरांना भव्यतेचे ! 'मृच्छकटिक' हे कोल्हटकरांचे आवडते नाटक उलट 'उत्तररामचरित' खाडिलकरांना फार प्रिय ! पदवीधर होताच खाडिलकर 'केसरी'त गेले. तिथे जीवनातल्या भव्यतेचे, उग्रतेचे आणि उदात्ततेचे चिंतन करणाऱ्या त्यांच्या प्रतिभेचा विकास झाला.'' अशा नाटककारांबद्दल त्यांच्या नाटकांच्या निमित्ताने लिहिताना त्यांच्या नाटकांचे मार्मिक रसग्रहण यशवंतराव करतात. तसेच याबरोबर त्यांचे व्यक्तिमत्वही वाचकासमोर ते उभे करतात. तत्कालीन जुन्या व नव्या नाटकातील फरक ते अचूक दाखवतात. खाडिलकरांना अचूक नाट्यदृष्टी होती. नाटकांसाठी सुटसुटीत व पूर्वपरिचित अशी कथानके त्यांनी निवडली. खाडिलकरांवर त्यांच्या कर्तृत्वकाळाच्या पूर्वार्धात लो. टिळकांचा व उत्तरार्धात म. गांधींचा विशेष प्रभाव होता. त्यांच्या नाटकातूनही आपल्याला याचे दर्शन घडते. यशवंतराव चव्हाण या संदर्भात लिहितात, ''नाट्याचार्य खाडिलकरांनी आपली लेखणी आणि वाणीच नव्हे तर प्रत्यक्ष जीवनही स्वातंत्र्याच्या चळवळीला वाहिले. साहजिकपणेच उत्कट देशभक्ती हा त्यांच्या नाट्यकृतींचा स्थायीभाव झाला. त्यामुळे सहेतुकता किंवा जनजागृती हा त्यांचा अविभाज्य घटक आहे. राष्ट्रनिष्ठा व दिव्यत्वाचे दिग्दर्शन यांचा परिणाम साधणे हा त्यांच्या लेखनाचा हेतू होता. पुढे ते लिहितात, ''खाडिलकर हे ध्येयवादी होते. उदात्त गुणांचे त्यांना आकर्षण होते. काही जीवनमूल्यांवर त्यांची निष्ठा होती. एक प्रकारे त्यांच्या मनाची घडण आध्यात्मिक होती. त्यांच्या नाटकातील अनेक पात्रे या गुणांचे दर्शन घडवितात. तसेच खाडिलकरांच्या सगळ्या नाटकात कै. तात्यासाहेब केळकरांनी म्हटल्याप्रमाणे 'ओज' हा गुण आहे. त्यांचे शृंगार आणि करुण रससुद्धा ओज गुणान्वित असतात. व त्यामुळे त्या रसाभोवती एक प्रकारचे उदात्त वातावरण निर्माण होते.'' खाडिलकरांनी मुख्यत: शृंगार व करुण हे रस वापरले. प्रमुख पात्रांच्या ध्येयवादावरून वीर रसाचा उदय आणि कांचनगड, कीचकवध, विद्याहरण, सवाई या स्वभाव व परिस्थितीप्रधान शोकांतिकेतून करुणरसांचा उत्तम हृदयस्पर्शी परिणाम साधलेला आहे, तर 'स्वयंवर' व 'मानापमाना'तील मुग्ध शृंगाररस यांची खुलावट विलक्षण आहे. महाभारताप्रमाणेच



मराठ्यांच्या इतिहासातही सर्व व्यक्तिरेखांना युद्धाची पार्श्वभूमी आहे. त्यातील शृंगार हा वीरांचा शृंगार आहे. त्यातील कारुण्य हे युद्धाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या घटनांचे आहे. युद्धामुळेच मानवी जीवनात निर्माण झालेल्या तणावांचे चित्रण करण्याचे युयुत्सूक व प्रतिभाशाली नाटककाराला वाटलेले आकर्षणच अशा नाट्यविषयांची निवड करण्यामागे असू शकते. हे यशवंतरावांचे स्पष्टीकरण फारच मार्मिक आहे. रेखीव व रसपरिपोषक नाट्यसृष्टी हीच त्यांची सर्वात मोठी शक्ती होती.

खाडिलकरांच्या एकूण पंधरा नाटकांपैकी नऊ पौराणिक, दोन ऐतिहासिक, एक कल्पनारम्य अशी आहेत. आठ नाटके संगीत व नऊ गद्य आहेत. त्यांच्या या काही नाट्यनिर्मितीमागील हेतू व अभिप्राय यशवंतराव मोजक्या शब्दांत असा व्यक्त करतात, ''कांचनगडच्या मोहनेसारखे मातृभूमीकरिता सर्वस्वाचा त्याग करण्याचा संदेश देणारे प्रभावी नाटक घ्या. जुलमी इंग्रजी सत्तेमुळे मातृभूमीची होणारी विटंबना रूपकात्मक रीतीने दाखविणारे 'कीचकवध' पहा किंवा दुफळीचे दुष्परिणाम रंगविणारे 'भाऊबंदकी' हे नाटक घ्या. सर्व नाटकांची प्रेरणा उत्कट देशभक्तीची होती हे कोणाच्याही सहज लक्षात येईल.'' सर्वसाधारणत: हा कालखंड मराठी रंगभूमीचा भरजरी वैभवाचा काळ मानला जातो. एक वैभवशाली कालखंड म्हणून यशवंतरावांनी या कालखंडाचा उल्लेख केला आहे. खाडिलकरांच्या काही नाटकांतील प्रमुख पात्रांचा देखील ते उल्लेख करतात. आनंदीबाई-राघोबा, धैर्यधर-भामिनी, कृष्ण-रूक्मिणी यांच्यातील शूरांचा शृंगार, कौटुंबिक जीवनातील नाट्य व खलपुरुषाशी संबंध याची उदाहरणासह चर्चा यशवंतरावांनी केली आहे.

यशवंतरावांनी मराठी रंगभूमीचा इतिहास अगदी मोजक्या शब्दांत वर्णन केला आहे. महाराष्ट्रात १८८२ ते १८९८ या सोळा वर्षांच्या काळात मराठी नाटकांची वाढ झपाट्याने झाली . १८९० ते १९२० या तीस वर्षांमध्ये देवल, खाडिलकर, कोल्हटकर व गडकरी यांच्या उत्कृष्ट नाट्यकृती रंगभूमीवर आल्या. सर्वस्वी नवीन व या मातीतला असा संगीतनाटक हा नाट्यप्रकार मराठी रंगभूमीने या काळात विकसित केला. 'शारदा', 'भाऊबंदकी', 'कीचकवध', 'एकच प्याला', 'भावबंधन' अशा वेगवेगळ्या प्रकृतीची पण कसदार नाटके या काळात निर्माण झाली आणि नंतरच्या इतिहासात मानदंड ठरली असे यशवंतराव म्हणतात. या काळात बहुजन समाजाला नाटकाशिवाय दुसरी बौद्धिक करमणूक उपलब्ध नव्हती. रंजनाचे व उद्‌बोधनाचे नाटक हे एकमेव असे सर्वस्पर्शी साधन होते त्यामुळे त्यावेळी विविध अभिरुचीच्या प्रेक्षकांचे रंजन करणाऱ्या विविध दर्जाची नाटकमंडळी अस्तित्वात होती. साहजिकच कोणत्याही

नव्या नाटकाला रंगभूमीवर येण्याच्या कामी फारसा प्रयत्न करावा लागत नसे. त्यांना नाटकाची गोडी लहानपणापासूनच होती. राम गणेश गडकरी या नाटककाराबद्दल व त्यांच्या नाट्यकृतीबद्दल लिहितात, ''गडकरी म्हणजे मराठी रंगभूमीवरील तेजाचा तारा. 'एकच प्याला'तील सुधाकरच्या पश्चातापाचा प्रवेश किंवा 'भावबंधना'तील सूडाने पेटलेल्या घनश्यामाचे पाय लतिकेला धरावे लागतात तो प्रवेश एकदा पाहिल्यावर विसरणे शक्यच नाही. गडकऱ्यांच्या भडक पण भावपूर्ण नाटकाने लोक वेडावून गेले. मराठी रंगभूमीचा एक वैभवशाली कालखंड म्हणून याचा निर्देश करावा लागेल.'' गडकरी नाटककार होते. तसेच विनोदी लेखकही (बालकराम) होते व कवीही (गोविंदाग्रज) होते. गडकऱ्यांची परंपरा पुढे माधवराव जोशी, शं.प. जोशी, टिपणीस, औंधकर इत्यादी नाटककारांनी सामाजिक आणि ऐतिहासिक नाटके लिहून पुढे चालविली असा उल्लेख यशवंतराव करतात.

यशवंतरावांनी ज्याप्रमाणे १९२० पूर्वीच्या नाटकांचा व नाटककारांचा आढावा घेतला त्याप्रमाणे १९२० नंतरच्या मराठी नाटकांचाही आढावा घेतला. या काळात निर्माण झालेल्या नवनाट्यांच्या अंतरंगाची आणि बहिर्रंगाची चिकित्सा ते करतात. १९३३ मध्ये नाट्यमन्वंतर लिमिटेड ही संस्था स्थापन झाली. १९३० च्या सुमारास चित्रपटाच्या आगमनामुळे मराठी रंगभूमीला अवकळा प्राप्त झाली होती. बहुतेक सर्व जुन्या नाटक कंपन्या मोडकळीस आल्या. अशा परिस्थितीत नाट्यसृष्टीला नवचैतन्य देण्याचा प्रयत्न 'नाट्यमन्वंतर' या नावाखाली काही तरुणांनी केला. त्यात श्री.वि.वर्तक, अनंत काणेकर आणि के. नारायण काळे हे प्रमुख होते. 'आंधळ्यांची शाळा' हे नाट्यमन्वंतराचे नाटक नवीन पद्धतीचे नाटक म्हणून बरेच गाजले. याच सुमारास आचार्य अत्रे हे नाटककार म्हणून लोकांपुढे आले. त्यांची गंभीर आणि विनोदी अशी दोन्ही प्रकारची नाटके गाजत राहिली. आणि प्रतिकूल परिस्थितीत मराठी रंगभूमी टिकून राहिली. अत्रे यांच्या नाट्यकृतीबाबत यशवंतराव लिहितात, ''आचार्य अत्रे यांनी गंभीर व प्रहसनवजा अशी दोन्ही प्रकारची नाटके लिहून एक प्रकारे मराठी रंगभूमीवर स्वत:ची वैशिष्ट्ये प्रस्थापित केली. नाटक मंडळींचा संस्थानी कारभार, चित्रपटांचे बहुरंगी आकर्षण, समाजाची आर्थिक स्थिती, यामुळे मराठी रंगभूमीला अवकळा आली. तेव्हा तिला हातभार लावून जगविणाऱ्या साहित्यिकांत श्री. अत्रे यांचा उल्लेख प्रामुख्याने करावा लागेल. विडंबन आणि अतिशयोक्ती यावर आधारलेल्या प्रसन्न विनोदाचे आवाहन हा त्यांच्या भात्यातील रामबाण! 'घराबाहेर' व 'उद्याचा संसार' ही सामाजिक समस्येला हात घालणारी त्यांची गंभीर नाटकेही खास उल्लेखनीय आहेत.'' यशवंतरावांनी अत्रे यांच्या नाट्यसामर्थ्याचे गुणगान केलेच शिवाय त्यांनी नाट्यलेखन



केले ते मराठी रंगभूमीच्या पडत्या काळात. हे ध्यानात घेतले की अत्र्यांच्या नाट्यनिर्मितीचे वैभव खास करून वेगळे समजावून सांगण्याची गरजच उरत नाही, असा निर्देश ते करतात.

१९३३ पासून पुढे १९४५ पर्यंत रंगभूमी गाजविणारे अत्र्यांप्रमाणे अनंत काणेकर आणि मो.ग. रांगणेकर यांचाही यशवंतराव उल्लेख करतात. रांगणेकरांचे 'कुलवधू' हे नाटक फारच लोकप्रिय झाले असाही ते उल्लेख करतात. रंगभूमीच्या पडत्या काळात इब्सेनचे नवे नाट्यतंत्र मराठीत आणून श्री. भोळे, के. वर्तक, आणि श्री. रांगणेकर यांनी रंगभूमीची फार मोठी सेवा केली आहे.'' असाही गौरवपूर्ण उल्लेख ते करतात. मरगळलेल्या रंगभूमीला संजीवनी देण्याचा प्रयत्न काही नाटककारांनी केला. मराठी नाट्यसृष्टी विविध प्रकारच्या नाटकांनी पुन्हा एकदा गजबजून गेली. १९३० पर्यंत मराठी रंगभूमी संगीतामुळे गाजत होती, तो प्रभाव हळूहळू कमी झाला आणि संगीत नाटक टिकून राहिले. ते भावगीताच्या स्वरूपात होते. स्त्रियांची भूमिका स्त्रियांनीच करण्याची पद्धत रूढ झाल्यामुळे आणि रंगभूमीवरील नेपथ्य बदलामुळे मराठी नाट्यसृष्टी अधिकाधिक वास्तवाकडे झुकू लागली. तीन अंकी संपूर्ण नाटकाऐवजी एक अंकी नाटक या काळात अस्तित्वात आले. ही बदलत्या काळाची गरज होय. आता बालगंधर्वासारखा साडी नेसलेला नट पुन्हा रंगभूमीवर दिसणार नाही, असा जुन्या व नव्या नाटकातील बदलही ते सूचित करतात. रंगभूमी अधिकाधिक लोकाभिमुख झाली तरच ती टिकणार आहे. असेही ते सूचित करतात. ''जुन्याचा अभिमान जरूर असावा. कारण नवे हे त्यातूनच आलेले असते. पण जुने तेवढे चांगले नवे तेवढे वाईट असेही समजण्याचे कारण नाही.'' पूर्वीची नाटके व आजचे नाटक यातील संघर्षात न जाता त्यांनी आजची नाटकेही समाजवास्तवाचा सूक्ष्म वेध घेऊ पाहात आहेत हे त्यांचे भाष्य फार मोलाचे आहे. तसेच नाट्यगीतांची भावगीते होऊन त्यातला 'गायनरस' नष्ट होऊ द्यायचा नसल्यास रंगभूमीच्या सूत्रधारांनी घ्यावयाची काळजी ते सूचित करतात. म्हणून मराठी रंगभूमी टिकवण्यासाठी नटांना नाटकाचे योग्य आकलन होण्याची गरज आहे असे ते प्रतिपादन करतात.'' साहित्यिकांचा व नटांचा सहवास घडला तर नटांची नाटकाविषयीची समज वाढते. त्यामुळे अभिनयाचा दर्जा वाढतो. मराठी साहित्यिकांनी व नव्या नाटककारांनी ही परंपरा पुन्हा चालू करण्यासारखी आहे. आज मराठी रंगभूमीचा पिसारा शोभिवंत दिसतो आहे. त्याचा कस वाढवायचा असेल तर असे नाट्यजीवनाशी समरस झालेले नाटककार हवे आहेत.'' नाटककारांनी अधिक प्रभावी लेखन करण्याचा सल्ला यशवंतराव देतात. तसा प्रयत्नही १९३० नंतरच्या काही नाटककारांनी केल्याचा उल्लेख ते करतात.'' १९३० नंतरही वरेरकर, अत्रे, रांगणेकर, पु.ल. देशपांडे, वसंत

कानेटकर, विजय तेंडुलकर यांच्यासारख्या नाटककारांची गाजलेली नाटके हेच दर्शवितात की मराठी रंगभूमीची परंपरा मोठी आहे, ती अशी डगमगणार नाही.'' असा आत्मविश्वास ते व्यक्त करतात. या नाटककारांनी तेव्हाच्या काळाची गरज ओळखून नाट्यलेखन केले. त्या दृष्टीने नाट्यबदलाचा योग्य असा लवचिकपणाही त्यांनी दाखविलेला होता. पण केवळ मागणीचे स्वरूप लक्षात घेऊन पुरवठ्याचे रूप बेतणारे निर्जीव नाट्यलेखन या मंडळींनी केले नाही.

मराठी नाट्यसृष्टीची निष्ठेने सेवा करण्याची फार मोठी कामगिरी त्या काळात मामा वरेरकरांनी केली. जवळजवळ पाच दशके वरेरकरांनी नाट्यलेखन केले. त्यांच्या नाटकांची संख्या जवळपास ५०. त्यातही पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक असे विविध नाट्यविषय त्यांनी हाताळले. त्यांची नाट्यलेखनकला मुख्यत: समाजाभिमुख आणि प्रचारकी वृत्तीची आहे. त्यांच्या नाट्यलेखनाबाबत यशवंतराव लिहितात, ''मामासाहेब वरेरकर हे आणखी एक थोर सामाजिक नाटककार ! हुंड्यापासून धर्मांतरापर्यंतचे विषय आणि गिरणीतल्या मजुरापासून साहित्यसंमेलनाचा अध्यक्ष निवडल्या गेलेल्या पण टांग्याच्या भाड्याला महाग असलेल्या प्रामाणिक साहित्यिकांपर्यंतची निरनिराळ्या थरांतील पात्रे त्यांनी कुशलतेने हाताळली. ताजे विषय, चुटचुटीत टीका आणि खुसखुशीत संवाद हे त्यांच्या लेखणीचे प्रमुख विशेष. मामासाहेब वरेरकर वृद्ध झाले, तरी 'प्रौढत्वी निज शैशवास जपणे' हा त्यांचा बाणा आहे. त्यांची कला चिरतरूण आहे हे सिद्ध करण्यास 'भूमिकन्या सीता' या नाटकाचा उल्लेख पुरेसा होईल.'' समाजात वेळोवेळी जी आंदोलने झाली त्याचे पडसाद त्या आंदोलनासंबंधीची वरेरकरांची भूमिका त्यांच्या नाटकात अवतरते. वरेरकरांनी एकांक प्रवेशी नाटके लिहिण्याचा पायंडा पाडला. नाटकातील संगीताचा अतिरेक कमी करून मर्यादित पदांची योजना केली. वरेरकरांची नाटके समकालीन सामाजिक विषयांवर असल्याने यशवंतरावांना ही नाटके अधिक भावस्पर्शी वाटली.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर मराठी नाटक आणि रंगभूमी यांचे क्षेत्र व्यापक झालेले दिसते. वाङ्मय म्हणूनही नाटकाचा प्रांत जीवनाच्या विविध अनुभवांचे समर्थ दर्शन घडविणारा झालेला आहे. रंगभूमीच्या उद्धारासाठी अनेक नवीन नाट्यसंस्था निर्माण झाल्या. या संस्थांच्या माध्यमामुळे अनेक नाटके बसविली जाऊ लागली. मुंबई मराठी साहित्य संघ या संस्थेने स्वतंत्र नाट्यगृहे उभारली. जुन्या नटांच्या सहकार्याने जुनी नाटकेही बसवली जाऊ लागली. १९५४ मध्ये दिल्ली येथे झालेल्या अखिल भारतीय नाट्य स्पर्धेत साहित्य संघाने केलेल्या 'भाऊबंदकी' या नाटकास प्रथम पारितोषिक मिळाले. या यशाने डॉ. भालेराव यांच्या नाट्यसेवेचा आणि दुर्गा खोटे,



केशवराव दाते, इ. कलावंताचा तत्कालीन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु यांनी गौरव केल्याने उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या संदर्भात यशवंतराव लिहितात, ''त्यावेळी पहिले पारितोषिक 'भाऊबंदकी' नाटकाने पटकविले. मराठी रंगभूमीच्या थोर परंपरेचा असा गौरवपूर्वक बहुमान करून भारताच्या राजधानीतील श्रोतृवर्गाने आपल्या रसिकतेची साक्ष पटविली आहे.'' १९५५ मध्ये नवे मुंबई राज्य अस्तित्वात आले. या सरकारने नाटकांवरील कर रद्द केला. ही मराठी रंगभूमीच्या विकासातील महत्त्वाची घटना आहे. नाटकातून येणाऱ्या उत्पन्नावर ३३ टक्के कर भरावा लागत असल्याने नाटक करणारे कोलमडून जात असत. याच वर्षी सरकारी नाट्यमहोत्सव सुरू झाले. अनेक नाट्यसंस्था उदयास आल्या. सरकारी उत्तेजन व निमसरकारी पातळीवरच्या नाट्यस्पर्धा, नाट्यसंमेलने, नाट्यप्रशिक्षण, शिबिरे अशा अनेकविध उपक्रमांतून मराठी नाटकाला पुन्हा एकदा बहर येऊ लागला. दूरदर्शन, रेडिओ ही नवीन माध्यमे मराठी नाटकाला मिळाली. त्यामुळे नाटककार आणि नाटकांची संख्या वाढली. गावोगावी हौशी नाट्यसंस्था स्थापन झाल्या. या संस्थांच्या माध्यमातून विविध नाटके स्पर्धेसाठी बसवली जाऊ लागली. या स्पर्धेमुळे महाराष्ट्रात नाटकाने चांगलेच मूळ धरले. त्यामुळे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात नवे नाटककार आणि नवे नाट्यकलावंत निर्माण झाले. या नवनाटककारांबाबत यशवंतराव लिहितात, ''अगदी अलीकडच्या काळात श्री.पु.ल. देशपांडे यांची 'तुझे आहे तुजपाशी' व 'सुंदर मी होणार, श्री. बाळ कोल्हटकर यांचे 'दुरितांचे तिमिर जावो', श्री. मराठे यांचे 'होनाजी बाळा,' श्री. विद्याधर गोखले यांचे 'पंडितराज जगन्नाथ', श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर यांचे 'चंद्र नभीचा ढळला' इत्यादी नाटकांनी विलक्षण लोकप्रियता मिळविली. या प्रकाराच्या नाट्यकृतीमुळे मराठी रंगभूमीवर एक नवीन पर्वकाळ येऊ पाहात आहे. त्याचे आपण स्वागत करूया.'' मराठी रंगभूमी बराच काळ कथानक, संवाद, संगीत यांच्या साच्यात अडकून पडलेली होती. कृत्रिमतेच्या चौकटीतून मुक्त होऊ पाहणाऱ्या नव्या मराठी रंगभूमीचे यशवंतरावांनी स्वागत केले आहे. नाट्यवाङ्मयात स्त्री शिक्षण, प्रौढ विवाह इ. सामाजिक चळवळींचे चित्रण तत्कालीन राजकीय जीवनाचे प्रतिबिंब नाटकातून उमटले. हिंदू मुस्लिम ऐक्य, अस्पृश्यांची समस्या, शेतकऱ्यांचे प्रश्न आदी असंख्य प्रश्न सामाजिक नाटकातून मांडण्यात आले. कितीतरी नाटककार व नाटकमंडळ्या अशा स्वरूपाची नाट्यनिर्मिती करत होती. त्याचेही स्वागत यशवंतराव करतात.

मराठी नाट्यवाङ्मयाचा परामर्श घेताना आणि प्रसंगी नव्या नाटकाविषयी बोलताना यशवंतरावांनी मराठी रंगभूमीवरील नव्या बदलाचे स्वागत केले आहे. नाट्यरचनेचे नवे तंत्र, नवविचारांच्या दर्शनासाठी नव्या नाटककारांची मराठी रंगभूमीला असणारी

आवश्यकता यशवंतरावांनी संधी मिळेल तेथे प्रतिपादन केली आहे. पु.ल.देशपांडे, अत्रे, वरेरकर, पुरूषोत्तम दारव्हेकर, बाळ कोल्हटकर यांच्या नाटकांतही वैशिष्ट्येही त्यांना दिसली आहेत. काळाबरोबर निर्माण होणारे नवे प्रश्न - नाट्यरूपाने मांडण्याचा प्रयत्न या नाटककाराने केला आहे. परंतु मनाचा तळ शोधण्याचा प्रयत्न आणि वास्तवाचे प्रखर दर्शन हा नव्या पाश्चात्य नाटकाचा विशेष मराठी नाटकात दिसत नाही याची खंत यशवंतरावांनी व्यक्त केली आहे.

एकीकडे परंपरेचा वारसा सांगत असताना यशवंतरावांना बदललेल्या जीवनमूल्यांची आणि वाङ्मयीन मूल्यांचीही जाणीव आहे. त्यामुळे नव्या नाटकांबद्दलचे त्यांचे विचार प्रगमनशील आहेत. नव्या अनुभूतीने नवा नाटककार संपन्न असेल तर जीवनाचे सामर्थ्यशाली दर्शन तो घडवू शकेल. यासाठी जुन्या नाटकांचा वारसा त्यांना उपयुक्त ठरेल असा विश्वासही यशवंतराव व्यक्त करतात. मराठी रंगभूमीची मरगळ दूर करण्यासाठी नवे तंत्र, नवे विषय, नव्या काळाची जाणीव ठेवून प्रयोग करणे यशवंतरावांना जरूरीचे वाटते. नव्या नाटकांतून बदलत्या जीवनाचे सखोल व उत्कट दर्शन व्हायला हवे. केवळ जुन्याची थट्टा आणि नाविन्याची हौस एवढेच नवतेचे स्वरूप असू नये, ही अपेक्षाही यशवंतरावांनी व्यक्त केली आहे.

नाटके चांगली हवी असतील तर नटांना योग्य प्रशिक्षण मिळाले पाहिजे. त्यांच्या पोटाची, त्यांच्या भावनांची योग्य कदर केली गेली पाहिजे. त्यासाठी यशवंतरावांनी काही विचार व्यक्त केले आहेत. राज्यसरकार आणि केंद्रसरकार यांनी मराठी रंगभूमीला आर्थिक पाठबळ द्यावे - त्यांना उत्तेजन द्यावे. उत्कृष्ट नाटककारांना प्रतिवर्षी पारितोषिक देण्यात यावे असेही ते सूचित करतात. रंगभूमीच्या पडत्या काळात रंगभूमीचा उत्कर्ष कसा करावा याचे सर्व स्तरांवर प्रयत्न व्हावेत. प्रत्येक जिल्ह्यात नाटकाचे प्रयोग सरकारी सहकार्याने व्हावेत, म्हणजेच संबंधित संस्थांनाही फायदा होईल आणि जिल्ह्यातील लोकांनाही प्रयोग पाहण्याची संधी मिळेल. मराठी नाट्यपरिषदेने नाट्यसंमेलनाऐवजी कलाकारांच्या कलागुणांना अधिक वाव द्यावा, अधिक निधी उभा करून अशा कलाकारांना सुवर्णपदके व लेखी पुरस्कार द्यावेत. प्रेक्षकांनी या कार्यास हातभार लावला पाहिजे. तसेच नाट्यपरिषदेमुळे मराठी रंगभूमीवर उत्साह आला व त्याबरोबर नाट्यवाङ्मयात नवनिर्मिती होऊ लागली. प्रयोग दृष्ट्या नवे बदल होऊ लागले. मराठी रंगभूमीला नवीन परिमाणे देण्यासाठी या नाट्यपरिषदेचे कार्य मोलाचे आहे. या परिषदेला यश येवो अशीही अपेक्षा ते करतात. एकूणच या रंगभूमीच्या संदर्भात नवी दृष्टी, नवा विचार पचवून नवे नाटककार जन्माला येणे ही काळाची गरज आहे, असे यशवंतरावांना वाटते. मराठी रंगभूमीच्या पडत्या काळात बाबूराव पेंढारकर किंवा दुर्गा खोटे



यांच्यासारख्या बोलपटातील कलावंतांनी रंगभूमीवर पदार्पण करून मराठी रंगभूमी जिवंत करण्याचे केलेले प्रयत्न यशवंतरावांना महत्त्वाचे वाटतात. नटवर्य बालगंधर्व यांचासुद्धा यासंदर्भात उल्लेख करून त्यांना मासिक तीनशे रुपये मानधन देण्यात येत आहे असा संदर्भ यशवंतराव देतात. नाट्यकलावंत, रंगभूमी व नाट्यविचार यासंबंधींचे त्यांचे विवेचन पाहिले म्हणजे यशवंतरावांची नाट्यविषयक भूमिका व दृष्टिकोन सहज लक्षात येतो.

नाटक या वाङ्मयप्रकाराचा विचार करताना यशवंतराव तो एक कलाप्रकार मानतात. त्यातील श्राव्य आणि दृश्य कलेचे महत्त्व ते विसरत नाहीत. नाटकाचा जनमानसावर होणारा परिणाम ते अधिक लक्षात घेतात. या कलाप्रकाराचा समाजाशी असणारा अनुबंधही यशवंतरावांनी लक्षात घेतला आहे. लोकरंजन आणि लोकाराधन या नात्याने नाट्याचे स्थान ते महत्त्वाचे मानतात. नाटकातून आदर्श मूल्यांची जपणूक झाली पाहिजे. त्यासाठी रंगभूमी अधिकाधिक लोकाभिमुख असायला हवी. तसेच मराठी नाटकांतून सामाजिक प्रश्नांची मांडणी व्हावी, जीवनदर्शन चित्रित करावे असा त्यांचा दृष्टिकोन होता. जीवनविषयक चिंतनाला चालना देण्याचे सामर्थ्य नाट्यकृतीत असणे गरजेचे आहे. म्हणून काळाबरोबर उत्पन्न होणारे नवे नवे प्रश्न नाट्यरूपाने मराठी वाङ्मयात मांडले गेले पाहिजेत. त्यात कंटाळवाणा एकसुरीपणा नसावा, वैविध्य असावे. नाटक केवळ करमणुकप्रधान असू नये. पण नाटकातून नाना रसांचा आस्वाद घेता यावा असे त्यांचे विचार होते. यावरून त्यांची नाट्यअभिरुची किती सजग होती, याचे प्रत्यंतर येते.

यशवंतराव चव्हाणांनी आपल्या साहित्यामध्ये मराठी रंगभूमीच्या थोर परंपरेचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. याचबरोबर भावनात्मक आवाहन करणाऱ्या भडक नाटकाबद्दलचे त्यांचे मत प्रतिकूल आहे. या स्वरूपाच्या नाटकात आलेली कृत्रिमता आणि रंजकतेकडे झुकलेली अभिरुची यशवंतरावांना मान्य नाही. नाटकातील आशयसंपन्नता, कथानकाची गती आणि प्रेक्षकांवरील परिणाम या विषयी यशवंतराव अधिक दक्ष आहेत. मराठी रंगभूमीची दुरावस्थाही त्यांनी लक्षात घेतलेली आहे. नाटकाचा एक वाङ्मयप्रकार म्हणून जसा ते विचार करतात तसा त्यांच्या प्रयोगमूल्यांचा विचार त्यांच्या विवेचनात येतो. त्यांनी मराठी नाटकाचा आढावा घेतला. त्याबरोबर मराठी रंगभूमीवरील नव्या बदलाचे त्यांनी स्वागत केले आहे. नाट्यरचनेचे नवे तंत्र, नव्या नाटककारांची मराठी रंगभूमीला असणारी आवश्यकता यशवंतरावांनी संधी मिळेल तिथे प्रतिपादन केली आहे.

ᴑ ᴑ ᴑ

प्रकरण ४

—

# ललितगद्याचे आकलन व समीक्षा

## चरित्रविषयक विचार

चरित्र व आत्मचरित्र हा एक लोकप्रिय असा ललितेतर वाङ्मय प्रकार आहे. स्वातंत्र्योत्तर काळात मराठीतील इतर वाङ्मयप्रकाराप्रमाणेच याही वाङ्मयप्रकाराने मराठी साहित्य सृष्टीत फार मोलाची भर घातली आहे. वरवर पाहता सोपा वाटणारा पण प्रत्यक्ष लेखनात तितकाच अवघड असणारा हा वाङ्मयप्रकार आहे. कलात्मक दृष्ट्या हा वाङ्मयप्रकार हाताळणे अवघड आहे. कारण चरित्रात खऱ्या व्यक्तीची जीवनगाथा असते. त्यामुळे ते अधिक वस्तुनिष्ठ असते. असंख्य उपलब्ध अशा बाह्य पुराव्यांच्या आधारे व्यक्तीच्या बाह्यांगाकडून अंतरंगाकडे चरित्र जात असते. उपलब्ध माहितीवरून आणि चरित्रनायकाच्या उक्तींच्या आणि कृतीच्या आधारे त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे चित्र चरित्रकाराला रेखाटावे लागते. चरित्राची थोडक्यात व्याख्या 'सत्यपूर्ण व कलात्मक व्यक्तिदर्शन' अशी करता येईल. सातत्याने सत्याचे भान राखून एखाद्या कर्तृत्ववान व्यक्तीच्या जीवनाचा कालानुसार, घटनानुसार वा विषयानुरूप साधार विश्लेषणात्मक वा परिचयात्मक इतिहास व त्या आधारे त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाचा आलेख सामान्य चरित्रलेखात रेखाटलेला असतो.' ती व्यक्ती ज्या काळाशी व समाजाशी एकरूप झालेली असते त्यांच्याशी तिचे अतूट नाते जडलेले असते. चरित्राचा संबंध व्यक्ती आणि व्यक्तीच्या जीवनातील घडामोडी एवढ्यापुरताच मर्यादित असतो. एखादा थोर पुरुष त्याचे असामान्य कर्तृत्व, त्याचे लोकविलक्षण वागणे, त्याला आलेले विविध प्रकारचे अनुभव यांचे ज्ञान करून घेण्याची जिज्ञासा वाचकांना नेहमीच असते. एखादे चांगले चरित्र वाचताना आपण त्या त्या श्रेष्ठ व्यक्तींचे जीवन जगत असतो. थोडक्यात 'चरित्र वाङ्मय' हे अनेक अंगांनी सुजाण वाचकाला आकर्षून घेते. यशवंतराव चव्हाणांसारखा जाणकार वाचक सुद्धा याला अपवाद नव्हता. अशा या साहित्य प्रकाराचे सामर्थ्य, त्याच्या रचनेची वैशिष्ट्ये, निर्मितीमागच्या प्रेरणा काय असाव्यात याबाबत यशवंतरावांचे विचार व



मर्यादा जाणून घेण्याचा हा प्रयत्न आहे.

रूढार्थाने यशवंतरावांना चरित्रकार म्हणून संबोधता येईल की नाही याविषयी शंका वाटते. कारण लघुनिबंधकार, टीकाकार, आत्मचरित्रकार अशा विविध नात्यांनी यशवंतरावांनी मराठी साहित्याची बहुमोल सेवा केली आहे. यशवंतरावांच्या लेखनाची सारी वैशिष्ट्ये त्यांच्या या विविध लेखन संभारात दिसून येतात. यशवंतरावांचे एकूण साहित्य डोळ्यांखालून घातले तर त्यांच्या नावे चरित्र ग्रंथ या रकान्यात एकही ग्रंथ आढळत नाही आणि म्हणूनच यशवंतरावांना सर्वार्थाने चरित्रकार म्हणावे की नाही असा संभ्रम निर्माण होतो. त्यांच्या साहित्यात चरित्रविषयक पुस्तक एकही नसले तरी त्यांनी चरित्रविषयक लेख मात्र पुष्कळ लिहिले आहेत. यशवंतरावांचे चरित्र, चारित्र्य व साहित्य या सर्वांवर विचारांच्या आणि आचारांच्या दृष्टीने चिरस्थायी छाप असलेल्या अनेक चरित्रकारांच्या चरित्रांचा प्रभाव जाणवतो. यशवंतरावांच्या कार्य व कर्तृत्वाची सुरुवातच मुळी महात्मा ज्योतिबा फुले, विठ्ठल रामजी शिंदे, छ. शिवाजीमहाराज, छ. शाहू महाराज, लो. टिळक, म. गांधी, पं. जवाहरलाल नेहरु यांसारख्या दिग्गज व्यक्तींपासून स्फूर्ती घेऊन झालेली आहे आणि म्हणूनच या थोर विभूतींविषयी प्रसंगानुरूप चरित्रपर लेख लिहून ठेवावे अथवा त्यांच्याबद्दल आपले मत व्यक्त करावे यात खचित औचित्य होते. त्यांनी लिहिलेल्या चरित्र लेखांचे स्वरूप तसे पाहिले तर अत्यंत संक्षिप्त होते. चरित्रलेखन करायचे म्हणून त्यांनी चरित्रलेखन केलेले दिसत नाही, तर त्यांनी जे थोडे फार चरित्रलेखन केले आहे त्यामध्ये ठरवून, निश्चित करून, बेतून असे फार कमी लिहिले आहे. स्थूल मानाने राजकीय, सामाजिक, वैचारिक अशा रीतीने काही स्फुटलेखन करताना मनाशी काही निश्चय बाळगून यशवंतराव लिहित असल्याचे आढळते. साहजिकच कुणा थोरामोठ्याचे चरित्रलेखन करावे, ते अमुकच एका हेतूच्या सिद्धीसाठी असावे. ते अमुक अमुक रीतीचे असावे असा काही विचार यशवंतरावांच्या हातून जे नकळत चरित्रलेखन झाले आहे त्याबाबत दिसून येत नाही. लेखनाची हौस आणि आपल्याला सांगावेसे वाटते ते सांगण्याचा दांडगा उत्साह हाच यामध्ये प्रमुख असा भाग आढळतो. परिणामी चरित्र लेखनाविषयी तंत्रमंत्राचा विचार करून यशवंतरावांनी चरित्र लेखन अथवा चरित्रलेखनावर भाष्य केले नाही. पण जे थोडेफार या वाङ्मयप्रकाराबाबत लेखन केले आहे त्यामध्ये चरित्रलेखनाचे तंत्रमंत्रविषयक विशेष आढळतात हे विसरता येत नाही.

विविध कार्यक्षेत्रातील महनीय प्रवक्त्यांवर यशवंतरावांनी लेखन केले. लेखन विषय विविध थरातले, कार्यप्रांतातले, परिस्थितीतले आणि विचार पातळीतले असे आहेत. हे चरित्र लेखन सलगपणे केलेले नाही. ते प्रसंगानुसार झालेले आहे. लेख, अग्रलेख

यांच्या रूपामध्ये. विशेषत: अंग भाजून काढणाऱ्या, समाज ढवळून काढणाऱ्या विविध लढ्याच्या वेळी किंवा मृत्यूच्या करुण प्रसंगाच्या निमित्ताने अथवा जयंत्या, पुण्यतिथीच्या, शताब्दी निमित्ताने. त्या त्या प्रसंगी त्या त्या महनीय व्यक्तींचे जे देदिप्यमान दर्शन झाले त्याचा प्रत्यय देण्याचा आटोकाट प्रयत्न यशवंतरावांनी चरित्रलेखनातून केला आहे. तसेच चरित्र या वाङ्मय प्रकाराबद्दलची आपली भूमिका प्रसंगानुरूप व्यक्त केली आहे.

प्रत्येक वाङ्मयप्रकाराला स्वत:चे असे स्वतंत्र लेखन तंत्र असते. चरित्र या वाङ्मयप्रकाराचे स्वरूपही तसे स्वतंत्र आहे. तसा हा वाङ्मय प्रकार उद्बोधक असा आहे. 'सत्यपूर्ण व कलात्मक व्यक्तिदर्शन' असे त्याचे स्वरूप असते. द.न. गोखले म्हणतात,''चरित्र म्हणजे एका माणसाच्या किंवा जीवनखंडाचा 'वृतान्त' सांगणारी 'कलाकृती' ही माझी प्रथमपासून समजूत होती नि आजही आहे. अर्थात हा वृत्तांत असल्यामुळे जे घडले, जे ऐतिहासिक सत्य आहे, जे प्रत्यक्षात नि वास्तव आहे त्यापासून चरित्रकार मुळीच दूर जाऊ शकत नाही. म्हणजे घटित सत्य हा त्याचा आशय किंवा गाभा असतो. पण चरित्र हा जसा 'वृतान्त' आहे तशीच 'कलाकृती'ही आहे. सर्व वाङ्मयीन कलाकृतींच्या मागे मनुष्यसंबद्ध जिव्हाळ्याची जिज्ञासा असते.' व्यक्ती हाच चरित्राचा केंद्रबिंदू असल्याने चरित्रातून व्यक्तीच्या भावजीवनाला स्थान मिळते. म्हणूनच म. फुले, म. गांधी, न्या. रानडे, गोखले, लो. टिळक, पं. नेहरु यांसारख्या कृतीप्रवण व्यक्तींच्या चरित्रातून व्यक्ती आणि कृती यांची सजीव एकात्मता पाहावयास मिळते. या राष्ट्रनेत्यांचा संबंध राष्ट्र, समाज आणि संस्कृती यांना नवे वळण देणाऱ्या व्यापक चळवळीशी येतो. म्हणूनच अशा व्यक्तींचे ऐतिहासिक महत्व व व्यक्तिगत जीवन अथवा राजकीय, सामाजिक जीवन जाणून घेण्याच्या जिज्ञासेपोटीच यशवंतरावांना चरित्र लेखनाचा छंद शालेय जीवनापासून लागला. लो. टिळकांचे चरित्र, त्याचप्रमाणे नेपोलियन, मॅझिनी, डी. व्हॅलेरा, गॅरीबाल्डी यांची चरित्रेही त्यांनी विद्यार्थी जीवनात वाचून काढली होती. या संदर्भात ते लिहितात, ''चरित्र वाचनाची आवड मराठीने मला लावली. अगदी लहानपणापासून ती कायम राहिली असे नव्हे तर वाढतच गेली आहे. जिज्ञासेची क्षेत्रे जशी वाढत गेली तशी त्या क्षेत्रांशी संबधित स्त्री पुरुषांच्या जीवनाविषयी औत्सुक्य वाढले आणि चरित्रग्रंथाची त्यात आत्मचरित्रे व आठवणीही (मेमॉयर्स) आल्या. आवड कायम राहिली.'' आपल्या चरित्रविषयक वाचनाच्या काही आठवणींची नोंद यशवंतराव अशा प्रकारे करतात. शिवाय चरित्र वाचनाचे त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर कसे परिणाम घडत गेले ते ही सांगतात. अशा प्रकारचे ग्रंथ वाचताना ते चरित्र नायक कोण आहे हे पाहूनच निवड करत असत. तशी यशवंतरावांची वाचनाची



पद्धत वेगळी होती. साधारण एकाच वेळी ते चार-पाच तऱ्हेच्या पुस्तकाचे वाचन करत असत. गंभीर, विचारप्रधान चरित्र हा वाङ्मय प्रकार ते आवडीने वाचत असत. त्यामुळे जिज्ञासेची क्षेत्रेही वाढत गेली. त्याचप्रमाणे त्या त्या संबंधित स्त्री पुरुषांच्या जीवनाविषयी औत्सुक्येही वाढत गेली. ''याच काळातील एक छोटीशी आठवण सांगितली पाहिजे. योगायोगाने जोतिबा फुले यांचे पंढरीनाथ पाटील यांनी लिहिलेले छोटेखानी चरित्र मी वाचले. ते चरित्र आज ज्याला चोपडे म्हणता येईल, अशा आकाराचे होते. परंतु या छोटेखानी चरित्रग्रंथाने माझ्या जाणिवेच्या कक्षा रुंदावल्या. हे मला कबूल केले पाहिजे.'' असे यशवंतरावांनी स्पष्टपणे नोंदवले आहे. यशवंतराव नेहमी जुने-नवे एकत्र सांधून भविष्याचा अचूक वेध घेणारे समन्वयवादी द्रष्टे नेते होते. त्यामुळे जगाच्या आणि मानवी जीवनाच्या प्रगतीच्या दृष्टीने थोर पुरुषांच्या कर्तृत्वातला इतिहास पाहणे त्यांना महत्वाचे वाटते. थोर पुरुषांची चरित्रे ही राष्ट्राची बहुमोल संपत्ती असते. अशा व्यक्तींचा आदर्श समोर ठेवून आपण त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून त्यांचा मार्ग चोखाळणे हे सामान्यांचे कर्तव्य असते. म्हणून अशा व्यक्तींच्या कार्याचा, त्यांच्या मार्गाचा, हेतूचा, ध्येयाचा उलगडा होण्यासाठी चरित्र लेखनाचा उपयोग होतो. नव्या पिढीला नैतिक शिक्षणाचे धडे चरित्र लेखनातून मिळतात. थोरांचे असे आदर्श समोर ठेवण्याने सामान्य माणसाचे स्वत:चे व्यक्तिमत्त्व घडविण्यास निश्चित उपयोग होतो, असा त्यांचा विश्वास होता. ते म्हणतात, ''चाळीशीनंतर माणसे चरित्र वाचनाकडे वळतात. असे एका सुप्रसिद्ध टीकाकाराने म्हटल्याचे माझ्या वाचनात आहे. आमची पिढी पंधराव्या सोळाव्या वर्षापासूनच या वाचनाकडे वळली होती असे म्हटले तरी चालेल.'' यशवंतरावांना चरित्रवाचनाची ओढ लागण्याची कारणेही त्यांनी विशद केली आहेत. बी. ए. च्या वर्गात यशवंतराव चव्हाण शिकत असताना त्यांना चरित्रवाङ्मय हा साहित्य प्रकार अभ्यासक्रमात होता. त्यावेळी त्यांनी लिटन स्ट्रची लिखित 'क्वीन व्हिक्टोरिया' आणि इतर काही प्रसिद्ध चरित्रे अभ्यासली होती. तेव्हापासून या वाङ्मयप्रकाराबाबत त्यांच्या मनात ओढ निर्माण झाली. ते म्हणतात, ''ते दिवस मंतरलेले होते. स्वातंत्र्य चळवळीने आमची मने भारून टाकलेली होती. काही नव्या प्रेरणा घेऊन देशाच्या आकांक्षाची क्षितिजे उंचावणाऱ्या विचारांची झेप असलेल्या एका तरुण नेत्याचे जीवन समजून घेण्याची ओढ होती.'' यशवंतरावांना राजकारण आणि इतिहास हे विषय आवडत. त्यामुळे ऐतिहासिक व्यक्तींची चरित्रे व राजकीय व्यक्तींच्या चरित्रांचा ते मनमुराद आस्वाद घेत असत. मानवी जीवन प्रवाह म्हणजे जुन्याचा बोध नव्याचा शोध आहे. त्यामुळे गतकालीन व समकालीन व्यक्तींबद्दल त्यांच्या मनात कुतूहल असे. या जाणिवेतूनच या लोकांनी

काय म्हटले आहे व काय म्हणावयाचे आहे हे जाणून घेण्याची उत्सुकता त्यांना लागली होती. त्यासाठीच त्यांनी चरित्र या वाङ्मयाचा उपयोग केला.

थोरामोठ्यांची चरित्रे वाचत असताना माणसा-माणसांच्या जीवनात आणि अनुभवविश्वात किती विविधता असते हे लक्षात येते आणि आपले मन चिंतनशील बनते. अंतर्मुख होऊन विचार करू लागते. ''वर्तमानकाळ समजण्यासाठी इतिहासाचे सतत चिंतन करावे लागते. कारण वर्तमानकाळाशी झगडणाऱ्या माणसाला भूतकाळ समजण्याची जर अक्कल नसेल तर वर्तमानकाळाशी तो फारसा झगडू शकणार नाही आणि म्हणून त्यासाठी इतिहासाचा थोडाफार अर्थ समजून घ्यावा लागतो.'' असे चव्हाण म्हणतात. चरित्रकार हा इतिहासकारही असावा लागतो. इतिहासाची जशीच्या तशी पुनरावृत्ती जरी होत नसली तरी माणसाची प्रवृत्ती इतिहासापासून धडा घेण्याची असते. इतिहास हा कर्तृत्व करण्याला उत्तेजन देत असतो आणि तसे उत्तेजन देताना मागील चुकांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून सूचना देतो. इतिहासामुळे पुढच्या पिढीला मार्गदर्शन लाभते. तसेच चरित्रापासून जीवनाला मार्गदर्शन लाभते. पूर्वजांचे आणि त्यांच्या भव्य दिव्य वृत्तींचे पुण्यस्मरण व्हावे, जीवनाला काही वळण लागावे, हे उदिष्ट डोळ्यांपुढे ठेवून कित्येक काळापर्यंत चरित्रे लिहिली गेली आणि म्हणूनच इतिहास व चरित्रे यांचा संबंध भूतकाळाशी असतो. काही चरित्रे याला अपवाद आहेत. यशवंतरावांनी मालोजीराजे आणि शहाजीमहाराज ग्रंथप्रकाशन समारंभाच्या वेळी ऐतिहासिक चरित्रग्रंथावर मांडलेले विचार फार मोलाचे आहेत.

यशवंतरावांनी पं. नेहरू, रविंद्रनाथ टागोर, पं. गोविंद वल्लभ पंत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, इ. चरित्र ग्रंथांना अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहिल्या आहेत. त्यामध्ये या वाङ्मयाचे महत्त्व त्यांनी सांगितलेच शिवाय भारतीय दिशाहीन तरुणांना मार्गदर्शन व्हावे त्यांनी या थोर नेत्यांच्या चरित्रांचा अभ्यास करावा व स्वत:ही प्रतिकूल परिस्थितीशी झगडून कर्तृत्वाने मोठे व्हावे असा संदेश दिला. चरित्रपर कादंबरी हा वाङ्मयप्रकार अतिशय लोकप्रिय असा वाङ्मयप्रकार आहे. यामध्ये माणसाच्या जीवनाची कहाणी सांगितली जाते. चरित्रपर कादंबरी व्यक्तिजीवनाचा इतिहास कथन करते. आलेल्या अनुभवातून मानवी जीवनाचे स्वरूप व रहस्य उलगडून दाखवणे हेच या वाङ्मयप्रकाराचे उद्दिष्ट असते. या वाङ्मय-प्रकाराबद्दल यशवंतराव म्हणतात, ''चरित्रात्मक कादंबरीचा एक नवा लेखन प्रकार अलीकडे मराठी साहित्यात रूढ होऊ पाहत आहे. कादंबरीकार साहित्यिक हे वास्तवाच्या जवळपास जाऊ लागले आहेत आणि उगवत्या पिढीला केवळ स्वप्नरंजन किंवा मनोरंजन यांच्या चौकटीत न ठेवता पलीकडच्या टप्प्यावर बोलावत आहेत हा याचा अर्थ मी मानतो. या प्रयत्नाने अधिक



बाळसे धरायला पाहिजे असे मला वाटते.'' स्वर्गीय श्री. लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनावर चरित्रपर 'अमृतपुत्र' या भा.द. खेर लिखित कादंबरीच्या प्रस्तावनेमध्ये यशवंतरावांनी वरील विचार मांडला आहे. ज्याच्या जीवनाविषशी पुरेशी माहिती मिळते, ज्याचे जीवन आकर्षक वंदनीय, पुण्यवान असून अनेक समर प्रसंगांनी, भावनिक चढउतारांनी, असामान्य घटनांनी, मानसिक द्वंद्वांनी, गुणावगुणांनी रसरसलेले असते अशाच मनुष्याची शक्यतो चरित्रपर कादंबरीसाठी निवड केली जाते. भा. द. खेरांनी या लेखनाच्या माध्यमातून चरित्रात्मक कादंबरीचा एक नवीन प्रकार मराठी कादंबरीत रूढ केला आहे, असा उल्लेख ते करतात. एवढेच नव्हे तर पाश्चात्य इंग्रजी वाङ्मयात चरित्रात्मक कादंबरीला अव्वल दर्जाचा वाचक मिळत आहे. लेखकांनी या वाङ्मयप्रकारात भरपूर लेखन करावे व हा वाङ्मयप्रकार घरातघरात पोहचवावा असा आशावाद ते व्यक्त करतात.

स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्योत्तर काळात अनेक राजकीय व सामाजिक नेत्यांची चरित्रे लिहिली गेली. स्वातंत्र्योत्तर काळात अनेक महत्वाचे नेते 'चरित्राचे' विषय झालेले आहेत. यामध्ये मुख्यत: पंतप्रधान, राष्ट्रपती यांसारख्या सत्तास्थानी असलेल्या अनेक व्यक्तींचा समावेश आहे. सामाजिक, स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेतलेल्या व चळवळीचे उद्‌गाते म्हणून कार्य केलेल्या अनेक समाजसुधारकांची चरित्रे लिहिली गेली. या चरित्रांमुळे मराठी साहित्यात व सांस्कृतिक वातावरणात भर पडली. पण त्याबरोबर जीवनातल्या भल्याबुऱ्या घटनांकडे तटस्थ वृत्तीने पाहण्याची सवय वाचकांना लागते. यासंदर्भात असे म्हणता येईल, ''कर्तृत्ववान व सफल माणसांच्या जीवनाचे दर्शन त्यांच्या चरित्र आत्मचरित्राच्या माध्यमातून घडते आहे त्यातून अधिक चांगले जीवन जगण्याची प्रबळ इच्छा जागृत होते. जीवनमान सुधारण्यासाठी कष्ट करण्याची प्रेरणा व स्फूर्ती मिळते. बुद्धी प्रगल्भ होऊन दृष्टिकोन व्यापक होतो.'' यशवंतरावांना अंतर्दर्शी मानवतावादी चरित्र नायक आवडतात. ते महापुरुष असतात अशा महापुरुषांचे चरित्र अत्यंत अघटित आणि रोमहर्षक घटनांनी भरलेले असते. सत्यासाठी तत्त्वासाठी आाणि माणसाच्या उभारणीसाठी हे महापुरुष खर्ची पडत असतात. हे खर्ची पडणे 'स्फूर्तिदायक' असेच असते. म्हणूनच यशवंतरावांना या चरित्रवाङ्मय प्रकाराबाबत रुची होती हे स्पष्टपणे जाणवते.

## आत्मचरित्र विषयक विचार

आत्मचरित्र हा अत्यंत वास्तववादी असा वाङ्मयप्रकार आहे. तो कादंबरीइतकाच लोकप्रिय आणि महत्त्वाचा आहे. आतापर्यंत चरित्र या वाङ्मयप्रकाराचे भावंड म्हणजे

आत्मचरित्र अशी समजूत होती. पण दोन्ही वाङ्मयप्रकाराची प्रकृती भिन्न आहे. चरित्राचा एक उपप्रकार म्हणूनच या वाङ्मयप्रकाराकडे आजही पाहिले जाते. मराठी चरित्रापेक्षा आत्मचरित्राचा प्रांत लहान असला तरी अधिक मनोवेधक आहे. चरित्रांच्या तुलनेत आत्मचरित्रांची संख्या कमी आहे. कारण स्वत: विषयी लिहिण्यास माणसास संकोच वाटतो. समीक्षक सांगतात त्याप्रमाणे सामान्य माणसाच्या जीवनात सुद्धा सरस वाङ्मयनिर्मितीचे जिवंत झरे सापडू शकतात. ही लोकशाहीची सुसंगत अशी वृत्ती मूळ धरू लागल्यानंतर आत्मचरित्रात्मक लेखनाचा हळूहळू उदय झाला. लेखकाने आपल्या व्यक्तिगत जीवनाची स्वत:च्याच शब्दात सांगितलेली कहाणी म्हणजे आत्मचरित्र असे स्थूलपणे म्हणता येईल. स्वत:च स्वत:चे चरित्र लिहावयाचे म्हणजे एकप्रकारे आत्मनिवेदन, आत्मप्रकटीकरण, आत्मकथन करण्यासारखे आहे. त्यामुळे हा वाङ्मयप्रकार आत्मनिष्ठ आहे. अनुभवांची तीव्रता इतर कोणत्याही वाङ्मयप्रकारापेक्षा आत्मचरित्रात अधिक असते. माणूस स्वत:स जितके ओळखतो तितके त्यास अन्य कुणीही ओळखू शकत नाही. विशेषत: त्याचे व्यक्तिगत जीवन आणि अंतरंग हे त्याच्या स्वत:कडूनच अधिक यशस्वीपणे व प्रभावीपणे प्रगट होणे शक्य आहे. आत्मचरित्रातील लेखन हा केवळ तर्काचा भाग राहात नसून ती एका व्यक्तीची विश्वसनीय माहिती असते. ती एक वास्तव जीवनकथा असते. काल्पनिकतेची कसलीही ठिगळजोड करण्याचा अधिकार आत्मचरित्रकाराला नसतो. किंबहुना जे सांगेन ते सत्यच सांगेन अशी त्याची प्रतिज्ञा असावी लागते. त्यामुळे वास्तवाच्या चाकोरीपासून आत्मचरित्रकाराला रत्तीभरही बाहेर जाऊन चालत नाही. 'आत्मचरित्र हा एका जिवंत हाडामासाच्या व्यक्तीने स्वत:चाच दिलेला अंतर्बाह्य स्वरूपाचा वृतान्त असतो. तो समग्र सर्वांगानी अभ्यासून पारखून दिलेला असतो म्हणून वाचकाच्या दृष्टीने तो महत्वाचा असतो.''

यशवंतरावांनी आत्मचरित्र या वाङ्मयप्रकाराबाबत स्फुटलेखन केले आहे. निरनिराळ्या नियतकालिकातून, वृत्तपत्रातून व सभासंमेलनातून त्यांनी या वाङ्मयाविषयी आपली भूमिका मांडली आहे. आत्मचरित्रपर लेखनामध्ये वाचकांच्या मनात जागृत होणाऱ्या कुतूहलाची जात ही इतर वाङ्मयप्रकारापेक्षा वेगळी असते. बऱ्याच वेळा ती अधिक तीव्र असू शकते. आत्मचरित्रामध्ये चित्रित केलेले जीवन दर्शन हे मुख्यत: असंभाव्य, अपरिचित किंवा दूरचे वाटत नाही. ते जीवन आपणास ठाऊक असणाऱ्या किंवा बौद्धिक दृष्ट्या व भावनात्मक दृष्ट्या संभाव्य वाटणाऱ्या एकूण जीवनाचे लक्षणीय व अपरिहार्य घटक बनलेले असते. संस्मरणे, आठवणी, दैनंदिनी, कैफियती, कबुलीजबाब, चरित्र-आत्मचरित्रपर लेखन या किंवा यांसारख्या चरित्रवाङ्मयाशी निकटचे नाते असलेल्या छोट्या मोठ्या लेखनप्रकारातून दिसते.



यामधून व्यक्तिमनाचे, मानवी जीवनप्रवाहाचे अपेक्षित-अनपेक्षित स्फुल्लिंग उमटलेले आढळतात. हे प्रकार जर समर्थपणे हाताळले गेले तर मानवी इच्छा-आकांक्षाचा, मनोधैर्याचा, दौर्बल्याचा, संघर्षाचा, शरणागतीचा एक अर्थपूर्ण आलेख कदाचित सापडू शकेल. जीवनाला सामोरे जाण्याची शक्ती या लेखनप्रकारात आहे. आपल्या कहाणीच्या निवेदनाने मानवी जीवनाचे कानेकोपरे प्रकाशझोतांनी उजळून टाकण्याची अपूर्व क्षमता श्रेष्ठ आत्मचरित्रामध्ये असते.

यशवंतरावांचा आत्मचरित्र वाङ्मयाबाबत विशिष्ट असा दृष्टिकोन होता. आत्मचरित्र वाचताना यशवंतराव ती व्यक्ती व तिची घडण, सहानुभूतीने समजून घेण्याच्या भूमिकेने वाचत असत. आत्मचरित्रे वाचताना वाचकांनी नैतिक न्यायाधीशाची भूमिका न घेणे बरे असेही मत ते मांडतात. आत्मचरित्रविषयक त्यांची भूमिका मांडताना ते लिहितात, ''अलीकडच्या आत्मचरित्रांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे आपले बालपण व तरुणपण यांबाबत ती अतिशय पारदर्शक प्रामाणिक असतात. पण अलीकडच्या चालू काळाबाबत मात्र ती अतिशय सावध असतात. अर्थात याबद्दल मी त्यांना दोष देत नाही. कारण ही सावधानता समजण्यासारखी आहे. शिवाय एखाद्या माणसाच्या अगदी खाजगी जीवनात डोकवायची उत्सुकता मला वाटत नाही. तो माणूस खाजगी जीवनात कसा होता, याच्याशी वाचक म्हणून माझा काही संबंध आहे असे मला वाटत नाही. तो ज्या वैशिष्ट्यामुळे नावारूपाला आला त्याबद्दल त्याने तपशीलवार लिहावे एवढीच माझी अपेक्षा असते व ती पूर्ण झाली की मला समाधान वाटते.'' यशवंतराव अलीकडच्या आत्मचरित्राची वैशिष्ट्ये विशद करताना लेखकाच्या क्षेत्रानुसार आत्मचरित्रात पडणारा फरकही नोंदवतात. साहित्याचा आस्वाद घेणारे रसिक, मूल्यमापन करणारे समीक्षक आणि निर्मिती करणारे साहित्यिक हे व्यवहारातील महत्त्वाचे वर्ग आणि समाजातील महत्वाचे घटक आहेत. तसेच साहित्यही कधी एका ठशाचे नसते. बदलते जीवन, बदलता संदर्भ, बदलत्या राजकीय, सामाजिक घडामोडी याही साहित्यात असतात. जसा काळ तसे साहित्य. त्यामुळे काळाच्या परिणामापासून साहित्य अलिप्त राहू शकत नाही. लेखक आत्मचरित्रामधून आपली व्यक्तिगत अनुभूती स्वाभाविकपणे प्रकट करत असतो. तसेच लेखक ज्या समाजजीवनात जगत असतो त्या समाजाची परंपरा, संस्कृती व जीवनपद्धतीचे चित्रण आत्मचरित्रात येत असते. म्हणूनच अलीकडची आत्मचरित्रे अतिशय पारदर्शक व प्रामाणिक असतात. तसेच चालू काळाबाबत मात्र ती अतिशय सावध असतात. ही यशवंतरावांची या वाङ्मयाबाबतची भूमिका योग्यच आहे. विशेषत: दलित आत्मचरित्र वाचल्यानंतर यशवंतरावांच्या वरील विधानांची सत्यता जाणवते.

यशवंतरावांची आत्मचरित्रपर भाष्ये जर डोळ्यांखालून घातली तर त्यांच्या या कलाकृतीबाबतची मते स्पष्ट जाणवतात. चिंतनपर साहित्याची निर्मिती करण्यात जीवनातील पुष्कळ वेळ व्यतीत करणाऱ्या विशिष्ट ध्येयाच्या पूर्ततेसाठी साहित्य निर्मिती करणाऱ्या यशवंतरावांच्या आत्मनिवेदनात आत्मचरित्र वाङ्मयविषयक घडामोडींना आवर्जून स्थान मिळणे स्वाभाविक वाटते. साहित्यिक म्हणून त्यांनी 'चरित्रे-आत्मचरित्रे', 'आवडनिवड', या लेखांमध्ये या वाङ्मयाबद्दल जो विचार मांडला आहे त्या निवेदनाचा सूर बराच मोकळा आहे. समंजस व गंभीर वस्तुनिष्ठतेचा प्रत्ययही त्यांच्या या लेखांमधून येतो. ते म्हणतात, ''आत्मचरित्रामधून सत्य लपविले जाणे, आत्मगौरव व आत्मसमर्थन होणे याला आपले सामाजिक जीवनातील दुहेरीपण बऱ्याच प्रमाणात जबाबदार असावे. म्हणजे आपले आदर्श, आपली तत्त्वे आणि व्यवहार यांत फरक असतो, विरोध असतो. या आजच्या सामाजिक वास्तवतेचा हवे तर दांभिकतेचा म्हणा- आविष्कार आत्मचरित्र लेखनातही अपरिहार्यपणे होतो. म्हणून आत्मचरित्राचे मोठेपण मी ती संपूर्ण सत्य सांगतात की नाही या कसोटीवर ठरवत नाही आणि खरे म्हणजे संपूर्ण सत्य हे शेवटी आकाशपुष्पासारखेच नाही काय?'' सत्य लपविणे, आत्मगौरव व आत्मसमर्थन आत्मचरित्रातून येते याचा ठपका यशवंतराव लेखकावर न ठेवता समाजजीवनातील त्रुटींमध्ये ठेवतात. आत्मचरित्रामध्ये उत्कट चित्रणप्रसंगातून आणि आत्मनिवेदनातून जर काही जीवनचिंतन आले तर ते बोधापेक्षाही वरच्या पातळीवरचे ठरेल. खऱ्या आत्मचरित्रामागे आत्मप्रकटीकरणाची भूमिका असते. ते आत्मसमर्थन नसते. म्हणून आत्मचरित्रामध्ये आत्मप्रदर्शन मुळीच असू नये. आत्मप्रकटीकरण जितके प्रांजळ, उत्कट, तटस्थ तितकी आत्मचरित्राची उंची वाढत जाईल.

व्यक्ती, वाङ्मय आणि इतिहास यांचा लेखकाने कलात्मक संयोग घडवून आणलेला असतो. त्यामुळे विद्यार्थी दशेपासून यशवंतरावांनी अशा स्वरूपाची आत्मचरित्रे अभ्यासली होती. ''त्या दृष्टीने काकासाहेब गाडगीळ, आचार्य अत्रे, ना. सी.फडके इत्यादींची मराठी आत्मचरित्रे, त्याचप्रमाणे व्हेव्हेलच्या आठवणी, मौलाना आझादांचे 'इंडिया विन्स फ्रीडम', राजेंद्रबाबूंचे आत्मजीवन इ. पुस्तके मी वाचली आहेत.'' यात बर्ट्रांड रसेलचे आत्मचरित्र त्यांना खूपच आवडलेले दिसते. कारण एखादा माणूस प्रामाणिक आत्मचरित्र लेखनाची कोणती मर्यादा गाठू शकतो हे रसेलच्या पुस्तकात दिसते. या त्यांच्या आत्मचरित्राचे शेवटचे परिच्छेद म्हणजे तर गद्यात लिहिलेली एक सुंदर कविता आहे, असा उल्लेख यशवंतराव करतात. त्याचप्रमाणे गांधीजींचे आत्मचरित्रही सत्यकथन व अहिंसेचा शोध या सूत्रांनी वेढलेले असे. ते एक अविस्मरणीय



आत्मचरित्र आहे असे मत ते नोंदवतात.

साहित्यिकांनी लिहिलेली बहुतेक आत्मचरित्रे कलात्मक स्वरूपाची असतात. त्यांच्या साहित्यिक व्यक्तित्त्वाचा प्रभाव त्यांच्या आत्मचरित्र लेखनावर पडलेला असतो. त्यांच्या आत्मचरित्र लेखनाला त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे काही फायदे मिळत असतात. यशवंतराव चव्हाण अशा साहित्यिकांच्या आत्मचरित्राबद्दल लिहितात, ''अत्र्यांचे 'कऱ्हेचे पाणी' साहित्यिक गुणांनी श्रीमंत आहे. पण मला त्यांचे 'मी कसा झालो' हे पुस्तक अधिक आवडले होते. ते अधिक व्यक्तिगत होते. कऱ्हेच्या पाण्यामध्ये आपण एक ऐतिहासिक महत्त्वाची व्यक्ती झालो आहोत ही जाणीव सतत जागी असल्याचे जाणवते, पण हा काही दोष नाही. 'ना.सी. फडके यांचे आत्मचरित्रही मी आवडीने वाचले. ते माझे आवडते प्राध्यापक आहेत. कमलाबाई तर आमच्या वर्गात होत्या. त्यामुळे ते आत्मचरित्र वाचताना काही Nostalgia ची भावना येऊन जाते.'' यशवंतरावांना अशा साहित्यिकांची आत्मचरित्रे वाचताना अधिक अप्रूप वाटते कारण साहित्यिकांच्या प्रत्यक्ष जीवनात घडलेल्या अनेक अनुभवांचा तो आपल्या साहित्यकृतीत अनेक प्रकारांनी उपयोग करून घेत असतो. त्या अनुभवांना आपल्या मुक्त सर्जनशील मनाने आपणास हवा तसा नवा आकार देत असतो.

यशवंतरावांनी साहित्यावर आणि तदनुषंगाने साहित्यिकांवर जीवापाड प्रेम केले. मराठी साहित्य मोठे झाले पाहिजे. मराठी साहित्य निर्माण करणाऱ्या साहित्यकारांना आपल्या साहित्याच्या कक्षा रुंदावण्यासाठी तशी संधी निर्माण झाली पाहिजे. अशी त्यांची भावना होती. महाराष्ट्र कलेने आणि कलाकारांनी समृद्ध बनावा अशी त्यांची इच्छा होती. कलेच्या आणि कलावंतांच्या अभिवृद्धीसाठी त्यांनी अनेक उपक्रम सुरू केले. कलाकारांना सन्मानाची वागणूक दिली. कधी स्वत: कलाकारांपर्यंत गेले तर कधी कलावंताला सन्मानाने आमंत्रित करून जवळीक साधली. कलाकारांच्या बाबतीत त्यांच्या मनात कसलाही भेद नसे. त्यामुळे कलाकारांबाबत एक प्रकारचा जिव्हाळा निर्माण होत असे. या जिव्हाळ्यातून त्यांनी अनेक कलाकारांची आत्मचरित्रे वाचली. त्यांच्या जीवनातील चढ-उतार जाणून घेतले. हंसा वाडकर, आनंदीबाई शिर्के, स्नेहप्रभा प्रधान, आनंदीबाई विजापुरे, आनंद साधले, जागीरदार इ. लेखक कलाकारांची आत्मचरित्रे वाचली. यशवंतरावांच्या मते आयुष्यात घडलेल्या घटनांचे सूक्ष्म विश्लेषण करता येणे ज्यांना शक्य होते तेच चांगले आत्मचरित्र लिहू शकतात. ''म्हणूनच कलाकारांची आत्मचरित्रे अधिक अंतर्मुख तर राजकीय सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांची आत्मचरित्रे सामान्यत: अधिक बहिर्मुख असतात असा अनुभव येतो. त्यामुळे कार्यकर्त्यांच्या आत्मचरित्रातून खूप माहिती मिळाली तरी कलावंतांची

आत्मचरित्रे चटका लावून जातात.'' यशवंतरावांच्या ठिकाणी जे मूलगामी प्रेम होते, जी रसिकता होती त्याची प्रचीती येते. यशवंतराव कलावंतांचे नुसते बोलके चाहते नव्हते तर कलाकारांच्या जीवनातील ठळक ध्येये, आशाआकांक्षा, जीवनातील चढउतार आपणास ठोस स्वरूपात माहीत व्हावेत या इराद्यातूनच त्यांनी आत्मचरित्रे वाचली.

१९७० नंतर बरीच दलित आत्मचरित्रे लिहिली गेली. विशेषत: नवजागृत समाजातून ती निर्माण झाली. नव्या जाणिवा घेऊन उदयाला आलेले साहित्य नवे घाट घेऊन निर्माण झाले. तथाकथित साहित्य प्रकारांचे संकेत, आकृतीबंध झुगारून देऊन दलित आत्मचरित्रे लिहिली गेली. त्या त्या समाजस्तराची शेकडो वर्षे झालेली उपेक्षा कळाली. ती समजावी म्हणूनच ही आत्मचरित्रे लिहिली गेली. साहित्यक्षेत्रातील या नव्या प्रवाहाकडे यशवंतरावांचे लक्ष असे. लक्ष्मण माने यांचे 'उपरा' हे दलित आत्मचरित्र प्रसिद्ध झाले. तेव्हा त्यांच्या अनेक व्याख्यानातून आणि खाजगी संभाषणातून 'उपरा' चा प्रशंसापूर्वक उल्लेख येई. एखादे साहित्य आवडले म्हणजे त्या साहित्यिकाची बूजही ते मनापासून राखीत असत.

साहित्यक्षेत्रात एखाद्या विशिष्ट काळात अनेक कारणाने विशिष्ट साहित्यप्रकार लोकप्रिय होतो. काही काळ त्याची एक लाट निर्माण होते. अशा काळात उत्साही मंडळी लेखन करत असतात. आयुष्यातील काही विशिष्ट टप्पा ओलांडल्यानंतर शेवटी माणूस अशा ठिकाणी येऊन पोचतो की त्या वेळी थोडे थांबून त्याला आपल्या गतजीवनाकडे वळून बघावेसे वाटते. अशा वेळी ''राजकीय, सामाजिक कार्यक्षेत्रातील किंबहुना सार्वजनिक क्षेत्रात भाग घेणाऱ्या व्यक्तीने आत्मचरित्र लिहिणे आवश्यक आहे, हे तिचे एक कर्तव्य आहे असे मला वाटते. कारण त्यामुळे ऐतिहासिक महत्त्वांच्या घटनांचे धागेदोरे उलगडणे सुलभ होईल. आपल्याकडे वस्तुनिष्ठ विश्लेषणात्मक इतिहास लेखन न होण्याचे एक कारण म्हणजे अशा सामग्रीचा अभाव, असे मला वाटते.'' असे यशवंतराव नमूद करतात. गतकाळातील आठवणींना उजाळा देण्यासाठी आत्मचरित्राचा उपयोग होतो. तसेच तत्कालीन जीवनातील अनुभवापासून इतरांनाही बोध होतो. जीवनाच्या प्रवासात पूर्वी भेटलेल्या सोबत्यांची पुन्हा एकदा अवलोकनात भेट होते. त्यात पुन: मीलनाचा आनंद मिळतो. त्या व्यक्तींना, प्रसंगांना नवी झळाळी मिळते. म्हणून सार्वजनिक जीवनात भाग घेणाऱ्या व्यक्तींनी आत्मचरित्र लिहिणे आवश्यक आहे असे यशवंतराव सूचित करतात.

यशवंतरावांनी अनेक निवडक आत्मचरित्रे वाचली. अशा आत्मचरित्रांमुळे त्यांची वैचारिक, बौद्धिक व भावनात्मक भूक तर भागलीच शिवाय स्वत:च्या संकल्पित वाङ्मयाविषयी काही प्रश्न पडू लागले. ते म्हणतात, ''अलीकडे अधूनमधून माझ्या



मनाला शंका वाटून जाते की या वाचनाद्वारे मी माझ्याच आत्मचरित्र लेखनाची तयारी तर करत नाही ना?'' मी ज्या घटनांतून गेलो त्याबद्दल इतरांना काय म्हणावयाचे आहे, याबद्दल मला उत्सुकता वाटण्याचेही कदाचित हेच कारण असावे. पण आतापर्यंत प्रसंगानुसार लेखनाशिवाय अन्य लेखन मी केलेले नाही, करू शकलो नाही. आत्मचरित्र लिहायला मला आवडेल. पण त्यालाही कदाचित अवकाश आहे. मनाची तटस्थता असल्याशिवाय असले लेखन करणे शक्य नसते. मी जरी कधीकाळी आत्मचरित्र लिहिले, तर त्यात अभिनिवेश नसेल, माझे तेच खरे असा अट्टाग्रह नसेल, अशी मला आशा आहे.'' त्यांच्या यावरील आत्मगतातून त्यांची आत्मचरित्रे लिहिण्याची तयारी लक्षात येते. पुढे त्यांनी 'कृष्णाकाठ' हे आत्मचरित्र लिहिले. आपल्या गतायुष्याकडे यशवंतरावांनी सिंहावलोकनाच्या दृष्टीने पाहिले. त्याचे आविष्करण 'कृष्णाकाठ'मध्ये केले आहे. इतरांची आत्मचरित्रे वाचत असताना आपल्यापुढेही आपला जीवनपट अनुषंगाने कळत-नकळत उलगडत जात असतो. त्यातील अनेक बारकावे त्या त्या वेळी दिसू लागतात. आत्मचरित्रामधील आत्माविष्कार जीवनातील सत्याशी संबंधितच ठेवण्याचा प्रयत्न यशवंतरावांनी केला आहे. स्वानुभावाच्या आधारे जीवनसत्याचा शोध तटस्थपणे घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. लेखकाने आत्मचरित्र लिहिताना स्वत:ला विसरले पाहिजे. तसेच त्याला स्वत:चे भानही असले पाहिजे. म्हणजेच स्वत:ला विसरून स्वत:कडेच तटस्थपणे पाहात गतजीवनातील स्मृती अभिनिवेशाशिवाय सांगितल्या पाहिजेत.

यशवंतरावांनी साहित्यक्षेत्रात अनुभवांच्या आणि आविष्काराच्या नव्या वाटा चोखाळण्याचा सदैव प्रयत्न केला. या संदर्भात त्यांचे चरित्र, आत्मचरित्र, वाङ्मयविषयक विचार महत्त्वाचे आहेत. यशवंतरावांना या वाङ्मयप्रकाराबाबत विशेष रुची होती. ते या वाङ्मयप्रकाराचे आवडीचे वाचन करत. त्यामुळे या वाङ्मयाबाबतचे अनुभवविश्व साकार करणारे विचार त्यांनी मांडले. यामधून त्यांची जी प्रतिमा उभी राहते ती एक समाजमनस्क साहित्यिक म्हणूनच. या वाङ्मयप्रकाराबद्दल विचार मांडताना - एखाद्या साहित्यिकाच्या साहित्यकृतीचा आस्वाद आणि आकलन त्याच्या आत्मचरित्रातून अधिक सुलभ होऊ शकते. किंवा एखाद्या कालखंडाचा साक्षी म्हणूनही या वाङ्मयप्रकाराचा उपयोग होतो. तसेच एखाद्या माणसाविषयीच्या आपल्या ज्ञानात, समजूतीत हा वाङ्मयप्रकार फार मोठी भर घालणारा आहे. या वाङ्मयातून विविधांगी मानवी स्वभावाचे दर्शन घडते. असा हेतूही ते स्पष्ट करतात.

○ ○ ○

प्रकरण ५

# जीवननिष्ठ समीक्षादृष्टी

मराठी साहित्य क्षेत्रात यशवंतरावांनी विविधांगी आणि विपुल लेखन केले आहे. आत्मचरित्र, चरित्रलेख, व्यक्तिचित्रे, वैचारिक लेखन या ललित लेखनाबरोबरच त्यांनी समीक्षेच्या क्षेत्रातही मोलाची कामगिरी केली आहे. ''मी साहित्य समीक्षक नाही. एक रसिक मराठी भाषक साहित्यप्रेमी आहे.'' असे यशवंतरावांनी जरी नम्रपणे नमूद केले असले तरी रसिक मर्मज्ञ आणि समतोल टीकाकार हा वाङ्मयीन प्रगतीचा एक महत्त्वाचा घटक आहे. काव्यानंद व साहित्याचा आस्वाद घेताना यशवंतरावांना पराकोटीचा आनंद होतो. काव्याचे आणि साहित्याचे वाचन हा त्यांचा विरंगुळा होता. ''राजकारणात राहूनही वेळात वेळ काढून साहित्याचा आस्वाद चाखण्याचा मी प्रयत्न करतो'' असे ते सांगतात. हे यशवंतरावांचे विचार त्यांच्या साहित्य विचाराच्या अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचे मानून त्यांची समीक्षाविषयक भूमिका प्रस्तुत मुद्द्यात पाहावयाची आहे.

यशवंतरावांनी समीक्षाशास्त्राची मांडणी किंवा ऊहापोह केलेला नसला तरी वेळोवेळी त्यांनी ग्रंथाबद्दल वा कलाकारांबद्दल प्रकट केलेली मते, भूमिका आणि निवडक पुस्तकांना लिहिलेल्या प्रस्तावना म्हणजेच साहित्यातील आस्वादक समीक्षेचा एक आदर्श नमुनाच होय. या प्रस्तावनांचे चिकित्सक मूल्यमापन करणे म्हणजे यशवंतरावांमधील समीक्षकाचा शोध घेणे होय. तसेच त्यांनी प्रकट केलेली भूमिका आणि प्रसंगानुसार त्यांनी व्यक्त केलेली मते समीक्षक म्हणून त्यांचे स्वरूप दर्शवणारी आहेत.

बालपणापासून यशवंतरावांनी केलेल्या चौफेर वाचनामुळेच अभ्यासलेल्या ग्रंथाची आस्वादक समीक्षा करण्याची कुवत यशवंतरावांना लाभली होती. विविध ठिकाणी सभासंमेलनामध्ये त्यांनी जी विधाने साहित्यकृतींबद्दल केली आहेत त्या विधानांमध्ये साहित्यिक गुण तर दिसतात शिवाय रसिक गुणही दिसतात. ''साहित्यप्रेमी हा आजच्या लोकशाही युगात एक नम्र समीक्षकच असतो.'' याची यशवंतरावांना जाणीव दिसते. एवढेच नव्हे तर अशा साहित्यिकांनी निर्माण केलेले साहित्य हे सुद्धा एका अर्थाने जीवनाची समीक्षा आहे, अशी साहित्याबाबत त्यांची धारणा होती.



साहित्यात जीवनाचे प्रतिबिंब असते, ते संसाराचे नुसते चित्र नसते. साहित्य हेच मुळी जीवन आहे. जीवनरसाने ते तुडुंब भरलेले आहे. 'साहित्य निर्मिती करावी, पण खरे म्हणजे जीवनावरचा लोभ सोडू नये, जीवनावरचे प्रेम कायम ठेवावे. जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत काम करणाऱ्या सगळ्या माणसांचा नाही म्हटले तरी साहित्याशी संबंध येतो.'' यशवंतरावांचा साहित्यासंबंधीचा दृष्टिकोन सर्वस्पर्शी होता. म्हणून साहित्य आणि समाजजीवन यांची यशवंतरावांच्या साहित्यविषयक भूमिकेत जाम सांगड आहे. यशवंतरावांना साहित्याचे भव्य, विशाल आणि दिव्य स्वरूप अभिप्रेत आहे. यशवंतराव हे साहित्यप्रेमी आहेत. साहित्यप्रेमी हे सुद्धा लोकशाही युगात एक नम्र समीक्षकच असतात. तीच भूमिका आपल्याकडे घेऊन यशवंतराव वैचारिक प्रवर्तन व प्रबोधनाच्या दृष्टीने मराठी साहित्य समीक्षेकडे पाहतात. साहित्याची अंतिम प्रेरणा मानवी मूल्यांची जाणीव करून देणारी असावी असे त्यांना वाटते. मानवी मूल्यांचा प्रत्यय हीच वाङ्मयाची आपण शेवटची कसोटी मानली तर मानवी मूल्यांची किंवा गुणांची वाढ करणे हे आम्ही आमचे साध्य मानले पाहिजे. अशा प्रकारे समाजाच्या रचनापर्वात साहित्यिकांनी कोणते कार्य करावयास पाहिजे याबाबत यशवंतराव आपली भूमिका मांडतात. साहित्य हे जीवनाच्या कुशीत जन्मते. त्याची निर्मिती जीवनातील शाश्वत सत्याच्या आधारावर झालेली असते. प्रत्येक साहित्यकृती ही स्वत:चा असा एक आकृतीबंध साधीत असते. एका व्यक्तिमनाने शब्दाच्या साहाय्याने घेतलेला आपल्या एका असाधारण अनुभवांचा तो शोध असतो. शब्दांच्या साहाय्याने साक्षात करण्याचे काम एक निर्मितीक्षम व्यक्तिमन तेथे करीत असते. त्याचाही ठसा साहित्याच्या भाषेवर उमटलेला असतो. ''म्हणून लोकजीवनातून साहित्य निर्माण होते, असे मानण्यात येते. लोकजीवनाचे प्रतिबिंब प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे साहित्यावर पडत असते व त्यावर पुन्हा साहित्याचा लोकजीवनावर परिणाम होतो.'' असे चक्र चालूच असते असे यशवंतराव सांगतात. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम वगैरे संतांच्या जीवनाचा व साहित्याचा प्रतिध्वनी आजच्या जीवनात उमटलेला दिसतो. या संतांनी लिहिलेली गीते, अभंग आणि भजने यात लोकजीवनाचे प्रतिबिंब आढळते आणि साहित्यामुळे सर्वसामान्य माणसांना मन:शांती मिळते. म्हणून साहित्याचा आनंद समाजाचा महान ठेवा आहे व तो जास्तीतजास्त लोकांना स्वच्छ हवेप्रमाणे उपलब्ध व्हावा असे यशवंतरावांना वाटते. भाषा हे माणसाचे प्रभावी व महत्त्वाचे संपर्क साधन आहे. भाषेमुळे माणूस इतर प्राण्यांपेक्षा वेगळा ठरला आहे. माणसाइतकीच भाषा जिवंत असणे आवश्यक आहे. नैसर्गिक, सामाजिक, राजकीय, पर्यायाने सांकृतिक बदलाबरोबर तिच्यात होणारा बदल अपरिहार्य असतो. किंबहुना बदलाला सामोरे जाणारी भाषाच जिवंत राहू शकते.

समर्थ होऊ शकते. जनसामान्यांच्या अभिसरण व अभिव्यक्तीचे माध्यम ठरणारी भाषाच समर्थ म्हणावी लागेल. लोकभाषा ही सर्व जीवनव्यवहारासाठी वापरली गेली पाहिजे. लोकभाषेखेरीज खऱ्या अर्थाने लोकशाही असूच शकत नाही. बहुजन लोकांना समजणारी भाषाच जीवनातील सर्व व्यवहारात वापरली पाहिजे असा आज अट्टाहास धरला जातो. या संदर्भात यशवंतरावांचे विचार फार महत्त्वाचे आहेत. ते म्हणतात, ''ज्ञानभाषा आणि लोकभाषा एक झाल्याशिवाय समाजाचे जीवन समर्थ होत नाही. उन्नत होत नाही. विकसित होत नाही. ज्ञानभाषा एक आणि लोकभाषा दुसरी अशी हिंदुस्थानच्या जीवनाची परंपरागत कहाणी आहे.'' ज्ञानभाषेचे कार्य केवळ भाषा अभिमानातून होईल अशी आज शक्यता नाही. कारण त्यासाठी नवे संशोधन करून ते जगापुढे त्वरित मांडण्याची क्षमता व सोय असणारीच भाषा ज्ञानभाषा होऊ शकते. म्हणून मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी सर्व ज्ञान त्या भाषेत येणे अगत्याचे आहे. शिवाय ज्या भाषेतून मुख्यत: ज्ञानाचे आदान प्रदान होते व निर्मिती होते ती भाषा ज्ञानभाषा बनते. उच्च शिक्षण, संशोधन, माहितीचे विवरण व विनिमय इत्यादींमुळे इंग्रजी ही ज्ञानभाषा बनली आहे. म्हणून ज्ञानभाषेमध्ये जे ज्ञान आहे ते लोकभाषेमध्ये आले पाहिजे असा आशावाद ते व्यक्त करतात. तसेच उच्चशिक्षण मातृभाषेतूनच दिले पाहिजे असा अट्टाहासही ते व्यक्त करतात. मराठी भाषा जगवायची, फुलवायची, समृद्ध करावयाची आहे तर त्यासाठी इंग्रजी चांगल्या तऱ्हेने आत्मसात करणे आवश्यक आहे. ''मी भाषेवर प्रेम करणारा मनुष्य आहे. पण मी संकुचित अर्थाने भाषेचा अभिमानी राहिलेलो नाही. हेही तितकेच खरे आहे. भाषा ही माणसांना एकत्र आणण्याचे साधन बनण्याऐवजी त्यांच्यात ती दुरावा निर्माण करील की काय अशी भीती आज आपल्याला वाटू लागली आहे.'' म्हणून शिक्षण हे सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहोचवायचे असेल तर ते परक्या भाषेतून तळागाळापर्यंत पोहोचवणे अवघड आहे. त्यासाठी वेगवेगळ्या क्षेत्रांतील तज्ज्ञांनी आपल्या क्षेत्रातील ज्ञान इंग्रजीतून सोप्या मराठी भाषेत अनुवादित केले तर मराठी भाषेला जी मरगळ आली आहे ती दूर करणे शक्य आहे असा विश्वास ते व्यक्त करतात.

मराठी भाषेच्या परिवर्तनाची ही सुंदर मीमांसा यशवंतरावांनी केली आहे. यातून मराठी भाषेची त्यांची जाण किती सखोल होती हे लक्षात येते. यशवंतरावांची समीक्षा म्हणजे जाणकार रसिकाने साहित्य कृतीचा आस्वाद घेऊन दिलेला हुंकार आहे. यशवंतरावांच्या समीक्षेची प्रक्रिया ही एका शोधाची प्रक्रिया आहे. आणि तो शोध शोधकाच्या विनम्र परंतु जिज्ञासू बुद्धीने घेतलेला आहे. हा शोध वाङ्मयाच्या प्रवृत्तीचा, प्रयोजनाचा, रूपांचा आणि प्रश्नांचा घेतला आहे. साहित्यकृती ही चैतन्यपूर्ण नवनिर्मिती असते. अशा साहित्याचा शोध म्हणजे चैतन्याचा शोध असतो. एका परीने जीवनाचा



शोध असतो. जीवनाचा शोध जसा संपत नाही तसा उत्तम साहित्य कृतीच्या रसास्वादाचा शोध कधी संपत नाही. यशवंतरावांसारखा शोधक अशी समीक्षा नम्रपणे करत असतो.

यशवंतरावांची समीक्षा ही तात्त्विक समीक्षा, शास्त्रीय समीक्षा नाही. म्हणून या समीक्षेकडून शास्त्रीय स्वरूपाची सुस्पष्टता अपेक्षिणे अयोग्य आहे. यशवंतरावांची समीक्षा रसग्रहणात्मक सुद्धा नाही. त्यांची रसग्रहणे, ज्या त्या प्रकारची रसग्रहणे फारच कमी असतात. व स्वत: यशवंतरावांची मुक्तभाष्ये जास्त असतात. यशवंतराव स्वत: एक सर्जनशील साहित्यिक होते व त्यांना अत्यंत चिंतनमग्न मन लाभले होते. मराठी भाषेची निर्मिती कधी झाली, त्यावर इतिहासाच्या परिवर्तनाचा व भौगोलिक परिस्थितीचा परिणाम कसा होत गेला, त्यातून मराठी कशी बदलत गेली हे सांगण्यासाठी यशवंतराव रूपकात्मक भाषेचा उपयोग करून म्हणतात, ''मराठी भाषेला इतिहासाने वस्त्र दिले तर भूगोलाने ते शिवून मराठी भाषेच्या अंगावर घातले व तिच्या रूपात भर टाकली असे म्हणावे लागेल.'' यशवंतरावांची समीक्षेची प्रक्रिया अशी आस्वादापासून मूल्यमापनापर्यंत आपोआप घडत असते. मराठी भाषेचे बदलते रूप व बोलीभाषेच्या या परिवर्तनाच्या दिशा यशवंतराव नेमक्या शब्दांत मांडतात. साहित्य आणि समाजप्रबोधनाची दिशा आणि व्याप्ती स्पष्ट करताना यशवंतरावांची भूमिका स्पष्ट दिसते. ते म्हणतात, ''साहित्य हे थर्मामीटरमधील पाऱ्यासारखे संवेदनशील असते. निदान असावे. समाजमानसामध्ये जे असते तेच साहित्यात अवतरते. मराठी साहित्याचा इतिहास हेच सांगतो.'' पारा जसा उष्णतेने झरझर वर चढतो, तसेच हे साहित्य समाजाच्या परिवर्तनाच्या दिशा तेवढ्याच गतीने व्यक्त करीत असते. साहित्य हे आपल्या काळाशी संवाद करत असतानाच सर्वकालीन बनण्याची धडपड करीत असते. कोणतीही साहित्यकृती विशिष्ट काळात, विशिष्ट परिस्थितीत व विशिष्ट संदर्भात जन्म घेत असते. साहित्यात सर्वसाधारण लोकांच्या सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक प्रवृत्तींचे प्रतिबिंब पडत असते. त्या त्या काळाच्या गरजा, वैशिष्ट्ये व अपेक्षा यांनी तिला घाट दिलेला असतो. त्यामुळे साहित्यकृतीच्या आस्वादाच्या, आकलनाच्या आणि मूल्यमापनाच्या संदर्भात तत्कालीन परिस्थितीचा परामर्श ते घेतात. जवळजवळ सर्वच महत्वाच्या साहित्यप्रकारावर त्यांनी भाष्य केले आहे. प्रासंगिक पण विचारपूर्वक स्फुटलेखन करणारे विचारवंत म्हणून सामान्य वाचक यशवंतरावांना ओळखतो. त्यांचा व्यासंग, तर्कशुद्ध चिकित्सा, सडेतोडपणा, सुगम प्रतिपादन शैली आणि कलाकृतीच्या व कलावंतांच्या व्यक्तित्वाच्या सूक्ष्म छटा शोधणारी सौंदर्यवादी दृष्टी यामुळे यशवंतरावांची साहित्यमीमांसा भरीव आणि साहित्यसमीक्षा रोचक बनली

आहे. कारण त्यांची भूमिका ही बोधकाची नसून शोधकाची होती.

यशवंतरावांकडे साहित्यकृतीचे आकलन करण्याइतका व्यासंग आणि आस्वाद घेण्याइतकी संवेदना होती. अनुभवाविषयी संबंधित शास्त्रांचे, कलांचे ज्ञान त्यांना होते. साहित्याचा सांस्कृतिक अनुबंध लक्षात घेण्याची क्षमता त्यांच्याजवळ होती. त्याचप्रमाणे उपकारक ठरणाऱ्या अनेक शास्त्रांची माहिती त्यांना होती. साहित्याविषयीचे उदंड प्रेम त्यांच्याकडे होते. तसेच अनेक साहित्यकृतींच्या चिकित्सक वाचनातून यशवंतरावांची साहित्यदृष्टी तयार झालेली होती. यशवंतरावांसारख्या समीक्षकाने सर्व प्रकारचा वाङ्मयप्रकार मग तो हिंदी, इंग्रजी अथवा मराठी भाषेतला असो तो सारख्याच जिज्ञासू बुद्धीने तपासला. मिळतील तेथून वाङ्मयाच्या अंतर्बाह्य स्वरूपासंबंधीचे साहित्य त्यांनी गोळा केले. भाषेचा, राष्ट्राचा, धर्माचा, विशिष्ट मतप्रणालीचा अभिमान बाळगून आपली दृष्टी संकुचित न होऊ देता ललित कलांचा डोळस आस्वाद त्यांनी घेतला. त्यामुळे साहजिकच विविध ललितकलांविषयी त्यांच्या मनात जिज्ञासा व जिव्हाळा निर्माण केला.

यशवंतरावांसारखा एखादा समीक्षक ज्या वेळी एखाद्या पुस्तकाची, लेखनाची किंवा साहित्य प्रकाराची आपल्या वाचनासाठी निवड करतो तेव्हा त्या साहित्याची प्राथमिक चांगुलपणाची साक्षच देत असतो. काय निवडावे व काय निवडू नये याविषयी त्यांची विवेकबुद्धी जागरूक होती. चांगल्या वाईटाच्या त्यांच्या काही कल्पना निश्चित होत्या. आणि त्यांच्या आधारे विविध साहित्यकृतींवर अभिप्राय व्यक्त करताना समीक्षा जन्म घेत असते. यशवंतरावांनी अनेक साहित्यकृतींचा शोध घेतला. त्या साहित्यकृतींचे वर्णन, विश्लेषण केले. त्या कृतीतील मर्म सांगितले. अभ्यासाची समग्रता, लेखनाची सभ्यता, तर्कशुद्धता इ. मर्यादा ओळखून अनेक साहित्य कृतींचे विवेचन यशवंतरावांनी केले आहे.

यशवंतरावांनी वेगवेगळ्या साहित्यकृतीचा आणि साहित्यप्रकाराचा आस्वादक दृष्टिकोनातून आणि स्वागतशील दृष्टीने विचार करून साहित्य समीक्षेच्या क्षेत्रात आपली मते नोंदवली आहेत. कविवर्य सुधांशु (ह.न.जोशी) यांच्या 'स्वर' या काव्यसंग्रहाबद्दल ते आपले मत असे प्रगट करतात, ''कल्पनाशक्ती शापही आहे आणि वरही आहे. अशी तरल कल्पनाशक्ती असल्याशिवाय सरस साहित्य निर्मिती होणे कठीणच. परंतु हा शाप जीवनातल्या अनंत वेदना शब्दरूप करणारा आहे. स्वत:च्याच नव्हे, तर सहसंवेदनेने अनेकांच्या भावनांना शब्दरूप देऊन निर्भेळ आनंदाची निर्मिती करणारा असा हा शाप एखाद्या भाग्यवंतालाच पूर्वपुण्याईने लाभतो. कवि 'सुधांशु' कल्पनाशक्तीचे हे असेच वरदान घेऊन वाचकापुढे या 'स्वर' रूपात आले आहेत.'' 'दत्त दिगंबर दैवत



माझे' या भक्तीमधुर गीताने कवि सुधांशु सर्वांना परिचित होते. अशा कवीच्या काव्य संग्रहाबद्दल सौंदर्यपिपासू पण संस्कारक्षम व्यक्तिमत्त्वातून आपले विचार त्यांनी नोंदवले आहेत.

यशवंतरावांनी आस्वादक समीक्षेच्या दृष्टिकोनातून अनेक पुस्तकांना प्रस्तावना लिहिल्या आहेत. त्या त्या कलाकृतीचे वाङ्मयीन विहंगमावलोकन त्यांनी केले आहे. कोणत्याही पूर्वग्रहदूषित अशा भावना मनामध्ये न ठेवता स्वच्छ मनाने परंतु डोळस अशा दृष्टिकोनातून त्यांनी चिंतनपूर्वक रसग्रहणे केलेली आहेत. 'संघर्ष' या मीना जोशी संपादित इंदिरा गांधींच्या जीवनावरील कादंबरीला प्रस्तावना लिहिताना ते त्यांचे मोजक्या शब्दांत वर्णन करतात, ''हिंदूस्थानसारख्या एका विशाल देशात अखिल सामान्यजनांच्या विश्वात असणारी ही एक व्यक्ती म्हणजे एक शक्ती आहे. अर्थात ही शक्ती त्या व्यक्तीची राहत नसून ती त्या देशाची बनते व त्यामुळे देश सार्थ होतो आणि देश आत्मविश्वासाने प्रगतीच्या दिशेने पाऊल टाकू शकतो.'' यशवंतरावांच्या समकालीन व्यक्तींबद्दलचा हा अभिप्राय अतिशय महत्त्वाचा आहे. राजकारणामध्ये अनेक कठीण प्रसंग निर्माण झाले. काही दिवस इंदिरा गांधींचा व त्यांचा व्यक्तिगत दुरावा निर्माण झाला. पण राष्ट्रीय पुढाऱ्यांत एक अग्रणी व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांचा उल्लेख ते करतात. श्रीमती इंदिरा गांधींच्या बाबत 'संघर्ष' या एका शब्दात त्यांच्या सर्व जीवनाचे सार आल्याचे नोंद करतात. यशवंतरावांसारखा वाचक अशा साहित्यकृतीबद्दल सहज प्रतिसाद देतो.

कलेच्या स्वातंत्र्यावर व सामर्थ्यावर त्यांची निस्सीम श्रद्धा होती. कलेच्या आणि कलावंतांच्या अभिवृद्धीसाठी त्यांनी अनेक उपक्रम सुरू केले. 'लता' या गौरव ग्रंथामध्ये ते लिहितात, ''लता मंगेशकर हे अद्भुततेचा स्पर्श झालेले भारतीय संगीत सृष्टीचे लेणे आहे. त्यांची गीते ऐकण्याची संधी मला बरेच वेळा मिळाली. शब्द आणि भावना यांना जोडणाऱ्या त्यांच्या मधूर स्वरांतून संगीताची सृष्टी उभी राहते व त्या स्वरांनी रसिकांची हृदये हेलावतात. गीतांतील भावनांचा उत्कट अनुभव येतो.'' यशवंतरावांची कलेच्या क्षेत्रातील चिकित्सा किती चौफेर होती हे दिसून येते.

यशवंतरावांनी साहित्यकृतीला प्रतिसाद म्हणून अनेक पुस्तकांना प्रस्तावना लिहिल्या. त्या प्रस्तावनांना समीक्षेचे रूप प्राप्त झालेले आहे. त्या त्या कलाकृतीचे लावण्य, सौंदर्य व आशय मोजक्या शब्दांत यशवंतराव वर्णन करतात. त्यामुळे त्या कलाकृतीची अधिक चांगली समज येते. यशवंतराव लोकसाहित्याची परंपरा ही हजारो वर्षांपूर्वीची असल्याचे सांगतात. बदलत्या काळाप्रमाणे त्या काळातील जीवनाचे संदर्भ घेत ही परंपरा पोहोचली आहे. कित्येक शतकापासून लोकजीवनात अखंडपणे प्रवाहित

राहिलेला लोकसाहित्याचा हा प्रवाह आहे. त्यामुळे लोकसाहित्य हे लोकांचे पर्यायाने त्या देशाचे धन आहे. अमूल्य असा खजिना आहे. असा उल्लेख ते करतात, ''लोकसाहित्याचा संगीताशी संबंध आहे. कथांशी संबंध आहे. किंबहुना लोकजीवनाची जी विविध तऱ्हेची स्वरूपे आहेत व ज्यांचे वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये स्वरूप व्यक्त होत असेल ती सगळी लोकजीवनाची व्यक्त दर्शने म्हणजे लोकसाहित्य असे आपणाला मानावे लागेल.'' लोकजीवनातून लोकसाहित्य निर्माण होते आणि लोकसाहित्यातून लोकजीवनाचे प्रतिबिंब पडलेले असते. ''ज्या लोकजीवनाने त्यातील काहीतरी सौंदर्यस्थळामुळे, त्यातील काहीतरी शहाणपणामुळे जे स्वीकारले आणि जे सर्वांनी मान्य केले असा त्यातील जो गाभा, तेच शेवटी लोकसाहित्य होऊन बसते.'' अशा स्वरूपाची लोकसाहित्याची व्याख्या ते करतात. लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे संस्कृतीच्या अभिसरणाचा अभ्यास, लोकमानसाच्या अभिव्यक्तीचा अभ्यास होय. म्हणून लोकसाहित्याचे संशोधन झाले पाहिजे. तरच बाहेरच्या लोकांना आपला समाज काय आहे हे कळेल. पण आजही लोकसाहित्याचा अनादर केला जातो याची खंत यशवंतराव व्यक्त करतात. शिवाय त्यातील अपुरेपणा दाखवतात. त्यासाठी सर्वांनी खास प्रयत्न करणे गरजेचे आहे असा सल्लाही देतात.

एकूण साहित्य विचारात काव्याला मध्यवर्ती स्थान देण्यात येते. याचे कारण बहुतेक देशात साहित्य परंपरेची सुरुवात महाकाव्यांनी झाली असावी. 'गीता' तून उत्क्रांत होऊ लागलेले हे 'वाङ्मयीन रूप' म्हणजेच कविता अशी व्याख्या स्थूलमानाने रमेश तेंडुलकरांनी केली आहे. पण साहित्यप्रकाराच्या दृष्टीने कवितेचा विचार करताना संमिश्र कला असलेल्या गीतापेक्षा स्वतंत्र रूप धारण करणारी श्रावकविता हीच अखेर कवितेची मूळ प्रकृती ठरते. अशा या वाङ्मयप्रकाराबाबत यशवंतराव म्हणतात, ''कविता निव्वळ योजून घडत नाही म्हणतात, ती स्फुरावी लागते. अनुभूतीची उत्कटता भावनांच्या पंखावर बसून शब्दरूप होते. तेव्हा कवितेचा जन्म होतो. असंख्य स्त्री पुरुषांनी पिढ्यानपिढ्या अनुभवलेल्या उत्कट अनुभूती आणि त्यांच्या जीवनातील प्रीती, करुणा आणि पराक्रम या प्रबळ प्रवृत्तींना साद घालणाऱ्या प्रेरणांना आपल्या प्रतिभेने ललितरूप देणारा कवी भेटतो तेव्हा महाकाव्याचा जन्म होतो. यशवंतरावांनी कवी यशवंत (य. दि. पेंढारकर) यांच्या 'छत्रपती शिवराय' या महाकाव्याच्या प्रस्तावनेमध्ये वरील विचार व्यक्त केले. कवितेचा जन्म आणि महाकाव्याच्या निर्मितीची मीमांसा करून त्यांच्या काव्यासंबंधी संक्षिप्त विचार मांडले आहेत. नाटकांना जशी अलीकडे गर्दी होते त्याप्रमाणे कवी 'गिरीश' आणि यशवंतांची गीते ऐकण्यासाठी त्यावेळी गर्दी होत असे. काव्यातील गेयता ही रविकिरण मंडळानेच लोकांसमोर स्पष्ट मांडल्याचे यशवंतराव सांगतात -



'श्री छत्रपती शिवराय' या महाकाव्याचे प्रकाशन करताना यशवंतराव म्हणतात, ''शिवाजी महाराजांच्या रूपाने अतिभव्य असे एक चरित्र इतिहासाने आम्हाला दिले आहे. त्या चरित्राची मांडणी करण्याचे काम इतिहासकार आपल्या शब्दांनी करीत आहेत आणि कादंबरीकारही आपल्या शब्दांनी करतील. पण प्रतिभावान कवींच्या शब्दांमध्ये ते चरित्र रंगल्याशिवाय त्यातला खरा जिव्हाळा आपल्याला समजणार नाही आणि म्हणून हे एवढे सुंदर चरित्र एका महाकवीची वाट पाहात उभे आहे असे मी नेहमी म्हणत असे.'' महाकाव्याच्या रूपाने साकारलेले हे शिल्प कसे श्रेष्ठ आहे हे सांगताना यशवंतरावांनी त्यातले उत्तुंग यश, शौर्य, ध्येय, प्रेम आणि कारुण्यही उत्तुंग असल्याचे दाखवून दिले आहे. अशा या महाकाव्याचे भावसौंदर्यात्मक वर्णन ते असे करतात, ''श्री शिवाजी महाराजांचे जीवन हे आमच्या मराठी जीवनातले जे एक भव्य दिव्य असे विशाल शिल्प आहे ते महाकाव्याच्या रूपाने आमच्यासमोर उभे आहे.'' यशवंतराव चव्हाण हे मराठीचे नामवंत अभ्यासक आणि समीक्षक आहेत, हे त्यांच्या या महाकाव्यावरील समीक्षा-विचारामुळे लक्षात येते. त्यांनी सर्व प्रकारच्या वाङ्मयावर आपले मत प्रदर्शित केले आहे. त्यामुळे साहजिकच मराठी समीक्षेत एक मोलाची भर घातली आहे.

यशवंतराव चव्हाणांनी विविध वाङ्मयप्रकारावर विपुल लेखन केले आहे. याचे कारणही साहित्यकृतीच्या चिकित्सेला महत्व देण्याच्या त्यांच्या भूमिकेत आहे. एखादी साहित्यकृती ही साहित्यकृती म्हणून आणि कथा, कादंबरी किंवा कविता म्हणून कशी आहे याचा शोध ते घेत असत. यशवंतरावांचा पिंड हा त्या पुस्तकाच्या आस्वादाच्या प्रत्यक्ष अनुभवात रमणारा होता. साहित्य कृतींचे समरसून आकलन करणे, त्यांच्या अंत:स्वरूपाचा शोध घेणे या गोष्टींना त्यांच्या वाचनात व विचारात फार महत्व आहे. या वाटेने जाताना ते आवश्यक तेथे मराठी वाङ्मयासंबंधी व विविध कलाकृतींसंबंधी तात्त्विक विधाने करताना आढळतात. 'युगकर्ता' या कविता भावे यांच्या लोकमान्य टिळक चरित्रासंबंधी ते लिहितात, ''एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी व विसाव्या शतकाच्या प्रारंभी ज्या धैर्याने आणि सम्यकवृत्तीने बंदिवास स्वीकारण्याचे धैर्य टिळकांनी दाखवले ते विशेष आहे. मी जेव्हा लोकमान्य टिळकांच्या जीवनाचा विचार करतो तेव्हा त्यांच्या निर्धाराचे मला अधिक महत्त्व वाटते. असे निर्धारी पुरुष इतिहासात क्वचितच तयार होतात.'' यशवंतरावांनी अचूक शब्दात लो. टिळकांचे येथे वर्णन केले आहे. जगजीवनराम व्यक्ती आणि विचार : लेखक डॉ. प्रभाकर मायने यांच्या पुस्तकाच्या प्रस्तावनेमध्ये ते त्यांचा असा उल्लेख करतात, ''बाबू जगजीवनराम हे राष्ट्रीय चळवळीच्या प्रवाहात सामील झाले आणि देशाच्या मुक्तीत दलितांची मुक्ती

आहे. या भावनेने त्यांनी कार्य केले. दोन्ही दृष्टीने त्यांच्या चरित्रग्रंथास महत्त्व आहे.'' भा. द. खेर लिखित 'अमृतपुत्र' या लालबहादूर शास्त्रींच्या चरित्रात्मक कादंबरीमध्ये असा उल्लेख करतात, ''शास्त्रींचं या 'वामन' अवतारातील कार्य असेच चिरंजीव ठरले आहे. अठरा महिन्यांच्या कारकिर्दीची अठरा अध्यायांची गीता देशातील पन्नास-पंचावन्न कोटी मुखांनी एक सुरानं गावी अशीच आहे.'' याशिवाय पं. नेहरु, रविंद्रनाथ टागोर, पं. गोविंदवल्लभ पंत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, म. जोतिबा फुले, संत गाडगेमहाराज, महर्षी अण्णासाहेब कर्वे यांच्यावर विविध मान्यवर लेखकांनी चरित्रपर जे लेखन केले आहे त्यास यशवंतरावांनी अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहिल्याच, शिवाय टीका-टिप्पणीही केली आहे. यशवंतरावांनी विविध ग्रंथांना, गौरवांकांना प्रस्तावना लिहिल्या. आपला अभिप्राय कळवला. त्यापैकी १७६ प्रस्तावना आज उपलब्ध आहेत. यातील काही प्रस्तावना या समीक्षेच्या रूपात तर काही प्रस्तावना व पुरस्काराच्या शुभेच्छा, संदेशाच्या स्वरूपात आहेत. त्यामुळे सर्वच ग्रंथांचा आढावा येथे घेणे शक्य नाही. परंतु ज्या थोड्याफार समीक्षात्मक लेखांचा उल्लेख केला आहे त्यावरुन यशवंतरावांचे समीक्षा लेखन स्पष्ट झाल्याशिवाय राहात नाही.

भालचंद्र नेमाडे, ना.धों. महानोर, अरूण साधू यांसारख्या वेगवेगळ्या प्रवृत्तींच्या साहित्यिकांबद्दल त्यांनी आपली स्पष्ट मते नोंदविली आहेत. भा. द. खेरांची 'हिरोशिमा' ही कादंबरी सर्व भाषेत गेली तर ज्यांच्या हातात निर्णयशक्ती आहे त्यांच्यावर जनमानसाचे दडपण येण्याची आशा आहे असा आशावाद ते व्यक्त करतात.

लेखकाची निर्मिती आणि वाचकाचा आस्वाद हे दोन्ही प्रकार विशिष्ट असतात. एका विशिष्ट साहित्य प्रकारातून आपल्या अनुभवांची अभिव्यक्ती करणारे लेखक आणि विशिष्ट साहित्य प्रकाराच्या आस्वादातून जीवनाचा कलात्मक प्रत्यय घेऊ पाहणारे रसिक जीवनाकडे पाहण्याचा आपला वृत्तीधर्मच प्रकट करीत असतात. दलित साहित्य प्रकारातून आविष्कृत होणारी साहित्यकृती जेव्हा दलित लेखकाच्या साहित्य प्रकारातून अवतरते तेव्हा तिच्या मुळाशी असलेल्या अनुभवाची वेगवेगळी अंगे प्रकाशात येतात व त्यांची बांधणीही वेगळ्या प्रकाराने होते. सुमारे १९६०-६५ च्या दरम्यान दलित साहित्याच्या निर्मितीस प्रारंभ झाला.' शिक्षण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य यामुळे आत्मभान जागृत झालेल्या दलित तरुणांच्या प्रक्षुब्ध मनाचा आविष्कार म्हणजे दलित साहित्य होय.'' दलित साहित्याच्या आविष्कारात जात अपेक्षित नसते. तर अन्यायाविरुद्ध झुंज देणारी प्रवृत्ती महत्त्वाची असते. हे साहित्य अज्ञान, दारिद्र्य, पिळवणूक यांना नकार देते. सारांश आत्मोद्धार हेच दलित साहित्याचे



प्रयोजन आहे. या परिवर्तनवादी व विद्रोही दलित साहित्याची समीक्षा करताना यशवंतराव लिहितात, ''दलित समाजातून आलेल्या नव्या मराठी साहित्यिकांनी जे साहित्य निर्माण केले ती मराठीतील एक मोलाची भर आहे असे मी मानतो. उच्चभ्रू साहित्यांचे किंवा त्यांच्या संकल्पनाचे मानदंड लावून त्याला जोखणे चुकीचे आहे. उच्चभ्रू साहित्यात पाश्चात्य वळणाची अश्लीलता आपणास चालते. दलित समाजातून येणाऱ्या साहित्यिकांच्या भाषेस मात्र आपण नाके मुरडतो. हा नैतिक भेदभाव आहे. दुहेरी मानदंडाची भावना त्यामागे आहे, असे मला वाटते. म्हणून ज्या सामाजिक थरातून लेखक आलेला असेल, त्याची भाषा त्याच्या साहित्यात आली तर ती स्वागतार्ह मानली पाहिजे.'' असे यशवंतराव लिहितात. दलित साहित्याने मराठी साहित्याच्या कक्षा विस्तारल्या. आतापर्यंत मराठी साहित्यातून चित्रित न झालेले एक मोठे समाजजीवन या दलित साहित्याच्या रूपाने साकार झाले आहे. कविता, कथा आणि आत्मकथा या तीन वाङ्मयप्रकारामध्ये दलित लेखकांनी अपूर्व अशी निर्मिती करून मराठी साहित्याचीही दालने अत्यंत समृद्ध केली. दलित साहित्याकडे पाहण्याचा समीक्षकांचा पारंपारिक दृष्टिकोन दलित साहित्याने बदलून टाकला आहे. म्हणून उच्चभ्रू साहित्याचे निकष लावून या साहित्याकडे पाहणे योग्य नाही असे यशवंतराव सुचवतात.

दलित साहित्य हे आंबेडकरवादी साहित्य आहे. या साहित्यातून जरी लेखकाची व्यक्तिमनाची निर्मिती होत असली तरी तिच्यातून सामाजिक जाणीवही प्रभावीपणे प्रकट केली जावू शकते. मानवतावादी समाजव्यवस्थेची निर्मिती करणे ही या साहित्याची भूमिका आहे. माणसाला त्यांच्या दास्यातून मुक्त करून त्याला परिपूर्ण असा स्वतंत्र माणूस म्हणून उभा करणारे हे साहित्य आहे. या संदर्भात यशवंतराव म्हणतात, ''उपेक्षित सामाजिक स्तरांच्या भावनांची जी कोंडी इतकी वर्षे झाली होती ती आज फुटली आहे. त्याचा सामाजिक सुधारणेसाठी व सामाजिक प्रक्रियेसाठी उपयोग होईल. जी समाजसंस्था जुनी झाली आहे, तिच्याविषयी संबंधित सामाजिक गटांना काय वाटत होते. तिचा जाच या गटांना कसा होत होता, त्यांचा सामाजिक अनुभव काय होता याचे जे दर्शन या साहित्यातून घडते ते सामाजिक दृष्ट्या महत्त्वाचे आहे.'' असा विचार या साहित्याच्या अनुरोधाने यशवंतराव मांडतात. कित्येक वर्षापासून अन्याय, अत्याचार, सहन केलेल्या एका समूहाला आता शब्द मिळाले आहेत. असह्य कोंडमारा आणि असीम वेदना वर्षानुवर्षे सहन करणाऱ्या दलित वर्गाला स्वत:चा असा एक स्वर सापडला आहे. आपल्या स्वत:च्या मालकीचे साहित्य आपण निर्माण केले पाहिजे ही इच्छा त्याला झाली आहे. हीच नव्या अनुभूतीची खूण आहे. हे साहित्य समृद्ध, समर्थ आणि चिरकाल टिकणारे श्रेष्ठ साहित्य निर्माण होऊ पाहात आहे. त्यामुळे कोणास

काय वाटते त्यापेक्षा त्या समूहाचे दु:ख काय हे महत्त्वाचे आहे. अशा या साहित्यातून अस्वस्थतेचा, वेदनेचाच प्रामाणिक आविष्कार स्पष्टपणे दिसतो. म्हणून एखादा समूह आपल्या दडपलेल्या भावनांची अभिव्यक्ती दलित साहित्याद्वारे करीत असेल तर ही घटना सामाजिक दृष्टीने सुद्धा स्वागतार्हच आहे असे यशवंतरावांना वाटते.

यशवंतरावांचे समीक्षा लेखन हे अभ्यासपूर्ण समीक्षालेखन आहे. मराठी वाङ्मयाचा विचार ते अतिशय गांभीर्याने करीत होते. म्हणूनच वाङ्मयासंबंधी अनेक प्रश्न त्यांच्या मनात निर्माण झाले. त्यांची उत्तरे शोधण्याचा त्यांनी सदैव प्रयत्न केला. किंबहुना या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठीच त्यांनी समीक्षालेखन केले असावे. यशवंतरावांनी सभा संमेलन, पुरस्कार, प्रस्तावना तसेच भेट प्रत, पुस्तकाबद्दलचा अभिप्राय इ.बद्दल जे विचार व्यक्त केले आहेत ते वाचन आणि चिंतनातून. यातूनच त्यांचे समीक्षालेखन आकार घेत असे. त्यांचे वाचन विस्तृत होते. इंग्रजीतील व तिच्या द्वारे युरोपातील व अन्य देशांतील अभिजात वाङ्मय त्यांनी वाचलेले होते. मुळातच ते वकील असल्याने त्यांचे इंग्रजी ज्ञान चांगले होते. तसेच नव्या आणि जुन्या मराठी वाङ्मयाचे व्यापक व खोल वाचन त्यांनी केलेले होते. 'श्री नामदेव दर्शन' तसेच 'संतेश्रेष्ठ श्री. तुकाराम महाराज' यांचे चरित्र यासारखे प्राचीन वाङ्मय त्यांनी वाचले. या अंध:कारमय व नैराश्यपूर्ण परिस्थितीत आपल्या 'समता' धर्माच्या शिकवणीने जनतेला 'जीवनामृत' देणारी संतमालिका महाराष्ट्रात निर्माण झाली व भागवत धर्माची स्थापना या संतांनी केली असे ते नमूद करतात. आपण मराठी वाङ्मयाचे नव्हे तर 'वाङ्मयाचे वाचक आहोत' असे सांगण्यामागे सर्वच भाषांतील वाङ्मय आपला अभ्यासविषय असायला हवा, अशी त्यांची भूमिका होती. वाचक या नात्याने वाङ्मयाचे वाचन करण्याची कृती असल्यामुळे वाचलेल्या पुस्तकावरच्या आपल्या प्रतिक्रिया ते टिपून ठेवीत. किंवा अधोरेखित करत असत. तसेच काही नोंदी करत. त्यामध्ये रसग्रहण असे. मूल्यमापन असे आणि वाचनात उपस्थित झालेले प्रश्न असत. त्या प्रश्नांचा शोध घेत त्यातूनच त्यांचा समीक्षालेख निर्माण होत असे. त्यांचे समीक्षालेखन म्हणजे वाचक लेखक यांच्यातील जणू संवादच आहे.

यशवंतरावांच्या समीक्षालेखनाची वैशिष्ट्ये म्हणजे त्यांची वाचनीयता. वाचक त्यांचे लेखन वाचू लागला की त्या लेखनाची त्याच्यावर जबरदस्त पकड बसते. तो ते लेखन समरसून वाचत जातो. यशवंतराव आपल्या समीक्षालेखनातून वाङ्मयाच्या रूपाचा शोध घेण्यात घडलेली प्रक्रियाच वाचकासमोर ठेवण्याचा प्रयत्न करतात. साहित्याच्या रूपाचा त्यांना पडलेल्या प्रश्नांचा शोध घेतला. त्यांनी अनुभवलेले अस्वस्थतेचे, आनंदाचे, निराशेचे असे सर्व भाव त्यांच्या लेखनात स्पष्टपणे उमटतात. आपण त्यांचे



साहित्य विचार वाचीत नसून हे 'विचार' वाचता वाचता विचार करणाऱ्या व्यक्तीच्याही सहवासात आहोत अशी जाणीव वाचकाला होत असते. त्यांच्या लेखनाला जशी भावनिक पातळी लाभते तसेच ते लेखन वक्तृत्वपूर्णही बनते. कारण गंभीरपणे बोलणारे आणि श्रोत्यांना खिळवून ठेवणारे ते एक उत्तम वक्ते होते. त्यामुळे त्यांच्या समीक्षालेखनातही त्याच तोडीचे वक्तृत्व दिसते.

आपल्या आस्वादप्रक्रियेला लेखक-वाचक संवाद शब्दबद्ध करणे, आस्वादातील भावनिक अंग टिकवणे आणि वक्तृत्वाच्या साहाय्याने विचार मांडणे या त्यांच्या लेखनपद्धतीमुळे यशवंतरावांची समीक्षा जशी आस्वादक बनली तशीच ती बौद्धिक व विचारप्रवाही बनली आहे. म्हणूनच आस्वाद आणि वैचारिक मीमांसा यात सुसंवाद राखीत लेखन करणे हे त्यांच्या समीक्षा लेखनाचे वैशिष्ट्य आहे.

यशवंतरावांच्या समीक्षालेखनाच्या काही मर्यादाही जाणवतात. मराठी साहित्याच्या अनुरोधाने वेळोवेळी त्यांना जे प्रश्न सुचले त्यांच्या उत्तराच्या शोधासाठी त्यांचे लेखन झाल्यामुळे ते स्फुट, फुटकळ स्वरूपाचे आहे. म्हणूनच ते लेखवजा, टिपणवजा झाले आहे. ते प्रबंधात्मक होऊ शकले नाही. त्यांनी वेळोवेळी जे लेखन केले, त्यांना जे प्रश्न सुचले त्याचा जर अधिक व्यापक विचार केला असता तर ते लेखन त्यांना करणे सहज शक्य होते, पण त्यांनी केले नाही. तरीसुद्धा त्यांचे समीक्षालेखन मराठी ललित वाङ्मयसंबंधी झाले आहे. साहित्यकृती, साहित्यप्रकार, लेखक इ. विषयांसंबंधी झाले आहे. तात्त्विक समीक्षा लेखन फारसे केलेले आढळत नाही.

यशवंतरावांना चित्र, शिल्प, वास्तू इ. ललित कलांचा छंद होता. भारतात व परदेशात प्रवास करताना त्यांनी या कलाकृतीचा बराच अभ्यास केला होता. प्रवासात जेथे जेथे अशा कलाकृती आढळतात तेथे तेथे त्यांनी त्यांचे सापेक्षाने निरीक्षण केले. परदेशात त्यांनी कलावस्तू व संग्रहालये पाहण्यावर भर दिला. या सर्व अनुभवांचा एक संस्कार त्यांच्या कलादृष्टीवर झाला होता. साहित्य कृतींचा विचार करताना ते अन्य कलांमधील कलाकृतींचे संदर्भ देत. आंतरशाखीय विद्याभ्यास, साहित्यकृती आणि अन्य प्रकारच्या कलाकृती यांच्या रूपाचा एक समग्र विचार त्यांनी मांडला.

साहित्य कृतीच्या अंत:स्वरूपाचा वेध घेताना यशवंतरावांना इतर कला व्यवहारापेक्षा जीवन व्यवहाराचे वेगळेपण जाणवत राहिले. स्थूलमानाने त्यांची भूमिका ही जीवनवादी होती. साहित्यात समाजाचे प्रतिबिंब दिसते. साहित्यातून जीवनदर्शन घडते अशी विधाने त्यांच्या समीक्षेत वारंवार येतात. ललित वाङ्मयातून जीवनदर्शन होते असे ते सांगतात. असे जरी त्यांनी स्पष्ट केले असले तरी त्यांचे लेखन स्फुट स्वरूपाचे असल्यामुळे ते त्यांच्या वाङ्मय विषयक भूमिकेतील अनेक दुवे निसटले

आहेत हे मान्य करूनही त्यांनी मराठी समीक्षेत मोलाची भर घातली आहे. १९५५-६० नंतरच्या मराठी वाङ्मयाच्या कालखंडात एक मोठा प्रभाव पाडणारे यशवंतराव चव्हाण हे एक राजकीय व्यक्तिमत्व होते. मराठी समीक्षेला एक नवे वळण देण्याचा प्रयत्न करणारा समीक्षक, नवनव्या वाङ्मयीन प्रवाहाचे स्वच्छ मनाने स्वागत करणारा आणि नवलेखकांना प्रेरणा व प्रोत्साहन देणारा एक उत्तम रसिक अशा विविध रूपांतून त्यांचा प्रभाव त्या काळात व नंतरही पडलेला आहे.

रसिक मराठी भाषिक, साहित्यप्रेमी मर्मज्ञ व समतोल भाष्यकार हा वाङ्मयीन प्रगतीचा घटक आहे असे मानणाऱ्या यशवंतरावांनी सतत वाङ्मयाच्या विकासाचाच विचार केला आहे. साहित्य आणि समाज याचा त्यांनी विचार मांडला. साहित्य हेच मुळी जीवन आहे. साहित्याची अंतिम प्रेरणा मानवी मूल्यांची जाणीव करून देणारी असावी. मानवी मूल्यांचा प्रत्यय हीच वाङ्मयाची कसोटी असे ते मानतात. साहित्य आणि समाज, साहित्य आणि भाषा, साहित्य आणि अनुभव, साहित्य आणि इतर मानवी व्यवहार यांचे तारतम्याने आकलन करून त्यांनी विचार मांडले आहेत.

जनसामान्यांच्या वाङ्मयीन अभिरुचीला अनिष्ट वळण लागू नये म्हणून टीकेचा अंकुश यशवंतरावांना महत्त्वाचा वाटतो. म्हणून समीक्षेत दोष दिग्दर्शन निर्भीडपणे यावे. तद्वतच गुणदर्शनही घडवावे. त्याचबरोबर कोणत्याही कलाकृतीचे आत्मिक सौंदर्य समीक्षकाने शोधले पाहिजे. यशवंतरावांच्या साहित्यविचारात साहित्यकृतीतील आशयाच्या संपन्नतेला महत्त्व आहे. जीवनातील सत्याचा शोध, चिरंतन जीवनमूल्याधिष्ठित विचार, कलाकृतीतील आशयाची संपन्नता वाढवित असतो. साहित्याची संस्कारक्षमता लक्षात घेऊन त्यांनी आपला साहित्यविचार मांडल्यामुळे ते वाचकाच्या अभिरूची संवर्धनाच्या बाबतीत अधिक दक्ष दिसतात.

यशवंतराव चव्हाण यांनी विविध ग्रंथांना प्रस्तावना लिहिल्या. त्यांच्या जवळपास १७६ प्रस्तावना आजअखेर उपलब्ध झाल्या आहेत. त्यांनी बहुतांशी सर्वच लेखनप्रकाराला कमी अधिक प्रमाणात प्रस्तावना लिहिल्या आहेत. कादंबरी, कथा, संपादने, चरित्रे, काव्यसंग्रह, आत्मचरित्र, स्मरणिका, विशेषांक आदींना कधी आस्थेने प्रस्तावना लिहिल्या आहेत तर कधी 'दोन शब्द', 'चार शब्द' अशा स्वरूपाचे लेखन केले आहे. या लेखनाचे आशयाच्या, अर्थघनतेच्या दृष्टीने अर्थातच वेगळे महत्त्व आहे. प्रस्तावना किंवा पार्श्वभूमी म्हणून जे लेखन त्यांनी केले आहे ते संशोधन, दिग्दर्शन अशा स्वरूपाचे आहे. या प्रस्तावनेमधून यशवंतरावांची साहित्यिक आणि अभिजात रसिकता प्रकट होते. तसेच त्यांचे भावस्पर्शी संवेदनशील मन आणि मार्मिक समीक्षा व आस्वादक वृत्ती पाहावयास मिळते.



यशवंतराव हे लोकनेते होते. नेता हा नीतीमान असावा लागतो. तसा असलाच पाहिजे हा आदर्श प्रत्यक्षात आचरणाने, महाराष्ट्रासमोर, देशासमोर, जगासमोर त्यांनी ठेवला. आधी ते एक गंभीर वृत्तीचे राजकारणी होते. नंतर नामवंत वक्ते, लेखक, पुढारी या नात्याने यशवंतरावांकडे अनेक होतकरू लेखक, संपादक, प्रस्तावनेसाठी येऊ लागले. आणि त्यांच्या विनंतीनुसार यशवंतरावांनी प्रस्तावना लिहिल्या असे दिसते. यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व त्या काळी एवढे प्रभावी होते की त्यामुळे त्यांच्याकडे प्रस्तावनेसाठी वळणारे लेखक त्यांच्या आशीर्वादपर चार शब्दांसाठी सुद्धा उत्सुक असावेत. त्यांच्या प्रस्तावनांमुळे लेखकांना स्वत:च्या लेखनाचा गौरव झाल्यासारखे वाटत असे. यशवंतरावांसारख्या अष्टपैलू व्यक्तीची शाबासकीची थाप आपल्या लेखनाच्या पाठीशी असावी या इच्छेनेच काही नवोदित लेखक यशवंतरावांसारख्या आपल्या आवडीच्या व्यक्तीकडे धाव घेतात. साहित्य प्रांतातील या रिवाजांची परिणती म्हणूनच यशवंतरावांच्या प्रस्तावना लेखनास प्रारंभ झाला असावा.

यशवंतरावांच्या काळात वा.म. जोशी, न.चिं. केळकर, वि.स. खांडेकर यांसारखे प्रसिद्ध प्रस्तावनाकार लेखक म्हणून प्रसिद्ध होते. त्याच काळात यशवंतरावांनी काही पुस्तकांना प्रस्तावना लिहिल्या. या प्रस्तावनांमध्ये वाड्मयप्रकार, त्यांची वृत्ती-प्रवृत्ती आणि विकास, या विकासप्रक्रियेत स्वत: लेखक, संपादक यांचे त्या वाड्मयप्रकारात स्थान, त्यांची मराठी वाड्मयाला उपयुक्तता याचा विचार प्रामुख्याने त्यांनी केलेला दिसतो. तद्नंतर संबंधित वाड्मयप्रकार, त्यामधील विषय, त्या विषयाचे महत्त्व याचेही विवेचन केले आहे. त्यामुळे या सर्व प्रस्तावनांमध्ये यशवंतरावांसारख्या विचारशील माणसाचे चिंतन दिसते. त्यांच्या प्रस्तावनेतून कलात्मक रंजन आणि भाष्यात्मक प्रबोधन यांचा सुंदर समन्वय साधला गेला आहे. त्यामुळे यशवंतरावांच्या प्रस्तावना वैचारिक निबंधच वाटावे असे त्यांचे स्वरूप वाटते. आस्वादक समीक्षेचा एक नमुना म्हणून या प्रस्तावनांचा निर्देश करावा लागेल.

प्रस्तावना लिहिताना यशवंतराव अंत:करणपूर्वक लिहितात. त्यामध्ये मूलभूत विचार प्रकटन करतात. ज्या वाड्मयप्रकाराबाबत प्रस्तावना ते लिहितात त्यामध्ये सदर वाड्मय प्रकाराचे महत्त्व, त्या वाड्मय निर्मितीच्या प्रक्रियेतील उणिवा, त्याचे इतर वाड्मयप्रकाराशी साम्यभेद कसे जाणवले, लेखनास कसे प्रवृत्त केले गेले किंवा त्या कलाकृतीसंबंधी मनात कोणते विचार, कोणत्या भावना जागृत झाल्या याचे काही वेळा स्थूल तर प्रसंगी सूक्ष्म तपशील देऊन ते विवेचन करतात. त्यानंतर एकूण वाड्मयाच्या क्षेत्रात संबंधित कलाकृतीच्या लेखकाचे अथवा संपादकाचे स्थान निर्धारण

करून मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रात त्यांचे महत्त्व स्पष्ट करतात. याचबरोबर संबंधित वाङ्मयप्रकार, त्यामधील विषय, त्या विषयाचे काळपरिस्थिती संदर्भात महत्त्व इत्यादी मुद्द्यांचे विवेचनही यशवंतराव करतात. या सर्वांच्या अनुषंगाने यशवंतरावांच्या प्रस्तावनेमध्ये त्यांचे फक्त चिंतन 'मुक्तपणाने' येऊन जाते. यशवंतरावांचे हे मुक्त चिंतन विचारशील माणसांचेच चिंतन असते.

यशवंतरावांना अनेकदा उपचार म्हणून, प्राप्त कर्तव्य म्हणून 'प्रस्तावना', 'दोन शब्द', 'आशीर्वाद', लिहावे लागले आहेत. अशा औपचारिक लेखनामधूनही त्यांचे साहित्यप्रेम, गुणग्राहक वृत्ती प्रकटली आहे. 'संतश्रेष्ठ श्री. तुकाराम महाराज यांचे चरित्र' (पांडुरंग बाळाजी कवडे; १९५४), 'माझ्या आठवणी व अनुभव,' (महर्षी विठ्ठल रामजी शिंदे; १९५८), 'लोकसाहित्य साजशिणगार' (संपादिका डॉ. सरोजिनी बाबर १९६४) 'कर्मवीर भाऊराव पाटील व्यक्तिदर्शन' (वसंत लोखंडे, १९६४), 'लता (गौरवग्रंथ) (संपादिका - सरोजिनी वैद्य, शांता शेळके, वृंदा लिमये : १९६७), 'गगनात घुमविली जयगाथा' (गो.नी. दांडेकर :१९६६), 'अमृतपुत्र' (भा.द. खेर, १९७०), 'पंडित नेहरु : एक मागोवा' (डॉ. न.गो. राजूरकर व प्रा. नरहर कुरुंदकर : १९७३), 'सारंग' (कुमार धनवडे : १९८४), छत्रपती शिवराय (महाकाव्य), (महाराष्ट्र कवी यशवंत : १९६८), 'स्वर' (कवी सुधांशु, ह.न.जोशी १९७०) या सारखी कितीतरी उदाहरणे यशवंतरावांच्या प्रोत्साहनपर प्रस्तावना म्हणून सांगता येतील. या साहित्यकारांची साहित्यकृती व त्यांचे जीवन यांच्यातील परस्परसंबंध सूचित करण्याकडे यशवंतरावांच्या प्रस्तावनांचा रोख असतो. तर कधी लेखनातील आशयाचे कौतुक, कधी नव्या प्रयोगाचे स्वागत, कधी भावी लेखनासाठी शुभेच्छा, कधी वाचकांना केलेली शिफारस असे स्वरूप या प्रस्तावनांना प्राप्त झालेले आहे. संतश्रेष्ठ श्री. तुकाराम महाराज यांचे चरित्र; (बाळाजी कवडे) १९५४ साली प्रकाशित झालेल्या २ ऱ्या आवृत्तीमध्ये तुकाराम महाराजांच्या कामगिरी संबंधी प्रस्तावनेत ते लिहितात, ''त्यांनी आपल्या भक्तीपूर्ण, रसाळ व सोप्या परंतु अर्थपूर्ण अभंगातून जनतेमध्ये जागृती निर्माण केली. मृतवत पडलेल्या महाराष्ट्राला अभंगरूपी संजीवनी देऊन त्यांच्यात नवचैतन्य निर्माण केले,'' असे यशवंतराव लिहितात.

यशवंतरावांनी लिहिलेल्या काही प्रस्तावना दीर्घकाळ लक्षात राहतात. त्यामधून गंभीर स्वरूपाचा साहित्य विषयक विचार प्रकटला आहे. अशा प्रस्तावनांमध्ये सरोजिनी बाबर संपादीत 'लोकसाहित्य : साज शिणगार' या पुस्तकाच्या प्रस्तावनेचा उल्लेख करता येईल. ''जीवन पराकोटीचे समर्पित असेल तर ते कधीच जीर्ण होत नाही. चंद्र कधी जुना होत नाही. सूर्याला म्हातारपण येत नाही. दर्या कधी संकोचत नाही. यातील



प्रत्येकाच्या जीवनात पराकोटीचे समर्पण आहे. पण अनंत युगे लोटली तरी किनारा त्यांच्याजवळ पोहोचलेला नाही. काळाने त्यांना घेरलेले नाही. त्यांचा कधी कायापालट नाही. स्थित्यंतर नाही. ते विश्वसन अखंड आहे.... कन्याकुमारीच्या प्रशांत परिसरात, कृष्णामाईच्या सानिध्यात, गंगा यमुनेच्या सहवासात, हिमालयाच्या कुशीत, माझी अशी भावसमाधी लागते. अधूनमधून लोकसाहित्याच्या भावगंगेत डुंबताना देखील मी हाच अनुभव घेतो.'' अशा रीतीने या ग्रंथाच्या प्रस्तावनेत यशवंतराव जीवनानुभव व्यक्त करतात. याशिवाय यशवंतरावांची लोकसाहित्यविषयक चिंतनशीलता ही प्रकट होते. लोकसाहित्याचा विविध कलांशी संबंध आहे. 'लोकजीवनाची व्यक्त दर्शने म्हणजेच लोकसाहित्य' अशी साधी व्याख्या ते करतात. लोकसाहित्य आपण चाखले पाहिजे. तसा हेतुपूर्वक प्रयत्न केला पाहिजे. या साहित्याचा अनादर होता कामा नये असा विचार या प्रस्तावनेत मांडतात.

'छत्रपती शिवराय' या महाकाव्याच्या प्रस्तावनेत कवी यशवंतांच्या कवितेचे काव्यविवेचन अगदी मोजक्या पण मार्मिक शब्दात त्यांनी केले आहे. मराठी साहित्यात महाकाव्याची फारशी निर्मिती नाही याबद्दल खंत व्यक्त करून कवी यशवंतांनी मराठी भाषेत असे विशाल, उदात्त शिल्प महाकाव्याच्या रूपाने उभे केले आहे. यातून त्यांनी मराठी साहित्याची अमर सेवा केली आहे असा त्यांचा गौरव करतात. त्या संदर्भात ते लिहितात, ''कवी यशवंत महाकाव्याच्या रूपाने समर्थांचे शब्द खरे करीत आहेत. शिवरायांचे जीवन एवढे भव्य आहे की, त्यांचे गीत भूषण समर्थांच्या समोर अनेक कवीने गायले. यात रविंद्रनाथांची ओजस्वी प्रतिभाही सामील झाली आहे. आज आम्हा सर्वांना आनंद होत आहे की आमच्या पिढीतील श्रेष्ठ कवी शिवरायांची महापूजा आपल्या महाकाव्याने बांधीत आहे.'' असा कवी यशवंतांचा गौरवपूर्ण उल्लेख ते करतात.

भा.द. खेर लिखित 'अमृतपुत्र' (१९७०) या लालबहादूर शास्त्रीजींच्या चरित्रात्मक कादंबरीच्या प्रस्तावनेत लिहितात, ''शास्त्रीजींचं यशस्वी जीवन आणि निर्धारी व्यक्तिमत्त्व 'केसरी'च्या संपादक मंडळातील माझे मित्र श्री. भा.द.खेर यांनी 'अमृतपुत्र' या त्यांच्या कादंबरीत वर्णिले आहे. परंतु हे केवळ चरित्रकथन नव्हे, शास्त्रींचं चरित्र हा केंद्रबिंदू ठेवून श्री. खेर यांनी सौष्ठवपूर्ण वाङ्मयशैलीनं भारताच्या इतिहासातील सुवर्णपानं उलगडली आहेत. श्री. खेर हे पत्रकार आहेत आणि सिद्ध साहित्यकार आहेत. त्यांच्यातील पत्रकारानं त्यांना लेखणीचा विवेक सोडू दिलेला नाही. आणि विकारवशतेला बळी पडू दिलेलं नाही असं अमृतपुत्र वाचताना लक्षात येतं.'' लालबहादूर शास्त्रीजींच्या पंतप्रधानपदाच्या काळात यशवंतराव चव्हाण संरक्षण मंत्री होते. त्यामुळे त्यांना त्यांच्याविषयी कुतूहल असणे स्वाभाविक आहे. शिवाय

मराठी वाङ्मयात चरित्रपर कादंबरी लिहिली गेली. त्या कुतुहलातूनच त्यांनी ही प्रस्तावना लिहिलेली दिसते. त्यांच्या 'हिरोशिमा' (१९८४) या कादंबरीच्या प्रस्तावनेत त्यांच्या बद्दल लिहितात, ''निव्वळ कादंबरीकरिता कादंबरी लेखन न करता काही मानवी आदर्श डोळ्यांपुढे ठेवून करुणेच्या प्रेरणेने उद्युक्त होऊन श्री. खेरांनी हिरोशिमा कादंबरी लिहिली आहे.'' कवीला व कवितेला पूर्ण न्याय देणारी प्रस्तावना कशी लिहावी याचा एक आदर्श वस्तुपाठच यशवंतरावांनी 'स्वर' या कवी सुधांशूच्या (ह. न. जोशी) काव्याच्या प्रस्तावनेद्वारे घालून दिला आहे. ''काव्यशक्ती शापही आहे आणि वरही. अतितरल कल्पनाशक्ती असल्याशिवाय सरस साहित्य निर्मिती होणे कठीणच. परंतु हा शाप जीवनातल्या अनंत वेदना शब्दरूप करणारा आहे. स्वत:च्याच नव्हे तर सहसंवेदनेने अनेकांच्या भावनांना शब्दरूप देऊन निर्भेळ आनंदाची निर्मिती करणारा असा हा शाप एखाद्या भाग्यवंतालाच पूर्वपुण्याईने लाभतो... कवी 'सुधांशु' कल्पनाशक्तीचे हे असेच वादळ घेऊन वाचकापुढे या 'स्वर' रूपात आले आहेत.... कवी सुधांशूंचा हा 'स्वर' कुठे रडवील, कुठे हसवील तर कुठे वाचकांना अभिमानाने, आनंदाने नवे स्फुरण देईल.'' त्या काळाला अनुसरून चिंतनात्मक, तात्त्विक व काव्यविषयक असा त्यांच्या कवितांचा आस्वाद त्यांनी सादर केला आहे. कवी सुधांशूच्या जीवनदृष्टीचे काव्यामधून येणारे प्रत्यंतर आणि त्यांच्या काव्याशयातील अर्थपूर्णता त्यांनी सोदाहरण उलगडून दाखवली आहे.' 'दत्त दिगंबर दैवत माझे' या भक्तीमधूर गीताने सर्वांनाच परिचित झालेले 'सुधांशु' रसिकांच्या भावमनाला अनेक स्वरमधूर गीतांनी रिझवीत आहेत. घराघरातून नित्य नव्या भावोन्मेषाने त्यांची गीते आबालवृद्धांच्या ओठातून उमटतात.'' असा आशावाद ते व्यक्त करतात. तसेच त्यांच्या कवितेचे मर्म कमालीच्या जाणतेपणाने सांगितले आहे. कृष्णाकाठ, मातृप्रेम, देशप्रेम, प्रीती, समाजजीवन, आकांक्षा, शल्ये याविषयी उत्कटतेने तर तितक्याच व्यथित, आर्त भावनेने चंद्रवीर, रविंद्र सरोवर, गंधर्व गीतांची चांदणी रजनी ही उजळून निघालेली आहेत. अशी त्यांच्या कवितांची वैशिष्ट्ये सांगतात. मोजक्या शब्दात त्यांनी कवितांचे रसग्रहणही केले आहे. कवितेच्या गुणवत्तेच्या बाबतीत सूक्ष्म अवलोकन, अखंड आत्मचिंतन आणि दीर्घ निदिध्यास या कवी सुधांशु या कवीच्या वैशिष्ट्यांचे महत्त्व यशवंतराव यांनी प्रस्तावनेत सांगितले आहे.

१९८४ मध्ये शाहीर शंकरराव निकम यांच्या 'सांगतो ऐका' 'ज्ञानेश्वरी' सारख्या तत्त्वज्ञानविषयक ग्रंथाला शिफारसवजा व शुभेच्छापर अशी प्रस्तावना यशवंतरावांनी लिहिली आहे. त्यात शाहीर निकम यांच्या शाहिरी गीतांचा आणि कवित्व शक्तीचे वेगवेगळे पैलू त्यांनी स्पष्ट केले आहेत. प्रस्तावनेमध्ये त्यांच्या ग्रंथलेखनाबद्दल व



त्यांच्याबद्दल यशवंतराव लिहितात, ''एक प्रतिभावान गीतकार आणि निष्ठावान देशभक्त क्रांतिकारक हा त्यांचा तेव्हापासूनचा लौकिक आहे. ते प्रतिभाशाली गीतलेखक आहेत.'' असे विशेष कौतुक त्यांना वाटते. त्यांच्या या ग्रंथरचनेत त्यांनी ''मराठी भाषेचा अभिमान आणि प्रतिभावान शीघ्र कवित्व हे पुन्हा एकत्र आल्याचे पाहून मला आनंद वाटला.'' असे शब्द कौतुकाने लिहिले आहेत. यशवंतरावांच्या ठायी गुणग्राहकता होती आणि कवीची कवित्वशक्ती व लेखकाची लेखनवृत्ती टिकावी, वाढावी अशी भावना होती. त्यांची 'दिग्दर्शन' ही प्रस्तावना त्यांच्या स्वभावाची निदर्शक म्हणता येईल.

यशवंतरावांच्या प्रस्तावनेतील सामर्थ्य आणि निराळेपणा हे गुण स्वयंसिद्ध आहेत. त्यांच्या या प्रस्तावनेने मराठी साहित्याला पत आणि प्रतिष्ठा निश्चित मिळाली आहे. कलाकृतीचे सौंदर्य विशद करून सांगणे, तसेच लेखक, कवींच्या कार्यकर्तृत्वाचा गौरवपूर्ण उल्लेख करणे असाही हेतू दिसतो. 'श्री नामदेव दर्शन' संपादक रेळेकर-इनामदार - मिरजकर या ग्रंथास लिहिलेल्या प्रस्तावनेमध्ये नामदेवांच्या कार्यकर्तृत्वाचा असा उल्लेख करतात, ''ज्ञानेश्वर ही ज्ञानाची मूर्ती होती, तर त्याचे समकालीन नामदेव ही मुमुक्षूंच्या आर्ततेची, भक्तांच्या व्याकुळतेची मूर्ती होती. मराठी संतांच्या कार्याचा हा पाचशे वर्षाचा कालखंड राजकीय दृष्ट्या चैतन्यहीन वाटला तरी संतांच्या कार्यामुळे भक्तिमार्गाच्या व सारस्वताच्या क्षेत्रात तो बहरलेला वाटतो. या काळाने कैवल्यवृक्षाचे अनेक बहर पाहिले. ज्ञानेश्वर-नामदेव ही याच कैवल्यवृक्षाची उमललेली फुले होती..... नामदेवाच्या वाङ्मयात भक्तीवेड्या मनाचे उसासे, उद्रेक आहेत.'' अशा स्वरूपाचे त्यांच्या कार्याचे मूल्यमापन 'नामदेव दर्शन' च्या प्रस्तावनेत करतात आणि त्यांच्या तत्कालीन कार्याचा गुणगौरव करतात. त्या गुणांचा परिणाम सांगतात. त्यामुळे समीक्षकास आवश्यक असणारा तटस्थपणा या प्रस्तावनेत अनुभवास येतो.

यशवंतरावांनी वेळोवेळी प्रस्तावनेत मांडलेले साहित्यविषयक विचार हे पूर्णपणे सुसंगत असेच आहेत. तसेच या विचारातून तर्कशुद्ध अशी साहित्यमीमांसा त्यांनी निर्माण केली आहे. काही वेळा त्यांनी लेखक, कवी व संपादक यांचे कौतुक केले आहे. अनेकदा त्यांनी आपल्या भूमिकेचे समर्थन केले आहे. त्यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेतून समीक्षेचे अनेक गुण दिसतात. त्यांच्या या प्रस्तावनेतून, समीक्षेतून अनेकदा अभिजात रसिकतेचे दर्शन घडते.

यशवंतरावांनी चरित्रात्मक व गौरवग्रंथांना विशेष लक्षणीय अशा प्रस्तावना लिहिल्या आहेत. त्यात त्यांची चरित्रात्मक वाङ्मयाबाबतची भूमिका जशी व्यक्त होते त्याचप्रमाणे त्या चरित्रात्मक लेखनातील चांगले वाईट निवडण्याची त्यांची क्षमताही

व्यक्त होते. 'ऋणानुबंध' या ललित पुस्तकाच्या प्रस्तावनेत साहित्यबाबतची भूमिका मांडताना, ''साहित्यक्षेत्रात माझी मूळ आणि आवडती भूमिका खऱ्या अर्थाने स्पर्धातीत व टिकून राहणारी भूमिका आहे. शब्दांच्या सामर्थ्यावर व सौंदर्यावर माझा नितांत विश्वास आहे. नवनिर्मितीचे सर्जनशील कार्य जसे शब्द करतात तसेच साम्राज्यशक्ती धुळीला मिळवण्याचे संहारक सामर्थ्यही शब्दांत आहे. कल्पना, विचार आणि शब्द यांचा त्रिवेणी संगम ही मानव इतिहासातील एक जबरदस्त शक्ती आहे. शब्द हे साहित्यिकांचे प्रमुख शस्त्र आहे.'' कोणाही साहित्यिकाला जीवनाचे नाट्य टिपण्यासाठी डोळे व कान तल्लख आणि तरबेज असण्याची गरज असते. यशवंतरावांच्या या दोन्ही इंद्रियांना कुशाग्रतेचे जे देणे लाभले आहे त्याला तोड नाही. त्यांनी केलेले साहित्यक्षेत्रातील त्यांच्या भूमिकेचे वर्णन या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

यशवंतरावांच्या या प्रेरक प्रस्तावनेतील ललित शिफारसी म्हणजे त्यांचे निर्भेळ साहित्यिक कलाकृतीचे केलेले मूल्यमापनच होय. त्यामुळे सदरच्या कलाकृतीला विश्वासार्हता आणि वजन लाभले. यशवंतरावांना कुस्ती, क्रीडा, नाट्य, संगीत इ. कलांची आवड होती. 'भारतीय मल्ल विद्या शास्त्र' सारख्या पुस्तकांची शिफारस करताना ते लिहितात, ''महाराष्ट्राने मल्लविद्येची नुसतीच जोपासना केली नसून या विद्येच्या विकासास फार मोठा हातभार लावला आहे. यात शंका नाही. तरी पण पूर्वापार चालत आलेल्या या विद्येकडे जास्तीतजास्त तरुणांची मते आकर्षित करण्याची गरज आज भासू लागली आहे. अशा वेळी या मल्लविद्येची शास्त्रोक्त माहिती देणारे ग्रंथ उपयोगीच सिद्ध होतील.'' असा विश्वास व्यक्त करतात. यशवंतरावांनी त्यांच्या राजवटीच्या काळात मल्लविद्येला प्रोत्साहन दिले होते. शिफारसी दिलेल्या लेखकात जुन्या, जाणत्या आणि नवोदित अशा लेखकांचा अंतर्भाव आहे. त्यात भाई माधवराव बागल, नरहर कुरुंदकर, डॉ. पंजाबराव जाधव, अ.का. प्रियोळकर, शांता शेळके, गो.नी. दांडेकर, मोहनराव लोखंडे, कृ.गो. सूर्यवंशी, बाबूराव जोशी, रामभाऊ जोशी, बाळासाहेब पाटील, मीना जोशी, ना.धों. महानोर, भीकूशेट ज्ञानदेव पाटील, भा. ह. पाटील, कुमार धनवडे, धो. म. मोहिते, सविता भावे, यांसारख्या कितीतरी लेखकांची नावे दिसतात.

यशवंतरावांनी या लेखकांना लिहिलेल्या प्रस्तावनेत त्यांची कल्पकता आणि चिकित्सक बुद्धी पाहावयास मिळते. त्यात त्यांची साहित्यविषयक रुची प्रत्ययास येते. त्यांची साहित्यिक अभिरुची अधिक विशाल आणि वास्तवदर्शी होती याचीही प्रचिती येते. या प्रस्तावनेत प्रत्यक्ष अनुभवांचा आलेख आहे. प्रत्यक्ष जगणे, जगत असताना त्यासंबंधी उमटलेल्या प्रतिक्रिया आणि यासंबंधी जीवनाच्या तटस्थ बिंदूवरून पाहत



असताना मनात निर्माण होणारी चिंतन वलये त्यांच्या प्रस्तावनेत अधिक आहेत. त्यांच्या या प्रस्तावनेतून बदलत्या साहित्यिक अभिरुचीचे अनेक नमुने पाहावयास मिळतात. नव्या मान्यवर लेखकांचा, संपादकांचा, ग्रंथांचा आस्वादक आणि विश्लेषक परिचय या प्रस्तावनेतून व्हावा. त्यातून वाचकांना साहित्यिक बहुश्रुतता लाभावी इतकाच त्यांचा हेतू दिसतो.

यशवंतरावांच्या प्रस्तावनापर लेखनात स्वागताचा आणि प्रोत्साहनाचा व तन्मयतेने घेतलेल्या रसास्वादाचा मोठा भाग असावा हे साहजिकच आहे. किंबहुना त्यांच्या प्रस्तावना लेखनाचा तो प्राथमिक हेतू असावा. असे म्हणणे गैर ठरणार नाही. 'राजर्षी शाहू गौरव ग्रंथ', संपादक आमदार पी.बी. साळुंखे यांच्या या ग्रंथांबद्दल लिहितात, ''गौरवग्रंथांच्या संपादनाने एक प्रातिनिधिक स्वरूपाचे जीवन परीक्षण मराठी वाचकांच्या हाती पडत आहे. ही अतिशय आनंदाची व अभिनंदनीय अशी घटना आहे.'' राजा मंगळवेढेकर लिखित 'भूमिपुत्र' श्री. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या चरित्र ग्रंथाला प्रस्तावनेत या ग्रंथाचे असे स्वागत करतात.... ''आज असंख्य नवीन कार्यकर्ते महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात धडपडणाऱ्या मुलाप्रमाणे काम करीत आहे. त्यांना मार्गदर्शक होईल असे हे चरित्र त्यांच्या हाती पडण्याची गरज होती. चरित्रलेखकाने हा ग्रंथ या दृष्टीने लोकांच्या हाती दिला आहे..... लेखकाने कष्टपूर्वक माहिती मिळवून ती शैलीदार पद्धतीने मांडली आहे. त्याबद्दल त्यांना धन्यवाद.'' किंवा ''श्री. वसंतराव पोतदार यांच्या 'हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम' पुस्तकास प्रस्तावना लिहिण्यास मला आनंद वाटतो. मी उत्सुकतेने व काळजीपूर्वक हे पुस्तक वाचून पाहिले. परिश्रमपूर्वक अशा तऱ्हेची इतिहासाला उपयुक्त ठरणारी साधने या ग्रंथाच्या रूपाने श्री. पोतदार यांनी मराठी भाषिकांच्या हाती दिल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाचा हा विलक्षण इतिहास मराठी वाचकांच्या हाती पडतो आहे. याचा मला आनंद वाटतो. वाचक व इतिहासाचे अभ्यासक यांचे स्वागतच करतील अशी मला आशा आहे.'' यशवंतराव कोणतीही प्रस्तावना लिहित असताना त्या विषयाचा मूलभूत विचार मांडतात. मीना जोशी यांच्या इंदिरा गांधीवरील कादंबरीला लिहिलेली प्रस्तावना अशीच लक्षणीय आहे. ''श्रीमती इंदिरा गांधी यांच्या बाबतीत 'संघर्ष' हा शब्दच औचित्यपूर्ण आहे. या एका शब्दात त्यांच्या सर्व जीवनाचे सार आले आहे.'' किंवा 'अमृतपुत्र' या भा.द. खेर यांच्या शास्त्रीजींच्या जीवनावरील चरित्रात्मक कादंबरीच्या प्रस्तावनेमध्ये लिहितात, ''शास्त्रींचं या 'वामन' अवतारातील कार्य असंच चिरंजीव ठरलं आहे. अठरा महिन्यांच्या कारकिर्दीची अठरा अध्यायी गीता देशातील पन्नास पंचावन्न कोटी मुखांनी एकमुखानं गावी अशी आहे.'' महर्षी विठ्ठल रामजी शिंदे उर्फ

अण्णासाहेब शिंदे यांच्या पुनर्मुद्रित आत्मचरित्र 'माझ्या आठवणी व अनुभव'च्या प्रस्तावनेत त्यांच्या कार्याचे महत्त्व असे सांगतात, "त्यांच्या सार्वजनिक आयुष्याचा परिपोष त्यांच्याच भाषेत सांगावयाचा झाल्यास विश्वधर्मापासून सुरुवात होऊन समाजसुधारणा, समाजसेवा व राष्ट्रोद्धार अशा टप्प्यांनी झाली." अशा स्वरूपाचे लेखन हे त्यांचे समाजचिंतनगर्भ व विशुद्ध लेखन आहे असे नि:संकोचपणे नमूद करता येईल. त्यांच्या अशा काही शब्दयोजनेतील लय आणि सूचकता, अचूकपणाने काही विधानांना मार्मिकता प्राप्त होते. त्यामुळे यशवंतरावांच्या प्रस्तावनेमध्ये तिचा म्हणून एक 'घाट' आढळतो. हा घाट आशय आणि रचना या दोन्हींचा आहे. यशवंतराव चव्हाणांनी 'कर्मवीर भाऊराव पाटील' १९७० या अनुवादित वि.स.वाळिंबे यांच्या चरित्र ग्रंथाची शिफारस करताना "हे चरित्र म्हणजे कर्मवीरांना वाहिलेली खरीखुरी श्रद्धांजली आहे. कर्मवीरांनी आपले सारे जीवन गरीब आणि मागास लोकांच्या सेवेसाठी आणि उद्धारासाठी व्यतीत केले. अशा या दूरदृष्टीच्या व्यक्तीला तिच्या कृतज्ञ संस्थेने, निष्ठावंत कार्यकर्त्यांनी आणि महाराष्ट्रातील जनतेने या चरित्राच्या रूपाने आपली मानवंदना दिलेली आहे." असे उद्‌गार काढले आहेत. यशवंतरावांच्या प्रस्तावना लेखनाचा त्यांच्या वाचनाशी व अध्यापनाशी फार जवळचा संबंध आहे. मराठी पुस्तकांचे वाचन अतिशय गांभीर्याने ते करीत होते. म्हणूनच वाङ्मयासंबंधी अनेक प्रश्न त्यांच्या मनात निर्माण झाले. त्यांची उत्तरे शोधल्याशिवाय त्यांना चैन पडत नसे म्हणूनच या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी व विचार प्रकटनासाठी त्यांनी प्रस्तावना लेखन केले. वाचलेल्या आपल्या आस्वाद प्रक्रियेला शब्दबद्ध करणे, आस्वादातील भावनिक अंग टिकविणे आणि वक्तृत्वाच्या साह्याने विचार मांडणे या त्यांच्या प्रस्तावना लेखन पद्धतीमुळे त्यांच्या प्रस्तावनांना आस्वादकता प्राप्त होते. त्याचप्रमाणे वैचारिक मीमांसाही यात येते.

यशवंतरावांनी आपल्या 'भूमिका' या भाषण संग्रहास विस्तृत प्रस्तावना लिहून आपल्या लेखनामागची पार्श्वभूमी विशद करून सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. "या पुस्तकाचे शीर्षक 'भूमिका' हे ठरविले आहे. याचे कारण ज्या अनेक विषयावर जी वैचारिक क्षेत्रे निर्देशित केली आहेत, त्याविषयी माझी आणि माझ्या पक्षाची काही निश्चित भूमिका होती. त्यात सुसंगतता व एकसूत्रता आहे असे मला वाटते. ही भूमिका काहीशी स्पष्ट व्हायला या भाषणांचा उपयोग होईल असे मला वाटते. मराठी वाचकांच्या हाती 'भूमिका' हे पुस्तक देताना माझी एवढीच अपेक्षा आहे, की या सुसंगत भूमिकेची नोंद त्यांच्याजवळ राहील." अशी अपेक्षा ते वाचकांकडून बाळगतात.

यशवंतरावांच्या प्रस्तावनांना जीवनवादाची एक व्यापक पार्श्वभूमी आहे. तिचे विवरण करण्याच्या हेतूनेच त्यांनी प्रस्तावना लिहिल्याचे दिसते. काही प्रस्तावनांमध्ये



संबंधित कलाकृतीचे एकदम योग्य विस्तृत स्पष्टीकरण केले आहे. तर काही ठिकाणी एखाद्या परिच्छेदातून शुभेच्छापर लेखन केले आहे. काही कलाकृतींतून त्या प्रस्तावना खूप काही सांगून जातात. त्यामुळे त्यांची उपयुक्तता अधिक जाणवते. तसेच यशवंतरावांच्या प्रस्तावना वाचकांना सहृदयपणे अधिक काही समजावून देतात. त्याचबरोबर त्यांच्या या प्रस्तावनेतून त्या कलाकृतीच्या बाबत दर्शन घडते. यशवंतरावांनी ज्या काल-परिस्थिती अनुषंगाने लेखन झाले त्याचा संदर्भ, प्रेरणा व कार्य दिशा शोधता शोधता त्याच्या अंतर्गत वैशिष्ट्यांसह आपल्या लेखनाचा गाभा उलगडून दाखवावा अशी त्यांच्या प्रस्तावना लेखनाची पद्धत दिसते. साहजिकच तत्कालीन परिस्थिती, समस्या, नैतिक आचरण, साहित्यिक मूल्य, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक समस्यांसारख्या विषयांची चर्चा ही प्रस्तावनेतून झालेली आढळते.

यशवंतराव सदैव कार्यमग्न असताना व वारंवार दौऱ्यावर असतानाही त्यांनी वेळातवेळ काढून अत्यंत आत्मीयतेने अनेक लेखक, कवींच्या पुस्तकांसाठी प्रस्तावना लेखन केले. ते नि:संशय अभ्यासनीय आहे. प्रस्तावना विषय बनलेले लेखक व त्यांचे साहित्य, यांचे मराठी वाङ्मयातील स्थान निश्चित करण्याचा प्रयत्न त्यातून सिद्ध झाला आहे. यशवंतरावांच्या प्रस्तावनांतील साहित्य विचाराकडे मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकाला वाङ्मयेतिहासकाराला दुर्लक्ष करता येणार नाही.

यशवंतरावांच्या प्रस्तावना लेखनाचा अभ्यास करताना या लेखनातील समतोल, चिंतनशीलता, विद्वत्ता, व्यासंग आणि प्रतिभाशक्ती यांची ओळख होते. तसेच त्यांचे साहित्यावरील उदंड प्रेम, गुणग्राहकवृत्ती लेखकाला आनंद व प्रोत्साहन देण्याचे त्यांच्या ठायी असणारे सामर्थ्य आणि बरेवाईट रोखठोकपणे सांगणारी स्वच्छ शैली यांचे मर्मस्पर्शी दर्शन घडते. ज्या परिस्थितीत हे लेखन झाले, ते पाहता त्यांनी आपल्या प्रस्तावनांतून नवोदित लेखकाला प्रोत्साहित केले व जुन्याजाणत्या लेखकांच्या लेखनाचा आस्वाद कसा घ्यावा याचा वस्तुपाठच दाखवला आहे. समजून घेणे व समजून देणे अशी दुहेरी समन्वयाची भूमिका घेतल्यामुळे हे लेखन उभय लेखकांना व वाचकांना उपकारक ठरले आहे.

यशवंतरावांनी विविध ग्रंथांना प्रस्तावना लिहिल्या. या प्रस्तावनामधून यशवंतरावांची साहित्यिक आणि अभिजात रसिकता प्रकट होते. तसेच त्यांचे भावस्पर्शी संवेदनशील मन आणि मार्मिक समीक्षा व आस्वादक डोळसपणा पाहावयास मिळते. म्हणून आस्वादक समीक्षेचा एक नमुना म्हणून या त्यांच्या प्रस्तावनांचा निर्देश करावा लागेल. या प्रस्तावनांमधून व साहित्याकडून देशहिताची, देशाच्या एकात्मतेची आणि

समाजात नवचैतन्य निर्माण करण्याची व अपेक्षित परिवर्तन घडवून आणण्याची अपेक्षा केली आहे. प्रस्तावनेमध्ये साहित्यकृतीच्या आंतरिक सौंदर्याचा विचार हे यशवंतरावांच्या साहित्यविचाराचे बलस्थान आहे. यशवंतरावांनी श्रेष्ठ साहित्याच्या निकषाचा विचार करून आशयाच्या संपन्नतेचे महत्त्वही विशद केले आहे. यशवंतरावांनी लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा, भोवतालच्या वास्तवाचा, वाङ्मयीन अभिरुचीचा आणि वाङ्मयीन संस्काराचा केलेला विचार मौलिक स्वरूपाचा आहे. यशवंतरावांची ही साहित्यविषयक चिकित्सा आणि चिंतन म्हणूनच महत्त्वपूर्ण आहे.

यशवंतराव चव्हाण यांच्या साहित्यविषयक भूमिका व समीक्षा लेखनाचा स्थूल आढावा घेतला आहे. साहित्यविषयक विवेचनात त्यांनी वेगवेगळ्या वाङ्मयप्रकाराबद्दल समर्थपणे आपले विचार प्रकट केले आहेत. त्यातून त्यांची साहित्याकडे पाहण्याची भूमिका स्पष्ट होते. साहित्यप्रेम, साहित्य आणि समाज यांचा अनुबंध, साहित्यिकांकडून त्यांच्या अपेक्षा, साहित्याचे स्वरूप, जीवनवाद, साहित्याचे सामर्थ्य, साहित्यविषयक दृष्टिकोन, साहित्यातील सामाजिक जाणीव, साहित्य समीक्षा विषयक विचार व जीवन विषयक भूमिका यांचा मागोवा घेतला आहे.

प्रचारकी लेखन आणि वाङ्मयांतर्गत प्रबोधन यात त्यांनी भेद केला आहे. वाङ्मयातून प्रबोधन व्हावे या मताचे यशवंतराव होते. परंतु वाङ्मयाने केवळ प्रचार करावा अशा मताचे ते निश्चित नव्हते. जीवन आणि साहित्य यांचा परस्परसंबंध असतो. साहित्यात जीवनाचे प्रतिबिंब दिसते. तर काही वेळा साहित्याचा जीवनावर परिणाम होतो. साहित्यात मानवी अनुभवाचे प्रतिबिंब पडलेले असते म्हणून कोणत्याही साहित्याच्या निर्मितीची बीजे जीवनातील वास्तवात असतात.

वाङ्मयासाठी वाङ्मयबाह्य प्रयोजन त्यांनी कधी महत्त्वाचे मानले नाही. साहित्याची अंतिम प्रेरणा मानवी मूल्यांची जाणीव करून देणारी असली पाहिजे. त्या साहित्यात मानवी मूल्यांची किंवा गुणांची वाढ करणे हे उद्दिष्ट असले पाहिजे. जे साहित्य सर्वसामान्यांचे हित साधते तेच खरे साहित्य. निव्वळ शब्दलालित्य म्हणजे साहित्य नव्हे. जे साहित्य समाजजीवनाला मार्गदर्शक ठरते, मानवी मन आणि भावना यांचे उदात्तीकरण करून एकूण जीवन गतिमान करते तेच खरे साहित्य होय. अशा स्वरूपाच्या विचारातून त्यांची साहित्यविषयक भूमिका स्पष्ट होते. वाङ्मयात काल्पनिकतेपेक्षा वास्तवावर त्यांनी भर दिला असला तरी कल्पकतेचे स्थानही त्यांनी कधीच अमान्य केले नाही. कल्पना, प्रतिभा यांना साहित्य निर्मितीत त्यांनी स्थान दिले आहे.

○ ○ ○



प्रकरण ६

# भाषणे

यशवंतरावांनी त्यांच्या आयुष्यात विविध विषयांवर चिंतन केले. त्यामध्ये समाजकारण, शैक्षणिक विचार, साहित्यिकांची जबाबदारी, देशाचे अर्थकारण, परराष्ट्र धोरण, संयुक्त महाराष्ट्र चळवळ किंवा सामाजिक कार्य यांचा समावेश होतो. यशवंतरावांच्या भाषणांना त्याकाळी प्रचंड गर्दी जमत असे. त्यांच्या भाषणांनी अनेक लोकांना आकर्षित केले आहे. या भाषणांमधून नाना व्यक्तींच्या आठवणी त्यांनी सांगितल्या. अनेक घटना, प्रसंगांचा ऊहापोह केला. त्यांच्या भाषणांमधून वाङ्मयीन आणि कलाप्रेमी व्यक्तिमत्त्वाचाच एक संपन्न, सुंदर आविष्कार पाहावयास मिळतो. प्रदीर्घ व्यासंग, संदर्भ संपन्नता, गंभीर चिंतनशीलता, निखळ प्रांजळपणा, प्रसंगानुरूप व औचित्यपूर्ण संवाद इ. विविधतेमुळे त्यांची भाषणे वैविध्यपूर्ण आहेत. भाषण विषयातील ही विविधता जशी आपल्याला स्तिमित करते त्याप्रमाणे त्यातून व्यक्त होणारे साहित्यप्रेम आपल्याला उत्कटपणे जाणवते. साहित्याचा अनेक अंगांनी त्यांनी विचार मांडला. यशवंतरावांची ही साहित्यविषयक भाषणे व प्रासंगिक वैचारिक लेखन हे नियतकालिकातून व ग्रंथरूपाने प्रसिद्ध झाली आहेत. साहित्याच्या दृष्टीने त्यांच्या भाषणांचे संकलित ग्रंथ 'सह्याद्रीचे वारे', 'युगांतर', 'भूमिका', 'शिवनेरीचे सोबती', 'यशवंतराव चव्हाण- शब्दांचे सामर्थ्य', या सारख्या ग्रंथातील काही भाषणांमधून श्रोत्यांशी ते प्रत्यक्षाप्रमाणे बोलत राहिले. वक्तृत्व हा त्यांच्या वाङ्मयीन आणि सांस्कृतिक जीवनातला एक चैतन्यशील व समृद्ध असा महत्त्वाचा भाग होता. या भाषणांमधून विविध विषयांना स्पर्श करणारी आपली ठाम मते त्यांनी मांडली. यशवंतरावांच्या भाषणांनी वैचारिक व ललित निबंधांचा दर्जा प्राप्त केलेला आहे. ललित वाङ्मयाचा एक प्रकार म्हणून त्याचा अभ्यास प्रस्तुत ठिकाणी अपेक्षित आहे. यशवंतरावांची अनेक भाषणे साहित्यविषयक आहेत आणि त्यामध्ये त्यांच्यातल्या रसिकाइतकाच त्यांच्यामधला समीक्षकही सजग आहे. यशवंतरावांच्या चिंतनशील अंतर्मुखतेपासून ते सर्वस्पर्शी रसिकतेपर्यंत आणि साहित्यातील गहन प्रश्नांचा वेध

घेण्यापासून ते त्यातल्या अनेक अंतर्गत विरोधांची चिकित्सा करण्यापर्यंत त्यांच्या या भाषणांचा आवाका आणि पल्ला दिसतो. यशवंतरावांनी या भाषणाच्या माध्यमातून मराठी माणसाला स्वत:च्या उज्ज्वल भवितव्याच्या स्वप्नपूर्तीसाठी प्रेरणा देणारा विचार मांडलेला आहे. एकूणच राष्ट्राची उभारणी करण्याचा विचार त्यांनी या भाषणांतून मांडला. विविध क्षेत्रांना व्यापून टाकणारी कल्पनाशक्ती त्यांच्या या प्रासंगिक वैचारिक लेखांतून दिसून येते.

## भाषणे : रूप आणि रंग

महाराष्ट्रात उत्तम वक्तृत्व संपादन केलेला विवेकशील विचारवंत म्हणून यशवंतरावांचा उल्लेख अनेकांनी केला आहे. यशवंतरावांची विविध विषयावरील ही भाषणे वाचताना वक्ता म्हणून त्यांची एक वेगळी ओळख आपणास होते. यशवंतरावांनी त्यांच्या भाषणातून अनेक बाबींचा परामर्श घेतलेला आहे. या सर्व भाषणांमधून यशवंतरावांची सामाजिक चळवळ व साहित्यिक प्रेमाचा अधिक प्रत्यय येत राहतो. हे साहित्याबाबतचे प्रेम मर्यादित नाही. त्यात व्यापकता आहे, तशीच सर्वसमावेशकता आहे. त्यांची ही सर्व भाषणे वाचल्यानंतर मनात प्रश्न निर्माण होतो तो असा की त्यांच्या भाषणाचे स्वरूप कसे होते? ते त्यांच्याच शब्दात सांगायचे तर,''आजच्या काळात माझी होणारी वेगवेगळी भाषणे यांचे तीन चार प्रकार करावे लागतील. राजकीय विषयावरची पक्षासाठी केलेली भाषणे व लोकसभेमध्ये केलेली भाषणे अशा प्रकारचे भाषणांचे वेगवेगळे गट होतील. या प्रत्येकाचा उद्देश वेगळा असतो व त्याच्यासाठी स्वीकारल्या जाणाऱ्या शैलीतही फरक असतो.'' अशा प्रकारे वक्तृत्वाबाबतची भूमिका ते कधी स्वत: सांगतात तर कधी त्यांच्या स्फुट, त्रुटित, प्रसंगोपात्त अशा उद्‌गारांतून व्यक्त करतात.

यशवंतरावांचा भाषा विषयाचा अभ्यास दांडगा होता. या भाषा ज्ञानाचा उपयोग त्यांना वक्तृत्वासाठी चांगलाच झाला. भाषण किंवा व्याख्यान हा शब्द उच्चारताच व्यासपीठावर उभा असलेला नेता आणि जमलेला श्रोतृवर्ग असे चित्र आपल्यापुढे उभे राहते. यशवंतरावांच्या वक्तृत्वात खाजगी बैठकीतील भाषण, जाहीर भाषण, एखाद्या विषयावरील व्याख्यान यांचा समावेश होतो. त्याचप्रमाणे मुलाखती, चर्चासत्रे, परिसंवाद यातही ते तरबेज होते. सत्कारसभा, शोकसभा, काँग्रेस कार्यकर्त्यांचे शिबिर किंवा मेळावा, एखाद्या कवीचा, लेखकाचा सत्कारसमारंभ, साहित्य संमेलन, विधिमंडळ, लोकसभा या विविध ठिकाणी केलेल्या भाषणांचा समावेशही यशवंतरावांच्या वक्तृत्वकलेत करता येईल. यशवंतराव प्रासंगिक उत्स्फूर्त भाषण करत. यशवंतरावांना



निरनिराळ्या प्रसंगांनी वक्तृत्वाची संधी मिळत गेली. यातले काही प्रसंग आनंदाचे, काही दु:खाचे, काही कोणाच्या सत्काराचे, गौरवाचे, काही ठरवलेल्या विषयावरचे तर काही प्रासंगिक उत्स्फूर्ततेचे आहेत. या प्रसंगांच्या विविधतेमुळे यशवंतरावांच्या भाषणातही निराळेपणा दिसतो.

यशवंतरावांचे सखोल वाचन, मनन आणि चिंतन जसे त्यांच्या लेखनातून पाहावयास मिळते त्याचेच प्रतिबिंब त्यांच्या भाषणांतून पाहावयास मिळते. आत्मविश्वास आणि प्रचंड वाचन यांच्या जोरावर एखाद्या विषयावर विचार कसे मांडावेत याचे उत्तम प्रात्यक्षिकच जणू ते इतर वक्त्यांसमोर ठेवत. सर्वसामान्य माणसांच्या हृदयापर्यंत जाऊन पोहोचणे त्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे होते आणि म्हणूनच की काय अत्यंत साध्या, सोप्या, सर्वसामान्यांना कळेल अशा भाषेत भाषण करत. श्रोत्यांची मने भारून टाकणारे चैतन्य, त्यांना स्फुरण चढवणारी ओजस्विता आणि त्यांना सतत प्रसन्न वाटणारे विचार यांनी त्यांचे वक्तृत्व नटलेले असे. या वक्तृत्वात गर्दी खेचून घेण्याचे आणि तिला खिळवून ठेवण्याचे विलक्षण सामर्थ्य होते. या वक्तृत्वकलेमुळे यशवंतरावांना महाराष्ट्रात व भारतात नावलौकिक मिळाला.

यशवंतराव ज्या काळात लहानाचे मोठे झाले त्या काळात उच्च नैतिक मूल्यांनुसार वागणारे आणि त्या मूल्यांचा आदर्श समाजासमोर ठेवणारे अनेक नेते महाराष्ट्राला लाभले होते. ही माणसे मोठी उपक्रमशील होती. देशाबद्दल, संकृतीबद्दल आस्था ठेवून होती. निरपेक्ष देशसेवा करावी, सामाजिक व आर्थिक विषमता दूर करावी, ज्ञानसाधना करावी, पाश्चात्य संस्कृतीचे आंधळे अनुकरण टाळावे, प्रामाणिकपणे व नेकीने जीवन जगावे अशा प्रकारची मूल्ये या लोकांनी त्या काळात लोकांसमोर ठेवली. हीच मूल्ये यशवंतरावांनी स्वीकारली आणि अखेरपर्यंत या मूल्यांचा त्यांनी पुरस्कार केला.

यशवंतरावांनी वक्तृत्वाचा अपूर्व गुण लहानपणापासून जोपासला होता. कराडच्या टिळक हायस्कूलमध्ये शिक्षण घेत असल्यापासून ते निबंध स्पर्धा आणि वक्तृत्व स्पर्धेत भाग घेत असत. इ.स. १९३१ मध्ये पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयाने आयोजित केलेल्या वक्तृत्व स्पर्धेत यशवंतराव सहभागी झाले होते. या संदर्भात आठवण सांगताना यशवंतराव लिहितात, ''विद्यार्थ्याला तेथे आयत्या वेळी विषय देऊन दहा मिनिटे बोलायला सांगत. 'ग्रामसुधारणा' हा विषय देऊन मला बोलायला सांगण्यात आले. माझे भाषण ऐकून परीक्षक खूश झालेले दिसले. त्यांनी मला आणखी दहा मिनिटे वेळ वाढवून दिला. भाषण झाल्यावर सर्वांनी माझे कौतुक केले व त्या स्पर्धेत मला पारितोषिक मिळाले.'' यशवंतरावांकडे वक्त्याला लागणारे सर्व गुण होते आणि त्यांची जोपासना त्यांनी लहानपणापासून केली. पुढे वक्तृत्व हा त्यांच्या सर्वगुणसंपन्न व्यक्तिमत्त्वाचा

अविभाज्य भाग बनला. इंग्रजी, मराठी, हिंदी या तीनही भाषात यशवंतराव भाषण देत असत. ज्या वेगाने यशवंतराव मराठी भाषा बोलत त्या वेगाने ते हिंदी व इंग्रजी भाषा बोलत. पण त्यांचे मराठी वक्तृत्व मात्र असामान्य होते. आपल्या भाषासिद्धीवर, विषय प्रभुत्वावर व वाक्सामर्थ्यावर यशवंतरावांचा प्रचंड विश्वास होता. साहित्य संमेलन, विज्ञान संमेलन, वेगवेगळ्या वाङ्मय महोत्सवाचे अध्यक्ष म्हणून यशवंतरावांनी व्यक्त केलेले विचार वैचारिकदृष्ट्या अभ्यासनीय आहेत. संयमाने बोलणारे, लोकांच्या सद्भावनांना साद घालणारे, लोकाची विचारशक्ती जागृत करणारे, उपरोधाने विरोधकांचे चिमटे घेणारे, स्वपक्षीय कार्यकर्त्यांसमोर उपदेशाचे डोस पाजणारे, विवेक व विचारपूर्ण अशी व्याख्याने म्हणून त्यांचा उल्लेख करावा लागेल.

साहित्य, शिक्षण, माणुसकी, श्रमशक्ती, संस्कृती, कृषी-औद्योगिक धोरण, सहकार, विज्ञान, संगीत, शेती, संरक्षण, इतिहास, सामाजिक तत्त्वज्ञान, अर्थकारण, राजकारण यांसारख्या असंख्य विषयांवर त्यांनी आपल्या भाषणातून विचार व्यक्त केले आहेत. या विचारांतून कर्तबगार, लोकमान्य व चिंतनशील व्यक्तिमत्त्व असणारा व भविष्याचा व्यापक वेध घेण्याची क्षमता असणारा एक विचारवंत म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो. यशवंतरावांनी अनेक मोठ्या व्याख्यात्यांची व्याख्याने ऐकली होती. डॉ. सर्वश्री सर्वपल्ली राधाकृष्णन्, श्रीनिवास शास्त्री, भुलाबाई देसाई, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, काकासाहेब गाडगीळ, ना. सी. फडके यांसारख्या काही चांगल्या व्याख्यात्यांची व्याख्याने त्यांनी ऐकली होती. या व्याख्यात्यांनी घालून दिलेल्या पायवाटेचा यशवंतरावांनी राजरस्ता केला. ते लिहितात, "एकंदरीत प्रत्येक भाषणाची थोडीफार तयारी, चिंतन करणे आवश्यक असते. अनेक विषयांवरील अनेक व्यक्तींची संभाषणे, विचार यांच्या वाचनाचीही आवश्यकता असते. वक्तृत्वासाठी वक्तृत्व मी कधीही केलेले नाही. त्यामुळे कधी माझी भाषणे चांगली होतात, तर कधी सामान्य होतात, पण ती कधी पडत नाहीत. मी मूळचा राजकीय वक्ता आहे व त्याला अनुसरून ज्या विषयात रस आहे, त्यासंबंधी मी बोलत असतो. परराष्ट्र संबंध, आर्थिक व सामाजिक परिवर्तन हे माझे अति आवडीचे विषय आहेत. पण मला खरा आनंद होतो, मी जेव्हा साहित्यविषयक प्रश्नांसंबंधी माझे विचार मांडण्याचा प्रयत्न करीत असतो, तेव्हा त्या क्षेत्रातील मी अधिकारी माणूस नाही. परंतु बहुश्रुत आहे असा माझा दावा आहे. त्यामुळे त्या विषयांवर बोलण्याचा मला नेहमी आनंद वाटतो." यशवंतरावांची साहित्याबद्दलची ही स्वागतशील वृत्ती अनेक साहित्यिक मेळाव्यांच्या वेळी त्यांनी केलेल्या भाषणात प्रभावीपणे प्रकट झाली आहे. अशा काही भाषणांतून आपल्या साहित्यविषयक अभिरुचीचा यशवंतराव जसा आढावा घेतात त्याप्रमाणे त्या अभिरुचीत



वेळोवेळी बदल घडवून आणणाऱ्या साहित्यातील घडामोडींचेही ते विचारपूर्वक चिंतन व्यक्त करतात. इतर कोणात्याही विषयापेक्षा साहित्यक्षेत्रावर आपले अधिक प्रेम आहे. हे त्यांच्या वरील उताऱ्यावरून लक्षात येते. यशवंतरावांचे भाषण रंगत असे ते त्यातल्या अंगभूत सामर्थ्यामुळे हे जितके खरे तितकेच त्यांच्या भाषेचे सामर्थ्य हाही त्याला उपकारक विषय होता. भाषाप्रभू यशवंतराव हे शब्दांच्या अचूक फेकीने श्रोत्यांच्या मनाचा वेध घेताना आपल्याला दिसतात. याचबरोबर आवश्यकतेनुसार वाकणारी भाषा हे यशवंतरावांच्या भाषणातील एक अमोघ अस्त्र आहे आणि याचा पुरेपुर उपयोग यशवंतरावांनी करून घेतलेला दिसतो.

## साहित्य व संस्कृतिविषयक भाषणे

यशवंतरावांनी वेगवेगळ्या ठिकाणी साहित्यविषयक व संस्कृतिसंबंधी योजनापूर्वक व मन:पूर्वक भाषणे केलेली आहेत. त्यामध्ये सुभाषितप्राय असे काही विचार ही मांडले आहेत. या दृष्टीने त्यांची प्रस्तुत भाषणे महत्त्वपूर्ण आहेत. 'विदर्भ साहित्य संमेलन (दि. ६.१२.१९६४) उद्घाटन प्रसंगीचे भाषण, 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन' (दि. ६.१२.१९७५), कराड येथे भरलेल्या ५१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या वेळी स्वागताध्यक्षीय भाषण, 'साहित्य आणि संस्कृती' (दि.२२.१२.१९६०), महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे नागपूर येथील उद्घाटनपर भाषण, 'साहित्यिकांची जबाबदारी' (दि. १३.१२.१९६०), सावरगाव डुकरे येथील विदर्भ साहित्य संमेलनाचे उद्घाटनपर भाषण, 'लोकभाषा हीच ज्ञानभाषा' (दि. ७.९.१९६७), कोपरगाव येथे के. जे. सावेच्या आर्टस् व कॉमर्स कॉलेजच्या पायाभरणीच्या वेळी केलेले भाषण, 'राष्ट्रभाषेचा प्रश्न' (दि. २८.५.१९६६), औरंगाबाद येथे झालेल्या अखिल भारतीय राष्ट्रभाषा प्रचार समिती, वार्षिक अधिवेशनाच्या वेळी केलेले भाषण, 'आजच्या साहित्याकडून अपेक्षा' (दि. २५.१२.१९६५), हैदराबाद येथे मराठी साहित्य संमेलनाच्या वेळी केलेले भाषण, 'मराठी रंगभूमीची अखंड परंपरा' (दि. ३१.१.१९६५), नांदेड येथे संपन्न झालेल्या ४७ व्या मराठी नाट्यपरिषदेच्या वेळी मांडलेले विचार 'राष्ट्रभाषा हिंदी' (दि. १९.३.१९६१) मुंबई प्रांतिक राष्ट्रभाषा प्रचार सभेच्या २२ व्या पदवीदान समारंभाच्या वेळी दिलेले भाषण यांसारख्या कितीतरी भाषणांमधून मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती जतन करण्यासाठी व तिच्या संवर्धनासाठी या भाषणामधून वाङ्मयीन विचार त्यांनी मांडले आहेत. ही भाषणे माहितीचे अफाट भांडार आहे, तसा तो चिंतनशीलतेचा सुंदर प्रत्ययही आहे. साहित्याबद्दल व सहित्यिकांबद्दल जसे त्यांचे

उत्कट प्रेम दिसते तशी श्रोत्यांबद्दलची जिवंत कळकळही जाणवते. त्यांच्या उपरोक्त विषयांवरील भाषणांचा कितीही आस्वाद घेतला तरी कान तृप्त होत नाहीत अशीच त्यांची भाषणे आहेत.

## मराठीचा अभिमान

साहित्यिकांच्या मेळाव्यात यशवंतराव सारे राजकारण विसरत आणि मनमोकळेपणाने आपले विचार मांडत. यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना मराठी भाषेला राज्यभाषेचा दर्जा मिळाला. त्यांच्या काळात भाषा संचलनालयाची निर्मिती करण्यात आली. सरकारी यंत्रणेत मराठी भाषेचा माध्यम म्हणून उपयोग करण्यासाठी त्वरीत उपाय योजण्यात आले. शासकीय कार्यालयातील कारभार मराठी भाषेतून चालविण्याचा निर्णय घेतला. सर्व तालुका कचेऱ्यातला कारभार, पत्रव्यवहार मराठी भाषेतून करावा असा निर्णय घेण्यात आला. मराठी भाषेला राज्यभाषेचा दर्जा मिळाल्यानंतर तिच्या जबाबदाऱ्या वाढणार आहेत, या जबाबदाऱ्या स्वीकारण्याची तयारी साहित्यिकांनी दाखवावी असे आवाहन ते करतात, ''राज्यभाषेचा दर्जा जेव्हा भाषेला प्राप्त होतो तेव्हा लोकजीवन समृद्ध करण्याचे एक महत्त्वाचे साधन म्हणून आपण त्या भाषेकडे पाहात असतो. आपण जाणताच की वेगवेगळ्या साहित्य प्रकारांनी लोकजीवन समृद्ध होत असते.'' म्हणून लोकजीवन समृद्ध करण्यासाठी या भाषेत विविध प्रकारची वाङ्मयनिर्मिती व्हावी. श्रेष्ठ साहित्याची निर्मिती झाल्यावरच ज्ञानाच्या सर्व क्षेत्रांतील विचारसंपदा जेव्हा मराठी भाषेमध्ये येईल तेव्हाच मराठी भाषा ही विचारप्रवाही होईल. ही जबाबदारी लेखकांनी व साहित्यिकांनी पेलावी असे त्यांना वाटते. ''ज्ञानाच्या आणि विज्ञानाच्या क्षेत्रातील मूलभूत संशोधन हाती घेण्याचा प्रयत्न ज्या भाषेत होतो तीच भाषा ज्ञानाची भाषा होऊ शकते.'' मराठी भाषेचा सर्व मराठी भाषिकांना जरूर अभिमान आहे. पण ज्ञानाच्या आणि विज्ञानाच्या क्षेत्रात मूलभूत संशोधन झाल्याशिवाय मराठी भाषा ज्ञानाची भाषा होऊच शकत नाही. तेव्हा अशा प्रकारचे साहित्य निर्माण करण्याची रास्त अपेक्षा ते साहित्यिकांकडून करतात. साहित्याची किंवा साहित्यिकांची अंतिम प्रेरणा मानवी मूल्यांची जाणीव करून देणारी असली पाहिजे. निरनिराळ्या भाषेतील अक्षर वाङ्मय मराठी भाषेत आले पाहिजे. थोडक्यात जगातील अद्ययावत ज्ञान मातृभाषेत साठवून लोकांची सांस्कृतिक अभिवृद्धी व्हावी असे यशवंतरावांना वाटते. साहित्यातून मानवी मूल्यांचे दर्शन घडते. मानवी मूल्यांचा प्रत्यय हीच वाङ्मयाची कसोटी असावी व त्यातून मानवी गुणांची वाढ व्हावी असे ते स्पष्ट करतात. साहित्य व संस्कृती यांचा मानवी जीवनाशी असलेला अनुबंध



यशवंतराव येथे स्पष्ट करतात. सत्य, प्रेम, जिव्हाळा, माणुसकी, भूतदया इ. मानवी मूल्ये मराठी साहित्यातून विकसित व्हावीत अशी अपेक्षा बुलढाणा जिल्ह्यातील सावरगाव येथे विदर्भ साहित्यसंमेलनाच्या उद्‌घाटनप्रसंगी त्यांनी व्यक्त केली होती.

## साहित्यिकांकडून अपेक्षा

साहित्याविषयी आवड असलेले यशवंतराव नेहमी साहित्य चळवळीमध्ये रमून जात. साहित्य संमेलन हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील एक मोठा सोहळा आहे. अशा सोहळ्यामध्ये महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लोक सहभागी होतात. हैद्राबाद येथील मराठी साहित्य संमेलनाच्या उद्‌घाटनपर भाषणात ते असे विचार मांडतात,''साहित्य हे सुद्धा एका अर्थाने जीवनाची समीक्षा आहे. साहित्य निर्मिती करावी, पण खरे म्हणजे जीवनावरचा लोभ सोडू नये. जीवनावरचे प्रेम कायम ठेवावे.'' जीवन आणि साहित्य याचा संबंध कसा असावा याबाबतचे मत येथे यशवंतराव व्यक्त करतात. साहित्यिकांनी महाराष्ट्रातील किंवा भारतातील विविधतेचा शोध घेऊन त्यातील एकतेचा, महाराष्ट्रीयत्वाचा किंवा भारतीयत्वाचा शोध घेऊन तो लोकांपर्यंत पोहोचवला पाहिजे. मराठी संस्कृतीतील साम्यस्थळे शोधून त्यांची वाढ करण्यासाठी साहित्यिकांनी पुढाकार घेतला पाहिजे. त्याचबरोबर आतापर्यंत जे इतिहासाला अनभिज्ञ होते त्याचा शोध लावला पाहिजे. आतापर्यंत जी माणसे समाजापासून दूर राहिली, ज्यांचे जीवन साहित्याचा विषय झाले नाही अशा सर्वच उपेक्षित, दुर्लक्षित, आदिवासी, वनवासी आणि दलितांच्या प्रश्नाकडे ते लक्ष द्यायला सांगतात. त्यांचे जीवन साहित्याचा विषय होऊन साहित्यात त्याचे चित्रण झाले पाहिजे. यातूनच लोकजीवन आणि साहित्य समृद्ध होईल असा त्यांना विश्वास वाटतो. यशवंतराव सांगतात,''भारतातील वेगवेगळ्या ठिकाणी हे जे विविधत्व आहे त्याच्याशी आपण संपर्क जोडला पाहिजे, आणि त्याच्यातून अनुस्यूत असलेल्या एक भारतीयत्वाचा आपण अनुभव घेतला पाहिजे. हा अनुभव घेण्याचा आपण कदाचित प्रयत्न करीत असाल, परंतु हा अनुभव आमच्या साहित्याद्वारे लोकांपर्यंत जाऊन पोहोचला पाहिजे.'' हे काम साहित्यिकांनी करावे असे त्यांना अपेक्षित आहे. कारण साहित्य हे एक सामर्थ्य आहे. या सामर्थ्याच्या जोरावर व्यक्ती आणि राष्ट्र यास आपापल्या जीवनात अनेक संकटांना सामोरे जाण्याची शक्ती मिळत असते. यासाठी साहित्याकडून ते अशी अपेक्षा व्यक्त करतात,''आमच्या ज्या सुप्त शक्ती आहेत, त्या सुप्त शक्तींना आवाहन करून त्या जागृत करून, आम्ही आमचे सामर्थ्य वर्धिष्णू करू. सामर्थ्य संवर्धनाचे हे काम आज साहित्यिकांनी केले

पाहिजे. साहित्यिकांची ही भूमिका असली पाहिजे.'' मराठी साहित्यातून जाणीवपूर्वक विश्वसाहित्याचा व्यापक व सखोल अभ्यास व्हावा. या साहित्याबाबत आपण उदासीन असता कामा नये. यशवंतरावांची साहित्याकडून हीच अपेक्षा आहे. मराठी साहित्य हे विशिष्ट प्रदेशापुरते मर्यादित राहता कामा नये. या मर्यादा आणि सीमा पार करून श्रेष्ठ साहित्य निर्माण व्हावे. त्यामध्ये अस्सल असे अनुभवविश्व आले पाहिजे. या संदर्भात ते म्हणतात, ''एक अनुभूती आणि एक विचार राबविण्याचे हे जे काम आहे, ते अविभाज्य आहे. ते केवळ मराठीचे, बंगालीचे, तेलगुचे किंवा कानडीचे काम नसून भारतातील सर्वच भाषांचे ते काम आहे. ही अविभाज्यता, ही एकरूपता अनुभवाला आली पाहिजे. – आणि हा अनुभव साहित्यिकांना त्यांच्या जीवनामध्ये आला तरच तो ते जनतेपर्यंत पोहोचवू शकतील. परंतु ही आजच्या घडीची मागणी आहे, आजच्या घडीची ऐतिहासिक अपेक्षा आहे.'' सर्व भाषिक साहित्यिकांनी संस्कारसंपन्न साहित्य निर्माण करून मानवी जीवनावर संस्कार करून मानवी समाज सुसंस्कृत करण्याला मदत करावी अशी इतर भाषेतील साहित्यिकांकडून ते अपेक्षा करतात.

## प्रत्यक्ष कार्याची जोड

यशवंतराव चव्हाणांनी २२ डिसेंबर १९६० रोजी साहित्य व संस्कृती मंडळाचे उद्घाटन नागपूर येथे केले. या मंडळाची स्थापना म्हणजे महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर सांस्कृतिक क्षेत्रात झालेली एक महत्त्वपूर्ण घटना होय. सर्वांचीच बौद्धिक भूक भागविण्यासाठी, साहित्य आणि संस्कृतीच्या विकासासाठी या मंडळाची निर्मिती झाल्याचे ते सांगतात. या मंडळाच्या वृद्धीसाठी व संवर्धनासाठी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली विद्वज्जनांची एक यंत्रणा उभारली. १७ मे १९६२ रोजी वाई येथे साहित्य व संस्कृती मंडळाने स्थापन केलेल्या विश्वकोष कार्यालयाचे उद्घाटन यशवंतरावांच्या हस्ते झाले. साहित्य व संस्कृती मंडळाच्या निर्मितीचे स्पष्टीकरण करताना ते सांगतात, ''स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोकजीवन समृद्ध करण्याची जी प्रतिज्ञा आपल्या देशाने केली तिचेच हे पुनरूज्जीवन एक भाग असून भाषिक राज्यांच्या निर्मितीमुळे या पुनरूज्जीवनाच्या कार्यासाठी आम्हाला एक नवे साधन प्राप्त झाले आहे.'' यातूनच या मंडळाची निर्मिती झाल्याचे यशवंतराव सांगतात. मराठी भाषेच्या जडणघडणीसाठी, उत्तमोत्तम ग्रंथांच्या निवडीसाठी, साहित्य आणि संस्कृती या क्षेत्रातील संशोधनाला चालना देण्यासाठी या मंडळाची निर्मिती झाल्याचे सांगतात.

महाराष्ट्राच्या मातीत आणि संस्कृतीत वाढलेल्या यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या लोकजीवनाच्या आणि लोकसंस्कृतीच्या उन्नयनाचा नेहमीच विचार केला. त्यासाठी



सदैव नवीन विचार देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. वैचारिक, साहित्यिक व सांस्कृतिक धनामुळे देश ओळखला जातो. समाज जिवंत राहतो तो त्याच्या जवळील भौतिक सामर्थ्याने नव्हे तर त्या समाजाजवळ असलेल्या सांस्कृतिक मूल्यांवर आणि विचारधनावर, असा दाखला ते देतात. असा मानवी जीवनमानाची उंची वाढवणारा नवा विचार यशवंतराव समाजाला देतात.

यशवंतरावांना विद्वानांचा व विचारवंतांचा नेहमीच आदर होता. त्यांच्या कार्यावर आणि त्यांच्या ज्ञानावर त्यांचा पूर्ण विश्वास होता. अशाच विचारवंतांच्या कार्यावर देश, राष्ट्र जगत असते. म्हणून विद्वानांनी निर्माण केलेले शब्दधन जपून ठेवणे हे समाजाचे व शासनाचे कर्तव्य आहे. रामायण, महाभारत, ज्ञानेश्वरी, वेद, पुराणे इ. मुळे भारत ओळखला जातो. हाच आमचा सांस्कृतिक ठेवा असल्याचे ते सांगतात. पंडितांची, विचारवंतांची, साहित्यिकांची अक्षरवाणी ही देशाला चैतन्यमय बनवत असते. त्यांच्यात राष्ट्र अभिमान निर्माण करते आणि राष्ट्र भावनेचा विकास घडविते. त्यामुळे कोणत्याही देशातील साहित्यिक जिवंत राहतात, अमर होतात. मोठे मोठे सम्राट येतात आणि जातात पण शब्दधन, विचारधन हे चिरतरुण व चिरंजीव असते. म्हणूनच सम्राट संपतात आणि शेक्सपिअर अमर होतो. तुकारामाचे अभंग बुडविणारे मातीमोल होतात. तुकारामांचे समाजमानसातील स्थान अभंग राहते. ते म्हणतात,''मानवी मनात अनेक मूक आशा, आकांक्षा असतात, कल्पना असतात आणि त्यांच्या प्रकटीकरणासाठी, व्यक्तिमत्त्वासाठी एक प्रकारे हाका मारीत असतात. शब्दांसाठी त्या भुकेलेल्या असतात, तहानलेल्या असतात. त्यांच्या हाकेला ओ देऊन लेखक, विचारवंत, संशोधक व शास्त्रज्ञ त्यांना लेखनाद्वारे शब्दरूप देत असतात. मराठी भाषिक जनतेच्याही अशा काही आशा, आकांक्षा, इच्छा असून त्या विविध प्रवाही असतात. त्यांना आपण लेखनाद्वारे शब्दरूप केले पाहिजे.'' अशा रीतीने अतिशय मोलाचा व महत्त्वपूर्ण विचार यशवंतराव येथे मांडतात. यशवंतरावांनी साहित्य आणि साहित्यिक यांच्या विषयीचे विवेचन अगदी नेमकेपणाने केले आहे. साहित्य आणि संस्कृती मंडळाचा जन्म कशासाठी हेही त्यांनी स्पष्ट केले. त्याचे व्यापकत्व स्पष्ट केले. हे मंडळ एक प्रकारचे 'पॉवरहाऊस' बनावे, त्याने इतरांना ऊर्जा द्यावी, त्याने वाढती क्षितिजे निर्माण करावीत. या मंडळाने महाराष्ट्राचे जीवन व्यापक, विस्तृत व क्रियाशील करणारे माध्यम बनावे अशी अपेक्षा ते व्यक्त करतात. तसेच वैज्ञानिक संशोधन मराठी भाषेत आले पाहिजे, तरच ती भाषा 'ज्ञानभाषा' होईल. अमृताते पैजे जिंकायचे ज्ञानेश्वरांचे भाकीत खरे करायचे असेल तर शास्त्रीय माहिती मराठीत उपलब्ध झाली पाहिजे असा आग्रह ते धरतात व सामान्य माणसांचे

हित करण्याचे साधन म्हणून असे साहित्य मंडळाच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचले पाहिजे अशी अपेक्षा ते व्यक्त करतात.

## शब्दची अमुच्या जीवीचे जीवन

शब्दांचे अंतरंग, शब्दांचे सामर्थ्य काय असते व त्यांच्या उच्चाराचे ओज काय असते याचे प्रत्यंतर यशवंतरावांच्या साहित्यिक भाषणांतून मिळते. एखाद्या समर्पणशील प्रतिभावंतांच्या वाणीचा प्रभाव कसा असतो याचे प्रत्यंतर त्यांच्या अनेक भाषणांतून येते. भाषण करताना यशवंतराव काळ, वेळ आणि विषयाचे भान ठेवून बोलत. श्रोता व वक्ता यांच्यामध्ये सुसंवाद ठेवत. त्यांच्या भाषणाची शैली ही संभाषण पद्धतीची होती. भाषण रंगवण्यासाठी मनात काही आडाखे, विचार ते निर्माण करत. आपला एखादा नवा विचार, दृष्टिकोन ते श्रोत्यांना सांगत. त्यांच्या भाषणात विचारांची स्पष्टता असे व प्रचंड आत्मविश्वासाने ते सभा जिंकत असत. मनाचा समतोल ठेवूनच त्यांनी अनेक वादग्रस्त सभा जिंकल्या आहेत. ते म्हणतात, ''मात्र बोलण्यासाठी जो विषय निवडला असेल त्यासाठी चिंतन करण्याची आवश्यकता असते. त्या विषयाचे महत्त्व, त्या विषयाची ऐतिहासिक वाढ, त्यांच्या संबंधी आजचे प्रश्न व त्यावरील उपाय अशा तऱ्हेने मी त्या विषयाचा विचार करून ठेवतो व मग तो मी मांडू लागतो. पहिल्या दहा-पंधरा वर्षांत माझी काही निश्चित मते बनली नव्हती. मला वाटते की त्यानंतरच्या काळात राजकीय, आर्थिक, सामाजिक, साहित्यविषयक अशी माझी स्वत:ची म्हणून काही मते झाली. स्वत:मध्ये एक आत्मविश्वास निर्माण झाला.'' असे स्वत:च्या भाषणांबाबत यशवंतराव सांगतात. त्यांनी वक्तृत्वकलेची मूलभूत तंत्रे आणि कौशल्ये आत्मसात केली होती. त्यामुळेच ते श्रोत्यांशी उत्तम संवाद साधत असत. प्रसंगी आपल्या भाषणाचे तंत्र प्रसंगानुसार बदलतही असत. बोलताना माहितीच्या साठ्यातून अथवा कल्पनांच्या भांडारामधून योग्य ते संदर्भ आयत्या वेळी नेमकेपणाने देत असत. विचारांच्या या गाठोड्यातून योग्य वेळी योग्य ती अवतरणेही सांगत. ''माणसाचे मन शिक्षणाच्या संस्काराने, अधिक संपन्न केल्याशिवाय समाज खऱ्या अर्थाने समाज बनत नाही.... शिक्षणाने देशात बेकारीच निर्माण होणार असेल तर देशामध्ये सुशिक्षित बेकार असणे अधिक चांगले असे मी म्हणेन. कारण सुशिक्षित बेकार निदान विचार तरी करू शकेल.'.... ज्ञान भाषा आणि लोकभाषा एक झाल्याशिवाय समाजाचे जीवन समर्थ होत नाही, उन्नत होत नाही, विकसित होत नाही'... मराठी भाषेने मराठी मनाचा कस घेऊनच वाढले पाहिजे. तरच खऱ्या अर्थाने मराठी भाषा वाढेल. अधिकाधिक



उत्कर्ष पावेल.... भाषा ही विचाराच्या मागे येत असते. भाषेचे खरे सामर्थ्य विचार व्यक्त करण्यात आहे.'' त्यांचे वरील विचार कोपरगाव येथील के. जे. सोमय्या कॉलेजच्या पायाभरणी कार्यक्रमाच्या वेळी व्यक्त झाले आहेत. आपल्या भाषणांच्या माध्यमातून त्यांच्या मनातील विचार, माहिती, कल्पना, भावना आणि जाणिवांचे आदानप्रदान तदनुरूप भाषेद्वारे ते करत असत. अशी भाषणे ऐकणे हा एक वेगळ्या प्रकारचा आनंद असतो. तो मनाला उत्तेजित करत असतो.

## स्वागतशील भूमिका

लोकसंवाद हा यशवंतरावांचा सर्वांत आवडीचा विषय. त्यासाठी भाषणांद्वारे सदैव लोकांशी संपर्क साधणे त्यांना आवडत असे. लोकांचे प्रश्न जाणून घेणे, सभेत किंवा साहित्य मेळाव्यात त्या प्रश्नांना वाचा फोडणे, त्याद्वारे लोकांच्या अंतरंगाला हात घालणे, समाजाकडून पसंतीची दाद मिळवणे व त्यांच्या डोलणाऱ्या मानांच्या तालावर त्यांच्या मनात एखादा विचार रुजविण्याचे काम त्यांच्या अनेक भाषणांनी केले आहे. १९७५ साली कराड येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या स्वागतपर भाषणात ते म्हणतात, ''ज्ञानेश्वर, तुकाराम आणि कबीर भारतीय कवी आहेत असे मी मानतो. याचे कारण भारताच्या अंतरंगाचे दर्शन त्यांचे साहित्य घडवते. आधुनिक काळात शरच्चंद्र किंवा ह.ना. आपटे हे जसे राष्ट्रीय उष:कालाचे कादंबरीकार होते. तसेच आता राष्ट्रीय प्रबोधनाचे साहित्य निर्माण झाले पाहिजे.'' असा आशावाद ते व्यक्त करतात. दलित समाजातून आलेल्या नव्या दलित साहित्याचे ते स्वागत करतात. उच्चभ्रू साहित्याचे मानदंड लावून त्याला जोखणे त्यांना चुकीचे वाटते. ''म्हणून दलित साहित्याची भाषा कदाचित वेगळी असली तरी तिचा कस, तिच्यातील रग, जर नव्या मराठीत उतरली, तर ती हवीच आहे. पण यासाठी जाणकारांनी व सामान्य वाचकांनी स्वागतशील वृत्ती ठेवली पाहिजे.'' यशवंतरावांनी मराठी साहित्य हे संकुचित न राहता या साहित्याने सारे लोकजीवन व्यापले पाहिजे. बदलते विचारप्रवाह साहित्यात येणे आवश्यक आहे असे प्रतिपादन सातत्याने केले.

इ.स. १९६४ साली यशवंतरावांनी विदर्भ साहित्य संमेलनाचे उद्घाटनपर भाषण केले. 'वऱ्हाड-मराठवाड्याची ही भूमी मराठी भाषेची जननी आहे.' हे सांगून मराठी भाषेला येथेच अंकुर फुटले. या भूमीतच तिचे पालनपोषण झाले आणि एक स्वतंत्र भाषा म्हणून मराठी भाषेने नेत्रदीपक विकास केला असे स्पष्ट केले. या प्रसंगी ते म्हणाले, ''जनतेच्या स्वातंत्र्यासाठी, राष्ट्राच्या उत्थानासाठी आणि भारतीय जनतेच्या महान

महत्त्वाकांक्षा साकार करण्यासाठी संतांची वाणी, शिवाजीची ललकार, तसेच आगरकर, चिपळूणकर आणि टिळक अशा विचारवंत देशभक्तांचे विचार मराठी भाषेला न मिळते, तर आज मराठी साहित्य इतक्या उन्नत स्थितीत आढळले असते का?'' असा सवाल त्यांनी साहित्यिकांना केला. बुद्ध आणि महावीर यांच्या वाणीने लोकभाषेचे पंखच दिले असे सांगून संस्कृत भाषेचा विशाल तट ओलांडून प्राकृत आणि पाली या भाषा जैन आणि बौद्ध भिक्षुकांच्या मदतीने सर्व देशभर पसरल्याचे सांगतात. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम या संतांच्या जीवन साहित्याचा प्रतिध्वनी आजही लोकजीवनात उमटल्याचे ते स्पष्ट करतात, म्हणून मराठी साहित्य प्रदेशापुरते मर्यादित राहणार नाही याची दखल साहित्यिकांनी, लेखकांनी घेतली पाहिजे असा आग्रही विचार ते मांडतात.

यशवंतरावांनी मराठी भाषेबाबत व साहित्याविषयी ज्याप्रमाणे आपले स्पष्ट मत नोंदवले आहे त्याचप्रमाणे आपल्या राष्ट्रभाषेविषयीची भूमिका मांडली आहे. भारतामध्ये सध्या जवळपास २० भाषा अधिकृत प्रादेशिक भाषा म्हणून मानल्या जातात. अनेक बोलीभाषांचा वापर आज भारतात होतो. शिवाय प्रमाण भाषा आणि घटना बाह्य भाषा वेगळ्याच आहेत. एवढी भाषिक विविधता भारतात आढळते. प्रत्येक वर्षी १००० हून जास्त ग्रंथनिर्मिती त्या त्या भाषेत होत असते त्यामुळे भारत हे नाना धर्माचे, नाना जातीचे आणि विविध भाषा बोलणारे राष्ट्र आहे म्हणून स्वातंत्र्योत्तर काळात भाषावार प्रांतरचनेची निर्मिती झाली आणि वेगवेगळ्या भाषांना राजभाषेचा दर्जा मिळाला. या भाषिक श्रीमंतीचा जगातील इतर राष्ट्रांना हेवा वाटतो. पण संपूर्ण देशातील लोकांना समजू शकेल, देशातील संपूर्ण जनतेशी संपर्क ठेवू शकेल, अशा भाषेची आवश्यकता असते. अशी संपर्कभाषा किंवा राष्ट्रभाषा म्हणून यशवंतराव हिंदी भाषेकडे पाहतात. इतर सर्व भाषांपेक्षा राष्ट्रभाषेची जबाबदारी पेलण्याची क्षमता हिंदी भाषेत आहे. म्हणून बहुभाषिक राष्ट्रात एक दुसऱ्याचे विचार समजून घेण्यासाठी व देण्यासाठी या भाषेचे महत्त्व त्यांना अधिक वाटते. या भाषेमध्ये राष्ट्रीय ऐक्याची वाढ करण्याची ताकद आहे म्हणून हिंदीच्या प्रगतीबरोबर देशाच्या एकतेतही वाढ होईल असे त्यांना वाटते. आज कुठल्याही प्रांतिक भाषेपेक्षा हिंदी भाषिकांचे प्रमाण जास्त आहे. म्हणूनच या भाषेला राष्ट्रभाषेचा मान मिळाला आहे. तो टिकविण्यासाठी हिंदी साहित्यिकांना ते सांगतात,''परंतु त्याहीपेक्षा हिंदी भाषेतील शब्दसंपत्ती आज अशा प्रकारे वाढवली पाहिजे की, ज्यामुळे आधुनिक विचारप्रवाह, शास्त्रीय व तांत्रिक विषय आणि त्याचप्रमाणे राज्यकारभार यांची संपूर्ण गरज ती चांगल्या प्रकारे भागवू शकेल.'' हिंदी भाषा अधिकाधिक समृद्ध व विकसित होत गेली पाहिजे असे त्यांना वाटते. तसेच तिचा



प्रसार व प्रचार व्हावा. विज्ञानाची पुस्तके, माहिती या भाषेत यावी. ही भाषा संपन्न होण्यासाठी तिचा शब्दसंग्रह वाढावा. अन्य भाषेतील चांगले साहित्य हिंदीत अनुवादित व्हावे व हिंदीतील साहित्य इतर भाषेत अनुवादित व्हावे. त्यामुळे विचारांचे व आचारांचे दळणवळण वाढते. या विचारांच्या आदानप्रदानातून भाषा समृद्ध होते. तसेच अशा प्रकारच्या साहित्य निर्मितीतून साहित्य एकात्मता निर्माण होईल. राष्ट्रीय ऐक्याची वाढ होईल असा विश्वास ते मुंबई प्रांतिक राष्ट्रभाषा प्रचार सभेच्या २२ व्या पदवीदान समारंभाच्या वेळी व्यक्त करतात.

## भाषा व संस्कृती

यशवंतरावांनी मराठी भाषेवर जेवढे प्रेम केले तितकेच त्यांनी इंग्रजी, हिंदी या भाषाभगिनीवरही प्रेम केले. या भाषेतील शक्तिस्थाने आणि सौंदर्यस्थाने यांची त्यांनी ओळख करून घेतली. एकात्मिक भावनेच्या दृष्टीने त्यांनी या भाषांकडे पाहिले. अनेक भाषा एक संस्कृती असा विचार देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. भाषेच्या माध्यमातून आपण एकमेकांच्या जवळ आले पाहिजे. या भाषेच्या माध्यमातून संपूर्ण भारताचे ज्ञान समाजाला व्हावे. इतर भारतीय भाषांतील गुणसंपन्न साहित्याचा परिचय व्हावा आणि वाङ्मयविषयक जाणिवा समृद्ध व्हाव्यात असा त्यांचा या भाषेबाबत दृष्टिकोन होता. 'आसामी'सारखी भाषा येत नसली तरी ती भारतीय भाषा आहे. म्हणून ती आपली सर्वांची भाषा आहे असे सर्वांना वाटले पाहिजे. म्हणजे भाषिक तंट्याचे मूळ निघून जाईल. भारताचा सांस्कृतिक विकास भाषिक समाजांच्या कर्तृत्वाने होऊन धर्म, भाषा, प्रदेश यांची भिन्नता व विविधता हे आपल्या राष्ट्रजीवनाचे वादातीत प्रश्न नाहीसे होतील असा त्यांना विश्वास वाटतो. सर्व भारतीयांच्या मनात सर्व भाषांविषयी व सर्व भाषिक प्रदेशांविषयी ममत्व निर्माण झाले पाहिजे. असे झाले तर बहुभाषी भारत हा शाप न ठरता तो वैभवशाली होईल असा आशावाद ते व्यक्त करतात. ''मराठीच्या अभ्यासाबरोबर राष्ट्रभाषा म्हणून सर्व भाषांची मायभाषा व आपल्या प्राचीन संस्कृतीची भाषा म्हणून संस्कृत व आंतरराष्ट्रीय व्यवहाराची भाषा म्हणून इंग्रजी या भाषेचा अभ्यास करणे आपल्याला आवश्यक आहे. इतिहासाने इंग्रजी भाषेशी जो घनिष्ठ संबंध आला त्यामुळे इंग्रजी भाषा आपल्याला परकी राहिली नसून तिने आपले फार मोठे हितच साधले आहे. कारण ज्ञानाची अपार भांडारे इंग्रजीने आपल्याला खुली केली आहेत व त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय व्यवहार सुलभ केला आहे.'' म्हणून अलीकडच्या काळात भाषेला मर्यादित स्वरूपात बंदिस्त न ठेवता या सर्व भाषांचा अभ्यास झाला पाहिजे. विज्ञानाच्या क्षेत्रात मूलभूत संशोधन इंग्रजी सारख्या भाषेतून झाले आहे. हे आपणास

नाकारता येत नाही. म्हणून केवळ इंग्रजी भाषिकच इंग्रजी शिकतात असा समज न होता सर्व जगातील लोकांना विज्ञानाच्या क्षेत्रामध्ये प्रगती करावयाची असेल तर त्यांना इंग्रजी भाषेच्या अभ्यासाची नितांत गरज आहे. यशवंतराव सांगतात, ''आता वैज्ञानिक, औद्योगिक आणि तांत्रिक विषयांवरील ग्रंथरचना यांना आमच्या शिक्षणात आणि साहित्यात एक उपयोगी अंग म्हणून विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. असे जरी असले तरी ज्याला आम्ही अक्षरवाड्मय म्हणतो, त्याची प्रत ह्या सर्वांपेक्षा भिन्न असते. असे साहित्य मानवाच्या मूलभूत सद्भावनांना आवाहन करते आणि मानवाला जीवनसंघर्षासाठी समर्थ बनवते. अशा साहित्यामुळे समाज नित्य प्रगतीला अभिमुख राहतो.'' असा निर्वाळा ते देतात. म्हणून मराठी भाषांबरोबर अन्य भाषेचाही अभ्यास व्हावा. कारण प्रत्येक भाषेला एक कुलशील असते. त्याची ओळख आपल्याला असणे गरजेचे आहे. ही जाण असेल तर त्या त्या भागातील नवे वाड्मयीन प्रवाह कोणते? नव्या सामाजिक व वैचारिक चळवळी केव्हा सुरू झाल्या ? कोणत्या साहित्यिकांचा आणि कलावंतांचा प्रभाव जनमानसात आहे? याची जाणीव किंवा माहिती होईल व यातून राष्ट्रीय मानसिकता निर्माण होऊन त्या प्रदेशाबाबत जवळीकता निर्माण होण्यास मदत होईल. थोडासा निर्धार, स्वाभिमान, काळजीपूर्वक केलेली आखणी यांच्या आधारे मानवाचे भाषाभान समर्थ होईल व राष्ट्रीय ऐक्याचे बोल तो बोलत राहील असे त्यांना वाटते.

## लोकभाषा हीच ज्ञानभाषा व्हावी

यशवंतराव चव्हाण यांनी एके ठिकाणी असे म्हटले आहे की ''माणसाने भाषा निर्माण केली आता भाषेला माणसे निर्माण करावी लागणार आहेत.'' एकूणच भाषेची संपन्नता वाढावी अशी सूचना ते येथे व्यक्त करतात. कुठलीही भाषा ही ताठर झाली तर व्याकरणांच्या नियमांनी बंदिस्तपणा येण्याची शक्यता असते. मग तिचे डबके होते. प्रवाह थांबतो. तेव्हा भाषा सर्वसामान्य माणसांना समजावी, आकलन व्हावी, म्हणून ती सोपी करण्याकडे कल असावा. संस्कृतप्रचुर बोजड शब्द टाळावेत. बोलीभाषा भाषेचे साचलेपण फोडीत असते, मुक्त करीत असते. बोलीभाषेतील शब्द आले तर ती भाषा सामान्य लोकांना आपली वाटते. म्हणून प्रादेशिक भाषा देवनागरी लिहिण्यास वाढत्या प्रमाणात उत्तेजन मिळावे. असे झाले, ''तर भाषिक प्रश्नांचा पूर्ण कायापालट होऊन जाईल. आपल्याला अलग ठेवणाऱ्या अनेक भिंती त्यामुळे जमीनदोस्त होऊन तुटकपणाचे बांध वाहून जातील आणि भाषाभाषांमध्ये देवाणघेवाण सुरू होऊन सर्व भाषा समृद्ध बनतील.'' असा विचार त्यांनी औरंगाबाद येथे अखिल भारतीय राष्ट्रभाषा

प्रचार समितीच्या वार्षिक अधिवेशनाच्या वेळी मांडला. एवढेच नव्हे तर त्या त्या राज्यात असणाऱ्या लोकांची जी भाषा असेल तिचा तेथील शासनाचे, शिक्षणाचे व दैनंदिन व्यवहाराचे माध्यम म्हणून वापर झाला पाहिजे. अन्यथा लोकशाही शासन हे केवळ नावापुरतेच राहील व लोकशाहीचा आत्माच हरवून बसेल असा संकेतही ते देतात.



'मराठीचे सर्वसंग्राहक स्वरूप' या विषयावर विदर्भसाहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी केलेले भाषण हे त्यांची साहित्यविषयक भूमिका स्पष्ट करणारे आहे. साहित्य आणि प्रादेशिकता, मराठीवर इतर भाषेचा झालेला प्रभाव, भाषेचा विकास, भाषेच्या स्वरूपाचा मराठी साहित्यावरील प्रभाव, मराठी साहित्याला उन्नत स्थितीप्रत नेणारे साहित्य, संतांच्या वाणीचा प्रभाव, साहित्य हा समाजाचा आरसा आहे अशा कितीतरी विषयावर त्यांनी चिंतन विचार मांडले. हे चिंतन त्यांनी सहृदयतेने केले आहे. या विषयीचा त्यांचा व्यासंग, मौलिक विचारांची त्यांची झेप, आणि भाषाशैलीचे सामर्थ्य या विविध गुणांनी त्यांचे वक्तृत्व बहरलेले असे. त्यामुळे यशवंतरावांची भाषणे वाचली की अधिकच विलोभनीय वाटतात. यशंवतरावांची मराठी भाषा अगदी निर्मळ व बिनचूक आहे. तिच्यात जुनेपणाही दिसतो व आधुनिक विचारही विपुल दिसतो. मुख्य म्हणजे ती एका साहित्यिकाची भाषा आहे याचा प्रत्यय वारंवार येतो. यशवंतराव साहित्याला विशाल सागराचा एक महत्त्वपूर्ण अंश समजून मराठी साहित्याच्या सागराचे रूप स्पष्ट करतात. सागरातील विशाल लाटा तटांवर आदळून एका तटाचा विशेष संदेश दुसऱ्या तटावर नेऊन पोहोचवतात, त्याप्रमाणे भारतीय साहित्यातही उमटलेला प्रतिध्वनी एका प्रदेशापुरता मर्यादित राहत नाही. तर त्याचा प्रतिध्वनी सर्व देशात उठतो. प्रत्येक लाटेला सौंदर्य आहे. स्वतंत्र अस्तित्व आहे. या सर्व लाटांचा समावेश शेवटी त्या महासागरातच होतो. या लाटा साहित्याला नवीन स्वर देत असतात व त्यातून भारतीय साहित्याचे मधुर संगीत निर्माण होते. या संगीताची आवश्यकता सांगताना ते म्हणतात, ''आजच्या युगात, आम्हाला अशा संगीताची आवश्यकता आहे, जे एकतेच्या तालावर आम्हाला निरनिराळ्या स्वरात गाता येईल. भाषांच्या ह्या स्वरात एक नवे चैतन्य असेल, एक नवे आवाहन असेल आणि एक नवा संदेश असेल. त्यातून आम्हाला नवी शक्ती, नवी प्रेरणा आणि नवी स्फूर्ती मिळेल. असे झाल्यास जीवनात नवे चैतन्य निर्माण होईल आणि भारतातील प्रत्येक भाषा सजीव राहील.'' असा भाषिक एकतेचा विचार मांडतात. या त्यांच्या वक्तृत्वाचे खरे सामर्थ्य त्यांच्या विचारसरणीच्या स्वच्छपणात होते हे यावरून स्पष्ट होते. तसेच त्यांची वाक्यरचना, उच्चार आणि कल्पकता या

गुणांनी ते सामर्थ्य द्विगुणित होते. आपल्या भाषाविलासाने ते श्रोत्यांना घटका न् घटका गुंग करून सोडीत. कधी कल्पना विलासाच्या माध्यमातून श्रोत्यांच्या बुद्धीला पटवून देण्यासाठी काव्यात्मकतेचा उपयोग ते करतात. यशवंतरावांचे वक्तृत्व म्हणजे म. गांधी, लो.टिळक, पं. नेहरू, साहित्य सम्राट न.चिं. केळकर, शिवरामपंत परांजपे, स्वा. सावरकर यांसारख्या कसबी व्याख्यात्यांच्या बरोबरीचे वक्तृत्व होते. संयमी, संस्कारित प्रसंगोचित व लालित्यपूर्ण आविष्कार त्यांच्या भाषणातून पाहावयास मिळतो. लोकांच्या हृदयात हळुवारपणे स्थान निर्माण करणारा एक सृजनशील विचारवंत, लोकात आत्मविश्वास, स्वाभिमान, जिद्द निर्माण करणारा मधुर वाणी असलेला लोकनेता या नात्याने संपूर्ण भारतात त्यांनी लौकिक मिळवला. उत्तम वक्तृत्व, भाषेवर प्रभुत्व, लाघवी भाषा, आवश्यक तो सभाधीटपणा, कौशल्यपूर्ण समर्थन, सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची वृत्ती, असंतोष पेटू न देता त्यातून सामंजस्य निर्माण करणारी नीती, इच्छा स्वातंत्र्याला, वृत्ती स्वातंत्र्याची जोड देण्याची प्रवृत्ती इ. गुणसामर्थ्यामुळे ते त्यावेळी लोकनायक बनले. या गुणवत्तेमुळे त्यांचे भाषण स्वपक्षीय, विरोधक, अपक्ष, साहित्यिक, बुद्धिवादी पत्रकार सारख्याच तन्मयतेने ऐकत. 'संस्कृती' या विषयावर बोलताना भारतीय संस्कृतीचे सनातनत्व, या संस्कृतीची पारंपारिक वैशिष्ट्ये, मूळ संस्कृतीचे उदात्त स्वरूप इ. मुद्द्यांना स्पर्श करत ते विवेचन करत. साहित्य निर्मितीलाच ते एक सांस्कृतिक कार्य आहे असे म्हणत. ललित साहित्याची निर्मिती हा एक सांस्कृतिक आविष्कारच असतो. या संस्कृतीला नाकारून सकस साहित्य आपणास निर्माण करणे अशक्य आहे. भारतीयत्वाचा गाभा असणाऱ्या संस्कृतीला छेद न जाणारे साहित्य निर्माण झाले पाहिजे. सकस साहित्यच संस्कृतीला चांगुलपणा आणते अशी साहित्य व संस्कृतीबाबतची त्यांची ठाम भूमिका होती, तीच त्यांनी अनेक व्यासपीठावरून मांडली.

## वक्ता दशसहस्त्रेषु

यशवंतरावांच्या जवळ वक्त्याला लागणारे सर्व गुण होते. अतिशय गोड आणि प्रभावी आवाज, भरपूर विषयांचे ज्ञान, बोलण्याची गती आणि मुद्रेवरील गांभीर्य कमी-अधिक प्रमाणात वाढविण्याचे कौशल्य आणि मराठी भाषेवरील पट्टीचे प्रभुत्व या गोष्टींमुळे त्यांचे व्याख्यान म्हणजे श्रोत्यांना एक आनंद पर्वणीच असे. श्रोते कितीही असले तरी ते आपल्या भाषणाला सुरुवात इतक्या घरगुती पद्धतीने करत असत की सभेला एका कौटुंबिक संमेलनाचे स्वरूप येत असे. त्यामुळे वक्ता आणि श्रोता इतके एकजीव होऊन जात की वक्ता जे जे म्हणून काही सांगेल ते ते रसिकतेने ऐकून घ्यावयाची श्रोत्यांची तयारी असे. त्यामुळे कोणत्या प्रसंगी काय बोलावे किंवा



काय सांगावे याचे यशवंतरावांना अवधान होते. त्यांची साधी, सरळ, ओघवती भाषा, दैनंदिन व्यवहारातील उदाहरणे, महनीय विचार यामुळे त्यांच्या भाषणांची श्रोत्यांवर छाप पडे.

यशवंतराव समाजातील सर्व थरांतील मंडळींबरोबर समरस होत. पत्रकार, व्यावसायिकांशी व प्रसार माध्यमांशी ज्यांचे संबंध होते अशा मंडळींचेही त्यांनी प्रेम संपादन केले होते. लोकशाहीतील या चौथ्या आधारस्तंभांबद्दल त्यांना नेहमीच सहानुभूतीपूर्वक आदर होता. २३ सप्टेंबर १९६४ रोजी दिल्ली येथे हिंदी पत्रकार परिषदेसमोर मराठी वृत्तपत्रांचे स्वातंत्र्यलढ्यातील कार्य या विषयावर त्यांनी भाषण केले. या भाषणामध्ये वृत्तपत्रांचा जन्म व ऐतिहासिक महत्त्व विशद केले. 'दर्पण', 'ज्ञानप्रकाश', 'केसरी', 'सुधारक', 'संदेश', 'बहिष्कृत भारत', 'समता' यांसारख्या वृत्तपत्रांनी राष्ट्रीय स्वातंत्र्य व समाजसुधारणा करण्यासाठी केलेल्या कार्याचा उल्लेख केला. शिवाय त्या त्या प्रमुख संपादकांची विचारसरणी व त्यांनी केलेली महत्त्वाची कामगिरी स्पष्ट केली. त्यांनी समाजाच्या विचारधनात उत्तम रीतीने घातलेली भर याचा यशवंतरावांनी गौरवपूर्ण उल्लेख केला. या संबंधी ते म्हणतात,''सुबुद्ध मराठी समाजाच्या वैचारिक घडणीचे कार्य या काळात वृत्तपत्रांनी केले. या काळात अनेक वाद निर्माण झाले, पण त्यामुळे वैचारिक सहिष्णुता वाढली. ही सहिष्णुता व राजकीय जागरूकता लोकशाही रुजविण्यासाठी आवश्यक असते. हे कार्य मराठी पत्रांनी केले. वृत्तपत्रांना आणखीही एका दृष्टीने महाराष्ट्रात महत्त्व आहे. त्यांनी ज्ञानाच्या खिडक्या उघडल्या. त्यातून पुरोगामी विचार समाजापुढे आले. वैचारिक, आर्थिक, सामाजिक विचारांची मूलभूत चर्चा त्यांनी केली.'' वृत्तपत्रे ही लोकशिक्षणाचे कार्य करतात. समाज जागृती करतात. लोकांना राष्ट्रउत्थापनासाठी कार्यप्रवण करतात असे वृत्तपत्रांचे महत्त्व यशवंतरावांनी विशद केले.

यशवंतरावांनी सरकारी प्रसिद्धी व संपर्क अधिकाऱ्यांसमोरही प्रचार आणि माहितीचे महत्त्व सांगितले. त्यावेळी यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. प्रसिद्धी सहाय्यक परिषदेच्या उद्घाटनाच्या वेळी प्रसिद्धी ही कला आणि शास्त्र आहे असे सांगून आपली माहिती सत्यावर आधारलेली असावी, आपल्याकडे नि:संदिग्ध मन व स्वच्छ विचार असले पाहिजेत, लोकांना समजून घेतले पाहिजे. प्रसिद्धी हे दळणवळणाचे उत्तम साधन आहे. समाजाची बांधणी करण्यास त्याचा उपयोग होतो. राष्ट्रकार्यात सहभागी होण्यास उपयुक्त अशी माहिती व कल्पना समाजापर्यंत गेल्या पाहिजेत. प्रसिद्धी अधिकाऱ्यांचे वर्तमानपत्रांशी व वृत्तसंस्थेशी संबंधाबाबत ते बोलतात,''वृत्तसंस्थेशी संबंध ठेवताना आपण ही गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे की आपण ज्यांच्या हातात शब्दसामर्थ्याची

सत्ता आहे अशा चाणाक्ष लोकांशी काम करीत आहोत; आणि जगात शब्दांसारखी सत्ता कशातही नाही. शब्द हे कदाचित ॲटम बॉम्बपेक्षाही अधिक प्रभावी असतील, शब्द कोणत्याही गोष्टींची उलथापालथ करू शकतात. शब्दांनी क्रांत्या निर्माण केल्या आहेत आणि कदाचित ॲटम बॉम्बची उत्पत्तीसुद्धा शब्दांतूनच झाली असेल; मी तुम्हाला शब्दांचे महत्त्व सांगत बसत नाही कारण तुम्ही शब्दसृष्टीचे राजे आहात हे गृहीत आहे; परंतु ज्यावेळी तुम्ही वृत्तसंस्थेशी संबंध ठेवाल त्यावेळी एक गोष्ट विसरू नका की ज्यांचे शब्दरचनेवर प्रभुत्व आहे व ज्यांना शब्दांची कसरत करता येते अशाशी तुम्ही आपले काम करीत आहात, म्हणून तुम्हाला फार सावधगिरी बाळगली पाहिजे. ज्यावेळी त्यांच्याकडे जाल त्यावेळी मोठ्या कलात्मक रीतीने तुम्ही तुमचे काम केले पाहिजे.'' असा सल्ला ते प्रसिद्धी प्रमुखांना देतात. यशवंतरावांचे हे बोलणे सतत ऐकत राहावे असेच आहे. भाषेला ते उगीच नटवत नाहीत. एखाद्या वाहत्या झुळझुळ झऱ्याप्रमाणे आपले स्वच्छ व प्रवाही विचार ते सांगतात. सार्वजनिक जीवनामध्ये त्यांनी अनेक पत्रकारांशी प्रेमाचे संबंध ठेवले. अनेक पत्रकारांच्या टीकेला त्यांना सामोरे जावे लागले. पण त्या टीकेने विचलित न होता त्यापासून बोध घेऊन ते आपल्यात सुधारणा करत असत. त्यांच्याशी वादविवाद न करता त्यांच्याशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित करत. असाच समंजसपणाचा सल्ला त्यांनी प्रसिद्धी प्रमुखांना दिला आहे.

यशवंतराव हे जेवढे विचारशील व भावनाप्रधान व्यक्तिमत्त्व होते तितकेच विज्ञाननिष्ठ होते. विज्ञान म्हणजे नुसते ज्ञान नव्हे तर एका विशिष्ट पद्धतीने करून घेतलेले ज्ञान आहे. निरीक्षणाने, निरनिराळे व वारंवार प्रयोग करून एखाद्या विषयाचा सुसंगत अभ्यास करून, सर्व तऱ्हेच्या कसोट्या लावून, जे ज्ञान तर्कशुद्धपणे मांडले जाते त्यास विज्ञान असे म्हणता येईल. थोडक्यात आपल्या भोवतालचे विश्व जाणून घेण्याचा आणि त्याला अंकित करण्याचा प्रयत्न म्हणजे विज्ञान. विज्ञान हे आधुनिक काळातील संजीवनी विद्या आहे. आणि अशाच संजीवनीची भारताला गरज आहे. विज्ञानवादी दृष्टिकोन असलेले आधुनिक मन भारताला हवे. हे मन स्थितिशील राहत नाही. ते चौफर पाहते. विज्ञान म्हणजे भौतिक सुखे निर्माण करणारी शक्ती आहे. सामाजिक परिवर्तनात त्याचा फार मोठा उपयोग होईल असे यशवंतराव म्हणतात. मानवी गरजा पूर्ण करण्याची निकड निर्माण झाली की, विज्ञान आणि तंत्रज्ञानात प्रगती होते. विज्ञानवादी लोकांच्या समोर बोलताना ते म्हणतात, बुद्धिमंतांना समाजाशी समरस होऊन विज्ञानवादी चळवळ चालवावी लागेल. म्हणून साहित्य व वृत्तपत्र चळवळीकडे लक्ष द्यावे लागेल. शेतकरी व कामगार



यांच्यावर विज्ञानाचे संस्कार करणारे वाङ्मय निर्माण करणे ही आजची गरज आहे. मराठीत विज्ञान वाङ्मय निघू लागले आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. असे विचार यशवंतरावांनी ७ डिसेंबर १९६८ रोजी भरलेल्या विज्ञान परिषदेच्या अध्यक्षीय भाषणाच्या वेळी व्यक्त केले.

भाषण रंगवणे हे फक्त वक्त्यावरच अवलंबून नसते. ते बऱ्याच वेळा श्रोत्यांवर ही अवलंबून असते. यशवंतरावांचे प्रत्येक भाषण हे एक नवीन काही तरी देणारे आहे. अशी भावना श्रोत्यांत असे. यशवंतराव काय बोलणार याची जशी श्रोत्यांना उत्सुकता असे तेवढीच उत्सुकता एक वक्ता म्हणून यशवंतरावांना असे. यशवंतरावांची सर्वच भाषणे उत्तम होतील काय अशी साशंकता एखाद्या वेळी निर्माण होत असे. कारण एका राजकीय पक्षाचे पुढारी म्हणून त्यांच्यावर शिक्का होता. अशा वेळी हेतुपुरस्सर दंगल घडवून आणणे, सभा उधळून लावणे, गोंधळ घालणे असे काही प्रकार त्यांच्या काही भाषणांच्या वेळी झाले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या वेळचे अनेक प्रसंग बोलके आहेत. त्यांच्या जीवनात असे अनेक आणीबाणीचे प्रसंग आले. त्यावेळच्या सार्वजनिक जीवनात काही काँग्रेस विरोधी चळवळी काम करीत होत्या. त्या चळवळींनी काही वेळा यशवंतरावांना लक्ष्य केले पण त्यांच्या कर्तृत्वाने व आपुलकीच्या मार्दवी बोलण्याने अनेकांना त्यांनी आपलेसे केले. इ.स. १९७४ डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात अखिल भारतीय साहित्य संमेलन इचलकरंजी येथे संपन्न झाले. या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष पु.ल. देशपांडे हे होते. राजकारण्यांनी व्यासपीठावर येऊ नये असा वाद त्यावेळी उत्पन्न झाला. पण केंद्रीय मंत्री असतानासुद्धा यशवंतराव न संकोचता एक श्रोता म्हणून व्यासपीठासमोर बसले आणि त्यांनी साहित्यसंमेलनाचा मनापासून आस्वाद घेतला. पुढे एक वर्षाच्या कालावधीनंतर १९७५ मध्ये आणीबाणीच्या दिवसात श्रीमती दुर्गा भागवत यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय साहित्य संमेलन कराड येथे झाले. त्यावेळी या संमेलनाचे स्वागताध्यक्ष केंद्रीय मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण होते. लेखन स्वातंत्र्याच्या बंदीमुळे अनेक बुद्धिवादी मंडळी विरोधात होती. अनेक निषेधाची भाषणे व आणीबाणीतील तणाव पचवून त्यांनी त्यावेळी निखळ साहित्यिक भाषण केले व संमेलन यशस्वीपणे पार पडले. यावेळी स्वागतपर भाषणाच्या विरोधकांचा विरोध पचवून त्यांनी भाषण केले. या भाषणाच्या शेवटी सर्वांना उद्देशून अतिशय विनम्रपणे आपले मत सौम्यपणे मांडले. भाषणास उपहासाची झालर असून अतिशय गंभीरपणे त्यांनी आपले विचार पुढीलप्रमाणे मांडले, ''प्राचीन काळी तपस्व्यांच्या आश्रमात शिरताना राज्यकर्ते आपली

राजचिन्हे काढून साध्या वेषात जात असत. तसेच शारदेच्या उपवनात येताना भारत सरकारच्या मंत्रिपदाची बिरूदावली मी बाहेर ठेवून आलो आहे. माझ्या मातृभाषेवर उत्कंठ प्रेम करणारा एक मराठी माणूस म्हणून मी इथे आलो आहे. आमचा पाहुणचार भाजी भाकरीचा असला तरी तो भावमंत्रित आहे, जिव्हाळ्याचा आहे, सकस आहे हे ध्यानात असू द्या. तो तुम्ही गोड करून घ्यावा.'' वाक्यरचनेतील नेमका भावार्थ श्रोत्यांच्या अंत:करणाला भिडत असे. समयसूचकता, स्वत:च्या मताबद्दलची दृढता, आणि प्रतिपक्षाला उपहास, उपरोध व मार्मिक शब्द योजनेच्या जोरावर चारी मुंड्या चीत करण्याचे विलक्षण कौशल्य, हे सारे गुण त्यांच्या भाषणात ठायी ठायी दिसतात. याच्या जोडीला व्यक्तिमत्वाचे आकर्षण जे म्हणतात ते या बुद्धिमान, चतुर, संघटनकुशल आणि अभ्यासू वृत्तीच्या नेत्याच्या ठिकाणी फार प्रकर्षाने होते.

यशवंतरावांनी विविध विषयांवर चिंतनशील वृत्तीने भाषणे दिली. या भाषणांनी वैचारिक ललित निबंधाचा दर्जा प्राप्त केला आहे. ही भाषणे खाजगी बैठकीतील, जाहीर सभेतील किंवा एखाद्या नियोजित विषयावरील दिलेले व्याख्यान इ. स्वरूपाची आहेत. भाषणे, चर्चासत्र, परिसंवाद, मुलाखती, सत्कारसमारंभ, शिबिरे, मेळावे, शोकसभा, साहित्य संमेलने इ. प्रसंगी दिलेली आहेत. या भाषणातून त्यांचे सखोल वाचन, मनन आणि चिंतन यांचे प्रतिबिंब पाहावयास मिळते. साहित्य, शिक्षण, माणूसकीची उभारणी, श्रमशक्ती, संस्कृती, कृषी औद्योगिक धोरण, सहकार, विज्ञान संगीत, शेती, संरक्षण, अर्थ, परराष्ट्र धोरण, सामाजिक तत्त्वज्ञान, राजकारण, यांसारख्या असंख्य विषयांत त्यांचे विचारपूर्वक व्यक्त केलेले चिंतन पाहावयास मिळते. भाषाप्रभू यशवंतराव हे शब्दांच्या अचूक फेकीने श्रोत्यांच्या मनाचा वेध घेताना दिसतात. या भाषणांतून महाराष्ट्राच्या लोकजीवनाचा आणि लोकसंस्कृतीच्या उन्नयनाचा विचार मांडला. वैचारिक, साहित्यिक व सांस्कृतिक धनामुळे देश ओळखला जातो असा दाखला ते देतात. आपल्या भाषणांच्या माध्यमातून त्यांच्या मनातील विचार, माहिती, कल्पना, भावना आणि जाणिवांचे आदानप्रदान तदनुरूप भाषेद्वारे ते करत असत. त्यामुळेच लोकसंवाद हाच त्यांच्या आवडीचा विषय बनला.

प्रकरण ७

# शैक्षणिक व सामाजिक आशयनिष्ठ भाषणे



निबंध हा मराठी वाङ्मयप्रकार आधुनिक काळात साधारणत: इ.स. १९२६-२७ च्या जवळपास उदयाला आला. इतर वाङ्मयप्रकारांप्रमाणे हाही वाङ्मयप्रकार इंग्रजीतून मराठीत आला. या प्रकारात एखाद्या विषयासंबंधी स्पष्टीकरणात्मक, विवरणात्मक लेखन केले जाते. किंवा एखाद्या विषयासंबंधी माहितीपूर्ण केलेले विवेचन म्हणजे निबंध असेही म्हणता येईल. अशा स्वरूपाच्या लेखनात मतप्रसार, चर्चा, मत प्रतिपादन, माहिती विवरण, विवेचन, खंडन-मंडन इ. विविध अंगे असून निष्कर्ष काढणे व मांडणे यासारखे विविध उद्देश असतात. निबंध म्हणजे नियमांनी बद्ध असणारा लेख किंवा ज्याच्यामध्ये विषय गोवला आहे अशी रचना, असा हा मराठी गद्याचा एक उपप्रकार आहे.

निबंधात तर्कशुद्ध पद्धतीने, बुद्धीला आवाहन करणारी मते मांडली जातात. तसेच कल्पना, भावना आणि विचार यांचा स्वप्रकृतीप्रमाणे स्वच्छंद विलास निबंधात केला जातो. त्याचप्रमाणे कथित विचारांची साधार व समप्रमाणात मांडणी केली जाते. तेव्हा इतिहास, अनुभव व अवलोकन यांच्या आधारावर अशा विचारप्रधान वाङ्मयाची निर्मिती होते. म्हणून 'निबंध' हा वाङ्मयप्रकार मनोरंजनाशी कधीच निगडीत नव्हता. विचारांचे वेगवेगळे पैलू प्रकट करून वाचकांच्या जीवनदृष्टीला प्रगल्भता आणण्यासाठी निदान त्यांना विचार प्रवृत्त करण्यासाठी निर्माण झालेला हा वाङ्मयप्रकार आहे.'' असे डॉ. निर्मलकुमार फडकुले यांनी निबंधाबाबत आपले मत नोंदविले आहे. अशा या वाङ्मयात माहितीपर, वर्णनात्मक, निरूपणात्मक किंवा विवरणात्मक, वैचारिक, समीक्षात्मक, विश्लेषणात्मक अशा कितीतरी रूपांचे मिश्रण असू शकते.

निबंध हा लिखित स्वरूपातील वाङ्मयप्रकार असला तरी निबंधाच्या व्याख्यांत यशवंतरावांची भाषणे चपखलपणे बसतात. कारण जसे निबंधाचे स्वरूप 'कोणालातरी उद्देशून बोलण्यासारखे' असते किंवा वाचकाला उद्देशून लेखक बोलत असतो, विचार सांगत असतो, तसे यशवंतराव हे सुद्धा श्रोत्यांना व समाजाला आपले विचार सांगतात.

निबंधात, आत्माविष्कारापेक्षा विचार प्रकटीकरणाला अधिक महत्त्व असते. यशवंतरावांच्या भाषणातूनसुद्धा 'विचारप्रकटीकरण' हा मुख्य मुद्दा व्यक्त झाला आहे. त्यामुळे या अर्थाने यशवंतरावसुद्धा मराठी साहित्यातील 'निबंधकार' ठरतात. त्यांचे निबंध साहित्य वाचताना मुळात ही भाषणे होती याची आठवणही वाचकाला येत नाही. म्हणून या भाषणांना निबंधाचा दर्जा प्राप्त झाला असे म्हणता येईल. कारण यशवंतरावांच्या वक्तृत्वशैलीत दिसणारे गुण हे निबंध लेखनासही आवश्यक असतात. उदा. आरंभ, प्रस्तावना किंवा सुरुवात, विषयाची व्याप्ती स्पष्ट करणे, विषयाचे उद्दिष्ट सांगणे, मुख्य विषयाचे विवरण करणे व त्याचे विभाग पाडणे, विषयाला पूरक असे मुद्दे उदाहरणांसह मांडत जाणे, विषयाच्या अनुरोधाने घेतल्या जाणाऱ्या संभाव्य आक्षेपांचे खंडन करणे, आणि शेवटी निष्कर्ष काढणे. इत्यादी साम्यस्थळे दाखविता येतील. शिवाय अवतरणे, वचने, कथा, दंतकथा, इतिहासातील दाखले, विनोद, आख्यायिका यांचाही वापर निबंध व वक्तृत्वात केला जातो. साधारणत: १९५० नंतरच्या निबंधाच्या व वक्तृत्वाच्या स्वरूपात वरील मुद्द्यांचा अंतर्भाव केलेला दिसतो. मुळात वक्तृत्व शास्त्राच्या शैलीचा प्रभाव निबंध रचनेवर झालेला आढळतो. याचे कारण असे असावे की, वक्तृत्वाला महत्त्व देणारी ग्रीकांची लोकशाही राज्यव्यवस्था जेव्हा इंग्लंडने स्वीकारली तेव्हा विचारांच्या तर्कशुद्ध, मुद्देसूद व सुस्पष्ट मांडणीला प्राधान्य मिळाले. यातूनच निबंध या वाङ्मयप्रकाराला बहर आला असावा. विशेषत: इंग्लंडमध्ये सतराव्या शतकाच्या उत्तरार्धानंतर भाषणस्वातंत्र्याची संकल्पना दृढमूल झाली. संसदेतील भाषणांवरील निर्बंध उठले व ती भाषणे प्रभावी ठरू लागली. तसतसे वक्तृत्वशैलीतील मुद्देसूद मांडणीचे गद्यलेखन प्रभावी ठरू लागले. यशवंतरावांच्या या स्वरूपाच्या लेखनातसुद्धा मुद्देसूद मांडणी, अंत:करणाला भिडणारी भाषा, राजकीय दूरदृष्टी यांचा संगम दिसतो.

## चैतन्यदायी विचार

यशंवतरावांनी देशातल्या दारिद्र्याच्या दृष्टीने किंवा देशाच्या प्रगतीच्या दृष्टीने अशा स्वरूपाच्या लेखनात अंतर्मुख होऊन विचार केला आहे. केवळ आत्माविष्कारासाठी विचारप्रकटीकरण हा हेतू न ठेवता संवेदनशील वृत्तीने सामाजिक, राष्ट्रीय भावनांनी भरलेले विचार ते मांडतात. एवढेच नव्हे तर मानवी जीवनाचे जिव्हाळ्याने केलेले चिंतन व त्यातून निर्माण झालेला विचारविलास असेच त्यांच्या निबंधाचे स्वरूप आहे. ग्रामीण जीवन पद्धती, विविध स्तरांवरील सुसंस्कृत व्यक्तींचा सहवास या सर्वांचा संस्कार त्यांच्या निबंधशैलीवर दिसतो. त्यांच्या या स्वरूपातील भाषणातील विचार



महाराष्ट्राचे विचारधनच आहे. ते सर्वांना मार्गदर्शक व प्रेरक ठरतील ही या निबंधलेखनाची सर्वात मोठी उपयुक्तता आहे. या निबंधलेखनात मराठी माणसाने पाहिलेल्या उज्ज्वल भवितव्याच्या स्वप्नपूर्तीसाठी प्रेरणा देणारा विचार मांडलेला आहे. राष्ट्राची उभारणी करण्याचा एकंदरीत मनोदय या ठिकाणी त्यांनी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे मानवतावादी जीवननिष्ठा आणि कार्यप्रवणता यांचा संदर्भ या निबंधांना लाभलेला आहे. या दृष्टीने ललित निबंधाची प्रवृत्ती घेऊन येणाऱ्या त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक विषयांवरील भाषणसाहित्याचा विचार प्रस्तुत ठिकाणी अपेक्षित आहे.

यशवंतरावांनी स्वातंत्र्योत्तर काळात मराठी माणसांची दुर्बल व आत्मनिर्भत्सनेची मानसिक अवस्था दूर करण्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यात जाऊन भाषणांतून संदेश दिले. स्वदेश प्रीती व स्वाभिमान यांचे तेज निर्माण करण्यासाठी विविध विषयावरील चिंतनातून आपला मनोदय व्यक्त केला. या दृष्टीने त्यांची भाषणे महत्त्वाची आहेत. या भाषणांतून त्यांच्या संपन्न व्यक्तिमत्त्वाचा प्रत्यय येतो. त्यांचे खरे व्यक्तिमत्त्व त्यांच्या इतर वाङ्मयापेक्षा त्यांच्या भाषणरूपी साहित्यातूनच अधिक प्रकट झाले आहे. अतिशय कसदार असे विचार व्यक्त करून चैतन्यमय व टवटवीत समाज निर्माण करणे हाच त्यांच्या विचारांचा गाभा आहे. 'ग्रामीण शिक्षणाची माझी कल्पना', 'नवपदवी-धारकांकडून अपेक्षा', 'समाजाभिमुख शिक्षण', 'माध्यमिक शिक्षणाची गरज', 'अमृताचे कुंभ', 'लोकशाहीशक्तीचा प्रभावी आविष्कार', 'सोनियाचा दिवस', 'समाजक्रांतीचे रसायन', 'जनप्रेमाची शक्ती', 'शिक्षण-संख्या व दर्जा', यांसारख्या असंख्य विषयांतून त्यांनी शिक्षण व शिक्षणाचे महत्त्व आपल्या भाषणांतून जनतेस सांगितले. सत्तेवर असताना त्यांनी अनेक शैक्षणिक सवलती देऊन गोर-गरिबांच्या मुलांना शिक्षणाची दारे उघडी करून दिली. सत्ता नसतानाही त्यांनी अनेक शैक्षणिक प्रश्नांवर भाष्य केले व त्या प्रश्नांचा छडा लावला. समाजाची उन्नती, समाजाचे कल्याण हेच यशवंतरावांनी आपल्या समाजकार्याचे प्रमुख उद्दिष्ट ठेवले. समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी राजकारणाचा ते योग्य प्रकारे वापर करतात आणि समाजाचे प्रश्न सोडविण्याला प्राधान्य देतात. समाजातील अज्ञान, दारिद्रय, रूढी, परंपरा, सनातनी प्रवृत्ती नाहीशा करावयाच्या असतील तर प्रत्येक माणसाला शिक्षणाचा 'तिसरा डोळा' असणे गरजेचे आहे. हेच उद्दिष्ट ठेवून त्यांनी विविध ठिकाणी शिक्षणाबाबतचे आपले विचार मांडले.

यशवंतरावांच्या भाषणांतून आलेले विचार एखाद्या प्रबंधासारखे वाटतात. त्यांच्या बोलण्यातून अनेक संदर्भ, आठवणी, अनुभव यातून तत्त्वमंथन होते. त्यामुळे ऐकणाऱ्यांना

साहजिकच वैचारिक स्फुरण मिळते. यशवंतरावांनी सामाजिक व शैक्षणिक विषयांवर आपल्या संपन्न अनुभवांच्या द्वारे चिंतन व्यक्त केले. हे चिंतन एका लेखकाचे, विचारवंताचे व जाणत्या नेत्याचे आहे. त्यांची विचार सांगण्याची पद्धत फार चांगली होती, दुसऱ्याला ते विचार पटवून देत असत. आपल्या विचार कल्पनांना शब्दरूप देऊन श्रोते पाहून आपल्या भाषणाची पट्टी ते ठरवित असत आणि आपल्या विधानाची वास्तवता प्रभावीपणे जनसमुदायास पटवून देत. मला सत्तेचा मोह नाही पण विचारांचा जरूर आहे असे ते वेळोवेळी सांगत.

यशवंतरावांच्या भाषणात साहित्यिकांत साहित्यिक कार्यकर्त्यात कार्यकर्ता, पत्रकारात पत्रकार आणि विद्वानात विद्वान होण्याइतकी लवचिकता होती. आपले एखादे मत ते सहजपणे त्यांच्या वागण्याबोलण्यातून समाजास पटवून देत. विरोधकांना सुद्धा मित्रत्वाच्या पातळीवर आणून आपल्या नर्म विनोदाने त्यांचा विरोध कमी करत आणि सभेचे वातावरण त्यांच्या या खास नर्म विनोदी शैलीने बदलून टाकत. यात त्यांचा व्यासंग, सुसंस्कृतपणा, वक्तृत्व आणि मनाचा उमदेपणा, बोलण्यातील चातुर्य आणि औदार्य या बाबी महत्त्वाच्या होत्या. त्यांची एखाद्या विषयावरील मांडणी, त्याला अनुरूप दाखले, उपस्थित महत्त्वाच्या माणसांचा केलेला उल्लेख आणि प्रयत्नपूर्वक आणलेली काव्यात्मकता हे त्यांच्या वक्तृत्वशैलीचे खास विशेष. यांच्यामुळेच त्यांच्या भाषणाला रंग भरत असे. या त्यांच्या भाषणगुणामुळे पुस्तक-प्रकाशनासाठी, साहित्य-संमेलनासाठी, चर्चासत्रासाठी किंवा एखाद्या लेखकाच्या सत्कारासाठी त्यांची उपस्थिती महत्त्वाची वाटे. यशवंतरावांनाही अशा सर्जनशील लोकांचा सहवास नेहमीच प्रिय असे. अशा लोकांच्याबरोबर कोणत्याही विषयावर ते अगदी मुद्देसूद आणि नेमकेपणाने बोलत. राजकारण, समाजकारण, शिक्षण हे त्यांच्या आवडीचे विषय. पण कला, साहित्य, नाट्य, महाविद्यालयाचा पायाभरणी समारंभ, विद्यापीठाचे पदवीदान समारंभ, स्नेहसंमेलने यांसारख्या कार्यक्रमातून अशा विषयांवर ते लालित्यपूर्ण बोलत आणि अनेकांची मने आपल्या संभाषणाने आकर्षित करत.

## शिक्षणाची गंगा

ग्रामीण भागात जन्मलेल्या आणि वाढलेल्या यशवंतरावांनी हयातभर लोकशिक्षणाचे कार्य केले. शिक्षण ही सामाजिक गरज असल्याचे त्यांनी अनेकवेळा प्रतिपादले आहे. सत्तेत असताना व नसतानाही त्यांनी समाजातील शैक्षणिक प्रश्नांवर आपले विचार मांडले. त्यांनी त्यांच्या सत्तेच्या काळात अनेक शैक्षणिक कार्यक्रम राबवले. त्यांमध्ये मोफत शिक्षण योजना व व्यावसायिक शिक्षणावर भर दिला. इ. पाचवी पासून इंग्रजी



हा विषय ऐच्छिक केला. मराठवाड्यातील अनेक शिक्षण संस्थांना सढळ हाताने त्यांनी आर्थिक अनुदान दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची स्वतंत्र शिफारस व विद्यापीठाची स्थापना केली. कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठाची स्थापना व सातारा येथे सैनिकी स्कूलची स्थापना, आदिवासी मुलांच्यासाठी आश्रमशाळांची सोय. औरंगाबाद आणि कराड येथे अभियांत्रिकी महाविद्यालयाची निर्मिती, नागपूर येथील केंद्रसरकार पुरस्कृत इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये रूपांतर, तसेच माध्यमिक शाळांतील फी वाढ रद्द असे कितीतरी महत्त्वपूर्ण शैक्षणिक निर्णय त्यांच्या राजसत्तेच्या काळात त्यांनी घेतले. त्यामुळे शिक्षणाची दारे सर्वांना खुली झाली. मनुष्यबळाला शिक्षणाची जोड देऊन त्यांनी समाजात नवसामर्थ्य निर्माण करण्याचा सदैव प्रयत्न केला. एकूणच राज्याच्या व राष्ट्राच्या हितासाठी त्यांनी अनेक शैक्षणिक योजना राबविल्या. त्यामुळे आजच्या शैक्षणिक उभारणीमध्ये यशवंतरावांचा महत्त्वाचा वाटा आहे हे आपणास मान्य करावे लागेल. खरे शिक्षण कशाला म्हणावे याची व्याख्या यशवंतराव अशी करतात, ''शिक्षित व्यक्तीला स्वत:च्या भोवती घडणाऱ्या गोष्टी आणि जगामध्ये घडणाऱ्या इतर गोष्टी यांची ज्यामुळे काही संगती लावता येते, त्यांचा योग्य अर्थ समजावून घेता येतो आणि त्यांचा परिणाम आपल्या जीवनावर काय घडतो, आपल्या व्यक्तिमत्त्वावर काय घडतो हे समजावून घेता येते आणि समजावून देता येते, त्याला मी शिक्षण मानत आलो आहे.'' शिक्षणाचा जीवनाशी, परिसराशी जितका संबंध येतो तितकाच वर्तमान आणि भविष्याशी आहे असे ते सांगतात. खेड्यातील शिक्षण व शहरातील शिक्षण यांच्यातील कृत्रिम अंतर कमी करून त्यांच्यामध्ये तोल निर्माण करणे त्यांना महत्त्वाचे वाटते. शिवाय खेड्यातील कोट्यवधी जनतेचे जीवन मंगलमय होण्याच्या दृष्टीने ग्रामीण शिक्षणाकडे पाहावे. ग्रामीण जीवनातून शिक्षण घेतलेला विद्यार्थी ज्यावेळी उच्चविद्याविभूषित होतो तेव्हा त्याला शेतीत काम करण्याची लाज वाटते. एवढेच नव्हे तर पोटासाठी तो नोकरी पत्करतो. पर्यायाने शेती व आईवडील दोघांनाही मुकतो. अशी आजच्या नवशिक्षित ग्रामीण तरुणाची शोकांतिका ते खेदाने विशद करतात. तेव्हा अशा पांढरपेशी बनलेल्या तरुणांना शेतीच्या व खेड्याच्या विकासास उपयुक्त ठरणारे शिक्षण द्यावे, एकूणच सुशिक्षित तरुणांचे शहराकडे असलेले आकर्षण कमी करून ग्रामीण मातीत शिकलेली मुले ग्रामीण मातीच्याच विकासासाठी झटली पाहिजेत असा विचार 'ग्रामीण शिक्षणाची माझी कल्पना' या विषयावर मुंबई आकाशवाणीवरील भाषणात ते मांडतात.

महाराष्ट्रात शिक्षणाच्या आड गरीबी येऊ नये म्हणून त्यावेळच्या सरकारने अनेक सवलती जाहीर केल्या. या सवलती घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबर 'गुणांची वाढ'

केली पाहिजे. विद्यार्थी हा महत्त्वाकांक्षी असला पाहिजे. सर्व समाजात समरस होण्याची प्रवृत्ती त्याने अंगीकारली पाहिजे. कारण शिक्षणासाठी सरकारने खर्च केलेला पैसा हा गरीब समाजाकडून येतो. याची जाणीव ठेवून केवळ 'फुकट शिक्षण' हे फुकट शिक्षण होता कामा नये. विद्यार्थ्यात कर्तृत्व व परिश्रम करण्याची तयारी पाहिजे असे मार्गदर्शन ते करतात. यशवंतरावांचा गरीब विद्यार्थ्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन यावरून स्पष्ट होतो. समाजामध्ये असलेल्या कठीण परंपरा व रूढी झुगारून देऊन शिक्षणाचे महत्त्व महाराष्ट्राच्या जनतेस पटवून देण्याचा प्रयत्न सर्वांनी करावा या संदर्भात २५ ऑगस्ट १९६० रोजी 'लोकशाहीतील नियोजन' या विषयावर विधानसभेत केलेल्या भाषणात ते अधिक भर देऊन म्हणतात, ''सामाजिक सुखसोयीकडे दुर्लक्ष होता कामा नये ही गोष्ट मी मान्य करतो, आणि त्यातल्या त्यात शिक्षणाकडे तर मुळीच होता कामा नये. मी 'च' च्या भाषेत बोलणार नाही. परंतु शिक्षणाची बाब इतकी महत्त्वाची आहे की त्यासंबंधी 'च' च्या भाषेत मला बोलावे लागत आहे. आपल्याला नवीन पिढी निर्माण करावयाची आहे. म्हणून मी सांगू इच्छितो की शिक्षणाच्या बाबीकडे मुळीच दुर्लक्ष होणार नाही. मी ही गोष्ट मुद्दाम आग्रहपूर्वक सांगतो आहे.'' यशवंतरावांची शिक्षणविषयक भूमिका किती निकोप, किती आशावादी तशीच कार्यप्रवण आहे याची साक्ष त्यांच्या वरील विचारांतून प्रत्ययास येते.

यशवंतरावांचे शिक्षण विषयावरील विचार आधुनिक स्वरूपाचे आहेत. त्यांची बोलीभाषा बोजड नाही. त्यांच्या स्वभावाचा साधेपणा जसा आकर्षक आहे तशीच त्यांची बोलीभाषा हृदयाची पकड घेणारी आहे. त्यांची शिक्षण व सामाजिक विषयावरील भाषणे चाळताना त्यांच्या या भाषणांतील सौंदर्यस्थळे एकामागून एक पाहावयास मिळतात. तसेच त्यांचे त्या विषयांवरील विवेचन वा भाष्य अथवा विषयाची मांडणी ते इतक्या सोप्या रीतीने करतात आणि त्यासाठी ते इतकी सहजसुंदर भाषा वापरतात की त्यातून सामान्य वाचकालाही खराखुरा अर्थबोध झाल्याशिवाय राहात नाही. महाबळेश्वर येथे इ.स. १९६० साली कार्यकर्त्यांच्या शिबिराच्या समारोपप्रसंगी ते म्हणाले होते, ''मी आपणास सांगू इच्छितो की, शिक्षणाकडे निव्वळ सामाजिक गरजेच्या दृष्टीने मी पाहात नाही. माझ्या मते शिक्षण हे आर्थिक विकासाचे एक मूलभूत साधन आहे. आमच्यामध्ये शक्ती निर्माण करण्याकरिता आमच्याजवळ मनुष्यबळाशिवाय दुसरे काही साधन नसल्यामुळे आम्हाला या साधनाचा विकास करण्यासाठी त्याला शिक्षणाची जोड द्यावयाची आहे. खेड्यात बिजली नेऊन पोहोचविल्याशिवाय ज्याप्रमाणे शेतीचा विकास होणार नाही त्याचप्रमाणे आमचा नापीक पडलेला मनुष्यबळाचा हा जो मोठा साधनसंपत्तीचा भाग आहे त्यात शिक्षणाची बिजली नेल्याशिवाय नवसामर्थ्य



निर्माण होणार नाही. शिक्षणाकडे पाहण्याचा माझा स्वत:चा हा असा दृष्टिकोन आहे. महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती करण्याचा कार्यक्रम जितका महत्त्वाचा आहे, शेतीचे औद्योगिकरण करण्याचा कार्यक्रम जितका महत्त्वाचा आहे, तितकाच शिक्षणाचा हा कार्यक्रम महत्त्वाचा आहे.'' यशवंतरावांचे स्वत:चे ध्येयस्वरूपच जणू या शब्दात सामावले आहे असे म्हणता येईल. समाजाला विचारांचे ज्ञानदान करणे हेच यशवंतरावांच्या शैक्षणिक भाषणाचे सूत्र बनले. हे ज्ञानदान करताना सामाजिक परिवर्तनाची जी त्यांना आच लागलेली होती त्यामुळे या परिवर्तनासाठी सदैव कार्यरत राहण्याचे व्रत त्यांनी त्यावेळी अंगीकारले आहे. त्यासाठी वेळोवेळी असंख्य प्रश्नांची चर्चा केली. या चर्चेतून त्यांनी जे जे विचार मांडले आहेत ते धारदार झाले आहेत. ते आवाहन करणारेच नव्हे तर आव्हान देणारेही ठरले आहेत. ते म्हणतात, ''शिक्षणातून केवळ ज्ञानाची उपासना वा बुद्धीची जोपासनाच करून चालणार नाही, तर भावनांची प्रगल्भता आणि अंत:करणाचा मोठेपणा अंगी असणे आवश्यक आहे.'' शैक्षणिक विचारांचा प्रसार करण्यासाठी त्यांनी 'वाणी' या एकाच साधनाचा भरपूर उपयोग केला आहे. विचार अणि उच्चार याबाबत ते विलक्षण निर्भय होते. ही निर्भयशीलता त्यांच्या अनेक विचारांतून स्पष्ट होते. स्वत:ला योग्य वाटणाऱ्या विचारांचा हिरिरीने पुरस्कार करणे हे त्यांनी जीवनाचे व्रत मानले होते. तसे ते मानले होते म्हणूनच त्यांचे विचार सामान्यांपर्यंत येऊन पोहोचले. शिक्षण क्षेत्रात यशवंतरावांना जे चांगले वाईट जाणवले, अनुभव घेतले ते लोकांच्या समोर ठेवून त्यांची जिज्ञासा जागृत करण्याचा त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केला. माणूस मनाने व विचाराने मुक्त व समर्थ कसा होईल ही शिक्षणाची महत्त्वाची कसोटी आहे, असे ते सांगत. शिक्षणाच्या संस्कारामुळे समाज संवेदनशील व सुसंस्कृत बनला पाहिजे. म्हणून ते सांगतात, ''माणसाचे मन शिक्षणाच्या संस्काराने अधिक संपन्न केल्याशिवाय समाज खऱ्या अर्थाने समाज बनत नाही.'' शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे प्रमुख समर्थ साधन आहे. त्यामुळे सामाजिक विषमता नाहीशी करण्यासाठी शिक्षणाविषयी निराशा असता कामा नये. इंग्रजी शिक्षण घेतलेल्या भारतीय विचारवंतांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून त्या दृष्टीने फार मोठे कार्य केल्याचे यशवंतराव सांगतात. त्यामध्ये महात्मा जोतिराव फुले, दादाभाई नौरोजी, जगन्नाथ शंकरशेट, छत्रपती शाहू महाराज, विष्णूशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, आगरकर, महर्षी कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख आदींनी शिक्षण प्रसाराचे कार्य केल्याचा उल्लेख यशवंतराव आवर्जून करतात.

समाजाच्या उन्नतीसाठी, प्रगतीसाठी, त्यांच्यात स्वाभिमान जागृत करण्यासाठी शिक्षण हेच अत्यावश्यक साधन आहे असे यशवंतरावांनी सांगितले. एवढेच नव्हे तर

समाजातील आर्थिक विषमता नाहीशी करायची असेल तर त्या विषमतेचे मूळ असलेली बौद्धिक किंवा मानसिक विषमताही नष्ट झाली पाहिजे. त्याशिवाय समाजाची खरी प्रगती होणार नाही असे ते ठासून सांगत. म्हणून सर्व आव्हानांना सामोरे जाण्यासाठी बुद्धीच्या क्षेत्रात आणि ज्ञानाच्या क्षेत्रात वाढ झाली पाहिजे. त्यासाठी सर्वांना शिक्षण दिल्याशिवाय ते घडून येणार नाही. शिवाय विज्ञान आणि तंत्रज्ञान यामध्ये प्रगती केल्याशिवाय देशाची औद्योगिक प्रगती होणे अशक्य आहे. म्हणून शिक्षणाकडे व्यापारी दृष्टिकोनातून न पाहता माणूस मनाने, विचाराने, मुक्त व समर्थ होण्याच्या दृष्टीने आपण सर्वांनी शिक्षणाकडे पाहिले पाहिजे. हे ज्ञान प्रसाराचे कार्य पुढे नेटाने चालविण्याची विनंती ते करतात. ते याविषयी म्हणतात, ''शिक्षणाचा हा प्रचंड प्रवाह महाराष्ट्रातील प्रत्येक शहरात व प्रत्येक खेड्यात पोहोचला पाहिजे आणि त्यातून खेड्यातील नवीन पिढी सुशिक्षित झाली पाहिजे. शिक्षणाद्वारा होणारी ही क्रांती झालीच पाहिजे. असे एकही घर राहता कामा नये की, जेथे उच्च शिक्षणाची संधी पोहोचलेली नाही. ही शैक्षणिक क्रांती समाजामध्ये अशी जबरदस्त क्रांती निर्माण करेल की, ती शक्ती आपल्याला गप्प बसू देणार नाही. अडाणीपणाबरोबर भित्रेपणाही येतो. परंतु ज्यावेळी साठसत्तर टक्के समाज सुशिक्षित असतो, त्यावेळी तो कुणापुढेही नमते घेत नाही. खरे-खोटे, योग्य-अयोग्य, हिताचे-गैरहिताचे हे सर्व तो आपल्या शिक्षणाच्या तराजूवर तोलून बघतो. घराघरामध्ये असे तराजू लागल्यावर जे घडेल ते चांगलेच असेल.'' असे विचार त्यांनी नागपूर येथे विदर्भ विकास परिषदेच्या उद्घाटनाच्या प्रसंगी व्यक्त केले. यशंवतराव विशेषत: गरीब जनतेला शिक्षण देण्यावर भर देतात. तसेच सर्वांना समान शिक्षणाची संधी मिळावी ही आग्रहाची भूमिका मांडताना दिसतात. म्हणून शिक्षणाची ज्ञानगंगा शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविल्याशिवाय विकासाची गंगा अवतरणार नाही असा विचार ते अनेक ठिकाणी मांडताना दिसतात. माणसाला अनेक संकटांतून मुक्त करण्याच्या दृष्टीने ज्ञान लोकांपर्यंत पोहोचले पाहिजे. माणूस हेच शिक्षणाचे केंद्र असावे. निरक्षरता व अज्ञान यात रुतून बसलेल्या लोकांच्या बुद्धीचा विकास घडवून आणला पाहिजे. त्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी त्यांना शिक्षित करणे ही काळाची गरज आहे. समाजाच्या वैचारिक आणि भावनिक विकासासाठी शिक्षण हे जेवढे आवश्यक आहे तेवढेच त्यांच्या सांस्कृतिक विकासासाठीही आवश्यक आहे. यासाठी शिक्षणाची गुणात्मक वाढ झाली पाहिजे. ही गुणात्मक वाढ होण्यासाठी शिक्षणपद्धतीत सुधारणा कराव्या लागतील. अभ्यासक्रम, अध्यापन व परीक्षापद्धती इत्यादी गोष्टी बदलाव्या लागतील. म्हणजेच आपण मिळवलेले शिक्षण हे प्रत्यक्ष जीवनातील काही प्रश्न सोडविण्यासाठी उपयोगी पडले पाहिजे. असे शिक्षण देण्यासाठी शिक्षण संस्थांनी पुढाकार



घेऊन हे कार्य केले पाहिजे. संस्थाचालकांच्या कर्तबगारीवर आणि शहाणपणावर या गोष्टी अवलंबून आहेत. ते म्हणतात, ''पण मी आपल्याला सांगू इच्छितो की, नुसत्या इमारती म्हणजे शिक्षणसंस्था नव्हेत. त्या संस्थांमध्ये काम करणारी जी माणसे आहेत, त्यांना प्रेरणा देणारे जे विचार आहेत, जे ध्येयवाद आहेत, ती माणसे, ते ध्येयवाद म्हणजेच या संस्था. ते ध्येयवाद, ते विचार, त्या कल्पना आपण जिवंत ठेवल्या पाहिजेत. आपल्या मनात नित्य स्मरल्या पाहिजेत. परंतु हे ध्येयवाद, हे विचार, आणि कल्पना आपल्या मनापर्यंत पोहोचल्या म्हणजे आपले काम संपले असे नाही. विचारांनी आम्ही विद्यार्थ्यांच्या मनापर्यंत खरोखरी किती पोहोचलो आहोत हेही पाहण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे....... ही ज्ञानाची, शिक्षणाची, विचारांची, कल्पनांची, ध्येयवादाची ज्योत एकदा प्रज्वलित होऊन वाढली आणि कायम स्थिरावली की, हिंदुस्थानचे जीवन सुधारले आणि स्थिरावले असे तुम्हा-आम्हाला म्हणता येईल.'' असे विचार त्यांनी यशवंत बेसिक ट्रेनिंग कॉलेजच्या इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी वर्धा येथे व्यक्त केले आहेत. यशंवतरावांनी शिक्षक आणि त्यांच्या अध्यापनपद्धतीबाबतही येथे सूचना केल्या आहेत. तसेच संस्थाचालकांनीसुद्धा शैक्षणिक ध्येयधोरणाचा पाठपुरावा करून त्यांची ध्येयधोरणे यशस्वी करावीत, असा ते सल्ला देतात.

## प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची गरज

यशवंतराव प्राथमिक शिक्षण व शाळांबाबत आपली भूमिका अशी स्पष्ट करतात,''प्राथमिक शाळांसंबंधी माझी स्वत:ची अशी कल्पना आहे की, या शाळा ठराविक अंतरावर असाव्यात. कारण चार-सहा वर्षांच्या लहान मुलांनी किती अंतर ओलांडून शाळेमध्ये जावे हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. दोन तीन मजल्यांची मोठी शाळा या मुलांकरिता आवश्यक आहे असे मी मानीत नाही. त्यांच्यासाठी दोनशे अडीचशे पेक्षा जास्त संख्या असणार नाही अशा अनेक शाळा गावाच्या वेगवेगळ्या भागात असाव्यात. शाळा एकमजली असावी. तिला पुष्कळशी हवा मिळेल अशी व्यवस्था असावी. बाहेर छोटीशी बाग असावी आणि शाळेतील मुलांना निदान न्याहारी तरी देता यावी. या गोष्टी ज्या दिवशी घडून येतील तो दिवस माझ्या मताने मोठ्या आनंदाचा ठरेल.''[३६] यशवंतरावांनी प्राथमिक शाळांच्या प्रश्नाचे बारकाईने स्पष्टीकरण केलेच शिवाय आदर्श प्राथमिक शाळा कशी असावी या बाबतही आपले मनोगत भिवंडी नगरपालिका शतसंवत्सरिक महोत्सवप्रसंगी व्यक्त केले. प्राथमिक शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या तरच तळागाळातील बहुजन वर्ग शिक्षित होऊन

माध्यमिक व उच्च शिक्षण घेईल. असा त्यांचा विश्वास होता. म्हणूनच ते प्राथमिक शिक्षणाला अधिक महत्त्व देतात,''शिक्षणकार्य हे केवळ नैतिक कार्य आहे असे नाही. कोणत्याही सामाजिक कार्यास नैतिकतेचे अधिष्ठान लागते. त्यावाचून ते टिकाऊ व परिणामकारक होऊ शकणार नाही. शिक्षणकार्य हे तर याहून मौलिक स्वरूपाचे म्हणजे चारित्र्य घडविण्याचे कार्य आहे.'' हे पवित्र काम शिक्षणतज्ज्ञांनी, शिक्षकांनी व विचारवंतानी करावे असे यशवंतराव सांगतात.

यशवंतरावांनी प्राथमिक शिक्षणाबद्दल जशी भूमिका मांडली तशीच त्यांनी माध्यमिक शिक्षणाबद्दलही मांडली आहे. ''हे शिक्षण अर्थपूर्ण व सर्वस्पर्शी असावे. या शिक्षणात विविधता आणावी. प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण आणि उच्च शिक्षण या शिक्षणाच्या एकापुढील एक पायऱ्या आहेत. त्यामुळे त्यात एकसूत्रीपणा असावा. थोडक्यात म्हणजे काही काळ तरी माध्यमिक शिक्षण हेच बहुसंख्य मुलांच्या जीवनातील अंतिम शिक्षण असून त्यांच्यापुरते बोलायचे झाल्यास हे शिक्षण म्हणजे त्यांच्या भावी जीवनाची खूपच मोठी शिदोरी ठरणार आहे. तेव्हा प्रश्न असा निर्माण होतो की, हे शिक्षण पुरे होत असताना जीवनामध्ये प्रवेश करण्यासाठी लागणारी साधनसामग्री विद्यार्थ्यांच्या पदरात पडते आहे किंवा नाही ? हे सर्व पाहण्याची जबाबदारी अर्थातच शासनावर आहे. आणि पर्यायाने ती आता माध्यमिक शिक्षणमंडळावर पडणार आहे.'' असा विचार त्यांनी माध्यमिक शिक्षणमंडळाच्या उद्‌घाटनप्रसंगी 'माध्यमिक शिक्षणाचे महत्त्व' या विषयावर पुणे येथे व्यक्त केले. समाजाला आणि राष्ट्राला स्वावलंबी बनविण्याची एकमेव शक्ती शिक्षणात आहे. म्हणूनच त्यांनी व्यावसायिक शिक्षणाचा पुरस्कार केला. शिक्षणप्रसार म्हणजे शिक्षणविस्तार हा विचार त्यांनी वारंवार मांडला. या शिक्षणामुळे समाजामध्ये पहिल्या प्रतीच्या माणसांची वाढ व्हावी. त्यात गुणी माणसांची वाढ अधिक असावी आणि ज्ञानाच्या विविध क्षेत्रांत पराक्रम करण्याची संधी त्यांना मिळावी. तेव्हा अशा पात्रतेची गुणी माणसं माध्यमिक शिक्षणातून निर्माण व्हावीत व ती करावी लागतील असा आशावाद ते व्यक्त करतात.

## अमृताच्या कुंभातून लोकगंगेची समृद्धी

उच्च विद्यापीठीय शिक्षणाबाबतही त्यांनी असाच विचार व्यक्त केला आहे. मराठवाडा विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात अभिभाष्य करताना यशवंतरावांनी उच्चशिक्षणविषयक विचार मांडले. तसेच पदवी शिक्षणापासून व पदवीधारकांपासून काही अपेक्षाही व्यक्त केल्या आहेत. बदलत्या काळामध्ये नवे प्रश्न, नव्या समस्या निर्माण झाल्या आहेत. या नव्या काळाला अनुकूल शिक्षण व शिक्षणपद्धती असणे



आवश्यक आहे. कारण काळ कधी स्थिर नसतो. काळाबरोबर जाणे अपरिहार्य असते. कारण जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन पूर्वीपेक्षा आज आमूलाग्र बदलला आहे. शिक्षणाचा एकूणच उद्देश त्या त्या देशातील समस्या, प्रश्न, विषमता नाहीशी करणे हा आहे. विद्यापीठातील विद्यार्थ्यांकडून या संदर्भात ते अशी अपेक्षा व्यक्त करतात, ''या विद्यापीठात शिक्षण घेण्याची संधी ज्या विद्यार्थ्यांना लाभली आहे त्यांना माझी अशी विनंती आहे की, त्यांनी आपल्या भोवती घडत असलेल्या घटनांचा बारकाईने अभ्यास करावा. एवढेच नव्हे तर त्या घटनांना योग्य प्रकारे वळण लागेल अशा प्रकारे त्यांनी प्रयत्न करावेत. या प्रदेशाचे भावी नागरिक या नात्याने त्याच्या उन्नतीसाठी व उत्कर्षासाठी प्रयत्न करणे हे त्यांचे कर्तव्यच ठरते. आपण ज्या समाजात वावरतो त्या समाजाचे गुणदोष काय आहेत याचा शोध घेऊन गुणांचा विकास व दोषांचे निराकरण करणे, आपल्या प्रदेशाचे जे निकडीचे प्रश्न असतील त्यांचा अभ्यास करणे आणि जनहिताच्या दृष्टीने हे प्रश्न सोडविण्यास साह्य करणे हीच सुशिक्षित तरुणांकडून आज अपेक्षा आहे.'' यशंवतराव या विचारांनी नवपदवीधारकांना प्रभावित तर करतातच शिवाय त्यांना सत्कार्याची दिशाही दाखवितात. त्या दिशेने जाऊनच त्यांना समाजाचे आणि राष्ट्राचे हित साधायला सांगतात.

आपल्या वडिलांना ज्या संधी मिळू शकल्या नाहीत त्या तुम्हाला मिळाल्या आहेत. त्याचा परिपूर्ण उपयोग करा. अन्यथा भावी पिढी तुम्हाला दोष देईल. तसेच प्रादेशिक भावनांना उत्तेजन देऊ नये असेही यशवंतराव बजावतात. शिक्षणाचे महत्त्व सांगताना ते लिहितात, ''शिक्षणाने एक प्रकारचे मानसिक व बौद्धिक सामर्थ्य निर्माण झाले पाहिजे. एवढेच नव्हे तर या बौद्धिक व मानसिक सामर्थ्याच्या जोरावर आपल्या जीवनाचा यशस्वी मार्ग आपण शोधून काढीत असताना ज्या समाजाने आपल्या कल्याणासाठी या ज्ञानगंगा उघडल्या त्या समाजाचेही थोडेफार ऋण फेडण्याची शक्ती व भावना या शिक्षणाने आपल्या मनात निर्माण झाली पाहिजे..... आपण ज्ञानी व्हा व शहाणेही व्हा. ज्ञानात आणि शहाणपणात फरक आहे. असे त्यांनी (कुलपतींना) या संदेशात सुचविले आहे. शास्त्रांचे ज्ञान तत्त्वाच्या दृष्टीने करून देणे अत्यंत आवश्यक असते. परंतु त्या ज्ञानाचा समाजजीवनात उपयोग करून घेण्याचे जे शास्त्र आहे त्याचे नाव शहाणपण असे मी समजतो. विद्यापीठातून बाहेर पडल्यानंतर ज्ञानाबरोबरच हे शहाणपण तुम्हाला मिळवावे लागणार आहे. कारण या शहाणपणाचीच देशाला आज गरज आहे.'' हे विचार शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे दीक्षांत समारंभात इ.स. १९६४ मध्ये मांडले. उच्चशिक्षणाची ज्ञानसंक्रमण, ज्ञानसंवर्धन आणि ज्ञानविकास हीच प्रमुख उद्दिष्टे असल्याचे ते सांगतात. शिवाय विद्यापीठ हे फक्त पदवी देण्याचे यंत्र

किंवा कारखाना असता कामा नये. ते सांगतात, ''मित्रहो, ज्यासाठी विद्यापीठाचा जन्म झाला आणि ज्याच्या प्राशनाने आमचा समाज समर्थ बनणार आहे त्या अमृताचे कुंभ आज तुमच्यापुढे तुमच्या कुलगुरूंनी भरून ठेवले आहेत, ते तुम्ही प्राशन करा. जे कुंभ आज तुमच्यापुढे नसतील ते शोधून काढा आणि जे शोधून सापडणार नाहीत, ते निर्माण करा. शेवटी याच एका अमृताने लोकजीवनाची गंगा समृद्ध होणार आहे. दुथडी भरून वाहणार आहे. ते अमृत शोधण्याची, जनतेपुढे सादर करण्याची जबाबदारी स्नातक म्हणून तुम्ही आज स्वीकारली आहे. म्हणून मला तुमच्या आणि तुम्हाला माझ्या शुभेच्छा.'' अशा नम्र भावाने यशवंतराव देशनिष्ठा जोपासणाऱ्या लोकशिक्षणाची आवश्यकता सांगतात.

आज आपला देश सांस्कृतिक दृष्ट्या संपन्न होण्यासाठी विज्ञाननिष्ठ समाजाचा पाया रचण्याची गरज आहे. त्यासाठी आजच्या तरुणांनी विज्ञानशिक्षणाकडे आकर्षित झाले पाहिजे. हे शिक्षण पाठांतरापेक्षा संशोधनातून व अनुभवातून घेतले पाहिजे व यातून वैज्ञानिक व्यासंगाची लाट निर्माण झाली पाहिजे, या लाटेतून समाजात एक नवी वैचारिक ताकद निर्माण व्हावी. म्हणून या ज्ञानाचा पाठलाग करण्याची व ज्ञानाची सफर पुरी करण्याची ताकद आणि दृष्टी माणसात निर्माण झाली पाहिजे. कारण पूर्वी पायी रखडणारा माणूस बैलगाडीतून, मोटारीतून, हवेतून व विमानातून धावू लागला आहे. ही विज्ञानाची प्रगती झपाट्याने होत आहे. भविष्यात कदाचित पृथ्वीवरीलच नव्हे तर अब्जावधी कि. मी. दूर असलेल्या ग्रहताऱ्यावरचा कारभारसुद्धा हाकावा लागेल आणि हे आवाहन या नवशिक्षितांनी स्वीकारले पाहिजे, असा ते वैज्ञानिक दृष्टीकोन सांगतात. 'अज्ञान' हा शब्द महाराष्ट्राच्या कोषातून बाहेर काढला पाहिजे. हे काम तसे सोपे नाही. त्यासाठी सतत प्रयत्न केले पाहिजेत. त्यासाठी समाजात चांगली बीजे व मूल्ये निर्माण व्हावीत. महायुद्धात पराभूत झालेल्या जर्मनीने १० वर्षात पूर्वीपेक्षा उत्तम जर्मनी केवळ यांत्रिक तज्ञ व कुशल वैज्ञानिक यांच्या जोरावर निर्माण केल्याचे उदाहरण देतात. म्हणून विज्ञानाच्या क्षेत्रात क्रांतिकारक परिवर्तन घडावे यासाठी ते सांगतात, ''फक्त आम्हाला तांत्रिक शिक्षण, वेगवेगळ्या शास्त्रांचे शिक्षण घेतले पाहिजे. अशा तऱ्हेच्या शिक्षणाला आम्हाला प्राधान्य दिले पाहिजे. याशिवाय ज्याला आपण ह्युमॅनिटीचे शिक्षण म्हणतो अशा तऱ्हेच्या शिक्षणाचेही अर्थात महत्त्व आहेच. ते मूलभूत शिक्षण आम्हाला मंजूर आहे आणि या शिक्षणाच्या बाबतीत, शिक्षणाची सारी दारे सताड उघडी करून ते खालच्या थरापर्यंत पोहोचविण्याचे आमचे ध्येय असले पाहिजे. मी तर असे म्हणेन की, या तऱ्हेच्या शिक्षणाचे प्रकाशझोत अगदी शेवटच्या थरापर्यंत आम्ही नेऊ शकलो, तर महाराष्ट्राची शक्ती इतकी जबरदस्त वाढेल की त्याला



कोणाच्याही मेहेरबानीवर अवलंबून राहण्याचे कारण राहणार नाही. तो स्वत:चे रक्षण करील आणि राष्ट्राचेही रक्षण करील.'' असा विचार सांगली येथील जाहीर सभेत 'महाराष्ट्राच्या भवितव्याची सफर' या विषयावर बोलताना व्यक्त केला. माणसाच्या मूलभूत गरजांचा प्रश्न सोडविण्यासाठी आणि जीवनमान सुधारण्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञानाची आवश्यकता आहे. यासाठी आजची शिक्षण पद्धती कशी असावी यावर त्यांनी विचार मांडले. हे शिक्षण कदाचित चांगले असेल परंतु नोकरपेशाची मनोवृत्ती निर्माण करणारे आहे. अशा स्वरूपाच्या शिक्षणाची आज आवश्यकता नाही. त्यासाठी विज्ञान तंत्रज्ञानाच्या शिक्षणातून आधुनिक उद्योगधंद्यात वाढ करणारे शिक्षण आज हवे. जेणेकरून देशाच्या विकासाला नवीन दिशा मिळतील. शिक्षणासंबंधी बोलताना ते देशाचा विकास व शिक्षण यांचा समन्वय साधत तरुणांना आवाहन करतात की, ''शिक्षण संपल्यावर नोकरी करणार नाही अशी प्रतिज्ञा करा. बुद्धी व हात यांचा उपयोग करा. शौर्याला आम्ही कमी पडलो नाही तर शास्त्राला कमी पडलो. नव्या आकांक्षांनी पेटलेले तरुण आता पुढे आले पाहिजेत. कर्तृत्वाचे पीकच महाराष्ट्रात उभे राहिले पाहिजे. गुणी व बुद्धिमान असा महाराष्ट्र उभा राहिला पाहिजे. नवीन घडणारा महाराष्ट्र Sky is the limit (आकाश हीच वेस) असा आदर्श ठेवणारा होवो.''

## शिक्षणाचे मूल्य व मूल्यात्मक शिक्षण

यशवंतरावांनी उच्च शिक्षणाचा दर्जा खालावला आहे याची खंत व्यक्त केली आहे. हा दर्जा खालावण्याला शिक्षक आणि शिक्षणसंस्थांना ते जबाबदार धरतात. हे दोन घटक प्रामाणिकपणे काम करत नाहीत यामुळे दर्जा घसरतो. एकूणच शिक्षणपद्धतीत दोष आहे असे सांगून, ही शिक्षणपद्धती विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे काम करायचे सोडून केवळ पदव्यांचा हव्यास विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण करते. एकदा पदव्या मिळविणे महत्त्वाचे ठरले की शिक्षण, ज्ञान मिळविणे गौण ठरते आणि पदवी मिळविणे महत्त्वाचे. ही पदवी मिळविण्यासाठी निरनिराळे मार्ग शोधले जातात व त्यातून गैरमार्गाचा अवलंब केला जातो. विद्यापीठे, पदव्या देणाऱ्या पेढ्या ठरल्या म्हणजे गुणवत्तेकडे कुणीही लक्ष देत नाही. उच्च शिक्षणाचा दर्जा हे मुख्य कारण त्यांना वाटते. यशवंतरावांनी एकंदरीत उच्चशिक्षणाबाबत तीव्र हळहळ व्यक्त केली आहे. या पदव्या देण्यासाठी रात्रीची महाविद्यालये चालविणे, बहि:शाल पदव्या, पत्रद्वारा प्रशिक्षण देणे हे त्याचे द्योतक आहे. यामुळे खरे ज्ञानदानाचे काम विद्यापीठाकडून होत नाही. म्हणूनच शिक्षणाचा दर्जा ढासळला असावा असे त्यांना

वाटते. म्हणून ''असत्याकडून सत्याकडे, अंधारातून प्रकाशाकडे, मृत्यूपासून अमृताकडे, घेऊन जाणारे 'ज्ञान हेच अमृत' आहे. तेच तुम्हाला समर्थ बनवेल व समाजजीवनही समर्थ बनवेल.'' असा विश्वास ते व्यक्त करतात.

## मातृभाषेतून शिक्षणाची गरज

शिक्षण समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचते करायचे असेल तर ते मातृभाषेतून द्यावे लागेल. कारण शिक्षण सर्व थरांपर्यंत, सर्व माणसांपर्यंत, सर्व समाजघटकांपर्यंत कधीच पोहोचले नाही. सर्व स्तरांतील, सर्व समाजांतील लोकांना शिक्षण घ्यायचे असेल तर ते मातृभाषेतूनच देणे आवश्यक आहे या मताचा यशवंतराव आग्रह धरतात. महाराष्ट्र राज्य निर्मितीत मराठी भाषेचा सिंहाचा वाटा आहे. मराठीचे माहेर असलेल्या मराठवाड्यातील मराठी भाषिकांच्या विकासाला महत्त्व देतात. मराठी भाषेचा विकास होण्याच्या दृष्टीने त्यांनी प्रयत्न केले. मराठी भाषेच्या निर्मितीस चालना दिली, मराठी भाषाकोष निर्मितीस चालना दिली. मराठी शुद्धलेखन समितीची निर्मिती केली. 'जास्तीतजास्त लोकांकडून बोलली जाते व जी बोललेली लोकांना समजते ती प्रमाण मराठी भाषा' म्हणून स्वीकारावी असा निर्णयही भाषातज्ज्ञांच्याकडून मान्य करून घेतला. म्हणून ज्ञानभाषा व लोकभाषा एक झाल्यास सर्वसामान्य लोक शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत. पण या भाषेचा विकास फक्त ललित साहित्याच्या संदर्भात होऊन चालणार नाही. निरनिराळ्या वैज्ञानिक व शास्त्रीय माहितीचा ज्यावेळी ती भाषा आविष्कार करू लागेल त्यावेळीच तिचा खरा विकास होईल असे ते म्हणतात. साहित्यिकांनी, शास्त्रज्ञांनी, इतिहासकारांनी, विचारवंतांनी या मराठीच्या विकासास हातभार लावावा अशी विनंती ते करतात. ते म्हणतात,''नव्या महाराष्ट्रामध्ये मराठी भाषेचे काम आम्हाला करावयाचे आहे. जुने अमृतासारखे जे शब्द आहेत ते शब्द तर आम्हाला वापरायचे आहेतच, पण तुमच्या आमच्या जुन्या पिढीला माहीत नसणारे अमृतासारखे विचार अजून आपल्याला शोधून काढावयाचे आहेत. नवीन शास्त्रीय विचारांचा, शास्त्रीय ज्ञानाचा एक नवा इमला आपल्याला महाराष्ट्राच्या जीवनामध्ये उभारावयाचा आहे आणि या सगळ्या विचारांचे पोषण करणारे, त्यांना तोलणारे शब्द आणि भाषा तुम्हा आम्हाला निर्माण करावयाची आहे.'' उच्च शिक्षण हे मातृभाषेतूनच दिले पाहिजे. कारण विद्यार्थ्यांचा सुरुवातीचा काही काळ परकी भाषा शिकण्यात निघून जाईल. म्हणजे इंग्रजी जर राहिली तर ही भाषा ज्यांचा मक्ता आहे त्यांचेच सांस्कृतिक जीवनामध्ये साम्राज्य स्थापन होण्याची शंका ते व्यक्त करतात. म्हणून नवा विचार, नवे रंगरूप घेऊन मराठी भाषा संपन्न बनावी याचबरोबर इतर भाषांचाही ते तिरस्कार



करत नाहीत. ते म्हणतात,''उच्च शिक्षण हे मातृभाषेतून असावे की नसावे ? असल्यास त्याची सुरुवात कोठून व्हावी ? माझी स्वत:ची या प्रश्नासंबंधी काही ठाम मते आहेत. मी तीन भाषांचा, ज्याला थ्री लँग्वेज फॉर्म्युला म्हणतात त्याचा पुरस्कर्ता आहे. मातृभाषा, मातृभाषेच्या जोडीला हिंदी आणि हिंदीच्या जोडीला काही काळ तरी इंग्रजी हिंदुस्थानमध्ये राहणे आवश्यक आहे, असे माझे मत आहे.'' असा विचार 'लोकभाषा हीच ज्ञानभाषा' या विषयावर कोपरगाव येथे के. जे. सोमय्या कॉलेजच्या पायाभरणीच्या वेळी मांडला. मराठीच्या अभिमानापोटी इतर भाषांचा द्वेष न करण्याचाही सल्ला ते देतात. तसेच इतर भारतीय भाषांच्या विकासाला अडथळा होणार नाही यासाठी काळजी घ्यायला सांगतात.

यशंवतरावांनी मराठी भाषा सक्षम बनविली पाहिजे असा विचार मांडला. या भाषेतून विविध विद्याशाखेतील विषय शिकवले जाण्याची आवश्यकता ते सांगतात. याचबरोबर इतर भाषेतून शिकण्यासाठी जो वेळ, श्रम लागतात तेवढ्या वेळात जर मराठी भाषेतून शिक्षण घेतले तर त्याच्या चौपट लागणारा वेळ निश्चित वाचेल. शिवाय त्यांच्या विचारशक्तीला चालना मिळेल व आत्मविश्वास बळावेल, मात्र मराठी भाषा शब्दसंपत्तीने व आविष्कार क्षमतेच्या दृष्टीने संपन्न बनली पाहिजे. भाषा ही राबवावी लागते. जास्तीतजास्त ती वापरात आणली की साहजिकच ती वाढेल व तिचा विकास होईल. या संदर्भात यशवंतराव म्हणतात,''खरे म्हणजे भाषा ही विचाराच्या पाठीमागे येत असते. भाषेचे खरे सामर्थ्य विचार व्यक्त करण्यात आहे. संशोधनाच्या क्षेत्रात नवे विचार आणण्याचा प्रयत्न करणारी माणसे जसजशी निर्माण होतील, वाढतील, तसतशी भाषा वाढत जाईल. नवे अनुभव आले, भाषा वाढली, नवे काम वाढले, भाषा वाढली. पहिल्याने मोटारीची कल्पना आली, मग नंतर मोटार आली आणि त्या मोटारीबरोबर कितीतरी नवे शब्द आले. एक नवी परिभाषा आली. साखर कारखान्यांबरोबर कितीतरी नव्या कल्पना आल्या, नवीन जीवन आले. नवा विचार आला की भाषा नवे रंगरूप घेऊन आपल्यापाशी येते आणि तो विचार व्यक्त करण्याच्या प्रयत्नात ती स्वत:च संपन्न होऊन जाते. भाषेचे स्वरूप हे असे आहे. तेव्हा भाषा ही सतत वाढत राहील. याबद्दल शंका नको. आम्ही जर ठरविले की, रसायनशास्त्र हे मराठीत शिकवायचे तर त्यात काय अवघड आहे? त्यासाठी प्रयत्न केला पाहिजे हे मात्र खरे आहे. पण निव्वळ परक्या लोकांच्या ग्रंथाचे मराठीत भाषांतर करून मराठी भाषा वाढेल असे नाही. माझ्या मते भाषांतरित भाषा फारशी चांगली नसते.'' शिक्षणाचा भाषेशी अतिशय निकटचा संबंध असल्याने यशवंतरावांनी भाषेविषयी अतिशय विस्ताराने आपले मत मांडले आहे. अहो तुम्ही ज्ञान शिकाल की भाषा शिकाल? ''तुम्ही इंग्रजीतून जरी ज्ञान

शिकला असला तरी तुम्हाला ते तुमच्या मातृभाषेत सांगता आले पाहिजे. प्रयत्न करा, मोडके तोडके बोलावयास सुरुवात करा. प्रयत्न केल्यास सर्व काही जमेल.''  रशिया, जर्मन, जपान, चीन या देशात 'इंग्रजी' ही ज्ञानभाषा नाही. तरीही आपल्या भाषेतून हा देश संपन्न व समृद्ध बनला आहे. याच पार्श्वभूमीवर सर्व स्तरांवर अध्यापनाचे माध्यम म्हणून मराठी भाषेचा स्वीकार करावा. मराठी भाषा शिकविणाऱ्याचा, शिकणाऱ्याचा विश्वास वाढविला पाहिजे. शिवाय मराठी भाषेत इतर भाषांतले ज्ञान-विज्ञान आणण्याचे कार्य सातत्याने करणे गरजेचे आहे. असे केल्याने मराठी भाषिकांच्या मुलांच्या डोक्यावरील इंग्रजी भाषेचे ओझे निघून जाईल व सहजतेने त्यांना त्यांच्या भाषेतून ज्ञान-लाभ होईल आणि मराठी भाषेची उपेक्षा, अवहेलना थांबेल. यासाठी उच्च शिक्षण मातृभाषेतून व्हावे असा यशंवतरावांचा हेतू दिसतो.

## भाषाप्रभुत्व

यशंवतरावांची निबंधशैलीतील शैक्षणिक विषयावरील भाषणेही त्यांच्या मराठी भाषेवरील विलक्षण प्रभुत्व दाखवणारी आहेत. त्यांची ही भाषणे गांधीजीं किंवा शास्त्रींच्या भाषणाइतकी निर्मळ व बिनचूक आहेत. त्यांच्या या भाषणात भाषेचा अपूर्व विलास आणि शिक्षणाविषयी मांडलेले गहन विचार, श्रोत्यांच्या बुद्धीला पटवून देण्यासाठी ज्या विषयाला अनुलक्षून उत्कट काव्यमय शब्दांचा वापर करण्यातच त्यांच्या प्रतिभेचा कल अधिक आहे. मग अशा वेळी आपल्या काव्यमय विचारविलासाने व भाषाविलासाने ते श्रोत्यांना गुंग करत असत. यशवंतरावांच्या या भाषणांतील शब्दकला अतिशय साधी व अर्थवाही आहे. तिच्यात कुठेही जडता नाही. शिक्षणासारख्या विषयावर विचार मांडताना आपले अंगभूत भाषासौंदर्य संयमाने समर्थ शब्दातून प्रकट करतात. शब्दांच्या सुंदरतेपेक्षा चांगला विचार देण्यावर त्यांचा अधिक भर आहे. यशवंतरावांनी या निबंध सदृश शैलीतील भाषणांतून शिक्षणासारख्या विषयावरील महत्त्वपूर्ण विचार समाजाला आग्रहपूर्वक दिला. समाजाच्या व राष्ट्राच्या जीवशक्तीला चालना देणारी विचारधाराच त्यांनी मांडली. ज्ञान आणि राष्ट्रभक्ती या मूल्यांची बांधीलकी सांगत शिक्षण, राष्ट्र, भाषा यांसारख्या विषयांवरील आपले चिंतन त्यांनी प्रकट केले. या चिंतनातून त्यांनी जीवननिष्ठ विचाराला व शिक्षणाला अधिक महत्त्व दिले. सामाजिक व शैक्षणिक विचारात रस घेणाऱ्या यशंवतरावांनी आपल्या चिंतनशील वृत्तीतून अनेक शैक्षणिक विचार सांगितले. या विचारांची बोली, व्याप्ती व विस्तार निबंधासारखा आहे. त्यामुळे हे विचार गंभीर स्वरूपाचे असले तरी त्यातही लालित्य आहे. त्यात तार्किक सुसंगती,



खंडनमंडनाची भाषा, शैलीचा सुबोधपणा या त्यांच्या गुणवैशिष्ट्यांमुळे त्यांच्या निबंधशैलीतील भाषणातही स्वत:चा वैशिष्ट्यपूर्ण बाज दिसतो. तसेच सरळ विचाराला भिडण्याची आणि तो विचार ठामपणे मांडण्याची यशवंतरावांची भूमिका येथे दिसते.

यशवंतराव मुळातच सामाजिक कार्यकर्ते असल्याने एखादा मुद्दा समाजाला समजावून सांगण्याची त्यांची हातोटी अजब होती. सोप्या सोप्या उदाहरणाने व छोट्या छोट्या अर्थगर्भ वाक्यांनी समजावून देण्याची कला त्यांच्याकडे होती. तसेच त्यांची भाषेवर व शब्दावर हुकूमत होती. त्यामुळे जे शब्द बोलायचे त्यातून भरपूर आशय कसा व्यक्त होईल याकडे त्यांचे अधिक लक्ष असे. त्यांनी शब्दाचे सामर्थ्य, सौंदर्य, लालित्य ओळखले होते. त्यामुळे अभिव्यक्तीपेक्षा शब्दांच्या आशयावर त्यांचे स्वाभाविकच जास्त लक्ष दिसते. छोट्या छोट्या प्रसंगातून व सहजबोलीतील सुंदर अन्वयार्थ शब्द योजनेतून त्यांची ही भाषणशैली नटली आहे. त्यांच्या या बोलण्यात साजशृंगार नाही की नखरेलपणा नाही. जे विचार त्यांनी मांडले ते सर्वसामान्यांच्या उद्बोधनासाठी व हितासाठीच. मनातली तळमळ व त्या विषयाची अगतिकता सामान्य माणसांच्या भाषेत मांडण्याची त्यांची हातोटी विलक्षण आहे.

## निबंधशैलीतील सामाजिक भाषणे :

यशवंतरावांची भाषणे ज्याप्रमाणे साहित्य, संस्कृती व शिक्षण या विषयांवर आहेत त्याचप्रमाणे सामाजिक विषयांवरही त्यांची अनेक भाषणे उपलब्ध आहेत. या भाषणांत त्यांनी अनेक बाबींचा परामर्श घेतलेला आहे. या भाषणांमध्ये विविधता खूप आहे. पण या सर्व भाषणांमधून एक धागा सलगपणे सर्वत्र गेलेला दिसतो तो म्हणजे यशवंतरावांच्या सामाजिक प्रेमाचा. हे प्रेम संकुचित नाही, विशिष्ट गोष्टींनाच अधिक महत्त्व देणारे नाही. त्यात व्यापकता आहे तशीच सर्वसमावेशकता आहे. त्यांच्या सामाजिक प्रेमाची पाळेमुळे ही तत्कालीन हिंदुस्थानातील खेड्यापाड्यातील भूमीत रुजली होती. त्या काळात त्यांच्या मनाला हुरहुर लावणारे अनेक सामाजिक प्रश्न निर्माण झाले होते. त्या प्रश्नांचा तळ शोधण्याचा त्यांनी त्यांच्या काळात सदैव प्रयत्न केला. यशवंतराव वयाने जसे वाढत गेले तशी त्यांची सामाजिक जाणीवही प्रगल्भ होत गेली, विकसित झाली. समाजात जे जे बदल झाले, ज्या नव्या विचारप्रणाली निर्माण झाल्या, त्या विलक्षण तीव्र संवेदनशीलतेने, शांत समंजसपणाने आणि डोळस वृत्तींनी न्याहाळल्या. तसेच समाजातील, वैयक्तिक जीवनातील पारतंत्र्य, दारिद्रय आणि अज्ञान याने ते व्यथित होताना दिसतात. यातूनच समाजाकडे बघण्याचा त्यांचा निश्चित

असा दृष्टिकोन बनत गेला. त्यासंबंधी त्यांची निश्चित अशी काही मते आहेत. काही विचार आहेत. हे विचार अखंड वाचन, मनन व स्वानुभव यातून सिद्ध झालेले आहेत. तेच विचार त्यांनी अनेक भाषणांतून प्रभावीपणे मांडले आहेत. यशवंतरावांनी त्यांच्या राजकीय राजवटीमध्ये अनेक सामाजिक समस्यांचा विचार मांडला. या समस्या टाळण्याचा त्यांचा अजिबात हेतू नव्हता. त्यांचे अर्थविचार असो की शेतीसंबंधी किंवा उद्योगधंद्यासंबंधी अथवा सामाजिक प्रश्नांबाबत मांडलेले विचार असोत, त्या सर्वांच्या पाठीमागे एकच हेतू होता. माझा समाज, माझे राष्ट्र बलवान व सामर्थ्यसंपन्न बनले पाहिजे. यासाठी सर्वच क्षेत्रांतील सर्व प्रकारची विषमता नाहीशी होणे आवश्यक आहे. यावर ते विशेष करून लक्ष केंद्रित करताना दिसतात. निव्वळ आर्थिक विकास होऊनच काम भागणार नाही तर सामाजिक विकासही व्हायला पाहिजे असा ते आग्रह धरतात. सामाजिक समतेशिवाय समाजाचा विकास होणे अशक्य आहे. म्हणूनच हा विकास साधण्यासाठी एकदिलाने, एकजुटीने, एकत्र येणे आवश्यक आहे. त्यासाठीच सामाजिक समता असणे महत्त्वाचे आहे. एकूणच राष्ट्राच्या उभारणीत समाजाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या दृष्टीने त्यांची काही भाषणे महत्त्वाची आहेत. 'राष्ट्ररचनेतील समाजसेवेचे महत्त्व', 'सामाजिक समतेचे कार्य', 'विविधतेतील एकता', 'समाजवादाचा आमचा मार्ग', 'विकासाची शर्यत', 'सामाजिक प्रगतीच्या प्रेरणा', 'आमच्या मूळ समस्या', 'समाजसेवेचे महत्त्व' इ. व यासारख्या भाषणातून त्यांची समाजाभिमुखता प्रकट होताना दिसते.

यशंवतरावांनी आपल्या भाषणांतून जी सामाजिक जाणीव प्रकट केली आहे ती त्यांच्या वास्तवाच्या आकलनातून केली आहे. हे आकलन-प्रकटनातून वास्तवाच्या असंख्य बाबी मांडल्याने त्यांच्या या भाषणसाहित्याला मोठा अर्थ प्राप्त होतो. भारतीय समाज जागृत होऊन सर्व बाबतीत त्याने जगाची बरोबरी करावी. त्यातल्या प्रत्येक व्यक्तीला दुसऱ्याच्या स्वातंत्र्याआड न येता जास्तीतजास्त जेवढे स्वातंत्र्य मिळणे शक्य आहे तेवढे मिळावे असे त्यांना वाटते. देशातल्या हर तऱ्हेच्या दु:खाविषयीची उत्कट तळमळ आणि ती दु:खे त्यागाने आणि विवेकनिष्ठेने दूर करण्याची इच्छा प्रत्येक मानवाच्या मनात निर्माण झाली पाहिजे. यशंवतरावांनी नवसमाज निर्मितीत समतेचे महत्त्व ओळखले होते. यासाठीच ते समतेचा आग्रह धरतात. समता म्हणजे व्यक्तीव्यक्तींमध्ये झालेला संवाद. मग हा संवाद चर्चेतून असो, वाङ्‌मयातून असो, व्यासपीठावरून असो, संवाद साधण्यासाठी एकत्र येणे आवश्यक असते. या संवादातून सुसंवाद निर्माण झाला पाहिजे व यातूनच समाजाची उन्नती झाली पाहिजे. मने सुसंस्कारित झाली पाहिजेत असे त्यांना वाटे. त्यांच्याकडे माणसे जोडण्याची कुशलता



होती. त्यांना मार्गदर्शन करणे व त्यांना संधी उपलब्ध करून देणे, सहकाऱ्यांना विश्वासात घेणे व त्यांच्यावर जबाबदारी टाकून त्यांचा आत्मविश्वास वाढवणे हे त्यांचे गुणवैशिष्ट्य होते. एखादा मुद्दा कार्यकर्त्यांना व विरोधकांना नेमक्या शब्दांत ते पटवून देत असत. आदर्श समाजव्यवस्थेची संकल्पना अशीच स्पष्ट करताना ते म्हणतात,''ज्या समाजात आर्थिक व सामाजिकदृष्ट्या सर्व लोक समान पातळीवर असतात आणि ज्याला आपण समाजसेवा म्हणतो तिच्या मदतीशिवाय जीवनातील सर्व उपलब्ध सुखसोईंचा जिथे सर्वांना सारख्या प्रमाणात उपभोग घेता येतो, अशा प्रकारच्या समाजव्यवस्थेस आदर्श समाजव्यवस्था म्हणता येईल.'' भारतात आर्थिक व सामाजिक विषमता निर्माण होण्याचे मुख्य कारण म्हणजे नियोजन व योजनाबद्ध अर्थव्यवस्था नसल्यामुळे लोकांची सर्वांगीण सुधारणा होत नसल्याचे ते सांगतात.

समाजसुधारणा करणाऱ्या समाजसुधारकांपेक्षा राज्यकर्ते हे काम अतिशय प्रभावीपणे करू शकतील असा त्यांचा विश्वास आहे. राजकारण म्हणजे केवळ सत्तेच्या क्षेत्रात काही कारभार करणे वा निवडणुका लढविणे नसून समाजपरिवर्तनाचे ते साधन आहे असे यशवंतराव मानतात. म्हणून समाज गतिमान बनविण्यासाठी राज्यकर्त्या मंडळींनी पुढाकार घ्यावा. म्हणजेच समाजपरिवर्तनाच्या माध्यमातून हे काम करता येईल. समाजपरिवर्तन करण्यासाठी सत्ता किंवा मिळालेला अधिकार हे साधन आहे. साध्य नव्हे असा इशाराही कार्यकर्त्यांना देताना दिसतात. सामाजिक जाणीव मनात बाळगून महाराष्ट्रातील राजकारणाच्या क्षेत्रात यशवंतरावांनी काम केले. त्यांनी सामाजिक प्रश्नांचे महत्त्व जाणून घेतले. ज्या सुधारणा करायच्या त्या जनतेपर्यंत पोहोचल्या पाहिजेत. त्याशिवाय माणसामाणसांना संघटितपणे एकमेकांविरूद्ध शिकविणारा जातीवाद नाहीसा होणार नाही. महाराष्ट्रातील समाजमन विविध गंडांनी दुभंगले आहे. अनेक प्रकारच्या पूर्वग्रहांनी ते व्यापलेले आहे. त्यामुळे या समाजात भावनिक एकात्मता आढळत नाही. उलट अनेक तऱ्हेची भेदाभेदाची मोठी थोरली उतरंड रचली आहे. म्हणूनच हिंदुस्थान दुबळा बनला, प्रगतीपासून दूर गेला. ही प्रगती यशस्वी करून घ्यावयाची असेल व आर्थिक व औद्योगिक क्रांती करावयाची असेल तर समाजातील ही उतरंड नाहीशी केली पाहिजे. या संदर्भात यशवंतराव म्हणतात,''समाजामध्ये आम्ही ही जी उच्चनीचतेची, जातीभेदांची, वर्णभेदांची उतरंड रचलेली आहे ती केवळ एकाच प्रांतात रचलेली नसून सर्व हिंदुस्थानभर रचलेली आहे. ही उतरंड मोडण्याचे काम ज्या दिवशी आपण करू त्या दिवशी आपण खरी क्रांती केली असे मी म्हणेन.'' माणसामाणसातील जातीयता नष्ट करून सामाजिक समता प्रस्थापित झाली पाहिजे. एका समाजाला दुसऱ्या समाजापासून बाजूला ठेवणाऱ्या या सामाजिक विषमतेच्या भिंती आपण पाडून टाकल्या पाहिजेत. एक

मन एक समाज अशी भावना निर्माण झाली पाहिजे आणि प्रेमाचे आणि सहकाराचे चित्र निर्माण झाले पाहिजे अशी अपेक्षा यशवंतराव करतात.

## संतांना पडणारी जातीची चौकट

यशवंतरावांनी समाजाला जाती-धर्मनिरपेक्ष विचारांचे संस्कार आपल्या भाषणांतून दिले. जातीचा विचार त्यांच्या मनाला फारसा शिवला नाही. किंबहुना जातीचे राजकारण त्यांना फारसे आवडत नसे. हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन, पारशी, शीख अशा धर्माच्या लोकांमध्ये त्यांनी कधी फरक केला नाही. उलट मोठ्या माणसांची परस्परांशी तुलना करू नये. त्यांना विशिष्ट जातीचे बनवून आपण करंटेपणा दाखवित आहोत. या संदर्भात ते म्हणतात,''महात्मा फुले फक्त माळ्यांचे, डॉ. आंबेडकर फक्त बौद्धांचे, गांधी फक्त गुजराथ्यांचे, टिळक फक्त ब्राह्मणांचे, शिवाजीमहाराज फक्त मराठ्यांचे अशा प्रकारे जर आम्ही या महापुरुषांच्या वाटण्या केल्या, तर या हिंदुस्थानामध्ये सामाजिक क्रांती कधीच होणार नाही.''ज्या त्या जातीतील लोकांनी त्यांचे उत्सव साजरे करणे, त्यांची पूजा करणे यशवंतरावांना मान्य नाही. कारण त्या व्यक्तींचे जीवन हे सर्व समाजासाठी होते. म्हणून त्यांच्याविषयी सर्व समाजाने आदर दाखवून त्यांच्या शिकवणुकीचे अनुकरण करावे. संतांनीही आम्हा महाराष्ट्रीयांना हीच शिकवण दिल्याचे ते सांगतात. पंढरीच्या भागवत धर्माच्या झेंड्याखाली तुकाराम, रामदास, नामदेव, ज्ञानेश्वर, चोखामेळा, गोरा कुंभार, सावतामाळी अशा अठरा पगड जातींची मंडळी एकत्र आली. त्याचवेळी खऱ्या अर्थाने सामाजिक क्रांती व्हायला हवी होती. पण आज आम्ही संतांना सुद्धा आमच्या सोयीप्रमाणे आमच्यासारखे करतो. म्हणून जुन्या जातीधर्माच्या परंपरांनी येथील सामाजिक क्रांतीला नेहमीच अडथळा निर्माण केल्याचे ते सांगतात. ''कोणी राजकारणाच्या क्षेत्रात काम करीत असतील, कोणी साहित्याच्या क्षेत्रात काम करीत असतील, कोणी आर्थिक क्षेत्रात काम करीत असतील किंवा कोणी दुसऱ्या कुठल्या क्षेत्रात काम करीत असतील, पण या सगळ्यांनी मनामध्ये हे समजले पाहिजे की आमच्यामध्ये नाना तऱ्हेच्या सामाजिक भेदाभेदांची मोठी थोरली उतरंड रचली म्हणून हिंदुस्थान दुबळा झाला. हिंदुस्थानचा दुबळेपणा, हिंदुस्थानचा मागासलेपणा हा या उतरंडीचा परिणाम आहे असे माझे स्पष्ट मत आहे.'' त्यांच्या या विचारावरून ते निधर्मी लोकशाहीवादाचे कसे पुरस्कर्ते होते हे स्पष्ट होते. जातीभेदापलीकडचा मानवतावादी दृष्टिकोन त्यांनी येथे मांडला आहे. यातून त्यांच्या निर्मळ व ऋजू मनाचे प्रतिबिंब आढळते. तसेच त्यांच्या मनाची मंगलता, उदात्तता, विशालत्व,शब्दाशब्दातून जाणवते. मानवी सुहृदयपणाचा ध्यास प्रकट होताना दिसतो.



म्हणूनच माणसाने माणसाविरूद्ध केलेल्या अन्यायाविरूद्ध पोटतिडकीने बोलणे हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय बनतो. ''मला वाटते आपण साऱ्यांनी एकत्र यावे. आपली जात, भाषा, विसरावी. आपले जुने भेद विसरावेत, भांडणे गाडून टाकावीत. मला वाटते, आपली प्रगती रोखणारी सारी बंधने आपण झुगारून द्यावीत. त्या बंधनांनी आपले जखडलेले मन मोकळे करावे. त्यात कष्टाचे प्रेम निर्माण व्हावे अन् त्या प्रेमाच्या आधारावर त्याने आपले पाऊल झपझप उचलावे. त्याला गरिबीची घृणा वाटावी. रिकामटेकडेपणाची लाज वाटावी. विनाकारण मतभेद चर्चा करून आळसांचे बुरखे पांघरून बसण्याचा मोह त्याला होऊ नये. त्याने एकच निर्धार करावा मी पुढे जाणार ! हा निश्चय ज्या माणसाच्या हृदयात पक्का होईल तोच महाराष्ट्राची प्रगती करू शकेल. हे कार्य सोपे आहे असे मी कधीच म्हणत नाही. पण इतिहासात आम्ही यापेक्षाही अवघड कार्ये करून दाखविली आहेत. मग आजच ती अशक्य का वाटावीत? आम्ही एकत्र आलो, आम्ही निश्चय केला, आपसातील मतभेद मिटवले व गरिबीची बंधने झुगारून देऊन आळसाचे विष बाजूला करून जर संपन्न आयुष्याचा मार्ग चालू लागलो तर महाराष्ट्राची जनता खऱ्या अर्थाने नवा इतिहास घडवू लागली असे मी म्हणेन.'' मतभेद केवळ मतभेदासाठीच असू नयेत असे यशवंतराव सांगतात. शिवाय जातीय भावना समूळ नष्ट करण्याच्या कार्यात समाज सदैव गुंतला पाहिजे व तसे प्रयत्न करावेत असाही सल्ला ते देतात.

## शहरापेक्षा ग्रामीण भागाकडे लक्ष :

यशवंतराव सामाजिक सुधारणेचे कार्य शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात करणे गरजेचे आहे असे सांगतात. कारण तेथील अज्ञान, रूढींचे प्राबल्य आणि प्रचंड दारिद्रय यामुळे खेड्यापाड्यातील समाज अतिशय देवभोळा व धर्मनिष्ठ बनला आहे. त्यामुळे तिथे जातीपातीची बंधने अतिशय कडक आहेत. अस्पृश्यता निवारणाचे कार्य हे तिथे काहीच करू शकत नाही. ग्रामीण भागात खेड्यापाड्यापर्यंत, आदिवासींपर्यंत समाज-सुधारकांनी पोहोचून तिथे परिवर्तन घडवून आणावे असा ते सल्ला देतात. हे करीत असताना त्या लोकांवर आपण उपकार करत आहोत ही भावना न ठेवता समाजकल्याण साधण्यासाठी करीत आहोत ही भूमिका असणे आवश्यक आहे, अशी अपेक्षाही ते बोलून दाखवितात. सामाजिक कार्याची दिशा सांगताना त्या कामाची दोन गटात विभागणी करतात, ''पहिल्या प्रकारात मुख्यत: शारीरिक दृष्ट्या अपंग असलेले, भिकारी, बालगुन्हेगार, वेश्या, स्त्रियांचा अनैतिक व्यापार करणारे व अमली पदार्थांचे सेवन करणारे व्यसनी लोक आणि त्याचप्रमाणे हरिजन, गिरिजन व माजी गुन्हेगार

यांसारख्या समाजातील सर्वसाधारण हक्कांपासून वंचित झालेल्या दलित लोकांच्या उद्धारासंबंधीच्या प्रश्नांचा समावेश होतो. तर दुसऱ्या प्रकारात बालक व युवक कल्याण, ग्रामीण पुनर्रचना, समाजविकास, कुटुंबनियोजन वगैरे प्रश्नांचा अंतर्भाव होतो.'' या दोन्ही गटांतील प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी सरकार व समाजसुधारणा करणाऱ्या नेतृत्वाची गरज ते बोलून दाखवतात. ही समाजसेवा करणाऱ्याला कुठल्याही शिक्षणाची गरज नसते. फक्त सेवा करण्याची आवड व इच्छा असावी लागते. तसेच सामाजिक प्रश्नांची विशालता व गुंतागुंत पाहता अनेक चांगल्या सामाजिक संस्थांनी समाज-सेवेकरिता पुढे यावे असे आव्हानही करतात. हे काम शास्त्रोक्त पद्धतीने होण्यासाठी शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, क्रीडामंडळे, कलाकेंद्रे यांच्या सहकार्याची अपेक्षा ते व्यक्त करतात. शिवाय कोणत्याही विरोधाला न जुमानता समाजसुधारणा करणे आवश्यक असते. विशिष्ट अल्पसंख्य समाजाचे हक्क मिळवून देण्यासाठी बहुसंख्यकांना विरोध करावा लागतो. हे कार्य सरकारपेक्षा अशा सामाजिक संस्थांनी करणे अत्यंत उचित आहे.

मरगळलेल्या सामाजिक जाणिवा दूर करण्याचे महत्त्वाचे काम यशवंतरावांच्या या भाषणांनी केले आहे. त्यांनी त्यांच्या या सामाजिक भाषणांतून समाजवादी वास्तवाचे चित्र निर्माण करण्याचा सदैव प्रयत्न केला. व्यक्तीच्या बांधीलकीचे तत्त्व पुढे करून समाजाच्या साकल्याचे खरेखुरे क्षेत्र सामाजिक जीवनच आहे हे यशवंतरावांनी आग्रहाने प्रतिपादन केले. भारतातील समाज गरीब व श्रमजीवी आहे. अशा समाजाला मूठभर भांडवलदारांच्या कचाट्यातून मुक्त करावयाचे असेल तर जातीधर्मावर आधारलेली जुनी समाजव्यवस्था नाहीशी झाली पाहिजे. प्राचीन सामाजिक परंपरेचा व प्रचलित व्यवस्थेचा समग्रपणे निषेध करणारी एक न्याय्य समाजव्यवस्था नव्याने निर्माण झाली पाहिजे. जन्मजात उच्चनीचतेच्या कल्पनेवर आधारलेली जुनी समाजव्यवस्था मोडून सामाजिक, आर्थिक समानतेवर आधारलेली नवसमाजरचना उभी केली पाहिजे. सामाजिक आशयाच्या नव्या नव्या कक्षा धुंडाळताना यशवंतरावांनी समाजाचा तळठाव घेण्याचा प्रयत्न केला. यशवंतराव म्हणतात, ''या देशातील गरीबी, या देशातील विषमता नष्ट व्हावी म्हणून आम्ही स्वराज्य मिळवले. पिढ्यान् पिढ्या आमच्या मानगुटीवर बसलेले हे गरिबीचे भूत उठले पाहिजे. जातींच्या, धर्मांच्या वेडाने आम्ही दबून गेलेलो, तुटलेलो, फाटलेलो असे लोक आहोत. आमची ही दबलेली, तुटलेली, फाटलेली मने बांधली जाऊन एक बनली पाहिजेत. हिंदुस्थान हा सुखासमाधानाने, कर्तृत्वाने आणि वैभवाने नांदणारा असा एक नवा समाज बनावा, एकजिनसी समाज बनावा, असे समाजवादी चित्र आज आमच्या डोळ्यांपुढे आहे.



यशवंतरावांना सामान्य माणसांना महत्त्व देणारी व विचारात घेणारी व त्यांच्या कल्याणाच्या विकासाचा कार्यक्रम राबविणारी लोकशाही अभिप्रेत होती. त्याचबरोबर ते समाजवादाला अधिक महत्त्व देत असत, कारण समाजवाद म्हणजे सर्व क्षेत्रांतील विषमता नष्ट करून सर्वांना समान संधी व संपत्तीचे समान वाटप हे समाजवादी विचारसरणीचे महत्त्वाचे अंग आहे. शोषणरहित समाजाची निर्मिती हे समाजवादी विचारसरणीचे अंतिम ध्येय आहे. एकता, लोकशाही व समाजवाद याची पूजा म्हणजे मानवतेची सेवा असल्याचे ते स्पष्ट करतात. ''समाजातील सर्व वर्गांना एकाच प्रकारची, एकसारखी आणि समान तऱ्हेची संधी मिळेल अशा प्रकारची, परिस्थिती निर्माण झाली पाहिजे. समाजवादी जीवनाकडे घेऊन जाणारे हे दोन मार्ग आहेत. कोठलीही एक व्यक्ती किंवा व्यक्तींचा समूह अथवा गट अगर वर्ग दुसऱ्यांची पिळवणूक करीत नाही अशा प्रकारचे समाजवादाचे चित्र मी पाहत असतो. घोडेस्वारासारखा, एक दुसऱ्याच्या पाठीवर बसला आहे, अशी परिस्थिती ज्यात नाही, अशा तऱ्हेचे आर्थिक समतेवर आधारलेले समाजवादाचे चित्र माझ्यासमोर आहे.'' याचबरोबर अपेक्षित समाजवादाचे चित्र साकार करण्यासाठी इतिहासावर विश्वास ठेवण्यास ते सांगतात. कारण इतिहासाची स्वतंत्र अशी प्रक्रिया असते. म्हणून आमचा समाजवाद भारताच्या विशिष्ट अनुभूतीतून निर्माण झाला असून ऐतिहासिक परिस्थितीतून घेतलेला आहे. त्यामुळे तो लोकशाही मूल्यांवर आधारलेला आहे, असे ते सांगतात. शिवाय समाजवादाच्या नावावर जनतेची कुणी दिशाभूल न करण्याची सूचनाही देतात. महाराष्ट्रात समाजवादाची रचना स्वतंत्रपणे करावयाची आहे. तो आमचा निर्धार आहे, ध्येय आहे, उद्देश आहे असे ते सांगतात. हे काम सहज शक्य नाही. त्यासाठी लक्षावधी लोकांच्या प्रयत्नांतून हळूहळू ते सहज शक्य होईल. ''विणकर जेव्हा महावस्त्र विणण्यासाठी बसतो तेव्हा ते महावस्त्र ताबडतोब तयार होत नाही. सुरुवातीला जेव्हा तो आपल्यासमोर गुंतागुंतीचे सगळे लांब धागे टाकून बसतो तेव्हा आपल्याला सगळा गोंधळ दिसतो. एका धाग्याशी दुसरा धागा समांतर अशा पद्धतीने टाकलेले अनेक धागे आपल्याला दिसतात. त्यावरून हा कसले महावस्त्र निर्माण करणार अशी आपल्याला शंका येते. परंतु तो जेव्हा त्या समांतर धाग्यामधून आडवे धागे टाकण्याचा प्रयत्न करतो तेव्हा त्यातून हळूहळू सुंदर महावस्त्र तयार होत चालल्याचा प्रत्यय आपणास येतो. समाजवाद आणण्यासाठी अशाच तऱ्हेचा प्रयत्न हिंदुस्थानमध्ये करावा लागेल.'' असे विचार त्यांनी विधानसभा व विधानपरिषदेच्या समोर मांडले. थोडक्यात शोषणरहित समाज निर्माण व्हावा. व्यावहारिकदृष्ट्या जे योग्य आहे त्याचा स्वीकार करावा. केवळ काल्पनिक तत्त्वावर अथवा तत्त्वज्ञानावर अवलंबून राहू नये.

असा सल्ला ते देतात. राजकारण हे समाजकारणाचा एक भाग समजून त्याच्या आधारे समाजकारण करावे. खेड्यातील गोरगरीब जनतेच्या विकासाचा विचार व्हावा. एवढेच नव्हे तर महात्मा गांधीजींच्या रामराज्याची कल्पना मूर्त रूपात करण्याचा प्रयत्न करावयाचा आहे. त्यासाठी ते म्हणतात, ''ज्या समाजामध्ये प्रत्येक मनुष्य स्वाभिमानाने आपली मान उंच करून निर्भयपणे वावरू शकेल त्याला पोटभर अन्न आणि अंगभर वस्त्र मिळेल. त्याला आपल्या बुद्धीचा आणि शीलाचा विकास करण्याची संधी मिळेल. अशा प्रकारचा समाज आपणास निर्माण करावयाचा आहे.'' या विचारावरून यशवंतरावांचे भविष्यकालीन भारतीय समाज कसा असावा, याबाबतचे स्पष्ट मत व्यक्त होते. शिवाय प्रत्येक माणसाने जात-पात, धर्म, भेदभाव विसरून विकासाचा ध्यास घेतला पाहिजे. लोकशाही आणि स्वातंत्र्याच्या मदतीने समानता निर्माण झाली पाहिजे. गोर-गरिबांची गरिबी हटवून लहान व मोठा हा भेद नाहीसा करणे महत्त्वाचे आहे. यासाठी प्रत्येक माणसाच्या मनात जागृती निर्माण झाली पाहिजे. प्रत्येकाने स्वाभिमानी बनले पाहिजे, ''मी गरीब राहणार नाही, मी उपाशी राहणार नाही, मी कोणाचा लाचार राहणार नाही. मी या देशाचा मालक आहे. मी स्वतंत्र देशाचा मालक आहे, मी लोकशाहीचा मालक आहे. मला या देशामध्ये लोकशाही टिकवली पाहिजे, स्वातंत्र्याची शक्ती मोठी केली पाहिजे. माझे स्वत:चे जे व्यक्तिमत्त्व आहे, माझे स्वत:चे जे सामर्थ्य आहे. ते मी देशाच्या कामाला लावले पाहिजे. त्यासाठी मला जो जो मार्ग मोकळा दिसेल तो तो मार्ग मी अंगीकारला पाहिजे.'' अशा प्रकारचे त्यांचे सामाजिक विचार अतिशय प्रगतिशील व आधुनिक मानायला हवेत. सामाजिक क्रांती साधण्याचे राजकारण हे साधन मानून सार्वजनिक जीवनातील काही मूल्ये, ध्येय समाज-परिवर्तनासाठी समाजासमोर ठेवतात.

## समृद्ध समाजाच्या निर्मितीचे स्वप्न

यशवंतरावांनी आपल्या भाषणातून समाज जीवनामध्ये परिवर्तन घडवून एकसंध समृद्ध समाज निर्माण करावा अशी रास्त अपेक्षा व्यक्त केली आहे. याचबरोबर समाजघटकांनी एकमेकांकडे संशयाने पाहणे सोडून दिले पाहिजे. विषमतेवर आधारलेल्या, विषमता निर्माण करणाऱ्या किंवा विषमता मान्य करणाऱ्या कोणत्याही समाजव्यवस्थेला यशवंतरावांनी नि:संदिग्धपणे विरोध दर्शविला आहे. सूज्ञ, सुविचारी प्रत्येक व्यक्तीने शाश्वत हिताचा विचार करावा असे यशवंतरावांच्या निर्मितिशील मनाचे जरी विचार असले तरी तिच्यातून सामाजिक जाणीवही प्रभावीपणे प्रकट झाली आहे. हे काम ज्ञानेश्वरांपासून रामदासांपर्यंत सर्व मराठी संतांनी आपल्या साहित्य



निर्मितीच्या माध्यमातून केले. तेच कार्य म्हणजे समाजशिक्षण, प्रबोधन आणि सांस्कृतिक उन्नयन करण्याचे काम त्यांच्या अनेक भाषणांनी केले आहे. उलट समाजमीमांसा, धर्मचिकित्सा करण्याच्या नावाखाली उच्चवर्णीयांवर अर्वाच्य भाषेत टीका करून भाबड्या श्रोत्यांकडून टाळ्या मिळविण्यासाठी प्रक्षोभक बोलणे त्यांनी टाळले. समाजजीवनात द्वेषाग्नी भडकवणारे वक्तव्य त्यांनी केले नाही. द्वेषाग्नीच्या ज्वाळातून परिवर्तन होईल यावर त्यांचा विश्वास नव्हता. म्हणून बहुजन समाजाला, दलित समाजाला, तरुणांना, राजकीय नेत्यांना, सामाजिक कार्यकर्त्यांना द्वेषाने भडकवणारे, बहकवणारे आणि क्षणभराचे भ्रान्त समाधान देणारे असे भाषण त्यांनी कधी केले नाही. उलट तसे केल्याने कोणत्याही समाजघटकाचे अंतिम हित साधणारे नाही, याची त्यांना परिपूर्ण जाणीव होती. त्यांच्या काळात मराठी-अमराठी, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, महार-महारेतर किंवा अन्य जातीयवाद जे निर्माण झाले ते त्यांनी तेवढ्याच संयमशील वृत्तीने हाताळले. ते म्हणतात, ''मी नेहमी सांगत आलो आहे की, 'मराठा' हा शब्द जातिवाचक नाही. आचार्य अत्र्यांनी आपल्या वर्तमानपत्राला 'मराठा' हे नाव दिले ते काय तो शब्द जातिवाचक आहे म्हणून दिले? 'मराठा' शब्दामागे महाराष्ट्राच्या एकजिनसी जीवनाची भावना आहे. 'मराठा' शब्दाचा हा अर्थ आम्हाला अभिप्रेत आहे.'' ग. त्र्यं. माडखोलकरांनी आपल्या लेखात महाराष्ट्र राज्य हे 'मराठा राज्य' होणार की 'मराठी राज्य' होणार? या विचारलेल्या प्रश्नाला यशवंतरावांनी तेवढ्याच मार्मिकतेने उत्तर दिले आहे. मराठा या शब्दाला जातिवाचक अर्थ, आपण का चिकटवतो असा सवाल करून 'महाराष्ट्रातला तो मराठा' अशी साधी सुबोध व्याख्या ते करतात, यावरून त्यांची जाती संदर्भातील भूमिका किती व्यापक होती हे स्पष्ट होते. मराठी समाजजीवन महाराष्ट्रीयत्व अथवा भारतीयत्वाचेच अंग असल्याचे ते सांगतात. म्हणून संशयाचे वातावरण निर्माण होता कामा नये; समाजात 'भंगलेले मन' निर्माण झाले तर गुणांची पूजा 'मेरिट'चे महत्त्व आणि संशयाचे वातावरण दूर केल्याने भंगलेले मन सांधता येईल असा विश्वास व्यक्त करतात. उच्च शीलाची व चारित्र्याची माणसं निर्माण व्हावीत. तेच या देशाचे खरे भांडवल आहे. गुणी, बुद्धिवान व कर्तृत्ववान माणसांचे भरघोस पीक महाराष्ट्रात निर्माण झाले पाहिजे. शिक्षणाने माणसांचे जीवन संपन्न बनले पाहिजे. उमेदीने, धैर्याने आणि ईर्षेने आपल्या सगळ्या प्रश्नांना आपणच तोंड दिले पाहिजे. पूजा ही नेहमी चांगल्या गोष्टीची, सत्याची व न्यायाची होत असते. अन्यायाचा व द्वेषाचा विजय कधीच होत नसतो. म्हणून आपण एक कर्तृत्ववान समाज निर्माण केला पाहिजे. हा समाज जातीयवादी विचारांपासून बाजूला काढला पाहिजे. तशी माणसे निर्माण करता आली पाहिजेत. माणसे जन्मत:च मोठी नसतात. मोठे प्रश्न सोडविताना

गुण दाखविण्याची पुष्कळांना जी संधी मिळते त्यातून माणसे मोठी होतात.

प्रत्येक माणसाने मिळालेल्या संधीचा योग्य फायदा घेऊन आपल्या कामाचा, कार्याचा ठसा जनमानसात उमटविला पाहिजे. विधायक कार्यकर्तृत्वाने अशा संधीचे सोने केले पाहिजे. असा विश्वास ते व्यक्त करतात.

## पैसा तिजोरीत नसून ढगात आहे

महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील अत्यंत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे गरिबीचा आहे. या गरीब समाजाला समजावून देऊन त्यांना कार्यप्रवण केले पाहिजे गोर-गरिबांचे हाल होणार नाहीत, या दृष्टीने सदैव विचार करावा लागेल. या देशात थोड्याच माणसांनी श्रीमंत असून चालणार नाही. त्यासाठी सर्वांमध्ये आर्थिक क्षमता निर्माण झाली पाहिजे व ती व्यक्ती सर्वार्थाने शक्तिमान व्हावी. आपले पोट भरण्याकरिता समाजातील कोणत्याही व्यक्तीला दुसऱ्यापुढे पदर पसरावा लागू नये. उद्याचा सशक्त समाज निर्माण करावयाचा असेल तर अनंत साधनांनी युक्त असलेल्या या देशामध्ये आम्ही गरीब आहोत असे कोणीही सांगता कामा नये. म्हणून ही परिस्थिती काबूत आणावयाची असेल तर या गोरगरिबांच्या प्रश्नासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत. ज्या योगे महाराष्ट्राचा मान आणि महाराष्ट्राची शान वाढेल असे काम करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शिवाय महाराष्ट्रातील माणसाला प्रश्नाचे गांभीर्य समजावून दिले तर तो उत्साहाने उठतो, पण कर्तव्याची जाणीव दिली नाही तर तो पुन्हा झोपतो, असा मराठी माणसांचा स्वभाव आहे. तेव्हा या गोरगरिबांचे कल्याण करावयाचे असेल, त्यांना भरभराटीचे व सुखाचे दिवस निर्माण करावयाचे असतील, त्यांच्या अपेक्षांची पूर्ती करावयाची असेल तर त्यांच्या मनातील विचलित अवस्था नाहीशी करून त्यांना 'स्व' कर्तृत्वाची जाणीव करून देऊन प्रोत्साहित केले पाहिजे. ''गरीबमनात नव्या आकांक्षा उत्पन्न करून त्यांना कार्यप्रवण करण्यास प्रवृत्त करण्याऐवजी त्यांच्यात असंतोषच पसरविण्याचा प्रयत्न झाला तर रात्री त्यांचे लक्ष त्या श्रीमंताच्या तिजोरीकडे जाईल इतकेच. पण खरा प्रश्न कायमच राहील. पैसा हा पूंजीपतींच्या किंवा सरकारच्या तिजोरीत नसून तो आकाशातील ढगांत आहे. त्या ढगांतून खाली पडणाऱ्या जलधारात आहे. त्या पाण्याच्या प्रवाहरूपी नदीत आहे. नदीच्या दुकाठास मिळणाऱ्या काळ्या जमिनीत आहे. त्याच जमिनीतील खनिज संपत्तीत आहे. त्याच खनिज संपत्तीद्वारा निर्माण होणाऱ्या वैज्ञानिक यंत्रसामुग्रीत आहे. इतकेच नव्हे तर त्या सर्वांना एका सूत्रात बांधणाऱ्या मानवाच्या मनगटात आहे. असे जर ह्या गरीब जनतेला पटवून देऊन त्यांच्यात सृजनशक्ती निर्माण करून त्यांना कार्यप्रवण केले तर आपले सारे प्रश्न सुटतील



व त्या सुटण्यातच भारतीय लोकशाहीचे भवितव्य सामावलेले आहे.'' असे विचार यशवंतरावांनी 'हिंदी लोकशाहीचे भवितव्य' या विषयावर वसंत व्याख्यानमालेत पुणे येथे इ. स. १९५२ मध्ये मांडले. या गरीब समाजाने निराशावादी, भांडखोर, रडवी, विकलतेची, विषादाची आणि पराभवाची भावना सोडून दिली पाहिजे आणि आपल्या स्वत:च्या मनगटाच्या सामर्थ्यावर स्वत:चे जीवन स्वत:च फुलवले पाहिजे असा विश्वास ते व्यक्त करतात. यशवंतरावांनी सामाजिक प्रश्नांवर बोलताना सामूहिक विकास, रस्ते, पाणी, शिक्षण, जातीयता निर्मूलन, आर्थिक प्रगती, सेवाभावी संस्थांचे कार्य, कल्याणकारी योजना, शेतीचा प्रश्न, औद्योगिक विकास यांसारख्या असंख्य प्रश्नांवर भाष्ये केली आहेत. ''सबंध मानवी समाजाचे कल्याण हे आपले अंतिम ध्येय असून आर्थिक विकास हे ते ध्येय साध्य करण्याचे एक साधन आहे. त्यामुळे सामाजिक समस्यांच्या संदर्भात आर्थिक समस्यांची पाहणी करणे आवश्यक आहे.'' यासाठी ज्ञानाची उपासना करणाऱ्या ज्ञानी, विद्वान, बुद्धिवंतांनी कोणाच्या आमंत्रणाची वाट न पाहता स्वयंस्फूर्तीने पुढाकार घेऊन आपली ज्ञानगंगा समाजापुढे खुली केली पाहिजे. सामाजिक परिवर्तन ज्ञानी विद्वानांच्या विचारमंथनातून होत असते. म्हणून ज्ञानाची उपासना करणाऱ्याची एक प्रचंड आघाडी निर्माण व्हावी, असे झाल्यास अनेक सामाजिक प्रश्न समूळ नाहीसे होतील. यशवंतराव हे जीवनवादी साहित्यिक व सामाजिक कार्यकर्ते असल्याने त्यांनी समाजावर संस्कार आणि जीवनमूल्यांवर निष्ठा ठेवणारे विचार दिले. सामाजिक दु:खे आणि समस्या यांना सामोरे जाणारा मार्ग त्यांनी भाषणांतून दाखवण्याचा प्रयत्न केला. अनेक सामाजिक प्रश्न हाताळले व वास्तवता आणि ध्येयवादास पूरक विचार मांडले. त्यामुळे त्यांचे हे विचार वाङ्मयीन तत्त्वविवेचनपर निबंधात समाविष्ट होणारे आहेत. कारण अशा प्रकारच्या निबंध वाङ्मयात मूल्ये, तत्त्वे किंवा विचारप्रणाली या संबंधीचे विवेचन अभिप्रेत असते. म्हणजेच तत्त्वविवेचन हेच साधार असते. यशवंतरावांनी समाजातील अनेक प्रचलित कळीच्या मुद्द्यांवर भाषणातून मते मांडली आहेत. निबंध वाङ्मयातून अशा विविध प्रश्नांवर चर्चा केली जाते अथवा त्या समस्यांवर परखड अशी मते नोंदवली जातात. अशा स्वरूपाच्या निबंधात त्या विषयाचा दृष्टिकोन, त्या विषयाचे साक्षेपी ज्ञान, मुद्देसूद मांडणी इत्यादींना महत्त्व असते. यशवंतरावांच्या सामाजिक विषयांवरील भाषणांतून सुद्धा या सर्व मुद्द्यांचा ऊहापोह आलेला आहे. निबंध लेखन हा एक प्रकारचा विचार व्यवहार असतो. यशवंतरावांच्या भाषणांतूनही विवेकशील विचारांचे विवेचन येते. या विवेचनासाठी सामान्य तर्कपद्धती, तुलनात्मक पद्धती, ऐतिहासिक पद्धती, शास्त्रीय पद्धती यांचा

उपयोग केला जातो. आपल्या विचारांचे प्रतिपादन करून प्रभावीपणे त्या विचारांची मांडणी केली जाते. यशवंतरावसुद्धा सामाजिक, धार्मिक, राजकीय असा कोणतातरी सिद्धान्त, विचार उतरविण्याचा मनोमन प्रयत्न करत असत. त्यासाठी लेखणी आणि वाणी या दोन साधनांचा त्यांनी उपयोग केला. लोकजागृती आणि लोकसंग्रह ही दोन उद्दिष्टे समोर ठेवून ते सतत कार्यमग्न राहिले. त्यांच्या लेखनाची जी शैली होती तीच त्यांच्या वक्तृत्वाची राहिली. या गुणांमुळेच त्यांची भाषणेही निबंधासारखी होत. त्यांच्या या निबंधशैलीतील भाषणांतून देशहिताची कळकळ, लोकजागृतीची तीव्र तळमळ, निर्भयता आणि निश्चय इ. गुण ओतप्रोत भरलेले आहेत. तसेच त्यांच्या या निबंध धाटणीच्या भाषणांतून त्यांच्या मनाची बैठक विचारवंतांची असली तरी तिला सर्वस्पर्शी रसिकतेचा, सूक्ष्म निरीक्षणाचा, सामाजिक जिव्हाळ्याचा, विविध विषयात रमणाऱ्या वृत्तीचा आणि अस्सल मराठी व भरघोस अशा सुंदर भाषाशैलीचा आधार आहे. त्यामुळे त्यांच्या या साहित्यातून यशवंतरावांच्या व्यासंगाचे दर्शन घडतेच शिवाय त्यांच्या शैलीचा डौल, पांडित्याचे प्रतिबिंब जागोजागी पाहावयास मिळते.

यशवंतरावांची भाषणे ही आशय, आविष्कार व अभिव्यक्तीच्या दृष्टीने महत्त्वाची असल्याने ती अभ्यासाचा विषय बनतात. या भाषणांचे भाषेच्या दृष्टीनेही वेगळेपण आहे. कारण आपल्या विचार विश्लेषणात त्यांनी भाषेला महत्त्वाचे स्थान दिले आहे. त्यांचे भाषण ही व्यक्तिगत क्रिया असल्याने त्यांच्या तोंडून व्यक्त होणाऱ्या बोलीभाषेचा ठसा शाश्वत स्वरूपाचा आहे. त्यामुळे त्यांची भाषणे ही व्यक्तिगत आविष्काराची भाषिक प्रात्यक्षिके आहेत. या भाषणांतून आशय कसा प्रकट होतो. भाषा कशी वापरली जाते. त्याहीपेक्षा आशय प्रकट करण्याची त्यांच्या भाषेची पद्धती कशी होती हे प्रामुख्याने त्यांच्या भाषणांतून पाहावयास मिळते. भाषेचा उपयोग भाषणात कलाद्रव्यासारखा आहे. त्यामुळे भाषणात भाषेचा खास उपयोग केला आहे. त्यामुळे भाषा हेच त्यांच्या भाषणाचे महत्त्वाचे माध्यम आहे. ते जेव्हा भाषणांमधून शब्दाशब्दांतून पुढे सरकत असत तेव्हा त्यासाठी अलंकार, लय, प्रतिमा यांचा उपयोग करत असत. म्हणून समाजउपयोगी साधन म्हणून सामाजिक, शैक्षणिक विचारांचे दर्शन घडविण्यासाठी भाषेचा कलात्मक उपयोग त्यांनी केला. यशवंतरावांसारखा वक्ता भाषेचा हा जो नेहमीपेक्षा निराळा असा उपयोग करतो त्यासच त्यांची शैली म्हणता येईल. आल्पशा शब्दभांडाराच्या माध्यमातून आपल्या आशयाला अनुरूप अशा शब्दांची निवड करून त्यांचा नव्या संदर्भात वापर करून नवी रूपे तयार करून भाषेच्या सामर्थ्यात त्यांनी भर घातली आहे.



## यशवंतरावांची इतर विषयावरील भाषणे

यशंवतरावांनी समाजाच्या प्रगतीला पोषक अशा नवविचारांचा उपयोग भाषणातून केला. त्यांचा तो काळच उद्‌बोधन आणि प्रबोधनाचा होता. तो काळ मराठी साहित्यातील उत्साहपूर्ण विस्ताराचा ऐतिहासिक टप्पा होता. यशवंतराव चव्हाण आणि हा कालखंड यांचा सांधा छानपैकी जमून गेला होता. कारण राजकीय नेत्याला सामाजिक, सांस्कृतिक परंपरा सांभाळावीच लागते. नेत्याला समोरच्या समाजाचे भान ठेवून परंपरा आणि नवपरिवर्तन यांचा मेळ घालावा लागतो. त्याला सतत सुबोध परिभाषेत व सरळ भाषेत बोलावे लागते. हे बोलण्यासाठी विषय प्रतिपादनासाठी त्यांनी अनेक विषयांवर आपले फक्त चिंतन केले. समाजात जेथे ढोंग, असत्य, लुच्चेगिरी, प्रतिगामित्व, अन्याय, जुलूम या गोष्टी आढळल्या तेथे त्यांनी भाषणांतून आवाज उठवला. ढोंगी आणि भ्रामक लोकांच्यावर तेवढ्याच तिखट अशा प्रतिक्रिया व्यक्त करून त्यांना सावधानतेचा इशारा दिला तर गुणी आणि पराक्रमी लोकांच्या पाठीवर शाबासकीची थाप टाकून त्यांचे कौतुक केले. महाराष्ट्राला वंदनीय आणि आदरणीय वाटणाऱ्या अनेक सत्पुरूषांचा आणि विद्वानांचा गौरव केला. सत्कार्य आणि सद्‌हेतु यांचा सदैव विजय व्हावा म्हणून ते सतत झगडत राहिले. देशातील आणि इतर प्रांतातील भीषण आणि बिकट घटनांची माहिती भाषणांतून दिली. 'संयुक्त महाराष्ट्र' च्या प्रसंगी तर या विषयावर निरनिराळ्या बाजूने त्यांनी मते नोंदवली. महाराष्ट्राच्या विकासाच्या आणि कल्याणाच्या चळवळीचा त्यांनी त्यांच्या भाषणातून हिरिरीने पुरस्कार केला. राजकारण हे लोककल्याणासाठी असते हे त्यांनी पुढाऱ्यांना व जनतेस निक्षून सांगितले. त्यांनी आपली बुद्धिमत्ता, मुत्सद्देगिरी आणि कर्तृत्व यांचा योग्य वापर करून आपल्या वाणीच्या जोरावर महाराष्ट्राचे आणि राष्ट्राचे हित साधण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्राच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी अनेक योजना राबविल्या. त्या योजना समाजापर्यंत जाण्यासाठी भाषणाच्या माध्यमातून जनजागृती केली. महाराष्ट्राच्या या प्रश्नांखेरीज सबंध राष्ट्राच्या आर्थिक, राजकीय, संरक्षण, परराष्ट्र इ. प्रश्नांबाबत त्यांनी परखड विचार मांडले. एकूणच देशाच्या पुरोगामी धोरणाला दिशा देण्यासाठी, तसेच राज्यकारभारातील वाढत्या भ्रष्टाचाराचे निर्मूलन करण्यासाठी केंद्रीय मंत्री या नात्याने त्यांनी आपले सर्व वजन आणि सामर्थ्य पणाला लावले. देशाच्या सर्व भागांमधील जनतेला न्यायाची, समानतेची नि विकासाची शाश्वती वाटण्यासाठी अनेक व्यासपीठांवरून त्यासंबंधी समजूतदार विचार मांडले. कॉंग्रेस राजवटीचा डगमगता डोलारा सावरला जाण्यासाठी अनेक कॉंग्रेस शिबिरापुढे त्यांनी नेत्यांना, कार्यकर्त्यांना,

मार्गदर्शन केले. राजे लोकांच्या तनख्याबाबत पुरोगामी धोरण स्वीकारून त्यांनी त्यांचे तनखे बंद केले. यावरून यशवंतरावांच्याकडे असलेली समाजवादी दृष्टी व पुरोगामी धोरण लक्षात येते. राष्ट्रीय बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात त्यांनी पुढाकार घेतला. चीन-पाकिस्तान या दोन देशांच्या वेळची युद्धजन्य परिस्थिती हाताळली. यशवंतरावांनी समाजजीवनाच्या सर्व अंगांविषयी रस घेऊन राजकारण, समाजकारण केले. यासाठी आवश्यक असणारे संभाषणचातुर्य व वक्तृत्वकला त्यांना अवगत होती. बोलण्यात मनाचा मोकळेपणा व प्रामाणिकपणा होता. बुद्धी आणि संस्कृती यांचा मनोहर समन्वय त्यांच्या व्यक्तिमत्वात होता. त्यांच्या सानिध्यात आलेला कोणताही माणूस त्यांच्या पारदर्शक जीवनाने आणि मधूर भाषणाने मोहित झाल्याखेरीज राहात नसावा. राजकारणाच्या दाहक वातावरणामध्येही एखाद्या फुलपाखराप्रमाणे आपल्या जीवनातला आनंद आणि कोमलता कायम ठेवण्यासाठी ते साहित्यिकांच्या संपर्कात राहिले. या त्यांच्या सर्व कार्यकर्तृत्वात त्यांच्या अमोघ वाणीचा वाटा फार मोठा आहे. त्यांच्या पुढे शब्द हात जोडून उभे असत. या वाणीच्या जोरावर ते लोकांच्या हृदयाला हात घालत. त्यांना मंत्रमुग्ध करत. त्यांच्या अंतरीच्या भावना आणि संताप व्यक्त करत. असे वक्तृत्व त्यांच्याजवळ होते. अशा त्यांच्या सर्व वक्तृत्वाचा अथवा भाषणांचा आढावा संशोधनविस्तार भयास्तव घेणे अशक्य आहे. तरीपण त्यांच्या काही मोजक्या इतर भाषणांतील शैलीच्या व आशयाच्या दृष्टिकोनातून संक्षिप्त असा अभ्यास येथे अभिप्रेत आहे. कारण राजकारण, समाजकारण, परराष्ट्र धोरण, अर्थनीती, सहकार, विकासाच्या दिशा, प्रशासन, लोकशाहीतील नियोजन, शेती, नागरिकीकरण यासारख्या असंख्य विषयांवरील त्यांचे चिंतन हे स्वतंत्र अभ्यासाचा विषय होईल. एवढे विचारांचे सामर्थ्य यामध्ये आहे. यामुळे काही भाषणांचाच विचार मर्यादित अर्थाने येथे केला आहे.

## विष पचविणारे महादेव निर्माण व्हावेत

यशवंतरावांनी इ.स. १९५६ मध्ये राज्यपुनर्रचना विधेयकाची विधानसभेच्या सभागृहात जोरदार शिफारस केली. राज्यपुनर्रचना प्रश्नावरील कायद्याचा मसुदा सभागृहामध्ये मत प्रदर्शनासाठी ठेवण्यात आला होता. भौगोलिकदृष्ट्या मुंबई महाराष्ट्रात असणे किती महत्त्वाचे आहे हे सांगून त्यांनी एका राज्यात एका भाषेला एकत्र आणण्याचा हा प्रवाह आहे असे नमूद केले. याविषयी बोलताना राज्यात कोणती परिभाषा वापरावी याबद्दलची त्यांची मनोवस्था ते अशी व्यक्त करतात, ''शब्दांनी भावना पूर्णतया व्यक्त होतातच असे नाही आणि कधी कधी शब्दांनी गैरसमज व गोंधळ वाढण्याचा प्रकार घडतो, असा माझा अनुभव आहे. म्हणून शब्दांचा वापर



करताना मी काळजी घेत आहे.'' यशवंतराव शाब्दिक सामर्थ्याबाबत किती सापेक्षी आहेत हे यावरून स्पष्ट होते. यशवंतरावांसारखा निष्ठावान पुरूष केवळ कृत्रिम व मानभावीपणाने भाषण करताना आढळत नाही. तसेच कोणत्याही संकटांना भिऊन अथवा प्रलोभनाने मोहित होऊन आपला वक्तृत्व विक्रम करतानाही आढळत नाहीत. योग्य शब्दांची निवड करून वक्तृत्वपूर्ण शैलीयुक्त भाषणांनी जनमनांना आकर्षून घेण्याची करामत यशवंतरावानी केली. कोणतीही असंतोषाची चळवळ पेटविणाऱ्या मार्गाने सोडविता कामा नये. असे त्यांचे स्पष्ट मत होते. त्यामुळे ''मुंबई कोणाची हा प्रश्न भौगोलिक प्रश्नावर सोडवावा लागेल कारण इतिहास काही गोष्टी दडवून ठेवत असेल पण भूगोल काही दडवू शकत नाही. म्हणून महाराष्ट्रात मुंबई घातली नाही तर महाराष्ट्राचे अकल्याण होईल.'' असा सावधानतेचा इशारा ते सभागृहास देतात. तेव्हा महाराष्ट्रीय माणसांच्या अंत:करणात काय आहे हे जरी त्यांना सांगता आले नाही तरीही त्यांच्या शब्दांवरून व त्यांच्या अर्थावरून काय दिसते त्या भावना त्यांनी सांगितल्या तेव्हा हा प्रश्न सोडवला पाहिजे. तो प्रश्न निकालात काढायचा की नाही की तसाच ठेवायचा त्याचे उत्तर सहज सांगता येत नाही. याबद्दलचे त्यांचे चिंतन ते असे प्रकट करतात, ''जगातील अवघड प्रश्नांची उत्तरे पुस्तकामध्ये लिहून ठेवलेली नसतात. ती तशी ठेवली असती तर आपणा सर्वांचे काम सोपे झाले असते. तेव्हा जीवनामध्ये ज्या निरनिराळ्या बिकट समस्या निर्माण होतात त्याला योग्य विचार करून उत्तर देणे किंवा ते देण्याचा प्रयत्न करणे यात खरा पुरूषार्थ आहे. भाषिक वादाचे तत्त्व एका टोकाला गेल्यामुळे त्यातून विष निर्माण झाले ही गोष्ट खरी आहे, पण हा अवघड प्रश्न कोणीतरी सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यापासून बाजूला राहता येणार नाही. तेव्हा देशातील कोणीतरी मोठ्या व्यक्तींनी पुढे येऊन त्यातून मार्ग काढला पाहिजे. आणि जरी विष निर्माण झाले असले तरी कोणीतरी ते प्याले पाहिजे. समुद्रमंथनातून निर्माण झालेले विष प्राशन करण्यासाठी महादेवांना पुढे यावे लागले किंवा विष प्याल्यामुळे महादेव निर्माण झाले असे सांगण्यात येते. त्याचप्रमाणे हा अवघड प्रश्न निर्माण झाला आहे. तेव्हा हे विष कोणीतरी महादेवाने घेतले पाहिजे व ते पचविले पाहिजे.'' यशवंतराव महाराष्ट्र व मराठी माणसे यांच्या प्रगतीसाठी सदैव प्रयत्नशील राहिले. त्यांची प्रगती, मराठमोळी भाषा, आणि महाराष्ट्रीयन संस्कृती जपण्याचे काम, संवर्धन करण्याचे काम त्यांनी आयुष्यभर केले. या संदर्भात ते म्हणतात, ''मराठी भाषेचे राज्य यशस्वी करण्यासाठी, मराठी माणसांच्या मनात जो ज्ञानेश्वर आहे, जो रामदास आहे, जो तुकाराम आहे आणि त्याच्या मनात जी मराठी माऊली आहे. त्या सर्वांना जागे करण्याचा, माझ्या शरीरात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत मी

प्रयत्न करीन.'' यशवंतरावांनी स्वत:च्या जीवननिष्ठेबाबतची आपली भूमिकाच येथे मांडली आहे. मानवता हीच त्यांच्या जीवनाची निष्ठा असल्याचे ते सांगतात. यशवंतरावांच्या मनात मराठी भाषा आणि महाराष्ट्र यांच्याबद्दल असलेली आस्था ठिकठिकाणी झालेल्या भाषणलेखनातून पाहावयास मिळते. मराठवाड्याबाबतची आपुलकीची भावना व जिव्हाळाही त्याच स्वरूपाचा आहे. ते म्हणतात, ''ह्या विभागांशी मराठी बोलणाऱ्यांचे नाते अत्यंत जवळचे आहे. आमच्या एका मराठी कवीने या संबंधीची आमची भावना फार सुंदर रीतीने व्यक्त केली आहे. तो म्हणतो, मराठी बोलणारा माणूस जेव्हा मराठवाड्याकडे जायला निघतो तेव्हा माहेरला जायला निघालो आहे असे त्याला वाटते. मराठीतले उत्कृष्ट काव्य मराठवाड्यातल्या पैठणला लिहिले गेले आहे. एकनाथ, ज्ञानेश्वर ह्यांसारखे महाराष्ट्राचे मोठे संत त्या ठिकाणी होऊन गेलेले असल्यामुळे मराठवाड्याबद्दल महाराष्ट्रीयांना आपुलकी वाटते. थोडक्यात सांगावयाचे तर महाराष्ट्राचे अंत:करण ह्या भागाशी एकजीव झालेले आहे. अशी ह्या मराठवाड्याबद्दल भावना आहे.'' यशवंतरावांच्या ज्वलंत आणि अनुभवी विचारांचे वाहन असलेली मराठी भाषा व मराठवाडा यांचा अतूट संबंध या त्यांच्या विचारांतून स्पष्ट होतो.

## महाराष्ट्राची विविधता व एकता

मुंबई आकाशवाणीच्या भाषणातून त्यांनी महाराष्ट्राच्या पूर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तर भागातील विविधतेतील एकतेची कल्पना दिली आहे. कविवर्य मुकुंदराज, ज्ञानेश्वर, नामदेव, चक्रधर आदी संतांनी महाराष्ट्राच्या एकतेसंबंधी प्रयत्न केल्याची जाणीव ते करून देतात. महाराष्ट्राच्या विविधतेत समृद्धतेने कशी भर घातली आहे हे सांगताना ते म्हणतात, ''उत्तरेस सातपुडा आणि पश्चिमेस सह्याद्री यांची उत्तुंग शिखरे व यांच्या उतरणीवरील घनदाट जंगले यांनी या भागास भव्योदात्त सौंदर्य प्राप्त झाले आहे. तर वर्धा वैनगंगेच्या खोऱ्यात जागोजाग असलेली जलाशये व पळसाच्या लाल फुलांनी डवरलेली राने मनाला प्रसन्नता आणतात. कोकणचा किनारा अथांग पश्चिम सागराचे दर्शन घडवितो, तर गोदेच्या पाण्याने पुनीत व समृद्ध झालेली मराठवाड्याची भूमी महाराष्ट्राच्या तेजस्वी भूतकाळाची व संस्कृतीची आठवण करून देते. नागपूरच्या परिसरात भारतातच केवळ नव्हे तर आशियात उत्तम म्हणून नावाजलेली संत्री पिकतात, तर रत्नागिरीकडे भारतात ज्याच्या तोडीचा दुसरा आंबा नाही तो हापूस आंबा अमाप पिकतो. विदर्भ मराठवाड्याच्या काळ्याभोर जमिनीत कापूस भरघोस फुलतो, तर नगर-सोलापूर कोल्हापूर भागात पिकणारा रसदार ऊस सर्वांचे तोंड गोड करतो. निरनिराळ्या



भागांतील लोकांच्या बाबतीतही विविधता आहे. कोकणपट्टीतील माणसाचे अनुनासिक उच्चार ऐकून देशावरच्या माणसाला मौज वाटते तर खानदेश वऱ्हाडचा माणूस एक विशिष्ट हेल काढून बोलू लागला की सांगली कोल्हापूरकडील माणसांच्या चेहऱ्यावर स्मिताची रेषा न झळकली तरच आश्चर्य. पण या विविधतेतच महाराष्ट्रातील जीवनाचे सौंदर्य साठलेले आहे. अशी विविधता नसेल तर जीवन नीरस व रंगहीन होईल.'' या विविधतेने महाराष्ट्राच्या जीवनाला सौंदर्य प्राप्त होऊन एकत्रित जीवनाचे सामर्थ्य प्रतीत होते असे ते सांगतात. महाराष्ट्राच्या स्थापनेच्या वेळी केलेल्या आपल्या या भाषणात महाराष्ट्राच्या संस्कृतीतील एकजिनसीपणा, भाषिक ऐक्य, भौगोलिक एकात्मता व माणसामाणसांच्या मनाचा सांधा जोडण्यावर अधिक भर दिला आहे. याचबरोबर महाराष्ट्रातील निसर्गसौंदर्याचे जे वर्णन केले आहे ते त्या त्या परिसरातील माणसांच्या वैशिष्ट्यांसह केले आहे. तसेच मराठी माणसांच्या चालीरीती, परंपरा, भाषेची उच्चारप्रक्रिया, भाषिक एकता इत्यादीची महाराष्ट्रातील एकता आपण अधिक मजबूत केली पाहिजे. सामाजिक व आर्थिक विकास करताना मतभेद निर्माण न होता ऐक्यास तडा जाणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. विरोध विधायक असावा. तो आंधळा किंवा विरोधासाठी विरोध नसावा. वादामधून तत्त्वबोध व्हावा. अन्यथा त्या वादाला काहीच अर्थ राहणार नाही. म्हणून ममत्वाच्या भावनेने हे अंतर कमी करता येईल व महाराष्ट्राच्या ऐक्याला तडा जाणार नाही, म्हणून ते मतभेदातून सहकार्याची अपेक्षा व्यक्त करतात.

## सत्ताधाऱ्याला संयम हवा

यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या जनकल्याणाची चिंता सदैव मनात बाळगून कार्य केले आहे. महाराष्ट्रातील जनतेनेही दु:खविरहित जीवन जगण्यासाठी काळजी घ्यायला सांगताना ते म्हणतात, ''दु:खात असलेल्या जनतेच्या जीवनावर सुखाची सावली निर्माण करणे हे राजाचे कार्य आता प्रत्येक मराठी माणसाने केले पाहिजे. एकेक माणूस, एकेक मूल, हे सावली देणारे झाड आहे असे मानून त्यास खतपाणी घातले पाहिजे.'' यावरून यशवंतरावांच्या मनात गोरगरीब जनतेबाबत किती कणव होती हे स्पष्ट होतेच शिवाय बंधुभाव वाढीस लागून महाराष्ट्रातील जनतेचे जीवन सुंदर बनविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावा ही त्यांची भावनाही स्पष्ट होते. महाराष्ट्रीय लोकांनी आपला धर्म, जात अगर पक्ष विसरून आपण सर्व एक बांधव आहोत असे मानले पाहिजे. फक्त महाराष्ट्रात मराठी भाषा बोलणारा तो महाराष्ट्रीय असे न मानता जो महाराष्ट्रात राहतो आपल्या शक्तिनुसार जीवन समृद्ध करतो तो प्रत्येक माणूस महाराष्ट्रीय आहे

अशी महाराष्ट्रीयन लोकांची व्याख्या ते करतात. यशवंतरावांनी 'माझ्या कल्पनेतील खेडे' या विषयावर पुणे आकाशवाणीवर भाषण केले. त्यावेळी त्यांच्या मनातील खेड्याची कल्पना ते पुढीलप्रमाणे स्पष्ट करतात, ''माझ्या कल्पनेतील खेडे म्हणजे केव्हा एके काळी लोक शेती करू लागले आणि तिच्याभोवती राहू लागले आणि म्हणून बनले ते खेडे नाही किंवा ओढ्याच्या काठी शीळ घालीत हिंडणारा आणि कोकिळेची साद ऐकत फिरणारा कवी कल्पना करतो ते खेडे नाही, तर देशाच्या जीवनात आपले स्थान घेणारे, सदैव विकास करणारे, या टोकापासून त्या टोकापर्यंत जीवनाचे पडसाद ज्याच्यावर पडत आहेत आणि जे आपल्या उत्पादन क्षमतेने इतरांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेत आहे असे वर्धिष्णू गाव हे माझ्या कल्पनेतील खेडे आहे.'' ग्रामीण भागात विकासाच्या माध्यमातून नवचैतन्य निर्माण झाले पाहिजे अशी त्यांची अपेक्षा होती. तसेच या भागात नवचैतन्य निर्माण करून लोकशाहीस पूरक असे नवे नेतृत्व निर्माण झाले पाहिजे. सहकाराच्या माध्यमातून नव्या सुधारणा देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचल्या पाहिजेत असे ते सांगत असत. आपली भरभराट शेतीवर तर अवलंबून आहेच एवढेच नव्हे तर आपले औद्योगिकरण शेतीच्या भरभराटीवर अवलंबून आहे असे त्यांचे ठाम मत होते. एवढेच नव्हे तर शेतीला उद्योगाची जोड देऊन कृषी उद्योग निर्माण करण्यावर त्यांनी भर दिला. महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, ग्रामीण व कृषी औद्योगिक सहकार परिवर्तनाचा नवा दृष्टिकोन त्यांनी जनतेसमोर ठेवला. ग्रामीण भागाचा कायापालट करण्यासाठी कष्टकरी आणि कामकरी माणसाला माणूस म्हणून विकासाच्या नव्या वाटांवर स्वबळावर त्यांनी उभे करण्याचा प्रयत्न केला. श्रमाइतके व घामाइतके सुंदर जगात काहीच नाही अशी त्यांची ठाम भूमिका होती. म्हणूनच त्यांना श्रमिकाविषयी व ग्रामीण लोकांविषयी फार जिव्हाळा होता. जवळीक वाटत होती: उद्योगधंदे, कारखानदारी, रोजगारी, बेकारी याविषयी त्यांनी मांडलेले वेगवेगळे विचार फार महत्त्वाचे आहेत. शेतकरी, कामगार, कारागीर यांची शक्ती आणि बुद्धी सहकाराकडे वळवायला हवी. तिला विधायक वळण द्यायला हवे. असे वातावरण ग्रामीण भागात निर्माण झाले पाहिजे. आपल्या या स्वप्नाचे उद्दिष्ट सांगताना ते म्हणतात, ''एकमेकांच्या वैरानं वसवलेले, दारिद्र्याने निराश झालेले, आजपर्यंत एकसारखा कुणीतरी आपल्यावरती अन्याय केला या भावनेनी इतराकडे संशयाने पाहणारे असे गाव वसण्यापेक्षा एकमेकांकडे सहृदयतेने मदत करण्याच्या भावनेने पाहणारा बंधूबंधूंचा असा एक निराळा समाज खेड्यांतून आपल्याला उभा करावयाचा आहे.'' असे ग्रामीण भागाबाबत व्यापक उद्दिष्ट ते स्पष्ट करतात. ग्रामीण भागातील शेतकऱ्याला सहकारातून कर्जपुरवठा करता आला, त्याच्या शेतीमालावर प्रक्रिया करणारे



कारखाने सुरू करता आले तर त्याची आर्थिक दुरावस्था दूर करता येईल. सहकारात उद्धाराची शक्ती आहे. म्हणूनच महाराष्ट्राच्या औद्योगिक दृष्ट्या अविकसित ग्रामीण भागापर्यंत ही सहकारी चळवळ पोहोचवण्याचे काम त्यांनी केले. ही चळवळ जनतेची चळवळ व्हावी अशी त्यांची अपेक्षा होती, तसेच मार्गदर्शन त्यांनी केले. दुर्बलांना सामर्थ्य देण्यासाठी सहकारी चळवळीचा जन्म झालेला आहे या मूळ प्रेरणेकडे दुर्लक्ष होणार नाही याची काळजी घेण्याची गरज आहे असा सल्लाही त्यांनी दिला. विकासाची ही प्रक्रिया तळाच्या माणसांपर्यंत पोहोचवायची असेल तर विकासाची संघटना व सत्ता जनतेच्या शेवटच्या थरापर्यंत पोहोचली पाहिजे असा आग्रही विचार ते मांडतात. महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती करायची असेल तर शिक्षणाचा प्रसार होऊन जनता शहाणी व समजूतदार झाल्याशिवाय सहकारी चळवळीचा पाया भक्कम होणार नाही. शेती हाच महाराष्ट्रीयन लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. तो ग्रामीण विकासाचा गाभा आहे. या गाभ्याभोवती छोट्या उद्योगाची इमारत उभारली पाहिजे. महाराष्ट्राच्या भूमीवर उद्योगाचे भव्य मंदिर उभारण्यासाठी शासनाचे मार्गदर्शन आणि उत्तेजन असायला हवे. सामान्य माणसांचे अर्थशास्त्र सहकाराशिवाय सुटणार नाही. सामान्य माणसांचे हित जोपासण्याच्या अर्थनीतीस त्यांनी त्यांच्या भाषणातून प्राधान्य दिले. याचबरोबर लोकशाहीचे हे स्वरूप कोठेही डागाळणार नाही याची काळजी सर्वांनी घेतली पाहिजे. कारण सहकार चळवळीत 'आर्थिक सत्ता' आहे याची जाणीव लोकांना झाली आहे. त्यामुळे ही चळवळ एका अर्थाने सत्तेचे केंद्र बनत आहे. आणि सत्तेचे केंद्र म्हटले म्हणजे लोकशाहीचा अंकुश त्यावर ठेवलाच पाहिजे. तसे न केल्यास अनियंत्रित सत्तेमुळे विकासाचे हे शस्त्र दुधारी ठरेल अशी साधार भीती ते व्यक्त करतात.

## महाराष्ट्राचे भवितव्य

महाराष्ट्र राज्य हा जगन्नाथाचा रथ आहे. या रथास भक्तांचा हात लागल्याशिवाय तो हालणार नाही. म्हणजेच महाराष्ट्राचा गाडा जनतेच्या मदतीशिवाय चालणार नाही. महाराष्ट्राच्या सर्वांगीण उन्नतीचे कार्य, दिशा स्पष्ट करताना कार्यकर्त्यांना ते सांगतात, ''....महाराष्ट्राच्या भवितव्याची ही मोठीच मोठी, लांबच लांब सफर आहे... त्या सफरीतील आम्ही प्रवासी आहोत.....ही सफर तुम्हा आम्हाला पुरी करावयाची आहे.... ती सफर आज मला माझ्या डोळ्यांसमोर दिसते आहे, विजेच्या प्रकाशाने लखलखल्यासारखी मला दिसते आहे.....ती लांबची सफर आहे... पण ती पुरी केलीच पाहिजे......कारण त्यात जनतेचे कल्याण आहे....'' यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या भवितव्याची आणि जनसामान्यांची प्रगतीविषयक भूमिकाच

भाषणांतून व्यक्त केली आहे. त्यांचे हे स्वप्न केवळ राजकीय सत्ता मिळविण्याचे नव्हते, तर समतेसाठी आवश्यक ते समाजपरिवर्तन घडवून आणण्याचे होते आणि खरे लोकराज्य निर्माण करण्याचे होते. कारण ते जे बोलत ते मनापासून बोलत. अस्सल सातारी मराठी भाषेत बोलत. ही भाषा वाटेल तितक्या सोप्या शब्दांमध्ये आणि परिणाम होईल अशा तऱ्हेने वापरत असत. म्हणूनच स्वातंत्र्यानंतरचे प्रश्न सामान्यांना त्यांच्या भाषेत आणि कल्पनेत समजावून देत. या गुणामुळेच महाराष्ट्रात कार्यकर्त्यांचे मोहोळ ते उभे करू शकले.

यशवंतरावांनी आर्थिक विकासावर त्यांच्या भाषणातून अधिक भर दिला. आर्थिक प्रश्न सोडविताना ग्रामीण मजूर, भूमिहीन यांचा त्यांनी प्रामुख्याने विचार केला. हे विचार त्यांनी प्रामुख्याने 'पुरोगामी आर्थिक धोरण','आमचा आर्थिक पवित्रा','नाणे सुधारणा आणि विकसनशील देश', 'अर्थमंत्रिपदाची चार वर्षे ! एक ताळेबंद', 'अविकसित देशाचा आर्थिक विकास', 'औद्योगिक विकासाच्या समस्या', 'तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या उंबरठ्यावर', 'आर्थिक प्रश्नांचे राजकीय स्वरूप', 'आर्थिक विकास', 'खेड्यातील सहकार', 'बँकांकडून अपेक्षा', 'छोटे उद्योगधंदे' यासारख्या विषयांतून त्यांनी आर्थिक विषयांचा परामर्श घेतला. छोटे शेतकरी, शेतमजूर व बेकार तरुण यांची त्यांनी गांभीर्याने दखल घेतली. एकूणच देशाच्या अर्थखात्याला पूरक असे वळण लावण्याच्या हेतूने त्यांनी विचार मांडले. ते म्हणतात, ''तुलनात्मक दृष्ट्या अविकसित असलेल्या देशांचा त्वरित आर्थिक विकास होणे हे प्रगत देशांच्या हिताचे आहे हे सांगण्याच्या दृष्टीने धोकादायक असते. शिवाय एखाद्या भागाची अर्थव्यवस्था अगतिक व मागासलेली असणे हे आर्थिकदृष्ट्या पुढारलेल्या देशांच्या दृष्टीनेही धोकादायक असते.'' या देशात आर्थिक समस्या अतिशय गुंतागुंतीच्या आहेत. त्या सोडविणे अत्यंत गरजेचे आहे असा विचार त्यांनी अनेक ठिकाणी मांडला. समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी ही सामाजिक न्यायाच्या कल्पनेतील महत्त्वाची बाब आहे आणि म्हणूनच बुद्धी असूनही केवळ पैशाच्या अभावामुळे तिला वाव मिळत नाही. असे होता कामा नये. असा विचार त्यांनी प्रकट केला. आर्थिक प्रगतीच्या मार्गात बिकट समस्या, अडचणी व संकट असल्याचेही ते स्पष्ट करतात. विषमता ही आर्थिक प्रश्नाशी निगडित आहे. म्हणून त्यांनी या विषयावर अधिक भाष्ये केली आहेत. शेती, मनुष्यबळ, नागरीकरण, औद्योगिकरण, लोकसंख्या, जमीनसुधारणा इ. क्षेत्रात प्रगती करावयाची असेल तर मनुष्यबळाचा उपयोग करून आर्थिक सुधारणा करावी असा सल्ला ते देतात. यशवंतरावांचे हे आर्थिक विचारांवरील मत म्हणजे मनन करून, शोधून काढलेले कार्यकारणभावनात्मक ज्ञान असेच आहे.



त्यांच्या या मतांचा संबंध मनाशी नसून बुद्धीशी आहे हे त्यांचे या विषयांवरील विचार वाचले म्हणजे लक्षात येते.

## भाषणे म्हणजे जीवनभाष्यच

यशवंतराव ग्रामीण संस्कृतीत वाढले पण त्यांनी शहरी संस्कृती आत्मसात केली होती, ती केवळ अध्ययनशीलतेच्या बळावर. त्यांची भाषणे म्हणजे जणू काही जीवनभाष्यच असत. आपल्या भाषणांनी ते हजारोंना मंत्रमुग्ध करत. लाघवी भाषा, मृदू आवाज आणि चपखल शब्दरचना यामुळे त्यांचे भाषण रंगतदार होत असे. १८५० च्या आसपासच्या महाराष्ट्राचे व ग्रामीण भागाचे ते असे वर्णन करतात, ''त्या काळी खेड्यापाड्यातून किंवा गावाच्या बाजूने दुपारी आपण गेलो तर काही हालचाल दिसत नसे. सर्व गाव जणू काही झोपल्यासारखे वाटे. शेतीवर जेथे विहीर असे तेथे विहिरीतून पाणी काढल्याचा आवाज क्वचित ऐकू यावयाचा. दुपारच्या उन्हाने थकून भागून गेलेली माणसे आणि जनावरे चुपचाप पडून असायची. पडझड झालेली जीर्ण घरे, मोडकळीस आलेले वाडे आणि तुटलेली शेती हे त्या काळच्या महाराष्ट्रातल्या खेड्यांचे स्वरूप होते. अद्यापही थोडीफार हीच अवस्था आहे.'' अशा रीतीने तत्कालीन महाराष्ट्राचे आणि सामाजिक जीवनाचे वर्णन त्यांनी केले आहे. महाराष्ट्र म्हणजे फक्त सातारा, सांगली, कोल्हापूर असे न मानता बेळगाव कारवार पासून ते दक्षिणेकडून सातपुड्याच्या पर्वतापर्यंत तर पश्चिमेला पश्चिम समुद्राला बरोबर घेऊन उंबरगावच्या सीमेपर्यंत पोहोचला आहे तर पूर्वेला औरंगाबाद-नांदेडच्या पुढे गोदावरीच्या काठाने चांदा-भंडाऱ्याच्या बाजूने जातो, असे महाराष्ट्राच्या चतु:सीमेचे वर्णन ते करतात. एवढेच नव्हे तर महानुभावीय कालखंडात महाराष्ट्राचे 'लीळाचरित्र' या ग्रंथांत जे वर्णन केले आहे त्याचेही उदाहरण ते देतात.

> **''मऱ्हाटी भाषा जेतुलां ठाई वर्ते ते एक मण्डल ।**
> **तयासि उत्तरे बालेघाटाचा सेवट असे । ऐंसे एक खंडमंडळ ।**
> **मग उभय गंगातीर तेहि एक खंडमंडळ । आन तया पाटरोनि ।**
> **मेधकरघाट ते एक मंडळ ।**
> **तया पासोनि आवघे वराड: तेंहि एक मंडळ ।**
> **पर आवघेचि मिळौनि महाराष्ट्राचि बोलिजे ।''**

अशा रीतीने प्राचीन साहित्याचा आधार घेऊन उदाहरणांसह महाराष्ट्राचे वर्णन ते करतात. आपल्या अशा रेशमी, नाजूक आणि प्रेमळ धाग्यांनी व लाघवी वाणीने

विरोधकांनाही आपलेसे करत. आपल्या या खास भाषाशैलीतून एकतेचा, समतेचा विचार देत आणि नम्रशील वक्तृत्वाने श्रोत्यांना आपलेसे करण्याचा प्रयत्न करत.

यशवंतरावांच्या जीवनातील महत्त्वाची प्रेरणा ही राजकारण हीच होती. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी राजकीय कार्याला सुरुवात केली होती. १९३२ च्या म. गांधींच्या सत्याग्रह आंदोलनामध्ये त्यांना झालेली तुरुंगवासाची शिक्षा, १९४२ च्या 'भारत छोडो' चळवळीत भूमिगत राहून त्यांनी केलेले कार्य, पुढे १९४६ ते १९७६ या तीस वर्षांच्या काळात राज्य व केंद्रपातळीवर अनेक खात्याचे मंत्री, १९७७ ते १९७९ या काळात विरोधी पक्षाचे नेते, १९७९ मध्ये चरणसिंगच्या मंत्रिमंडळात उपपंतप्रधान, १९८२ नंतर आठव्या भारतीय वित्त आयोगाचे अध्यक्ष या घटनांमुळे राजकारण हाच त्यांच्या जीवनातील महत्त्वाचा भाग बनला. राष्ट्रीयत्व, लोकशाही व समाजवाद या नेहरूंच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर पडला. या राजकीय जीवनप्रवासात त्यांनी काश्मीरपासून ते कन्याकुमारीपर्यंत आणि अरबी समुद्रापासून ते ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यापर्यंतचा अभ्यास केला. या देशातील समाजजीवनाच्या प्रेरणा आणि आव्हाने पाहिली. देशाच्या प्रश्नांकडे डोळसपणे पाहिले. त्यामुळे राजकीय नेते, कार्यकर्ते हे डोळस असले पाहिजेत, त्यांच्याकडे समाजाच्या विकासाचा दृष्टिकोन असला पाहिजे. तो आंधळा असता कामा नये. आंधळा दुनियेत हिंडू शकेल पण आंधळ्याच्या मागे दुनिया जावू शकणार नाही असे कार्यकर्त्यांना त्यांनी आपल्या भाषणांतून मार्गदर्शन केले. त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी, कार्यप्रवण करण्यासाठी, पक्षबांधणीसाठी विचारांची आणि मनांची देवाणघेवाण करण्यासाठी नेत्यांच्या मनात संशयाचे, संभ्रमाचे, संस्काराचे निर्माण झालेले प्रश्न दूर करण्यासाठी, मूलभूत तत्त्वांची त्यांना आठवण करून देण्यासाठी, विरोधकांच्या विषारी विचारांचा परामर्श घेण्यासाठी त्यांनी राजकीय भाषणांचा पुरेपूर उपयोग करून घेतला. या भाषणांतून राजकारणात न्यायनीती असली पाहिजे असा आग्रह ते नेहमी धरत.

यशवंतरावांनी आपल्या राजकीय कारकीर्दीत काँग्रेस पक्षाची संघटना मजबूत केली आणि कार्यकर्त्यांची एक बलशाली संघटना स्थापन केली. जागोजागी काँग्रेस शिबिरे घेतली. कार्यकर्त्यांना भाषणाच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे शिक्षण दिले. त्यांच्या भाषणांतून त्यांना वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून दिले. काँग्रेस संघटना व शासन यांच्यामध्ये सुसंवाद घडवून आणण्यासाठी वक्तृत्वाचा त्यांना सदैव उपयोग झाला. तरुण पिढीला पुढे आणण्यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केला. यासाठी त्यांच्या प्रभावशाली वक्तव्यांचा त्यांना खूप उपयोग झाला. त्यांच्या या वक्तृत्वाची भाषा साधी, सरळ व सोपी हृदयाचा ठाव घेणारी असे. या कलेमुळे त्यांना श्रोत्यांची व



कार्यकर्त्यांची उणीव कधी भासली नव्हती. अशा या लोकसंग्राहक नेत्याने अनेक राजकीय विषयांवर आपले मुक्त चिंतन प्रकट केले. 'जनप्रेमाची शक्ती', स्वप्नपूर्तीचा ऐतिहासिक क्षण', 'सोनियाचा दिवस', 'विधायक कर्तृत्वास आव्हान', 'लोकशाही राज्यकारभाराची कसोटी', 'कल्याणकारी राज्यातील कारभाराची कसोटी', 'कल्याणकारी राज्याची कल्पना', 'काँग्रेसची ऐतिहासिक भूमिका', 'आमच्या सामर्थ्याचे जीवनस्रोत', 'पक्षसंघटनेच्या बदलत्या दिशा', 'आर्थिक प्रश्नांचे राजकीय स्वरूप', 'राजकीय समस्यांचा चक्रव्यूह : शोध, वेध आणि भेद', 'राजकीय निर्णय आणि परिवर्तनाची प्रक्रिया', 'लोकमताचा कौल आणि त्याचा अर्थ', 'पक्षावर अभंगनिष्ठा', 'बांधीलकीचे राजकारण' यासारख्या कितीतरी भाषणांमधून त्यांनी मार्गदर्शन केले. या विविध भाषणांतून त्यांनी लोक, त्यांच्या गरजा, परंपरा, श्रद्धास्थाने, जीवन जगण्याची रीत, भावी जीवनाची स्वप्ने, लोकांच्या काळजाला हात घालून त्यांच्या मनावर बिंबवली. ते म्हणतात, ''जनता आणि नेता असे हे माता आणि पुत्र यांचे नाते आहे. जनता हीच शेवटी माता. तिच्या आशीर्वादातून, तिच्या सर्वस्वातून, तिच्या भावनेतून तिच्या परंपरेतून नेतृत्व राहते.'' अशा स्वरुपाचे नाते जनता आणि नेता यांच्यामध्ये असले पाहिजे असा विश्वास ते व्यक्त करतात. एवढेच नव्हे तर माणसांच्या मनाची मशागत करून त्यांच्या समोर आदर्श निर्माण करणे हीच नेतृत्वाची कसोटी आहे. नेतृत्व हा शब्दच व्यापक अर्थाचा आहे असे ते सांगत. वेगवेगळ्या क्षेत्रांतील विविध शास्त्रांत जे कोणी सामूहिक परिणाम घडवून जो आदर्श निर्माण करत असतील ते खरे नेते असे यशवंतराव म्हणतात किंवा ज्यावेळी अनेक मार्ग समोर असताना योग्य मार्गाने जो मुक्कामावर पोहोचू शकेल किंवा संभ्रम नाहीसा करण्याचा प्रयत्न करेल हे ज्याला समजेल तो नेता. म्हणून राजकारणामध्ये जबाबदारीने काम करण्याचा सल्ला ते कार्यकर्त्यांना देतात. अशा या नेतृत्वाबद्दल ते सांगतात, ''स्वातंत्र्य, मानवतेचे दु:ख आणि ज्ञानविज्ञानाचा प्रसार या आपल्या मूळ निष्ठा, मूळ प्रेरणा यांच्याशी कुठलीही जडजोड न करता त्याचा लोकजीवनामध्ये आचार घडवीत असताना करावे लागणारे फेरफार ज्या माणसाला समजतात त्याला मी नेता मानतो.''[७८] अशा स्वरूपाची नेत्याची व्याख्या ते करतात.

## तीन आधारस्तंभ : लोकशाही, नियोजन व समाजवाद

यशंवतरावांनी 'राष्ट्रीय प्रगतीचे तीन आधारस्तंभ' या विषयावर १५ ऑगस्ट १९६१ रोजी भाषण केले होते. लोकशाही, नियोजन व समाजवाद हे आपल्या राष्ट्रीय प्रगतीचे आधारस्तंभ असल्याचे ते सांगतात. आपल्या राष्ट्रीय प्रगतीची भव्य इमारत

आपणास या तीन स्तंभावर उभी करावयाची आहे. आपण स्वातंत्र्य मिळविले आहे. मिळवण्यापेक्षा ते टिकवून ठेवणे अवघड असते. केवळ राजकीय स्वातंत्र्य मिळवून उपयोग नाही तर सर्वच पातळ्यांवर स्वातंत्र्य मिळवले पाहिजे. आजच्या स्वातंत्र्यदिनी भारताच्या प्रगतीची आपण शपथ घेतली पाहिजे. या देशातील थोर नेत्यांनी राजकारणाला नवे मूल्य प्राप्त करून दिले. राजकारण म्हणजे समाजपरिवर्तनाचे साधन आहे, असा सिद्धांत ते मांडतात. सामाजिक सुधारणा आमच्या राजकीय परंपरेचा अविभाज्य भाग बनल्या पाहिजेत. राजकारण हेच समाजकारण व्हावे अशी अपेक्षा ते करतात. देशातील आर्थिक व सामाजिक परिस्थितीत जी आव्हाने निर्माण होतात त्यांचा मुकाबला करण्याचे सामर्थ्य राजकीय पक्षात निर्माण झाले पाहिजे. ''स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताची मूलभूत अशी जर कोणती गरज असेल तर ती राष्ट्रीय एकात्मतेची होय. पण त्याबरोबरच देशात लोकशाही राज्यकारभार प्रस्थापित करून देशाच्या आर्थिक जीवनात बदल घडवून आणणे आणि ज्यायोगे प्रत्येक नागरिकास विकासाची समानसंधी लाभेल आणि समानतेची, अनुभवाची, सहजीवनाची, सहानुभवाची भावना त्याच्या मनात निर्माण होऊन ती रुजू लागेल, वाढीस लागेल अशा प्रकारची समाजरचना घडवून आणणे याही स्वातंत्र्योत्तर काळातील आपल्या प्रमुख व निकडीच्या गरजा आहेत.'' असा विचार अहमदाबाद येथे ज्युनिअर चेंबर ऑफ कॉमर्स येथे आयोजित परिसंवादात मांडला. या परिसंवादात त्यांनी काँग्रेसची ऐतिहासिक भूमिका मांडली. सत्तेवर आलेल्या पक्षावर न्यायसंस्थेची किंवा इतर कायद्याची बंधने घालून ती सत्ता अधिक लोकाभिमुख बनली पाहिजे. सत्ता ही लोकांच्या कल्याणासाठी असावी, तशी असली पाहिजे. ''लोकशाही-मध्ये आज्ञा नाही. लोकशाहीमध्ये डायलॉग आहे. संभाषण आहे. विचारांची आणि मतांची देवाणघेवाण आहे. हे आपण विसरता कामा नये.... 'देशामध्ये असलेली लोकशाही या देशाला एक मोठा नेता होता म्हणूनच आहे. यावर माझा पूर्वीही विश्वास नव्हता आणि आजही नाही. नेहरूनंतरही आम्ही या देशात लोकशाही टिकवली. नेहरूनंतर आलेल्या कर्तृत्ववान पुढाऱ्यांच्या मृत्यूनंतरही आम्ही या देशात लोकशाही टिकवू शकलो. असा या देशाला पुन्हा एकदा अनुभव आला आणि बाहेरच्या देशालाही आला. हिंदुस्थानचा हा एक मोठा विजय आहे असे आम्ही मानले पाहिजे..... 'घेतलेले निर्णय बदलू नयेत असे कोणी सांगितले ? शेवटी निर्णय जे घ्यावयाचे असतात ते लोकांच्या हिताकरिता, लोकांच्या इच्छेला मान देऊन घ्यावयाचे असतात. निर्णय महत्त्वाचे की लोक महत्त्वाचे असा प्रश्न निर्माण झाला, तर लोक महत्त्वाचे असेच मी म्हणेन. जेव्हा लोक आणि निर्णय यांच्यात संघर्ष निर्माण होतो तेव्हा लोक विजयी होतात असा इतिहास आहे.

म्हणून राज्ये चालविण्यासाठी राज्यशक्तींच्या बाहेर जी माणसे असतात त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा व पुण्याईचा फार उपयोग होत असतो. कारण ही माणसे ज्या परंपरा व शक्ती निर्माण करतात त्याचा उपयोग राज्य चालविण्यासाठी होत असतो.'' असे ते कार्यकर्त्यांना सांगतात.



यशवंतराव चव्हाण यांनी राजकारणात अतिशय जबाबदारीचे काम केले. महाराष्ट्रात काय किंवा हिंदुस्थानच्या राजकारणात त्यांनी सहकाऱ्यांना विश्वासात घेऊनच पक्षातील उणिवांची चर्चा केली. राजकारणाकडे ते व्यापक दृष्टिकोनातून पाहतात. ते म्हणतात, ''हे तख्त कोणा एका व्यक्तीचे नाही. कोणा एका धर्माचे नाही. कोणा एका वर्गाचे नाही. ते या देशातल्या चाळीस पंचेचाळीस कोटी लोकांचे तख्त आहे आणि त्याचे रक्षण हे तुमचे आमचे कर्तव्य आहे. तुमचे आमचे हे तख्त जोपर्यंत चंद्र सूर्य उगवत राहतील तोपर्यंत कायम राहिले पाहिजे. कारण ते आमच्या स्वातंत्र्याचे व लोकशाहीचे प्रतीक आहे. अशा तऱ्हेची देशभक्तीची भावना आपल्या मनात फुलली पाहिजे, पेटली पाहिजे.'' या त्यांच्या विचारांवरून यशवंतरावांची लोकशाहीवरील निष्ठा किती सजग आणि अविचल होती हे स्पष्ट होते. कोणतेही राजकीय विचार बोलून नंतर त्यावर विचार करण्यापेक्षा बोलण्यापूर्वी ते विचार करत. त्या विचारांची वास्तव परिस्थितीशी पुन्हा पुन्हा तपासणी करत. मांडलेला विचार प्राप्त परिस्थितीशी पूरक आहे किंवा नाही याचा ते गंभीर विचार करत. त्यांनी नेहमी स्वत:च्या मर्यादा ओळखून नेतृत्व केले. राजकारणामध्ये केवळ वैयक्तिक महत्त्वाकांक्षा बाळगून यश मिळत नाही. म्हणून महत्त्वाकांक्षेच्या मोहजाळात राजकारणात फारसे पडू नये असे ते सांगतात. याउलट आपले नेतृत्व हे सर्वसमावेशक असावे. सर्व सामाजिक थरांचा विश्वास असलेले व सर्व सामाजिक थरांना विशेषत: खालच्या मानल्या गेलेल्या थरांतील कार्यकर्त्यांना विश्वासार्ह्य वाटणारे व कार्याच्या भागीदारीत भाग घेणारे नेतृत्व म्हणजे नवे सामाजिक नेतृत्व होय. निरनिराळ्या पातळीवर लोकशाही संस्था निर्माण झाल्याशिवाय आपण लोकशाही नेतृत्व निर्माण करू शकणार नाही. लहानलहान क्षेत्रांत काम करणाऱ्या ह्या लोकशाही संस्थांतूनच भावी नेते तयार होतील.'' अशा नेत्यांनी सतत सत्तेच्या जोखमीचे भान मनात ठेवून राजकीय सत्तेचा कारभार करावा. सत्तेचा लाभ जास्तीतजास्त लोकांपर्यंत पोहोचता करावा. वैयक्तिक स्वार्थ त्यामध्ये असता कामा नये. एखाद्या कार्यकर्त्याची जर परीक्षा घ्यावयाची असेल तर त्याच्यामध्ये जिद्द आहे की नाही हे प्रथम पाहणे महत्त्वाचे आहे. पदांची अभिलाषा न धरता त्या पक्षाची पुरोगामी शक्ती वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी त्याग सहन केला पाहिजे. अन्यायाविरुद्ध लढण्याची, विषमतेविरुद्ध लढण्याची जिद्द, ईर्षा त्या कार्यकर्त्याच्या मनात निर्माण

झाली पाहिजे. फक्त विचारांचे डोस देऊन चालणार नाही तर ते काम अंत:करणापासून केले पाहिजे. ''पक्ष चालतात ते निष्ठेनेच चालतात, हे जरी खरे असले तरी लोकशाहीत पक्ष हे विचाराच्या निष्ठेनेच चालले पाहिजेत असा तुमचा आमचा आग्रह असला पाहिजे.'' प्रत्येक पक्षात काम करणाऱ्या त्या व्यक्ती व पक्षावर अढळ अशी श्रद्धा व निष्ठा असावी असे ते सांगतात. सामाजिक परिस्थिती, लोकांच्या गरजा आणि वृत्ती, विरोधकांचे आक्षेप आणि प्रतिक्रिया यावर ते विशेष भर देतात. याचबरोबर संघटनात्मक कार्याला वाहून घेणारी क्रियाशील तरुण कार्यकर्त्यांची फळी उभारण्याची गरज आहे असे ते सांगतात. ''वैयक्तिक महत्त्वाकांक्षेची दृष्ट महाराष्ट्राच्या काँग्रेसला लागू देऊ नका'.... मला सत्तेचा मोह नाही पण विचारांचा जरूर आहे...... सत्तेचा वापर करीत असताना पक्षांनी किंवा माणसांनी आपणाला मिळालेल्या सत्तेचा वापर आपण दररोज कशासाठी करीत आहोत हे तपासून घेतले पाहिजे..... समाजवादाचं निशान हाती घेऊन जीवनातल्या अखेरच्या क्षणापर्यंत मी निर्धारानं लढा देईन पण काँग्रेसचं ऐक्य दुभंगू देणार नाही.'' अशी त्यांची पक्षनिष्ठा होती. आपले हे विचार ते अतिशय संयमाने सांगत. आपुलकीने बोलत. आपल्या विचाराशी ते आग्रही राहत. बोलताना त्यांचा तोल कधीही ढळला नाही. शब्दांची निवड मोठ्या कौशल्याने करत. समोरचा श्रोता पाहून भाषणाची पट्टी ते ठरवत. आठवणी, प्रसंग, विनोद, दृष्टांत यांचा समप्रमाणात मसाला घालून जे सांगायचे ते अतिशय रुचकरपणे सांगत. अगोदरच्या वक्त्याने काही बंडखोर भाषण किंवा वादाचा प्रश्न निर्माण केला असेल तर ते नेमके लक्षात ठेवून आपल्या भाषणात त्याचा खरपूस समाचार घेऊन त्या वक्त्याला आनंद मिळावा इतका गंमतीदार पालट घेत. बोलण्यात जितका जिव्हाळा तितकाच प्रेमळपणा तर प्रसंगी तेवढाच खंबीरपणा दिसतो. कमी, मार्मिक पण सूत्रबद्ध असे बोलणारे, डावे आणि उजवे यांच्यात सुवर्णमध्य साधणारे प्रभावी नेतृत्व व वक्तृत्व त्यांच्याकडे होते.

## परराष्ट्र धोरण

यशवंतरावांनी भारतीय जवानांना पुरुषार्थाची प्रेरणा आपल्या भाषणांतून दिली. आपल्या विचामंथनातून भारताच्या संरक्षणाचा प्रश्न आणि परराष्ट्र नीतीचा प्रश्न हिंदुस्थान प्रस्थापित होण्याच्या दृष्टीने सोडविले. संरक्षणमंत्री, गृहमंत्री व परराष्ट्र आणि अर्थमंत्री असताना त्यांनी या विषयांवर अनेक भाषणे दिली आहेत. या भाषणांतून देशाच्या ऐक्याचा आणि स्थैयाचा प्रश्न त्यांनी मांडला. त्या काळातील त्या समस्यांचे चित्रण त्यांनी या भाषणातून मांडले. या दृष्टीने त्यांची पुढील भाषणे उल्लेखनीय आहेत. 'आजचा क्षात्रधर्म', 'संरक्षणाचा अन्वयार्थ', 'संरक्षणाची मूलसूत्रे', 'आमचे हुकुमी



पत्ते', 'व्यर्थ न हो बलिदान', 'संकट ही संधी', 'गृहमंत्रीपदाचे कसोटीचे वर्ष', 'परराष्ट्र धोरणाची दिशा', 'परराष्ट्र धोरणाची मार्गदर्शक मूलतत्त्वे', 'जनता सरकारचे परराष्ट्रीय धोरण' इत्यादी. त्यांच्या 'युगांतर' व 'भूमिका' या पुस्तकात भाषणे समाविष्ट केली आहेत.

यशंवतरावांनी राष्ट्रीय एकतेस अतिशय महत्त्व दिले. ही एकता टिकविण्यासाठी राष्ट्रीय एकतेस बाधा येईल अशी कोणतीही गोष्ट बोलण्यातून व कृतीतून आढळल्यास ती विष म्हणून बाजूला टाकण्याचा प्रयत्न केला पाहिजे. देशाच्या एकतेची भावना टिकविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. देशाच्या स्वातंत्र्याचा आणि एकतेचा विचार त्यांनी अनेक वेळा मांडला. ते म्हणतात, ''या राज्यावर एक जबरदस्त हल्ला करून त्याचे स्वातंत्र्य, त्याची मूल्ये धोक्यात आणण्याचा शत्रूकडून जो प्रयत्न चालला आहे त्याचा निकराने प्रतिकार करण्यासाठी आपले जवान मृत्यूला सामोरे जात आहेत.....सगळे लोक मरण्यासाठी तयार होतील या भावनेने ते आज येथे लढत आहेत.'' यशंवतराव संरक्षणमंत्री असताना त्यांनी या विषयांवर विचार मांडले. हुशार, बुद्धिमान माणसे आघाडीवर लढत आहेत अशावेळी आपण मुर्दाड होऊन चालणार नाही. स्वातंत्र्याचे आणि देशाचे प्रेम तुमच्या आमच्या मनामध्ये निर्माण झाले पाहिजे. लढाईसाठी ज्यावेळी देश तयारी करतो त्यावेळी मनगट लोखंडासारखेच बळकट करावे लागते. त्याचप्रमाणे मनही लोखंडासारखेच बळकट करावे लागते. असा आत्मविश्वास लोकांच्यात निर्माण करण्याचा ते प्रयत्न करतात.

## ऐक्याची शक्तिशाली सुंदरता

देशाची हाक आली म्हणून यशवंतराव संरक्षणपद स्वीकारल्याचे सांगतात. केवळ मोठे पद मिळते म्हणून मी जात नाही. जाताना १९ नोव्हेंबर १९६२ रोजी महाराष्ट्राचा निरोप घेताना ते म्हणाले, ''मी देशाच्या सेवेसाठी जात असताना माझ्याबरोबर सह्याद्रीचा निधडेपणा, कृष्णानर्मदेची सखोलता, वैनगंगेची विशालता, कोकणचा कष्टाळूपणा आणि पैठणची भाविकता घेऊन जात आहे...... 'या मातीतच मी प्रथम रांगलो आणि रंगलो, पुढे हीच गड्यांनो माती माझ्या रक्तामध्ये चढे'...... तसेच भारत परचक्र परतवून लावल्याशिवाय मी राहणार नाही. ह्या कामी सह्याद्री आपल्या छातीचा कोट करील.'' प्रसंग पडला तर जान देण्याच्या भावनेने यशवंतरावांनी ही जबाबदारी स्वीकारल्याचे ते सांगतात. भारतावरील कोणत्याही आक्रमणाची त्यांना भीती नाही. त्यांना भीती वाटते ती, ''तुमचे आमचे मन दुबळे बनेल की काय? तुमचे आमचे मन दुफळीने फुटून जाईल की काय? ते होता कामा नये. एवढी शक्ती जर

आपण महाराष्ट्रामध्ये आणि भारतामध्ये निर्माण करू शकलो तर दुनियेतल्या लोकांची, विमानांची किंवा ॲटमबाँबची शक्तीच काय पण इतर कोणतीही शक्ती हिंदुस्थानचा पराभव करू शकणार नाही.'' असा विश्वास ते व्यक्त करतात. देशातल्या प्रत्येक माणसाच्या मनात आपल्या देशाच्या स्वातंत्र्याबद्दल जाज्वल्य प्रेम, जाज्वल्य भक्ती आहे. कितीही संकटे आली, कितीही आपत्ती आल्या, कितीही बिकट प्रश्न निर्माण झाले तरीही या जाज्वल्य देशप्रेमातून निर्माण झालेली आपली राष्ट्रीय एकता आपण टिकविली पाहिजे. अखंडित अबाधित राखली पाहिजे, असा विचार त्यांनी औरंगाबादच्या जाहीर सभेत मांडला.

प्रत्येक मानवाच्या मनात एकजिनसीपणा निर्माण होऊन सद्‌भावना निर्माण होणे महत्त्वाचे असते. सर्वांचे मनगट एका सामर्थ्याने बांधले गेले पाहिजे. ''समाजाच्या जीवनात मैत्री आणि शांतता टिकवायची असेल तर त्यासाठी मनगटात शक्ती असली पाहिजे. केवळ प्रेमाची भाषा बोलून किंवा शांततेची घोषणा करून समाजात मैत्री आणि शांतता निर्माण होणे अवघड आहे. त्यासाठी चांगल्या मूल्यांची शक्ती आणि सत्प्रवृत्तींची जोपासना करावी लागेल. देशातल्या मानवजातीच्या रक्षणाकरिता शांतता निर्माण करावी लागेल. ज्यामुळे अपमान होईल, अभिमान नाहीसा होईल, दुसऱ्याच्या दडपणाखाली वागावे लागेल अशा प्रकारचे कोणतेही कृत्य हिंदुस्थानातील व्यक्तीला करता येणार नाही. हिंदुस्थानात ज्या ज्या वेळी संकटे निर्माण होतील तेव्हा त्या संकटांना तोंड देणारे सुपुत्र भारतात निर्माण झाले पाहिजेत. जीवनामध्ये जे उत्कृष्ट आपल्याजवळ आहे ते आपण देशासाठी व समाजासाठी दिले पाहिजे. दान द्यावयाचे असेल तर उत्कृष्ट गोष्टींचे द्यावे लागते. देशासाठी द्यावयाचे दानही असेच असले पाहिजे. नको असलेली गोष्ट दान देणे, याला दान म्हणत नाहीत. यशवंतरावांच्या मनात देशभक्तीची भावना किती तीव्र होती हे त्यांच्या अशा काही वक्तव्यांवरून सहज स्पष्ट होते. त्यांचे मन मोकळे होते. जे वाटले तेच बोलत. एखाद्या कामाची सुरुवात ही शंका-कुशंकांनी करू नये असे त्यांना वाटत होते. ते गृहमंत्री व संरक्षणमंत्री असताना प्रत्येक निर्णयात त्यांनी कणखरपणा दाखविला. अनेक प्रश्नांची उकल करून घेण्यासाठी आवश्यक असणारा समजूतदारपणाही त्यांनी दाखवला. एखाद्या प्रश्नाच्याबाबत कधीही मनाचा हेकटपणा दाखवला नाही. सदैव देशाच्या विशालतेचा व प्रगत स्वप्नांचा त्यांनी ध्यास घेतला होता. देशाला प्रतिष्ठा लाभेल असेच सर्वांनी वागले पाहिजे या संदर्भात ते म्हणतात, ''हिमालयाची उत्तुंगता, सागराची खोली व विशालता, भारताच्या नद्यांतून अखंड वाहात असलेली एकच उदात्त उदारतेची परंपरा, मंदिरात तेवणारे नंदादीप व मशिदीमशिदीतून भल्या पहाटे ऐकू येणारी बांग हे भारताचे व्यक्तिमत्त्व आहे. मला



वाटते त्याचा विसर या देशाला पडू नये. तो विसर पडला नाही तर हा देश खरोखरच महान होईल हा माझा विश्वास आहे.'' असा विचार त्यांनी 'लोकसत्तेने' घेतलेल्या मुलाखतीच्या वेळी मांडला. देश, देशातील लोक, त्यांचे जीवन, त्यांच्या समस्या याचा विचार त्यांनी सदैव आपल्या भाषणांतून मांडला. त्यांच्या भाषणांतील काही अवतरणे, नीतीसूत्रे, विचारधन हे आजच्या नेत्यांना निश्चितच मार्गदर्शक आहेत. ते म्हणतात, ''तलवारीने लढाई जिंकावी असा काळ आज राहिलेला नाही. आजचा काळ, आजचा जमाना, आपल्या विचारांची तलवार साफ आहे की नाही, आपल्या मनातल्या भावना साफ आहेत की नाहीत, आपल्या प्रतिज्ञा साफ आहेत की नाहीत हे पाहण्याचा आहे. आजची लढाई ही विचारांची लढाई आहे. एका अर्थाने ती तत्त्वांची लढाई आहे.'' यशवंतरावांच्या अशा अनेक अवतरणातून अत्यंत मजबूत, शब्दांचा सच्चा, विनम्र स्वभावाचा, दिलाचा पक्का असाच नेता प्रतीत होत राहतो. महाराष्ट्र क्लब मैदान पुणे येथे 'व्यर्थ न हो बलिदान' या विषयावर जाहीर सभेत भाषण देताना सैन्या-विषयीचा आदरभाव ते असा व्यक्त करतात. ''झाडावर फुललेले सुंदर फूल जसे आपण देवाला वाहतो. त्याचप्रमाणे अत्यंत हुशार, अत्यंत कर्तृत्ववान, अत्यंत समर्थ नेतृत्वाचे सर्व गुण अंगी असलेली अशी आमच्यातील वेचक वेचक तरुण मुले आमच्या जीवनाचा, आमच्या संसाराचा हा सुंदर भव्य फुलोरा, आम्हाला रणचंडीला अर्पण करावा लागतो. त्यांची आठवण आम्हाला कशी विसरता येईल?'' सैन्यात, वायुदलात, नौसेनेत, मरण पत्करलेल्या प्राणाहुती दिलेल्या वीर जवानांना ते अशा शब्दात कृतज्ञता व्यक्त करतात. घराघरातून अशी नवीन पुष्पे पुन्हा फुलावीत, ती फुलून विकसित व्हावीत व त्यांचा सुगंध सर्वत्र पसरावा अशी अपेक्षा ते व्यक्त करतात.

## भाषणांची शैली

यशवंतरावांच्या भाषणांची शैली ही मोहिनी घालणारी होती. आपल्या मराठी भाषणांच्या वैभवशाली भाषासौंदर्याने राजकारणात एक स्वतंत्रयुग निर्माण करण्याचा मान यशवंतरावांना मिळाला. म्हणून गेल्या पन्नास वर्षांत महाराष्ट्रात यशवंतरावांच्या इतके अनुकरण दुसऱ्या कोणत्याही राजकीय नेत्याचे झाले नाही. असे म्हटले तरी अतिशयोक्ती होणार नाही. कारण नंतरच्या काळात निर्माण झालेल्या बहुतेक सर्व राजकीय पुढाऱ्यांवर कमी अधिक प्रमाणात यशवंतरावांच्या भाषेचा, शैलीचा आणि वक्तृत्वाचा ठसा उमटलेला आढळतो. त्यांचे विचार, त्यांची भाषा, त्यांचे मिष्कील बोलणे, त्यांचा उपरोध, त्यांचा विनोद हे सगळेच वेगळे होते. नाविन्यपूर्ण होते.

यशवंतरावांच्या प्रतिभेची ठेवण आणि झेपच काही वेगळी होती. जो सुभाषिते निर्माण करतो तो अमर लेखक. याप्रमाणे ज्यांच्या भाषणात सुभाषिते देण्याचे सामर्थ्य अधिक प्रमाणात त्या भाषणाला भाषिक सौंदर्य अधिक प्राप्त होते. यशवंतरावांच्या भाषणांत शेकडो सुभाषितांची निर्मिती झाली आहे. यशवंतरावांनी आपल्या मानवी जीवनाच्या कडू-गोड भावनांचा नि अनुभवांचा अर्क काढून तो आपल्या सुभाषितात ओतला आहे. त्याचा अनेक ठिकाणी प्रत्यय येत राहतो. असा हा त्यांच्या भाषेचा आणि विचारांचा कलात्मक अन् तालबद्ध रुबाब त्यांच्या भाषणात आढळतो. मोजक्या वाक्यातच अर्थाचे ब्रह्मांड उभे करण्याचे सामर्थ्य यशवंतरावांच्या बुद्धीत होते. उदा. ''शांततेचा विचार करणारा आपला देश आणि तोंडाने शांततेचा मंत्र म्हणत म्हणत खिशातील खंजिराला हात घालणारा चीन.'' ''व्यक्तीचे मोठेपण नाही. राज्याचे मोठेपण महत्त्वाचे आहे ; पण ही गोष्ट आपण कधीही विसरू नका.' ''सासरी जावेसे वाटते पण माहेर तर सुटत नाही.'' ''तुम्हा आम्हाला तुमच्या आमच्या मनामध्ये निर्धाराचे दुर्ग उभे केले पाहिजेत. प्रत्येक स्त्री, प्रत्येक पुरुष, प्रत्येक मूल या देशाच्या स्वातंत्र्याचे रक्षण करणारा एक किल्ला बनला पाहिजे.'' ''निव्वळ पैशाने लढाई जिंकता आली असती तर शस्त्रांचे कारखाने काढण्याऐवजी आपण टांकसाळीच काढल्या असत्या. कारण ते पुष्कळ सोपे आहे.'' ''आमची नीती, फुलासारखे वागतील त्यांच्याशी फुलासारखे वागाववाचे आणि वज्रासारखे वागतील त्यांच्याशी वज्रासारखे वागावयाचे.'' ''सारख्या उसनवारीने संसार चालला तर तो फार दिवस टिकत नाही.'' ''दुसऱ्यांच्या चुकांचा उपयोग आपली सुधारणा करण्यासाठी करावयाचा असतो. पुढच्यास ठेच मागचा शहाणा असे आपण साध्या जीवनामध्ये म्हणतो.'' ''माणसाचे मन शिक्षणाच्या संस्काराने अधिक संपन्न केल्याशिवाय समाज खऱ्या अर्थाने समाज बनत नाही.'' ''ज्यामुळे ज्ञानाचा पाठलाग करण्याची ज्ञानाची सफर पुरी करण्याची शक्ती आणि दृष्टी माणसात निर्माण होते ते शिक्षण होय.'' अशा कितीतरी म्हणी, वाक्प्रचार, सुभाषिते व कलात्मक सौंदर्ययुक्त वाक्यरचना त्यांनी तयार केल्या. जागोजागी सुभाषितांचा वापर करून वक्तृत्वात एक प्रकारचा वेगळेपणा निर्माण केला. भाषणातील विचारांचा ओघ व विचारांचा आविष्कार यांना अनुकूल असा बदल ते आवाजात करत. त्यामुळे श्रोत्यांवर सहज प्रभाव पडत असे. शिवाय चांगल्या वाक्यांचा उपयोग, विनोद, कोटी, टोला, कोपरखळी यांचाही उत्तम रीतीने वापर केला असल्याने त्यांची भाषणे प्रभावी बनत. शिवाय काळ, वेळ आणि विषयाचे भान ठेवूनच ते बोलत. त्यांच्याकडे समयसूचकता तर होतीच शिवाय हजरजबाबीपणाही होता. १९६५ मध्ये नांदेड येथे भरलेल्या ४७ व्या नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष पु. ल. देशपांडे होते. तर उद्‌घाटक यशवंतराव होते. आचार्य अत्रेही व्यासपीठावर



उपस्थित होते. त्यांनी सुरुवातीस भाषण केले. त्या भाषणात उपरोधिक शैलीत ते म्हणाले, ''मुंबईहून एवढा मोठा प्रवास करून मी आलो. रस्ते दगड-धोंड्यांनी भरलेले, धूळ तर अवर्णनीय होती. मराठवाड्यातल्या रस्त्यावरील धूळ खात खात येथपर्यंत येऊन पोहोचलो. नामदार यशवंतरावांच्या राज्यात रस्त्याची ही स्थिती...!'' यशवंतरावांनी तेवढ्याच मिस्किलपणे असे उत्तर दिले, ''आचार्य अत्रे यांनी धुळीची तक्रार केली पण नेहमी दुसऱ्याला धूळ चारणाऱ्याने एकदा तरी स्वत: धूळ खावी ना!''

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळी यशवंतराव पुण्याच्या नाट्यगृहाचे उद्घाटन करण्यासाठी गेले. त्यावेळी पुण्याच्या नगरसेविका श्रीमती भीमाताई दांगट या बांगड्या घेऊन स्टेजवर यशवंतरावांना देण्यासाठी गेल्या व ''सूर्याजी पिसाळ चालता हो'' म्हणून ओरडल्या. सभेत एकच गोंधळ झाला. गोंधळ शांत झाल्यानंतर यशवंतरावांनी एकच वाक्य उच्चारले व म्हणाले, ''इतक्या नाट्यपूर्ण पार्श्वभूमीवर जगातल्या कोणत्याही नाट्यगृहाचे उद्घाटन झाले नसेल.'' किंवा सोलापूरच्या दयानंद महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी गोंधळ घातला. त्यावेळी ते काही वेळ निस्तब्ध उभे राहून म्हणाले, ''विद्यार्थी मित्रांनो, तुम्ही आता जे काही केलं त्यामुळे मला माझ्या कॉलेज जीवनाची आठवण झाली आणि मी तुम्हाला सांगू इच्छितो की तुम्ही आता जो दंगा केलात त्यापेक्षा दसपटीने मी केला होता.'' इस्लामपूर येथील राजारामबापू पाटील यांच्या सत्काराच्या कार्यक्रमाच्या वेळी अनेक लोकांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. सांगलीच्या श्री. कडलास्कर यांनी गांधी टोपी यशवंतरावांच्या हस्ते घालावी असा आग्रह धरला, तेव्हा यशवंतराव म्हणाले, ''मी कधीच कुणाला टोपी घातली नाही.'' या ठिकाणी त्यांचा हजरजबाबीपणा दिसून येतो. त्याचप्रमाणे आणखी एक प्रसंग सांगता येईल. गोहत्ती येथील काँग्रेस अधिवेशनात त्यांनी काही लोकांना त्यांच्या बंगल्यावर जेवायला बोलावले होते. निमंत्रितांमध्ये कलकत्त्याचे एक व्यापारी होते. ते व्यापारी शाकाहारी आहेत हे जेवायला बसल्यावर समजले. जेवताना ते व्यापारी म्हणाले, ''जगातील सर्व शक्तिमान प्राणी शाकाहारी आहेत.'' त्यावर यशवंतराव म्हणाले, ''होय, जगातील सर्व उपयुक्त प्राणी शाकाहारी आहेत.'' व्यापारी पुन्हा म्हणाले, ''हे सर्व प्राणी शक्तिमान आहेत कारण ते शाकाहारी आहेत.'' त्यावर साहेब म्हणाले, ''आणि म्हणूनच त्यांच्यावर स्वार होणे सोपे आहे.'' अशा प्रकारे त्या शाकाहारी माणसाचा अहंकार न दुखावता त्यांनी समर्पक असे उत्तर दिले. यशवंतरावांच्या अशी काही प्रासंगिक संभाषण चातुर्यामुळे त्यांच्याकडे असलेले प्रसंगावधान, वैचारिक समतोलपणा, मिश्किल स्वभाव, चिमटे घेणारा उपहास, उपरोध, प्रसंगावधान, संयमीपणा इ. अनेक गुणवैशिष्ट्यांचे दर्शन होते. प्रभावी वक्ते

म्हणून त्यांचा नावलौकिक होताच. शिवाय प्रतिपक्षावर कठोर उपहास करून, कधी हास्यास्पद बनवत तर कित्येकांना तिखट-गोड चिमटे घेत अनेकांना खुलवित. पुष्कळांना अंतर्मुख व्हायला लावत. अशा प्रकारे यशवंतरावांच्या भाषणांत विवेक आणि विचारशीलपणा जागोजागी पाहावयास मिळतो.

यशवंतरावांची भाषणे ही प्रेरणादायी व लोकजागृती करणारी अशीच आहेत. त्यांच्या भाषणशैलीबाबत डॉ. भगवान कवठेकर म्हणतात, ''ज्ञानेश्वराच्या ओवीत यशवंतराव जीवनाची भव्यता, विशालता आणि दिव्यता बघत असत, तर तुकारामाच्या अभंगात जीवनाचे रूप, स्वरूप आणि आशय ते बघत. शाहिरांच्या पोवाड्यात मराठीचा व मराठ्यांचा पराक्रम त्यांना नतमस्तक व्हायला लावीत असे. पंडितांच्या विद्वत्तेविषयी ते विनम्र होऊन आपला आदर शब्दरूपाने, वक्तृत्वाने व्यक्त करीत असत. वेरुळ अजिंठ्याच्या लेण्यातून दर्शित होणारे कालविश्व त्यांना अभिमानास्पद वाटत असे, तर मराठी लावणीतील मुग्ध शृंगाराला जीवनातील शिवत्वाचा पवित्र स्पर्श झाला असल्याचे त्यांना जाणवत असे.''

यशवंतरावांच्या विविध गुणकर्तृत्वाचा आलेखच येथे या लेखकाने उभा केला आहे. त्यांच्या या विविध विषयांवरील भाषणांत अफाट माहितीचे भांडार आहे. तसेच चिंतनशील विचार व श्रोत्यांबद्दल जिवंत कळकळही दिसते. या भाषणांतून त्यांच्यातील विद्वत्ता, तात्त्विकता, जागोजागी पाहावयास मिळते. प्रसिद्ध साहित्यिक प्रा. ना. सी. फडके त्यांच्या वक्तृत्वाबद्दल लिहितात, ''हजारो लोकांची विराट सभा असो किंवा शे-पाचशे निवडक श्रोत्यांची सभा असो, ती हमख़ास जिंकण्याचं कौशल्य, यशवंतरावांनी कमावलेलं आहे. श्रोत्यांच्या भावनांना आवाहन करण्याचं आणि त्याचप्रमाणे वैचारिक प्रतिपादनानं श्रोत्यांना जिंकण्याचं दोन्ही प्रकारचं कौशल्य त्यांच्या वक्तृत्वात आढळतं. प्रतिपक्षाला घायाळ करण्याचं चातुर्य ते अनेक वेळा प्रगट करतात. त्यांच्या भाषणाला अवश्य तेवढी विनोदाची झालरही असते आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही की, त्यांचं भाषण अत्यंत प्रमाणबद्ध आणि आटोपशीरही असतं. महाराष्ट्राच्या नामांकित वक्त्यांत यशवंतरावांची गणना अवश्य करावी लागेल.'' यशवंतरावांच्या गुरूंनी आपल्या शिष्यांबद्दल व त्यांच्या भाषणाबद्दल लिहिलेल्या प्रतिक्रिया स्पृहणीय तर आहेतच शिवाय एकूणच त्यांच्या भाषणगुणाचे कौतुक व मूल्यमापन करणाऱ्या आहेत.

यशवंतरावांची भाषणे ही ललित निबंध वाङ्मयाचा एक प्रकार म्हणून त्यांच्या निबंधशैलीतील शैक्षणिक व सामाजिक विषयांवरील भाषणे महत्त्वाची आहेत. या भाषणातून मुद्देसूद मांडणी, अंत:करणाला भिडणारी भाषा, राजकीय दूरदृष्टी यांचा संगम त्यांच्या भाषणात दिसतो. यशवंतरावांची ही भाषणे निबंधाच्या व्याख्येत



चपखलपणे बसतात. कारण निबंधाचे स्वरूप 'कोणालातरी उद्देशून बोलल्यासारखे' असते किंवा वाचकाला उद्देशून लेखक बोलत असतो. तसेच यशवंतरावांनी सुद्धा श्रोत्यांना व समाजाला आपले विचार सांगितले आहेत. त्यामुळे त्यांची भाषणे वाचताना ही भाषणे वाचत नसून निबंध वाचतो आहोत अशी जाणीव होत राहते. ग्रामीण जीवनपद्धतीत विविध स्तरांवरील सुसंस्कृत व्यक्तींचा सहवास या सर्वांचा संस्कार त्यांच्या या ललितरूपी भाषण साहित्यावर झालेला आहे. त्यांनी या साहित्यातून मराठी माणसाला स्वत:च्या उज्ज्वल भवितव्याच्या स्वप्नपूर्तीसाठी प्रेरणा देणारा विचार मांडलेला आहे. एकूणच राष्ट्राची उभारणी करण्याचा मनोदय त्यांनी या ठिकाणी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. केवळ आत्माविष्कारासाठी विचार प्रकटीकरण हा हेतू न ठेवता संवेदन वृत्तीने सामाजिक, शैक्षणिक विषयावर राष्ट्रीय भावनांनी भरलेले विचार ते मांडतात. साहजिकच हे विचार एखाद्या प्रबंधासारखे वाटतात. यामुळे या विषयावरील भाषणे ही मराठी भाषेवरील त्यांचे विलक्षण प्रभुत्व दाखवणारी आहेत. शिवाय मरगळलेल्या सामाजिक जाणिवा दूर करण्याचे महत्त्वाचे काम यशवंतरावांच्या भाषणांनी केले आहे. थोडक्यात समाजजीवनामध्ये परिवर्तन घडवून एकसंध, समृद्ध समाज निर्माण व्हावा अशी वास्तव अपेक्षा ते व्यक्त करतात.

यशवंतरावांनी इतर विषयावर दिलेली भाषणे आशय, आविष्कार व अभिव्यक्तीच्या दृष्टीने महत्त्वाची असल्याने तीही अभ्यासाचा विषय बनतात. या भाषणांतून त्यांनी उद्‌बोधन आणि प्रबोधनाची भूमिका स्वीकारल्याचे दिसते. महाराष्ट्राच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी अनेक योजना राबविल्या पाहिजेत व त्या जनतेपर्यंत गेल्या पाहिजेत. या दृष्टीने आर्थिक, राजकीय, संरक्षण, परराष्ट्र धोरण इ. विषयावर मुक्त चिंतन केले आहे. जनतेला न्यायाची, समानतेची नि विकासाची शाश्वती देण्यासाठी या विषयांवर अनेक व्यासपीठांवरून विचार मांडले. आर्थिक विकासावर अधिक भर दिला. त्यांनी कार्यकर्त्यांच्या समोर दिलेल्या भाषणांतून समाज प्रबोधनाचे शिक्षण दिले व तरुण पिढीला पुढे आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. राजकारण हेच समाजकारण व्हावे अशी अपेक्षा ते व्यक्त करतात. तसेच भारतीय जवानांना पुरुषार्थाची प्रेरणा देऊन त्यांचे स्फुल्लिंग जागृत करण्याचे काम त्यांच्या अनेक भाषणांनी केले आहे. या भाषणातून देशाच्या ऐक्याचा आणि स्थैर्याचा प्रश्न सतत मांडला. सर्वांचे मनगट एका सामर्थ्याने बांधले गेले पाहिजे म्हणजे ऐक्य व स्थैर्य प्रस्थापित होईल असा विश्वास ते व्यक्त करतात.

○ ○ ○

प्रकरण ८

—

# प्रासंगिक लेखन

यशवंतरावांनी अशा स्वरूपाचे लेखन वृत्तपत्रांतून व मासिकांतून केले आहे. काही मुलाखतीच्या आधारेही या स्वरूपाची लेखन निर्मिती झाली आहे. त्यामुळे या लेखनाचे वाङ्मयीन रूप फार भिन्न स्वरूपाचे आहे. हे लेखन वेगवेगळ्या कारणांनी आणि वेगवेगळ्या वेळी लिहिले आहे. त्यामुळे या साऱ्या लेखनाचा पोत एकसारखा नाही. या लेखनामागील प्रेरणा व त्यांना लाभलेले कलात्मक स्वरूप हे प्रामुख्याने स्फुट स्वरूपाचे आहे. त्यांचे जीवन, त्यांचे साहित्यिक स्वरूप, त्यांच्या राजकीय प्रेरणा, त्यांची सामाजिक परिवर्तनाची भूमिका, देशाभिमान, राजकीय आकांक्षा, त्यांचा ध्येयवाद इत्यादी गोष्टींचा उलगडा अशा स्वरूपाच्या लेखनातून होतो. त्यांच्या जीवनाचा भव्य पट उलगडून दाखविण्याचाही काही अंशी प्रयत्न त्यांनी केला आहे. प्रासंगिक लेखनातून फक्त भावनात्मक परिणाम साधणे हे त्यांचे प्रयोजन न राहता, तत्कालीन युगांच्या जाणिवा व्यक्त करण्याचा समाजमनाचा हुंकार सांगण्याचा त्यांचा प्रांजळ प्रयत्न दिसतो. जीवनातील ओंगळ आणि मंगल प्रसंगाचा पट उलगडत असताना जो अनुभव आला तोच त्यांनी शब्दांकित केला आहे. या लेखनाचा निर्माता स्वत: लेखकच असल्याने त्यांच्या व्यक्तित्त्वाचे किंवा आयुष्याचे ठसे या स्वरूपाच्या साहित्यकृतीम्ये उमटण्याची प्रक्रिया सहजच होते. या लेखननिर्मितीसाठी ज्या अनेकविध घटकांचा त्यांनी उपयोग केला आहे, त्यामध्ये त्यांच्या आयुष्यातील घटना-प्रसंगांचा, व्यक्तींचा, त्यांच्या सभोवतालच्या परिसराचा समावेश आहे. थोडक्यात त्यांच्या अनुभव विश्वाच्या उभारणीमध्ये ज्या घटकांचा उपयोग झाला त्याचा या लेखन निर्मितीशी अतूट संबंध दिसतो. त्यामुळे याचेही ठसे या लेखननिर्मितीवर उमटलेले दिसतात.

यशवंतरावांच्या प्रासंगिक लेखनातही विविधता दिसते. शिवाय वकिली बाणाही जाणवतो. या वकिली बाण्याच्या मागे खंबीर वास्तवतेची बैठक होती. त्यामुळे आपले म्हणणे निर्भिडपणे मांडणे, ज्या क्षणाला जसे वाटते तसे मांडण्याचा प्रयत्न त्यांनी केला. या लेखनातून साहित्यविषयक व समाजविषयक, स्वातंत्र्यविषयक,



स्व-संबंधी राजकारणाविषयक अशा नानाविध प्रश्नांचा किती सूक्ष्म रीतीने यशवंतरावांनी विचार केला होता. हे त्यांच्या पुढील काही लेखनावरून स्पष्ट होते. 'वर्गसंघर्ष आणि जातिसंघर्ष' (तरुण भारत, नागपूर येथील १९७० दिवाळी अंक) 'पक्षावरील अभंग निष्ठा (केसरी १२ नोव्हेंबर १९७७) 'भारतीय लोकशाही एक भविष्यकथा (किर्लोस्कर जानेवारी १९७०), भारताची सद्यस्थिती एक चिंतन (केसरी १९६८ दिवाळी अंक), 'केंद्र राज्य संबंधावरील दृष्टिक्षेप (माणूस दिवाळी अंक १९६८), 'संयुक्त महाराष्ट्राचे साध्य' (केसरी, प्रजासत्ताक संयुक्त महाराष्ट्र विशेषांक), 'आजच्या राजकारणातील माझी भूमिका (केसरी दीपावली पुरवणी, पुणे १९७७), 'नव्या प्रेरणांना साथ देऊ या, (नवे जग किर्लोस्करवाडी मासिकातील लेख १९६२) 'काही संस्मरणीय वाढदिवस' (पुणे, रविवार केसरी १० मार्च १९७४) 'केल्याने देशाटन', (पुणे, केसरी दिवाळी विशेषांक १९७५), 'मंगल कलश' (मुंबई, महाराष्ट्र टाईम्स दिवाळी वार्षिक १९७८) अशा असंख्य संकीर्ण लेखाचा नामनिर्देश करण्यासारखा आहे. त्यांचे हे लेखन सर्वार्थाने महत्त्वाचे आहे. या लेखांतून साहित्य, स्वातंत्र्यसंग्राम, जीवन, राजकारण, पक्षनिष्ठा यांसारख्या विषयांवर लेख आहेत. या सर्वांना न्याय देणारे विवेचन करणे असाध्य आहे. मात्र या लेखांतून जाणवणारी एक महत्त्वाची गोष्ट ही की, हे सर्व प्रासंगिक लेख मानवी जीवनाशी असलेले संबंध स्पष्ट करणारे आहेत.

यशवंतरावांचे प्रासंगिक लेखन नियतकालिकांतून, दिवाळी अंक, पुरवण्या व वृत्तपत्रांतून आलेले आहेत. त्यांच्या या लेखांत व्यक्तिचित्रे, विविध अनुभवातून आलेले विचार, विविध विषयांना स्पर्श करणारे लिखाण इ.चे प्रतिबिंब उमटले आहे. या लेखनाला साचेबंद स्वरूप न देता त्यांनी मुक्तपणे लेखन केले आहे. कुठलेही बंधन त्यावर नाही. त्यात विविधता आहे. व्यक्तिचित्रणात्मक लेख वृत्तपत्रीय सदरातून लिहिलेले स्फुट लेख, काही आठवणवजा लिखाण तर काही निरनिराळ्या विषयांवरचे मुक्त चिंतनपर लेख अशा प्रकारे त्यांच्या प्रासंगिक लेखनाचे वर्गीकरण करता येईल.

'स्वातंत्र्याचा पहिला दिवस' या नावाचा एक सुरेख व वेधक असा लेख 'ऋणानुबंध' या पुस्तकात आहे. या लेखात स्वातंत्र्याबद्दलचे विचार व स्वातंत्र्याच्या पहिल्या दिवसाच्या आठवणी यशवंतरावांनी सांगितल्या आहेत. ते या लेखाची सुरुवातच अशी करतात, ''स्वातंत्र्य! जी कालपर्यंत एक अमूर्त कल्पना होती, ती आज मूर्त स्वरूपात येत होती. जे काल एक स्वप्न होते, ते आज सत्य ठरणार होते. जो कालपर्यंत एक संकल्प होता तो आज सिद्ध होणार होता. कालपर्यंत गुलाम असलेला एक देश आज स्वतंत्र होणार होता! पारतंत्र्याचा काळोख संपून स्वातंत्र्याची

मंगल प्रभात आज उगवणार होती. अननुभूत आनंदाचा तो एक दिवस, कृतार्थ भावनेचा तो एक दिवस, आज अनेक वर्षांनंतरही माझ्या डोळ्यांसमोर ताजा आहे. अनेक वर्षे झाली. कालगणनेचे चक्र चालू आहे. अव्याहत चालू आहे, त्याची नोंदच आहे ती. ती चुकेल कशी ? पण त्या दिवसाची आठवण झाली की मनाचे हरिण केव्हाच त्या पवित्र दिवसापाशी जाऊन पोचते.''

यशवंतरावांच्या अंत:करणातील स्वातंत्र्याच्या पहिल्या दिवसाची आठवण ते सांगतात. ती आठवण झाली की अजून मन भरून येते. हृदय भरून येते. देह पुलकित होतो. एकूण एक संकल्प सिद्ध झाल्याची भावना यशवंतरावांच्या मनात निर्माण होते. या स्वातंत्र्याच्या पहिल्या दिवसाचे त्यांनी केलेले वर्णन लक्षणीय आहे. शिवाय तो दिवस म्हणजे त्यांच्या आयुष्यातील सर्वोच्च आनंदाचा क्षण होता. यशवंतरावांनी स्वातंत्र्याच्या सोहळ्याचे वर्णन अत्यंत मोहक असेच केले. ते वर्णन वाचताना साक्षात तो प्रसंग एखाद्या तैलचित्राप्रमाणे डोळ्यांसमोर उभा राहतो. यशवंतराव म्हणतात, ''लोकांचे जथेच्या जथे आनंदोत्सवात भाग घेण्यासाठी निघाले होते. रोषणाई झाली होती. स्वातंत्र्याचे वारे संचारले होते. एक गुलाम देश स्वतंत्र झाला होता. आजच्या पिढीला या आनंदाची कल्पना सांगूनही येणार नाही. एक प्रकारच्या बेहोशीतच मी घरी पोचलो.'' स्वातंत्र्याचे वारे संचारले होते. अशा अवस्थेत औत्स्युक्य, उत्साह, समाधान, भावनांचे अमृतमय रसायन यांचा उल्लेख ते करतात. शिवाय झेंडावंदनाच्या वेळची धुंदी, हर्ष मात्र आज अनेक वर्षे झाली तरी डोक्यात घर करून बसल्याचे ते सांगतात.

## ‘संयुक्त महाराष्ट्राचे साध्य

‘माझी भूमिका’ ‘मंगल कलश’ ‘संयुक्त महाराष्ट्राचे साध्य’ या लेखांतून संयुक्त महाराष्ट्राचा लढा आणि त्याची फलश्रुती यासंबंधीचे यशवंतरावांचे मनोगत आहे. महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठी मराठी माणसांनी दिलेला लढा, महाराष्ट्र निर्मितीचा मंगल सोहळा व त्यावेळी घडलेल्या इतिहासाचे पुनर्दर्शन करून देणारे हे लेख आहेत.

यशवंतरावांचा ‘भारताची सद्यस्थिती’ हा अतिशय चिंतनगर्भ लेख आहे. राजकारणातील व समाजकारणातील लोकांना विचार करावयास लावणारा आहे. ते म्हणतात, ''विमानातून जाताना दिसणारे नद्या, पर्वतांचे रूप मोहक असते, पण प्रत्यक्ष त्या नद्या पर्वतासमोर आपण उभे राहतो, तेव्हा दुर्लंघ्य वाटू लागतात. वाटते की, ती मोहकता हा एक भास होता. आपले तसेच झाले आहे.'' कारण भारतातील जी स्वातंत्र्यापूर्वीची स्वप्ने होती ती पूर्ण झाली नाहीत. स्वातंत्र्यानंतर भारताचे बदलते स्वरूप यशवंतरावांनी उघड्या डोळ्यांनी पाहिले आहे. सत्ता, सत्ताधारी, संस्कृती,



बदलत्या संस्कृतीचे बदलते स्वरूप : हे त्यांनी डोळसपणे पाहिले आहे. त्यामुळे हा लेख म्हणजे यशवंतरावांच्या भारताबाबतच्या भूमिकेचा, समाजमनाचा आरसा आहे. या आरशात समाजाचे, देशाचे, लोकशाहीचे आणि स्वतंत्र भारताचे स्वरूप दाखवून दिले आहे. तत्कालीन राजकीय आणि सामाजिक परिस्थितीवर परखड असे भाष्य केले आहे. यशवंतरावांनी 'वर्ग संघर्ष आणि जाति संघर्ष' नागपूरच्या 'तरुण भारत' मध्ये १९७७ च्या दिवाळी अंकात लेख लिहिला. या लेखात जातियवाद समूळ नाहीसा व्हावा. दलित समाजाविषयीची उपेक्षा थांबली पाहिजे आणि चांगुलपणाची भावना प्रत्येक माणसांच्या मनात निर्माण झाली पाहिजे. शोषकांचा अत्याचार थांबला पाहिजे. दीन-दलितांच्या मन-भावना समजावून घेऊन त्यांच्याशी समन्वय साधला पाहिजे. म्हणजे असंतोष आणि संघर्ष होणार नाही. 'माणूस' म्हणून त्याच्याकडे पाहिले पाहिजे. अन्याय, अत्याचार, पक्षपात, हिंसाचार न होईल अशी दक्षता घ्यावी लागेल. असे झाल्यास आर्थिक, सामाजिक विषमता दूर होऊन वर्गसंघर्ष व जाती संघर्ष होणार नाही, वितुष्ट निर्माण होणार नाही. ते टाळले पाहिजे. त्यासाठी समाजातल्या सर्व लोकांनी, शासन व नेत्यांनी पुढाकार घ्यावा व जातीय संघर्ष टाळायचा असेल तर ''वर्गसंघर्षाने हिंसक वळण घ्यायला नको असेल, तर वर्गविग्रहाची भावना दूर करायला हवी. आर्थिक दृष्ट्या दुर्बल आहे, एवढ्याचसाठी कुणावर अन्याय होणार नाही, याची दक्षता घ्यायला पाहिजे आहे. आजही कुणी दरिद्री असेल, गरीब असेल, तर तो दोष त्याचा नसून संपूर्ण समाजव्यवस्थेचा आहे, असे मानले पाहिजे. ते न करता वर्ग संघर्ष हिंसक राहणार, की अहिंसक राहणार ही चर्चा नुसती पोकळ व कोरडी ठरणार आहे. समाजात विविध स्तरांवरील वर्ग आहेत व त्यातला एक वा अनेक सबल वर्ग दुसऱ्या कमकुवत वर्गाचे शोषण करतात, छळ करतात, हेच वर्गसंघर्षाचे मूळ कारण आहे.'' यशवंतरावांच्या या वरील मजकूरावरून त्यांची जातीयता आणि वर्गसंघर्षाबाबतचा त्याकडे बघण्याचा दृष्टिकोन स्पष्ट होतो. माणूस म्हणून असलेली त्याची महान प्रतिष्ठा त्याला प्राप्त व्हावी. त्यासाठी सर्वांनी सर्वतोपरी प्रयत्न करावा असा सल्ला ते देतात.

यशवंतराव सतत माणसांच्या वेढ्यात असत. त्यांच्या स्थानाचा विद्वत्तेचा, अनेकांना लाभ झाला. यशवंतरावांचा राजकारणाशी अतिशय जवळचा संबंध होता. त्यामुळे त्यांचे बरेच प्रासंगिक लेख हे राजकारणातील चालू घडामोडींवर आधारित आहेत. त्यामुळे या लेखांचा वर फक्त उल्लेखच केला आहे. त्यांचे या प्रांतातील लेखन विपुल आहे. त्याची नोंद घेण्याइतपत ते सकस व दर्जेदार आहे. ते सर्वच लेखन वैशिष्ट्यपूर्ण आहे. या सर्व लेखांतून यशवंतरावांचे आगळेवेगळे दर्शन घडते. एक राजकारणी म्हणून,

विचारवंत म्हणून, राजकारणाच्या चालू घडामोडींवरील भाष्यकार म्हणून, ते या लेखांतून प्रकट होताना दिसतात. शिवाय लेखक विचारवंत म्हणून, जेवढे वाचकांसमोर येतात तेवढेच कमालीच्या नाजूक, कोमल भावना जपणारा 'माणूस' म्हणूनही या लेखांतून दिसतो. त्यांच्या या लेखनाबाबत प्रा. ना. सी. फडके असा उल्लेख व गौरव करतात. ''यशवंतरावांचं पडलेलं भाषण कधी कुणी ऐकलेलं नाही. क्वचित प्रसंगी त्यांची लेखनाची पातळी इतक्या उंचीवर गेलेली असते की, ती पाहून मी स्तिमित होतो.... भावनेनं ओथंबलेलं, प्रभावी भाषेनं नटलेलं हे लेखन जी लेखणी करू शकते, ती साधीसुधी लेखणी नाही, श्रेष्ठ दर्जाच्या अस्सल साहित्यिकाच्या हातात शोभावी अशीच ती आहे.'' यशवंतरावांच्या साहित्यविषयक गुणांचा अर्कच प्रा. फडके यांनी सांगून टाकला आहे.

यशवंतरावांनी प्रासंगिक लेखन हे वृत्तपत्रे, मासिके, नियतकालिके, दिवाळी अंक, विविध पुरवण्या इ. मधून केले आहे. या लेखनाचे स्वरूप विभिन्न आहे. सर्व लेखनाचा पोत एकसारखा नाही. बरेच लेखन हे राजकीय स्वरूपाचे आहे. या लेखनातूनही त्यांची रसिक वृत्ती व वकिली बाणा दिसतो. जीवनातील अमंगल आणि मंगल प्रसंगाचा जो अनुभव आला त्याचा पट उलगडून दाखविण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे.

भाषण करताना त्यांना कधी वाचून दाखवावे लागले नाही. ते त्यांना आपोआप स्फुरत असे. भाषणातील विचारांशी ते नेहमी आग्रही राहात. हळुवारपणाने श्रोत्यांच्या मनाचे एकेक कप्पे ते उघडत असत. त्यामुळे लोक तल्लीन होऊन ऐकत. लोकांना तो आपलाच माणूस वाटे. त्यांच्या भाषणाला कसला दर्प नसे. त्यामुळे आपलेच प्रश्न, आपलीच सुखदु:खे त्यांच्या तोंडातून बाहेर पडत आहेत असे श्रोत्यांना वाटत असे. असा मजबूत शब्दांचा, सच्चा, विनम्र स्वभावाचा, दिलाचा पक्का, शालीन, नम्र असा हा नेता होता. त्यामुळे मराठी भाषणांच्या वैभवशाली भाषासौंदर्याने राजकारणात एक स्वतंत्र युग त्यांनी निर्माण केले. असे हे युगंधर लोकनेते भाषासामर्थ्याच्या दृष्टीनेही समर्थ ठरतात व नवमहाराष्ट्राचे भाग्यविधाते ठरतात.

❍ ❍ ❍



प्रकरण ९

# समारोप

यशवंतराव चव्हाण यांच्या साहित्यविषयक भूमिकेचा आणि त्यांच्या प्रस्तावनेमधून आलेल्या समीक्षात्मक विचारांचा परामर्श घेतला आहे. तसेच त्यांच्या विविध भाषणांमधून व लेखांमधून त्यांनी साहित्यविषयक मांडलेली भूमिका येथे विशद केली आहे. यशवंतरावांची साहित्यविषयक मते समाजशास्त्रीय विचारांनी परिणत झालेली दिसतात. समाजमनावर नीती विचारांचा असलेला पगडा लक्षात घेता, नैतिकतेला बाधा आणणारा विचार कितीही कलासंपन्न असला तरी तो समाजात रुजत नाही. भावत नाही. विवेकवादी विचार यशवंतरावांच्या साहित्यविषयक भूमिकेत दिसतो. यशवंतरावांनी आपल्या साहित्यविषयक विचारांत व समीक्षालेखनात लेखकांच्या व्यक्तिमत्त्वाची केलेली चिकित्साही महत्त्वाची असून त्यांच्या एकूण साहित्य विचाराशी ती सुसंगत अशीच आहे. यशवंतरावांना वाङ्मयीन अभिरुचीला वळण लावण्यासाठी टीकेचा अंकुश महत्त्वाचा वाटतो. समीक्षेत दोषासह गुणांचेही मूल्यमापन निर्भीडपणे करावे. तुलनेला महत्त्व देऊन ती तुलना योग्य असावी. याची दक्षता घेण्यास सांगतात. कोणताही श्रेष्ठ लेखक अथवा साहित्यवृत्तीचे मानदंड ठरवून दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, जनवादी साहित्य किंवा तत्सम साहित्याशी तुलना करीत सुटणे त्यांना योग्य वाटत नाही. कोणत्याही कलाकृतीचे आत्मिक सौंदर्य समीक्षकाने शोधावे. साहित्याची अंतिम प्रेरणा मानवी मूल्यांची जाणीव करून देणारी असली पाहिजे. त्या साहित्यात मानवी मूल्यांची किंवा गुणांची वाढ करणे हे उद्दिष्ट असले पाहिजे. जे साहित्य सर्वसामान्यांचे हित साधते तेच खरे साहित्य. निव्वळ शब्दलालित्य म्हणजे साहित्य नव्हे. ललित साहित्याने समाजकारण केले पाहिजे. म्हणजेच ललित साहित्य सामाजिक वास्तवाशी भिडले पाहिजे असे त्यांचे मत होते. जीवनात परिवर्तन घडवून आणण्याचे कार्य साहित्याने केले पाहिजे. साहित्य केवळ विरंगुळ्यासाठी नसते. साहित्यात माणूस हा केंद्रबिंदू आहे असे त्यांचे प्रतिपादन होते. मानवी मन आणि भावना यांचे उदात्तीकरण

करून एकूण जीवन गतिमान करते तेच खरे साहित्य होय. अशी त्यांची साहित्यविषयक भूमिका होती.

त्यांनी साहित्याचा जीवनवादी विचार आपल्या विवेचनातून मांडला. साहित्याची संस्कारक्षमता व शब्दाचे सामर्थ्य यावर त्यांचा विश्वास होता. साहित्यिक प्रक्षुब्ध झाला पाहिजे असे ते नेहमी म्हणत. साहित्यावर व संस्कृतीवर श्रद्धा असल्याने समाज जिवंत राहतो, तो सांस्कृतिक साहित्यिक मूल्यांमुळे असे ते म्हणतात. साहित्य आणि समाजजीवन यांच्यात त्यांनी कधीच फारकत केली नाही म्हणून यशवंतरावांच्या साहित्यविचारात समाजचिंतनाला अग्रस्थान आहे. त्यांनी काव्य, नाट्य, ललित, निबंध, चरित्र, आत्मचरित्र, कादंबरी इत्यादी संबंधी मोलाचे विचार प्रकट केले आहेत. कविता हा साहित्याचा आत्माविष्कार प्रकार असून 'नवनिर्मिती' असल्याने तिच्या सौंदर्याला आणि बंदिस्तपणाला ते महत्त्व देताना दिसतात. जीवनातल्या अनंत वेदनांना शब्दरुप देणाऱ्या आणि अनेकांच्या भावनांना शब्दरूप देऊन आनंद निर्मिती करणाऱ्या या प्रकाराबाबत स्वत:ची भूमिका ते नम्रपणे व्यक्त करतात. काव्यविषयक विचारात भावना आणि कल्पना यास अधिक महत्त्व देतात. काव्यविषयक दृष्टिकोनात त्यांच्या मनाची मूस विचारी आणि चिंतनशील अशीच आहे.

नाट्यविषयक विचारांत लोकरंजन आणि लोकाराधन या नात्याने नाट्याचे स्थान महत्त्वाचे आहे असे ते मानतात. नाटकातून आलेली कृत्रिमता आणि रंजकता त्यांना मान्य नाही. म्हणून नाटकातील आशयसंपन्नता, कथानकाची गती आणि प्रेक्षकांवरील परिणाम या विषयी दक्ष राहण्यास नाटककारास सांगतात. थोडक्यात रंगभूमी अधिकाधिक लोकाभिमुख असायला हवी. काळाबरोबर निर्माण होणारे नवे नवे प्रश्न नाट्यरूपाने मराठी नाट्यवाङ्मयात मांडावे. 'नाना रसांचा' आस्वाद नाटकातून घेता यावा. एकूणच जीवनवादी विचाराला धरूनच त्यांचे नाटकाविषयीचे विचार आले आहेत.

चरित्र, आत्मचरित्र या वाङ्मयाबाबत यशवंतरावांना विशेष रुची होती. या वाङ्मयप्रकाराबाबत विचार मांडताना आस्वाद आणि आकलन त्यांच्या आत्मचरित्रपर लेखनातून अधिक सुलभ असल्याचा प्रत्यय येतो. तसेच एखाद्या कालखंडाचा साक्षी म्हणूनही या वाङ्मयाचा उपयोग व्हावा अशी त्यांनी अपेक्षा प्रतिपादली आहे. कथेच्या वैचारिक परिणामापेक्षा तिचा भावनात्मक परिणामच त्यांना विशेष महत्त्वाचा वाटतो.लघुनिबंध आणि लघुकथा या वाङ्मयाबाबत त्यांनी अधिक प्रगल्भ विचार मांडला आहे. यशवंतराव चव्हाण हे कथाकार, कादंबरीकार, नाटककार, कवी म्हणून त्यांच्या स्वतंत्र वाङ्मयीन कलाकृती नसल्या तरी त्यांनी या वाङ्मयाचा साहित्यविचार केला आहे. त्याचबरोबर स्फुट ललित लेखन व अध्यक्षीय भाषणातून त्यांनी अशा



स्वरूपाच्या लेखनाबाबत स्वतंत्र विचार केला आहे.

रूढ अर्थाने यशवंतराव समीक्षक नाहीत, पण सामान्यांच्या साहित्यविषयीच्या जाणीवा प्रगल्भ करणारे त्यांचे साहित्यविषयक लिखाण आहे. यशवंतरावांचे 'मराठीचे सर्वसंग्राहक स्वरूप', 'साहित्य आणि प्रबोधन', 'चरित्रे आणि आत्मचरित्रे', 'प्रकाशाचा लेखक', 'साहित्यिकांची जबाबदारी', 'साहित्य आणि संस्कृती', 'माझा विरंगुळा', 'लोकभाषा हीच ज्ञानभाषा', 'सोन्याचा सोहळा', 'आजच्या साहित्याकडून अपेक्षा', 'मराठी रंगभूमीची अखंड परंपरा', 'इतिहासाचे मर्म' या लेखातून साहित्यविषयक निखळ भूमिका मांडली आहे. यातून त्यांची भूमिका आस्वादक समीक्षकाची आहे हे स्पष्ट होते. यातून त्यांनी अभिजाततेला प्राधान्य दिले आहे. वाङ्मय समीक्षेबाबतची आपली मते निर्भिडपणे व्यक्त केली. त्यांचे लेखन हे आस्वादक समीक्षेचा एक नमुना ठरते. प्रचारकी साहित्य आणि वाङ्मयांतर्गत प्रबोधन यांच्यात त्यांनी फरक केला आहे. त्यांना वाङ्मयाच्या ललितरूपाचे भान होते. म्हणूनच वास्तवाचा आग्रह धरताना त्यांनी कल्पनाशक्ती, प्रतिभा यांना गौण मानले नाही. हे त्यांचे लक्षणीय विशेष नोंदवणे आवश्यक आहे.

रसिक मराठी भाषिक, साहित्यप्रेमी, मर्मज्ञ व समतोल भाष्यकार हा वाङ्मयीन प्रगतीचा घटक आहे असे मानणाऱ्या यशवंतरावांनी सतत वाङ्मयविकासाचाच विचार केला आहे. साहित्य आणि समाज याचा त्यांनी विचार मांडला. साहित्य आणि समाज, साहित्य आणि भाषा, साहित्य आणि अनुभव, साहित्य आणि इतर मानवी व्यवहार यांचे तारतम्याने आकलन करून त्यांनी विचार मांडले आहेत. भाषेच्या शक्तीचेही पुरेसे आकलन त्यांना असल्याचे प्रत्ययाला येते. यशवंतरावांच्या साहित्यविचारात साहित्यकृतीतील आशयाच्या संपन्नतेला महत्त्व आहे. जीवनातील सत्याचा शोध, चिरंतन जीवनमूल्याधिष्ठित विचार कलाकृतीतील आत्मिक सौंदर्य शोधले पाहिजे. साहित्याची संस्कारक्षमता लक्षात घेऊन त्यांनी आपला साहित्य विचार मांडल्यामुळे ते वाचकाच्या अभिरुची संवर्धनाच्या बाबतीत अधिक दक्ष दिसतात.

यशवंतरावांनी विविध ग्रंथांना प्रस्तावना लिहिल्या. या प्रस्तावनांमधून यशवंतरावांची अभिजात साहित्यिक रसिकता प्रकट होते. तसेच त्यांचे भावस्पर्शी संवेदनशील मन आणि मार्मिक समीक्षा व आस्वादक पाहावयास मिळते. तसेच या प्रस्तावनेतून त्यांची कल्पना आणि चिकित्सक बुद्धी व साहित्यविषयक रुची प्रत्ययास येते. या प्रस्तावनेतून प्रत्यक्ष अनुभवांचा आलेख येतो. जीवनाच्या तटस्थ बिंदूवरून पाहात असताना मनात निर्माण होणारी चिंतनवलये त्यांच्या प्रस्तावनेत अधिक आहेत. तसे गंभीर स्वरूपाचा साहित्यविषयक विचार, देशहिताची भावना आणि देशाच्या

एकात्मतेची व समाजात नवचैतन्य निर्माण करण्याची, अपेक्षित परिवर्तन घडवून आणण्याची अपेक्षा केली आहे. त्यांच्या प्रस्तावनापर लेखनात स्वागताचा आणि प्रोत्साहनाचा तन्मयतेने घेतलेल्या रसास्वादाचा मोठा भाग आहे. तसेच त्या त्या साहित्यकृतीच्या आंतरिक सौंदर्याचा विचार हे यशवंतरावांच्या साहित्यविचाराचे बलस्थान आहे. त्यामुळे प्रस्तावनेतील ललित शिफारसी म्हणजे त्यांचे निर्भेळ साहित्यिक कलाकृतीचे केलेले मूल्यमापन होय. यशवंतरावांनी श्रेष्ठ साहित्याच्या निकषाचा विचार करून आशयाच्या संपन्नतेचे महत्त्वही विशद केले आहे. यशवंतरावांनी लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा, भोवतालच्या वास्तवाचा, वाङ्मयीन अभिरुचीचा आणि वाङ्मयीन संस्कारांचा केलेला विचार भौतिक स्वरूपाचा आहे. यशवंतरावांची ही साहित्यविषयक चिकित्सा आणि चिंतन म्हणूनच महत्त्वपूर्ण आहे. यशवंतरावांच्या या प्रस्तावना लेखनात समतोल, चिंतनशीलता, विद्वत्ता, व्यासंग आणि प्रतिभाशक्ती पाहावयास मिळते. साहित्यावरील उदंड प्रेम, गुणग्राहक वृत्ती, लेखकाला आनंद व प्रोत्साहन देण्याचे त्यांच्या ठायी असणारे सामर्थ्य आणि बरेवाईट रोखठोकपणे सांगणारी स्वच्छ शैली यांचे मर्मस्पर्शी दर्शन घडते. समजून घेणे व समजून देणे अशी दुहेरी समन्वयाची भूमिका घेतल्यामुळे हे लेखन लेखकांना व वाचकांना उपकारक ठरले आहे.

यशवंतरावांनी केलेली भाषणे ही निबंध शैलीतील लेखनासारखी वाटतात. त्यामुळे त्यातील वैचारिकता सुटत नाही. केलेली भाषणे आणि प्रासांगिक लेखन अथवा मांडलेले विचार त्यांच्याजवळील प्रगल्भ सांस्कृतिक संचित आहे. त्यांनी भाषणांतून अस्तित्वगामी विचार मांडला. त्यांच्या भाषणात अपेक्षित असलेली सर्वसमावेशकता दिसते. नवोदितांना, नेत्यांना, समाजसेवकांना ते प्रोत्साहन देण्याची भाषा करतात. अवाङ्मयीन वृत्तीवर तोंडसुख घेतात. अभिरुची, निर्मिती, कलात्मकता यावर ते भर देतात. वाङ्मयाबद्दलची निकोप, एकनिष्ठवृत्ती त्यांच्या साहित्यविचारात आहेत. वाङ्मयाबद्दल आपुलकी व वाङ्मयाला सर्वस्व मानणारा संवेदनशील माणूसच असा विचार करू शकतो. भाषणातून त्यांचे सखोल वाचन, मनन आणि चिंतन यांचे प्रतिबिंब पाहावयास मिळते. साहित्य, शिक्षण, माणूसपणाची उभारणी, श्रमशक्ती, संस्कृती, कृषी-औद्योगिक धोरण, सहकार, विज्ञान, संगीत, शेती, संरक्षण, अर्थ, परराष्ट्र धोरण, सामाजिक तत्त्वज्ञान, राजकारण यांसारख्या असंखय विषयात त्यांनी विचारपूर्वक व्यक्त केलेले चिंतन पाहावयास मिळते. या भाषणातून त्यांनी महाराष्ट्राच्या लोकजीवनाचा आणि लोकसंस्कृतीच्या उन्नयनाचा विचार मांडला. शिवाय मरगळलेल्या सामाजिक जाणिवा दूर करण्याचे महत्त्वाचे काम यशवंतरावांच्या भाषणांनी केले आहे. यशवंतरावांची ही भाषणे निबंधांसारखी वाटतात. निबंधाला ज्याप्रमाणे आकर्षित करणारी सुरुवात,



सुभाषितांची पेरणी करीत विचारांना दिशा देणारा गाभा आणि वाचणाऱ्याला योग्य दिशा दाखवणारा, विषयाचे सार सांगणारा, विषयाचे तात्पर्य प्रकट करणारा शेवट असतो तशीच यशवंतरावांच्या भाषणांची मांडणी असे. निबंधाचे स्वरूप कोणालातरी बोलल्यासारखे असते, त्यातून लेखक वाचकांशी संवाद साधत असतो. वाचताना नकळत दोघांच्या मनाच्या तारा, विचारांच्या तारा जुळल्या जातात. याच धर्तीवर यशवंतरावांनी सुद्धा श्रोत्यांना व समाजाला आपले विचार सांगितले आहेत. एकूणच त्यांनी मराठी माणसाला स्वत:च्या उज्ज्वल भवितव्याच्या स्वप्नपूर्तीसाठी प्रेरणा देणारा विचार मांडला. चांगल्या पद्धतीने आदर्श राष्ट्राची उभारणी करण्याचा मनोदय त्यांनी या ठिकाणी मांडण्याचा प्रयत्न केला. विविध क्षेत्रांना व्यापून टाकणारी कल्पनाशक्ती त्यांच्या या वैचारिक लेखनातून दिसते.

इतर विषयावर दिलेली भाषणे आशय, आविष्कार, विषय व अभिव्यक्तीच्या दृष्टीने महत्त्वाची असल्याने तीही अभ्यासविषय बनतात. त्यांच्याजवळ प्रतिभा होती. जिव्हाळा होता. भाषणांत कसला दर्प नसे. त्यातून त्यांचे शालीन, नम्र व्यक्तिमत्त्व प्रकट होते. देश, धर्म, संस्कृती आणि महाराष्ट्र हे यशवंतरावांच्या श्रद्धेचे विषय असल्याचे जाणवतात. कलात्मक नवनिर्मितीमध्ये रमलेले यशवंतराव राजकारणी असूनही एक साहित्यिक म्हणून त्यांची वाङ्मयीन कामगिरी दखलपात्र आहे. त्यामुळे राजकारणी विचारवंत लेखक म्हणून मराठी साहित्याच्या इतिहासात त्यांचा कायमचा ठसा उमटलेला आहे.

यशवंतरावांचे प्रासंगिक लेखन हे विभिन्न स्वरूपाचे आहे. सर्व लेखनाचा पोत एकसारखा नाही. हे लेखन स्फुट स्वरूपाचे आहे. या लेखनातूनही मराठी भाषेचा एक नम्र पाईक या नात्याने सामान्य वाचकासंबंधी मनात अत्यंत आदराची भावना ठेवून लेखन केले आहे. या लेखनाचा एकंदरीत विचार करता यशवंतराव चव्हाण यांचे मराठी साहित्यात निश्चित असे स्थान निर्माण झाल्याचे दिसते. ते स्थान निश्चित होण्यासाठी त्यांच्या साहित्यातील एकूण वाङ्मयीन घटक कारणीभूत ठरतात.

यशवंतराव चव्हाणांच्या बहुपरिमाणयुक्त व्यक्तित्वाचा वाङ्मयीन मूल्यांच्या दृष्टीने विचार केल्यास त्यांचे साहित्य श्रेष्ठ वाटते. स्वतंत्र शैलीचा एक साहित्यिक म्हणून यशवंतरावांचे स्थान मराठी वाङ्मयात निश्चित होते. या साहित्यिकाची भाषा अलंकारिक काव्यमय असून ललित गद्याच्या जवळपास जाणारी आहे. त्यामुळे त्यांचे साहित्य वाचकांच्या अभिरुचीला मान्य होईल असेच आहे. त्यांचे साहित्य अनुभवाच्या श्रीमंतीबरोबर अभिव्यक्तीच्या सौंदर्याचा आणि सामर्थ्याचा, जीवनमूल्यांचा, कलामूल्यांचा एकाच वेळी प्रत्यय देते. आनंद देते. उद्‌बोधनही करते. स्थलवर्णन,

प्रवासवर्णन व व्यक्तीवर्णन यांची सुंदर चित्रणे आली आहेत. त्यांच्या लेखनात निसर्गावर आधारित रूपकांची आणि उपमांची विविधता आढळते. त्यांच्या ललितगद्य, आत्मानुभव वृत्ती व समाजहिताची तळमळ जाणवते. त्यांच्या साहित्यामध्ये भावभावांचा हळूवारपणा दिसतो. त्यात कौटुंबिक वात्सल्य, बंधु-भगिनी प्रेम, राष्ट्र-प्रेम, शौर्य, विनोद, टिंगल, चेष्टा, अर्थकारण, आत्मानुभव इ. विषय दिसतात. धार्मिक भावभावना व श्रद्धाही त्यांच्या साहित्याचा विषय आहे. त्यांच्या साहित्यातून पुराणकालीन कथा, साधुसंतांची भक्ती, श्रद्धा, निसर्गाची ओढ, मायबोलीवरील प्रेम, सामाजिक आणि आर्थिक जीवनाचे चित्रण, नाविन्याची जाणीव, कौटुंबिक जिव्हाळा, सौंदर्य आणि रसिकवृत्ती यांचाही अंतर्भाव झालेला दिसतो. या सर्व रसायनातून प्रकट होणारा यशवंतरावांचा आविष्कार न्याहाळणे, त्यातून पुढे आलेली अवलोकने नोंदवणे, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या पैलूंचा, त्यांच्या साहित्यिक शैलीचा विचार मांडण्याचा प्रांजळ प्रयत्न केला आहे.

❍ ❍ ❍



## यशवंतराव चव्हाण यांचा दृष्टिक्षेपात जीवनपट

- १९१३ मार्च १२, पूर्वीच्या सातारा जिल्ह्यातील (सध्या सांगली जिल्ह्यातील नवीन पलूस तालुक्यात) देवराष्ट्रे गावी मातोश्री विठाबाईच्या पोटी जन्म (कृष्णाकाठ आत्मचरित्र ग्रंथातून)
- पूर्ण नाव :- यशवंतराव बळवंतराव चव्हाण
- १९१८-१९१९, कराड येथे प्लेगच्या साथीत पिता बळवंतराव यांचे निधन, वयाच्या ४ थ्या वर्षी पितृछत्र हरपले. देवराष्ट्रे येथील प्राथमिक चौथीपर्यंतचे शिक्षण व नंतर कराड येथे शिक्षणासाठी दाखल.
- १९२७ साली, कराडच्या केंद्र शाळेतून व्हर्नाक्युलर फायनल परीक्षा पास व कराड येथील टिळक हायस्कूलमध्ये प्रवेश.
- १९३०, १४ मार्च, पुणे येथील वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे १५०/- रु.चे बक्षीस मिळविले.
- १९३० ते १९३२ टिळक हायस्कूलमध्ये झेंडावंदन करून म. गांधींच्या कायदेभंग चळवळीमध्ये सहभाग (असहकार) व १८ महिन्यांची शिक्षा.
- १९३३ मे, तुरुंगातून सुटका.
- १९३४, मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण आणि कोल्हापूर येथील राजाराम महाविद्यालयात प्रवेश. प्राचार्य बाळकृष्ण, ना. सी. फडके यांच्यासारखे नामवंत प्राध्यापक लाभले.
- १९३५, महाराष्ट्रातील समाजवादी पक्षाचे संस्थापक सदस्य.
- १९३८, इतिहास व राजकारण हे विषय घेऊन मुंबई विद्यापीठाची बी. ए. पदवी परीक्षा उत्तीर्ण. पुणे येथील लॉ कॉलेजमध्ये प्रवेश.
- १९४०, एल. एल. बी. परीक्षा उत्तीर्ण व वकिली व्यवसायास प्रारंभ.
- १९४०, सातारा जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष.
- १९४२ जून २, फलटण येथील मोरे यांची कन्या वेणुताई यांच्याशी विवाह.
- १९४२ ऑगस्ट ९, म. गांधींच्या 'चले जाव' घोषणेमुळे राजकीय जीवनास कलाटणी, विशाल सातारा जिल्ह्याचे नेतृत्व, भूमिगत चळवळीत प्रवेश, चळवळीत संचालन आणि मार्गदर्शन.
- १९४२ साली कराड येथे भरलेल्या दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलनातील परिसंवादाचे अध्यक्ष.
- १९४२, रुग्ण पत्नी सौ. वेणुताई यांना भेटण्यासाठी फलटण येथे आगमन झाले

असता पोलिसांनी अटक केली. एका नातेवाईक पोलिस अधिकाऱ्यानेच पकडून देण्यासाठी मदत केली.

- १९४३, थोरले बंधू ज्ञानोबा यांचे देहावसान.
- १९४४, राजकीय विषयावर कविता (तुरुंगवास)
- १९४५, तुरुंगातून सुटका.
- १९४६, मुंबई विधिमंडळाच्या निवडणुकीत कराड मतदारसंघातून विजयी. गृहखात्याचे पार्लमेंटरी सेक्रेटरी या पदावर नियुक्ती.
- १९४७ डिसेंबरमध्ये मधले बंधू गणपतराव यांचे निधन.
- १९४८, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे चिटणीस गणपतरावांच्या पत्नीचे निधन
- १९५१, गणपतरावांच्या पत्नीचे निधन.
- १९५२, मुंबई विधानसभेमध्ये कराड मतदारसंघातून निवड. मुंबई राज्याचे पुरवठामंत्री.
- १९५३ सप्टेंबर, विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र यांच्या एकीकरणाची पूर्वतयारी करणाऱ्या नागपूर करारावर नागपूर येथे पश्चिम महाराष्ट्राच्या वतीने स्वाक्षरी.
- १९५४, मुंबई राज्य पंचायत संघाची स्थापना.
- १९५५ डिसेंबर १, फलटण येथे सातारा जिल्हा काँग्रेस कमिटीच्या सभेत उपोषण, संप, राजीनामे हे संयुक्त महाराष्ट्र मिळविण्याचे मार्ग नव्हेत असे ठासून प्रतिपादन करणारा ठराव मंजूर. 'महाराष्ट्रापेक्षा नेहरू श्रेष्ठ आणि संयुक्त महाराष्ट्र मिळविण्याचे प्रयत्नात यापुढे शंकर देव यांचे नेतृत्व स्वीकारण्यास मी तयार नाही' अशी चव्हाण यांची घोषणा.
- १९५५ डिसेंबर २, राज्यपुनर्रचना समितीच्या शिफारशीने प्रक्षुब्ध झालेले जनमत यशवंतरावांच्या या घोषणेने अधिकच भडकले आणि नंतर सतत वर्षभर यशवंतरावांवर शिव्याशापांचा वर्षाव होत राहिला.
- १९५६ ऑक्टोबर, लोकसभेने विदर्भासह विशाल द्वैभाषिक मुंबई राज्याची स्थापना करण्याच्या बाजूने आपला कौल दिला.
- १९५६ नोव्हेंबर १, विशाल द्वैभाषिक मुंबई राज्याची स्थापना व मुख्यमंत्रीपदाची निवड (वय ४३)
- १९५७ एप्रिल, मुंबई विधिमंडळाच्या सार्वत्रिक निवडणुकीत कराड मतदारसंघात अटीतटीच्या सामन्यात विजयी आणि पुन्हा मुख्यमंत्रिपद.
- १९५७ नोव्हेंबर ३०, प्रतापगडावर शिवस्मारकाचे पंतप्रधान पं. नेहरू यांच्या



हस्ते उद्घाटन ; संयुक्त महाराष्ट्र समितीच्या वतीने द्वैभाषिक विरोधी मोर्चा, राजकीय वातावरण तप्त. पण मोर्चा व समारंभ शांततेने पार पाडले.

- १९५८ सप्टेंबर, अखिल भारतीय काँग्रेसच्या वर्किंग कमिटीवर निवड.
- १९५८ फेब्रुवारी, विसाव्या विदर्भ साहित्य संमेलनाचे उद्घाटन
- १९५९ जानेवारी, अखिल भारतीय काँग्रेसच्या नागपूर अधिवेशनात तृतीय पंचवार्षिक योजनेविषयी ठराव मांडला.
- १९५९ मार्च , शस्त्रक्रिया व ४२ दिवसांची विश्रांती
- १९५९ सप्टेंबर, द्वैभाषिक मुंबई राज्याच्या पुनर्रचनेसंबंधी विचार करण्यासाठी काँग्रेस वर्किंग कमिटीने नऊ सदस्यांची समिती नेमली.
- १९६० जानेवारी, द्वैभाषिक राज्याची पुनर्रचना करून मुंबईसह मराठी प्रदेशाचे व गुजरात प्रदेशाचे अशी स्वतंत्र दोन राज्य निर्मितीचा निर्णय नऊ सदस्यीय समितीने घेतला.
- १९६० फेब्रुवारी १३, (सावरगाव-डुकरे) येथे भरलेल्या विदर्भ साहित्य संमेलनाचे उद्घाटक.
- १९६० मे, महाराष्ट्र राज्याची उत्साही वातावरणात स्थापना व नवीन राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथविधी.
- १९६० ऑक्टोबर २१, पुणे येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीतर्फे जाहीर सत्कार
- १९६० नोव्हेंबर, अखिल भारतीय काँग्रेस निवडणूक मंडळावर निवड.
- १९६० नोव्हेंबर १०, नागपूर कराराच्या अंमलबजावणीचा महत्त्वाचा भाग म्हणून नागपूरात महाराष्ट्र विधिमंडळाचे एक अधिवेशन दरवर्षी भरविण्यास सुरुवात.
- १९६० डिसेंबर जून, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना व नागपूर येथे मंडळाचे उद्घाटन.
- १९६०, मुंबई येथे शिवछत्रपतींच्या पुतळ्याचे अनावरण.
- १९६१ जानेवारी, काँग्रेस महासमितीमधून निवडणूक पद्धतीने प्रथमच झालेल्या निवडीत वर्किंग कमिटीवर निवड.
- १९६१ मार्च मध्ये विदर्भातील जनतेच्या वतीने नागपूर येथे ४७ व्या वाढदिवसानिमित्त सत्कार समारंभ.
- १९६१, दिल्ली येथे भरलेल्या ४३ व्या अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाचे (स्वागताध्यक्ष).
- १९६२ मे १, पंचायत राज्य योजनेचा प्रारंभ.

- १९६२ ऑक्टोबर, 'केसरी' च्या दिवाळी अंकात 'नियतीचा हात' हा पहिला लेख प्रसिद्ध.
- १९६२ नोव्हेंबर २३, भारताचे संरक्षणमंत्री म्हणून सूत्रे स्वीकारली.
- १९६३, अमेरिकेचे संरक्षण खात्याचे सचिव मॅक्नामारा यांच्या निमंत्रणावरून अमेरिकेस भेट.
- १९६३ ऑगस्ट , रशियाचा दौरा, रशियन पंतप्रधान क्रुश्चेव्ह यांच्याशी चर्चा, मदतीचे आश्वासन.
- १९६४ ऑगस्ट २८, रशियाचा दौरा.
- १९६५, दिल्लीतील महाराष्ट्रीय शिक्षणसंस्थेच्या अध्यक्षपदी नियुक्ती
- १९६५ जानेवारी, नांदेड येथे भरलेल्या ४७ व्या अखिल मराठी नाट्य परिषद - अधिवेशनाचे उद्घाटक
- १९६६ जानेवारी, ताश्कंद येथे शास्त्रीजी - अयुबखान यांची चर्चा (कोसिजिन यांच्या प्रयत्नानुसार यशवंतराव उपस्थित)
- १९६६ नोव्हेंबर १४, केंद्रामध्ये गृहमंत्रीपदाची सूत्रे स्वीकारली.
- १९६९, कानपूर विश्वविद्यालयाची 'डॉक्टर ऑफ लॉ' सन्मानपूर्वक बहाल.
- १९७० जून २८, भारताच्या अर्थमंत्रिपदी नियुक्ती
- १९७०, औरंगाबाद मराठवाडा विद्यापीठाची 'डॉक्टर ऑफ लॉ' ही सन्मान पदवी.
- १९७४, कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठाची 'डॉक्टर ऑफ लॉ' ही पदवी.
- १९७४ ऑक्टोबर, भारताचे परराष्ट्रीय व्यवहार मंत्रीपदी नियुक्ती.
- १९७५, गियान, क्युबा, लेबेनॉन, इजिप्त, पेरू, अमेरिका, अफगाणिस्तान, इराक, कुवेत, फ्रान्स आदी राष्ट्रांना भेटी.
- १९७५ डिसेंबर, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, कराड येथे दुर्गा भागवतांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष.
- १९७६, परभणी, मराठवाडा कृषी विद्यापीठाची 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी' ही पदवी.
- १९७६, तुर्कस्थान, अल्जेरिया या देशांना भेटी.
- १९७६, सदिच्छा राजदूत म्हणून अमेरिकेतील होस्टन येथील टेक्सास शहरातर्फे मानपत्र.
- १९७७-७८, लोकसभेतील विरोधी पक्षनेतेपदी निवड (मान्यता प्राप्त अशा विरोधी पक्षाचे लोकसभेतील स्वातंत्र्यानंतरच्या काळातील पहिले विरोधी पक्ष नेते)
- १९७८, इंदिरा गांधी यांच्या बरोबर मतभेद होऊन संजीव रेड्डी काँग्रेसमध्ये प्रवेश.



- १९७८, महाराष्ट्रात शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली 'पुलोद' मंत्रिमंडळ स्थापन. (यशवंतरावांचा पुलोदला पाठिंबा असल्याचा संशय)
- १९७९, चरणसिंग मंत्रिमंडळात उपपंतप्रधान आणि गृहमंत्री
- १९८०, सातारा मतदारसंघातून लोकसभेवर निवड, संजीव रेड्डी काँग्रेसच्या वतीने महाराष्ट्रातून निवडून गेलेले एकमेव खासदार.
- १९८१, इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश
- १९८२, आठव्या अर्थ आयोगाचे अध्यक्ष
- १९८३ जून १, पत्नी सौ. वेणुताई यांचे निधन
- १९८४, पुणे विद्यापीठाने सन्माननीय डी. लिट्. ही पदवी बहाल केली.
- १९८४, 'कृष्णाकाठ' आत्मचरित्रग्रंथास साहित्यसम्राट न.चिं. केळकर पारितोषिक
- १९८४ नोव्हेंबर २५, सायंकाळी ७-४५ वाजता दिल्ली येथे निधन
- १९८४ नोव्हेंबर २७, दुपारी ३-४० वाजता कराड येथे कृष्णाकोयनेच्या प्रीतिसंगमावर अंत्यसंस्कार.
- १९८६ मे ३१, क्षेत्र माहुली, जि. सातारा येथील रामशास्त्री प्रभुणे प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा 'सामाजिक न्यास पुरस्कार' (मरणोत्तर)

○ ○ ○

## यशवंतरावांची समग्र ग्रंथसंपदा

- 'आपले नवे मुंबई राज्य' - प्रकाशक पुणे एस्. एस्. १९५७
- 'विचारधारा' - सागर प्रकाशन, मुंबई, १९६०
- 'महाराष्ट्राची धोरण सूची'- प्रकाशन विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई, १९६०
- 'महाराष्ट्र राज्य निर्मिती विधेयक' - प्रसिद्धी विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९६०
- 'महाराष्ट्र - म्हैसूर सीमा प्रश्न' - महाराष्ट्र राज्य प्रसिद्धी खाते, मुंबई, १९६०
- 'शिवनेरीच्या नौबती'- व्हीनस प्रकाशन, पुणे, १९६१
- 'सह्याद्रीचे वारे'- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, १९६२
- 'युगांतर' - कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७०
- 'Winds of change' - Somayya Publications, Bombay, 1973.
- 'ऋणानुबंध' - प्रेस्टीज प्रकाशन, पुणे, १९७५
- 'India's foreign Policy' - Somayya Publications, Bombay, 1978
- 'भूमिका' - प्रेस्टीज पब्लिकेशन्स, पुणे, १९७९
- 'The Making of India's foreign Policy' - Pub. New Delhi, Allied Publications Pvt. Ltd, 1980
- 'कृष्णाकाठ' - प्रेस्टीज पब्लिकेशन्स, पुणे, १९८४
- 'विदेश दर्शन' - यशोदा प्रकाशन, पुणे, १९८८
- 'यशवंतराव चव्हाण : शब्दांचे सामर्थ्य - यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, २०००



## ग्रंथाधार


१) अत्रे प्र.के., ललित वाङ्मय, २ री आ., पुणे, देशमुख आणि कंपनी, १९५२
२) अत्रे प्र.के., सिंहगर्जना, प्रथम आ., मुंबई, ग.पा.परचुरे प्रकाशन, १९५७
३) अत्रे प्र.के., आषाढस्य प्रथम दिवसे, प्रथम आ., मुंबई, परचुरे प्रकाशन मंदिर, १९६९
४) इनामदार हे.वि., रेळेकर वि.ना., मिरजकर नि.धों. (संपा.), नामदेव दर्शन, प्रथम आ., कोल्हापूर, नामदेव समाज उन्नती प्रकाशन, १९७०
५) कदम कोंडिबा गेनू , निवडुंग, प्रथम आ., मुंबई, मायबोली प्रकाशन, १९९९
६) कऱ्हाडे सदा, साहित्य विश्लेष., प्रथम आ., औरंगाबाद, स्वरूप प्रकाशन, १९९९
७) कऱ्हाडे सदा, चरित्र आणि आत्मचरित्र, प्रथम आ., मुंबई, प्रकाशक लोकवाङ्मयगृह, गिरगाव, १९७६
८) कल्याणकर बा.ह. (संपा.) युगंधर नेते : यशवंतराव चव्हाण, औरंगाबाद, प्रकाशक बा.ह.कल्याणकर
९) कायंदे-पाटील गंगाधर वि., यशवंतराव चव्हाण, प्रथम आ., नाशिक, प्रकाश पब्लिकेशन्स, २०००
१०) काळे बाबूराव, यशवंतराव चव्हाण, मुंबई, प्रकाशक नारायण दत्तात्रय रेगे, कृष्ण कमल, माहीम
११) काळे भगवान (संपा.), संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज, प्रथम आ., जालना, संकेत प्रकाशन, १९८८
१२) कुलकर्णी अनिरुद्ध अनंत (संपा.), प्रदक्षिणा खंड २ रा (इ.स.१९४७ ते २०००), २री आवृत्ती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९९८
१३) कुलकर्णी गो. म., वाटा आणि वळणे, प्रथम आ., बेळगाव, नवसाहित्य प्रकाशन, १९७५
१४) कुलकर्णी व.दि., कुलकर्णी गो.म. (संपा.), मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड सहावा, पुणे, महाराष्ट्र साहित्य परिषद.
१५) कुलकर्णी व.दि., मराठी साहित्य : विमर्श आणि विमर्शक, प्रथम आ., पुणे, पद्मगंधा प्रकाशन, २००१
१६) कुलकर्णी रंगनाथ, साहेब यशवंतरावजी चव्हाण, नाट्यरूपांतर, मुंबई, शुभा प्रकाशन, २०००

१७) केळकर भा.कृ. (संपा.) यशवंतराव राष्ट्रीय व्यक्तिमत्त्व, प्रथम आ., मुंबई,
प्रकाशक महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, १९८५
१८) कोतापले नागनाथ, साहित्याचा अन्वयार्थ, प्रथम आ., पुणे,
मेहता पब्लिशिंग हाऊस, १९९६
१९) खेर भा. द., अमृतपुत्र, प्रथम आ., पुणे, श्रद्धा प्रकाशन, १९९१
२०) खेर भा.द. , हिरोशिमा, प्रथम आ., पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९८४
२१) खोब्रेकर व्हि.जी. (संपा.), यशवंतराव चव्हाण विधिमंडळातील निवडक
भाषणे (१९४६ ते १९६८), प्रथम आ., मुंबई, यशवंतराव चव्हाण
प्रतिष्ठान, १९८९
२२) खांडेकर वि.स., रेषा आणि रंग, दुसरी आवृत्ती, पुणे,
मेहता पब्लिशिंग हाऊस, १९९७
२३) गणोरकर प्रभा, वाड्‌मयप्रकार आकलन आणि रसास्वाद, यशवंतराव चव्हाण
महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
२४) गोखले द.न., चरित्र चिंतन, प्रथम आ., मुंबई, मौज प्रकाशन गृह, २०००
२५) चव्हाण यशवंतराव, कृष्णाकाठ, प्रथम आ., पुणे, प्रेस्टीज पब्लिकेशन्स, १९८४
२६) चव्हाण यशवंतराव, ऋणानुबंध, २ री आवृत्ती, पुणे,
प्रेस्टीज पब्लिकेशन्स, १९८६
२७) चव्हाण यशवंतराव, सह्याद्रीचे वारे, ३ री आवृत्ती, मुंबई,
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, १९९२
२८) चव्हाण यशवंतराव, युगांतर, प्रथम आ., पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९७०
२९) चव्हाण यशवंतराव, भूमिका, प्रथम आ., पुणे, प्रेस्टीज पब्लिकेशन्स, १९७९
३०) चव्हाण यशवंतराव, शिवनेरीचे नौबती, प्रथम आ., पुणे, व्हिनस बुक, १९६१
३१) चव्हाण यशवंतराव, विचारधारा, मुंबई, सागर प्रकाशन, १९६०
३२) चव्हाण शिवाजीराव, यशोदीप, प्रथम आ., वाई, सुशिपांज प्रकाशन, २०००
३३) जाधव पंजाबराव, यशवंतराव चव्हाण जीवनदर्शन, पुणे,
कर्मवीर प्रकाशन, १९७०
३४) जाधव रा.ग., साहित्य आणि सामाजिक संदर्भ, प्रथम आ., पुणे,
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९७५
३५) जोशी अ.म., चरित्र आत्मचरित्र, २ री आवृत्ती, पुणे,
सुविचार प्रकाशन मंडळ, १९६५
३६) जोशी प्र.न., मराठी वाड्‌मयाचा विवेचक इतिहास, प्रथम आ., पुणे,



प्रसाद प्रकाशन, १९७९
३७) जोशी रामभाऊ (संपा.), विदेश दर्शन, प्रथम आ., पुणे, श्री यशोदा प्रकाशन, १९८८
३८) जोशी रामभाऊ, इतिहासाचे एक पान, पुणे, केसरी प्रकाशन, १९७६, जोशी रामभाऊ, सह्याद्रीवरील सूर्यास्त, सातारा, समर्थ प्रकाशन
३९) जोशी रामभाऊ, ही ज्योत अनंताची, प्रथम आ., पुणे, यशोदा प्रकाशन, १९८४
४०) ठकार निशिकांत, साहित्याचे परीघ, प्रथम आ., औरंगाबाद, स्वरूप प्रकाशन, २००१
४१) ठाकूर रविंद्र, यादव आनंद, व्यक्ती आणि वाङ्मय, प्रथम आ., पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९९३
४२) थोरात संभाजीबाबा, यशवंतराव चव्हाण झुंजार नेतृत्वाचा शोध आणि बोध, कऱ्हाड, आगाशिव प्रकाशन, १९८८
४३) पवार गो.मा. , हातकणंगलेकर म.द. (संपा.), मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप, १९५० ते १९७५, प्रथम आ., मुंबई, पॉप्युलर प्रकाशन, १९८६/१९८७
४४) पाटील अनंतराव, यशंवतराव चव्हाण, प्रथम आ., मुंबई, यशंवतराव चव्हाण प्रतिष्ठान, १९९७
४५) पाटील दिनकर, पवार जे.के., - प्रस्तावनाकार यशंवतराव चव्हाण, प्रथम आ., पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९९७
४६) पाटील वसंत केशव, पाटील विठ्ठल (संपा.), यशंवतराव चव्हाण विचार आणि वारसा, प्रथम आ.,कराड, प्रकाशक दीपक वि.पाटील, १९८९
४७) पाटील विनायक (संपा.), यशोधन, (यशवंतराव चव्हाणांचे निवडक विचार), २ री आवृत्ती, औरंगाबाद, साकेत प्रकाशन, १९८६
४८) पाटील विठ्ठलराव (संपादक/संग्राहक), यशवंतरावांच्या प्रस्तावना, प्रथम आ., पुणे, अमेय प्रकाशन, १९९८
४९) पाटील विठ्ठल, यशवंतराव चव्हाण विविधांगी व्यक्तिमत्त्व, प्रथम आ., औरंगाबाद, साकेत प्रकाशन, १९९४
५०) पाटील विठ्ठल, यशवंतराव चव्हाण विविधांगी व्यक्तिमत्त्व, प्रथम आ., औरंगाबाद, साकेत प्रकाशन, १९९४
५१) पाटील रा.तु., यशवंतराव चव्हाण : एक कर्तबगार पण वादग्रस्त मुत्सद्दी, प्रथम आ., कोल्हापूर, राजे-देसाई प्रकाशन, १९८६
५२) पारगावकर वि.श., आस्वाद आणि समीक्षा, प्रथम आ., पुणे,

प्रतिमा प्रकाशन, १९८९
५३) पोतदार वसंत ब., हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम, २ री आवृत्ती, आष्टा कासार, प्रकाशक पोतदार, १९८४
५४) प्रधान राम, यशवंतराव चव्हाण (संपा.), शब्दाचे सामर्थ्य, प्रथम आ., मुंबई, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, २०००
५५) प्रधान राम, बंधनाचे ऋण, प्रथम आ., पुणे, अमेय प्रकाशन, २००१
५६) प्रधान राम, वादळमाथा, प्रथम आ., पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९७०
५७) प्रभुणे रा.गो., (संपा.), लोकमानसातील यशवंतराव, प्रथम आ., पुणे, प्रकाशक इंद्रायणी साहित्य, १९८५
५८) फकीर राम, श्री यशवंतराव चव्हाण एक रसग्रहणात्मक अभ्यास, प्रथम आ., सांगली, अद्वैत प्रकाशन, १९७१
५९) फडके ना. सी., असे वक्ते ! अशी व्याख्याने, प्रथम आ., पुणे, व्हीनस प्रकाशन, १९६०
६०) फडके ना. सी., साहित्य आणि संसार, ३ री आवृत्ती, कोल्हापूर, प्रकाशक दा.ना. मोघे, स्कूल ॲन्ड कॉलेज बुकस्टॉल, १९६४
६१) फडके य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड ५ वा, प्रथम आ., पुणे, श्रीविद्या प्रकाशन, १९९७
६२) बागल भाई माधवराव, माझे यशवंतराव, कोल्हापूर, समाज प्रकाशन
६३) बाबर कृ.भा., (संपा.), यशवंतराव चव्हाण : व्यक्ती व कार्य, प्रथम आ., पुणे, ठोकळ प्रकाशन, १९६०
६४) बाबर सरोजिनी (संपा.), मी पाहिलेले यशवंतराव, प्रथम आ., मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, १९८८
६५) बेणारे गोपाळ, यशवंतरावांचे उत्तराधिकारी, प्रथम आ., पुणे, राम प्रकाशन, १९९३
६६) भागवत श्री.पु., सुधीर रसाळ, मंगेश पाडगावकर, शिल्पा तेंडुलकर, अंजली कीर्तने (संपा.), साहित्य : अध्यापन आणि प्रकार, प्रथम आ., मुंबई, मौज प्रकाशन गृह, १९८७
६७) भोसले एस्. एस्. (संपा.), साहित्यिक खांडेकर, प्रथम आ., कोल्हापूर, अजब पुस्तकालय, १९८०
६८) भोसले एस्. एस्., प्र.के.अत्रे, साहित्य आणि समीक्षा, प्रथम आ., कोल्हापूर, अजब पुस्तकालय, १९७६




६९) भोळे भास्कर लक्ष्मण, यशवंतराव चव्हाण राजकारण आणि साहित्य, औरंगाबाद, साकेत प्रकाशन

७०) महानोर ना.धों. , यशवंतराव चव्हाण, प्रथम आ., औरंगाबाद, साकेत प्रकाशन, १९९१

७१) मालुंजकर मच्छिंद्र, माझा प्रवास, १८५७ च्या बंडातील हकीकत. आस्वादन व मूल्यमापन, प्रथम आ., नगर, स्फूर्ती प्रकाशन, १९९४

७२) मारवाडे नरेंद्र, कृष्णाकाठ एक आस्वाद, प्रथम आ., औरंगाबाद, कैलास पब्लिकेशन्स, १९९८

७३) मारवाडे नरेंद्र, ऋणानुबंध एक आस्वाद, प्रथम आ., औरंगाबाद, नाथ प्रकाशन, वरळीबाग, १९९५

७४) मुलाटे वासुदेव, दलितांची आत्मकथने संकल्पना व स्वरूप, प्रथम आ., औरंगाबाद, स्वरूप प्रकाशन, १९९९

७५) मंगुडकर मा.प., यशवंतराव चव्हाण : प्रेरणा व कार्य, प्रथम आ., पुणे, प्रकाशक सौ. सुवर्णा मंगुडकर, चित्रे बंगला, सदाशिव पेठ, १९८६

७६) यादव आनंद, आत्मचरित्र मीमांसा , प्रथम आ., पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९९८

७७) रावते ग.की., मराठी चरित्र मूलतत्त्वे व समीक्षा, प्रथम आ., मुंबई, प्रकाशक सौ. सरोज रावते, समर्थ प्रकाशन, १९८५

७८) लुलेकर प्रल्हाद जी., वेदनांचा प्रदेश (मराठवाड्यातील दलित आत्मकथने), औरंगाबाद, कैलास पब्लिकेशन्स

७९) लेले ना.बा., भारतीय विचार साधना, प्रथम आ., पुणे, २००१

८०) शेवते अरूण, कृष्णाकाठचा माणूस, प्रथम आ., मुंबई, ऋतुरंग प्रकाशन, १९९३

८१) शेवते अरूण, साहेब संध्याकाळी भेटले, पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९९२

८२) शिंदे विठ्ठल रामजी, माझ्या आठवणी व अनुभव, पुणे, ३ री आवृत्ती, रा.वा.आंद्रे प्रकाशन, १९५८

८३) सरडे कृष्णराव, सरडे मोहन, रत्ने आणि मोती, कराड, व्हरायटी स्टोअर्स,

८४) साबळे तुकाराम लिंगोजी, भारतीय मल्लविद्याशास्त्र, प्रथम आ., कोल्हापूर, राजर्षी शाहू मल्लविद्या प्रकाशन, १९७४

८५) सावंत वसंत, प्रवासवर्णन एक वाङ्मयप्रकार, प्रथम आ., मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, १९८७

८६) साळुंखे पी.बी., राजर्षी शाहू गौरव ग्रंथ , मुंबई,

महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग सचिवालय, १९७६
८७) सूर्यवंशी उत्तम दीपाजी, मराठी मातीचे वैभव, प्रथम आ., नांदेड, सांगाती प्रकाशन, १९८९

○ ○ ○

## संदर्भसूची

### नियतकालिके - विशेषांक

१) कदम के.जी. (संपा.), यशवंतराव चव्हाण, झुंजार नेतृत्वाची एक झेप, सोलापूर, प्रकाशक, शकील प्रिंटर्स
२) कवठेकर बाळकृष्ण, अध्यक्षीय भाषण समरसता साहित्य परिषद, महाराष्ट्र, ३ रे समरसता साहित्य संमेलन, वाशी, नवी मुंबई, २०००
३) जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.), श्री यशवंतराव चव्हाण अभिनंदन ग्रंथ, नागपूर, ४८ वा जन्मदिन प्रकाशन
४) माने हनुमंतराव (संपा.), मा. कै. यशवंतराव चव्हाण व त्यांची सहकार चळवळ, स्मृती विशेषांक, मोडनिंब, प्रकाशक हनुमंतराव माने, २००१
५) सणगे शांताराम (संपा.), लोकराज्य, यशवंतराव चव्हाण स्मृती विशेषांक, मुंबई, महाराष्ट्र शासन, १९८५.

○ ○ ○

या पुस्तकात यशवंतरावांच्या साहित्याच्या आधारे त्यांचे समीक्षणात्मक लेखन आणि भाषण कौशल्य अथांग महासागरासारखे व्यापक कसे आहे, याची सोदाहरण चर्चा अतिशय मार्मिकपणे केली आहे. समीक्षक म्हणून यशवंतराव प्रथमच वाचकांसमोर येत आहेत. भाषा, कल्पनाशक्ती, वाङ्मयनिर्मिती आणि जीवन यांचे परस्पर नाते काय असते, संस्कृतीशी त्याचा अनुबंध कसा असतो हेही प्रस्तुत पुस्तकात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. शिवाय यशवंतरावांची निर्भीड भूमिका त्यांनी तेवढ्याच समर्थ शब्दांत कथन केली आहे. यशवंतरावांचे लेखन प्रामुख्याने आत्मचरित्रपर, प्रवासवर्णनपर, शब्दचित्रणात्मक, पत्रात्मक आणि ललितगद्य स्वरूपाचे आहे. यशवंतरावांच्या प्रासंगिक लेखांचा व भाषणांचाही या पुस्तकात विचार केला आहे.

हे मोलाचे कार्य डॉ. देशमुख यांनी अत्यंत कष्टाने, तळमळीने व तन्मयतेने केले आहे. त्याबद्दल त्यांचे कौतुकच केले पाहिजे. या निमित्ताने माझ्या या पुस्तकास व लेखक डॉ. शिवाजीराव देशमुख यांना शुभेच्छा !

**मा. नामदार सुशीलकुमार शिंदे**
केंद्रीय ऊर्जामंत्री, भारत सरकार

